## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/८९८

निर्णय दिनांक ०१-०८-२००८

| | | |
|---|---|---|
| १ श्री. राजेंद्र गुरुराज बहिरे,<br>माणिकनगर, माणिक चौक,<br>उस्मानाबाद | : | अपिलार्थी |

विरुध्द

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी<br>तथा जिल्हा पुरवठा अधिकारी,<br>बीड | : | |
| २ जन अपिलीय अधिकारी<br>तथा अपर जिल्हाधिकारी,<br>बीड | : | प्रतिवादी |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०१-०८-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस श्री. मोहन बालचंदराव कट्टे, जन माहिती अधिकारी तथा जिल्हा पुरवठा अधिकारी, बीड (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत तर अपिलार्थी श्री. राजेंद्र गुरुराज बहिरे व जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, बीड हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने सर्वप्रथम त्यांच्याकडील दिनांक १०-०७-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे ०१ जानेवारी २००० ते जुलै २००६ पर्यंतच्या कालावधीतील खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

“ माहितीचा अधिकार २००५ च्या अधिनियमातील कलम ४ (१) (ब) नुसार कार्यवाही करुन विविध प्रकारच्या १७ बाबींवरील प्रसिध्द केलेल्या माहितीची झेरॉक्स प्रत देण्यात यावी.  जिल्हा पुरवठा कार्यालयाने जिल्ह्यातील सर्व तालुक्यातील टक्केवारीनुसार गावनिहाय/विक्रेतानिहाय केरोसीन निश्‍चिती केलेल्या पत्रकाच्या झेरॉक्स प्रती देण्यात याव्यात.  बीड जिल्ह्यातील सर्व अर्धघाऊक व किरकोळ विक्रेत्यांना देण्यात येणारे केरोसीन नियतन, त्यांना जोडलेली शिधापत्रिकांची संख्या, त्यांचे कार्यक्षेत्रात असलेल्या गॅसधारकांची संख्या आदी माहिती देण्यात यावी.  तसेच जानेवारी २०००, जानेवारी २००१, जानेवारी २००२, जानेवारी २००३, जानेवारी २००४, जानेवारी २००५, जानेवारी २००६, जुन २००६, जुलै २००६ या महिन्यातील जिल्हास्तरावर काढण्यात आलेल्या केरोसीन नियतनाच्या झेरॉक्स प्रती देण्यात याव्यात.  तसेच जिल्ह्यातील सर्व तालुक्यातील १ व २ सिलेंडर असलेल्या गॅसधारकांच्या संख्येची सध्याची तसेच २०००, २००१ या सालाची माहिती देण्यात यावी.  सदरील माहिती तालुकानिहाय, व एजन्सीनिहाय द्यावी.

जिल्हा पुरवठा कार्यालयाच्या संगणकातील सर्व डाटा मला सीडी मध्ये देण्यात यावा. (सर्व डाटा शक्य नसल्यास केरोसीन संदर्भातील संपूर्ण डाटा देण्यात यावा.)

तरी संबंधीत माहिती झेरॉक्स करुन घेण्यासाठी तसेच संगणकातील डाटा घेण्याकरिता लागणा-या सीडीसाठी होणारा खर्च मी भरण्यास तयार आहे. तेव्हा वरील सर्व कागदपत्रे, सीडी, माहिती मला उपलब्ध करुन द्यावी ही विनंती.''

अपिलार्थीने सदर माहिती नोंदणीकृत टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २६-०७-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन, अपिलार्थीने मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांच्या कार्यालयात उपलब्ध नसल्याने व ती तालुका स्तरावरुन उपलब्ध करुन घेण्यासाठी किमान ३ महिने कालावधी लागण्याची शक्यता व्यक्त करुन माहिती उपलब्ध झाल्यानंतर अपिलार्थीस अवगत करण्यात येईल असे त्यांना कळविण्यात आले.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून तदनंतर माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार, जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०४-०९-२००६ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येते.

अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १८-०९-२००६ रोजी सुनावणी घेऊन यासंदर्भातील आपले आदेश दिनांक ०४-१०-२००६ रोजी पारित केले. या आदेशान्वये त्यांनी अपिलार्थीचे अपील मंजूर करुन जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस अधिनियमाप्रमाणे माहिती देण्याचे सूचित केले.

जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय देऊनही अपिलार्थीस माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये, राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०५-०१-२००७ रोजी व्दितीय अपील

केले.  सदर अपीलाची राज्य माहिती आयोगाच्या मुंबई येथील कार्यालयास दिनांक १५-०१-२००७ रोजी नोंदणी झाल्याचे दिसून येते.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी त्यांचे म्हणणे आयोगाकडे लिखीत स्वरुपात फॅक्सव्दारे पाठवून दिले असून, यामध्ये त्यांनी असे निवेदन केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांनी दिनांक १० जुलै २००६ रोजीच्या अर्जान्वये मागितलेली माहिती प्रथमतः दिनांक २९-०४-२००८ व नंतर दिनांक २७-०६-२००८ रोजी प्राप्त झाली आहे.  ही माहिती देण्यासाठी संबंधित जन माहिती अधिकारी यांना जवळ जवळ २ वर्षे विलंब लागलेला आहे.  या विलंबाबाबत आयोगाने नियमानुसार अपील निर्णय करावा, अशी त्यांनी या पत्रामध्ये अखेरीस विनंती केली आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप व तिची व्याप्ती मोठ्या प्रमाणात असल्याने व अपिलार्थीने मागितलेली माहिती पूर्णतः त्यांच्याकडे उपलब्ध नसल्याने व त्यातील काही माहिती त्यांना तालुकास्तरावरुन गोळा करुन ती अपिलार्थीस पुरविणे भाग असल्याने त्यांनी अपिलार्थीने मागितलेली माहिती जिल्ह्यातील सर्व तहसीलदारांकडून वेळोवेळी प्राप्त करुन घेण्याचा प्रयत्न केला.  अपिलार्थीस विलंबाने माहिती देण्यासाठी ते स्वतः प्रत्यक्ष जबाबदार नसून संबंधित तहसीलदारांकडून त्यांना विलंबाने माहिती प्राप्त झाल्याने अपिलार्थीस अंतिमतः विलंबाने माहिती प्राप्त झाली.  त्यांनी आपल्या युक्तिवादामध्ये पुढे शासनाकडून त्यांना रॉकेलचे नियतन कशा प्रकारे होते याची माहिती आयोगास दिली.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे दिसून येते की, अपिलार्थीने जन

माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती मोठ्या स्वरुपाची होती. जन माहिती अधिकारी यांनी आज रोजी जिल्हास्तरावर शासनाकडून रॉकेलचे नियतन मंजूर झाल्यानंतर त्याचे पुढे कशा प्रकारे वितरण होते या बाबतची माहिती आयोगास दिली. त्यांनी आयोगास यासंदर्भात अशी माहिती दिली की, एकदा शासनाकडून जिल्ह्याला रॉकेल व इतर जीवनावश्यक वस्तुंचे नियतन प्राप्त झाल्यानंतर ते सर्व तालुक्यातील तहसीलदारांची मागणी विचारात घेऊन त्यांना अंतर्गत नियतन करतात. तदनंतर तहसीलदार या वस्तुंचे, रॉकेलचे गांवनिहाय, दुकाननिहाय, किरकोळ परवाना विक्रेतेनिहाय असे वाटप करतात. अर्धघाऊक विक्रेत्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांच्या स्तरावरुन वाटप केले जाते, तसेच शिधापत्रिकासंदर्भात संबंधित माहिती तहसीलदार यांच्याकडे उपलब्ध असते. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये १ व २ सिलेंडर असलेल्या गॅसधारकांची संख्या व सन २००० व २००१ सालची माहिती मागितली होती. सदर माहिती सर्वसाधारणतः त्यांच्याकडे सहज उपलब्ध नसते, त्यामुळे या मुद्यावरील माहिती देखिल संबंधित तहसीलदारांकडून त्यांना प्राप्त करुन घेणे जरुरीचे आहे. आज रोजी आयोगाकडे पाठविलेल्या पत्रामध्ये अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्रथमतः दिनांक २९-०४-२००८ रोजी व नंतर दिनांक २७-०६-२००८ रोजी अशा दोन टप्प्यामध्ये माहिती प्राप्त झाल्याचे कबूल केले आहे. त्यांचा आता आक्षेप सदर माहिती विलंबाने प्राप्त झाली असल्याबाबतचा असल्याचे दिसून येत आहे. या प्रकरणी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांना प्रामुख्याने त्यांच्या सर्व सहाय्यकांकडून गोळा करुन घेऊन ती अपिलार्थीस पुरवावी लागणार होती, तथापि माहिती अधिकार अधिनियमातील कलम ६ (३) (एक) मधील तरतुदी लक्षात घेतल्यास असे दिसून येईल की, माहिती अधिकार अधिनियमान्वये जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील

उपलब्ध माहितीसंदर्भात अधिनियमातील कलम ७ प्रमाणे कारवाई करावयाची असते. अधिनियमातील कलम ६ (३) (एक) मध्ये असे स्पष्ट केले आहे की, अर्जदाराने मागणी केलेली माहिती एखाद्या प्राधिकरणाकडे उपलब्ध नसल्यास सदर माहिती ज्या प्राधिकरणा-कडे उपलब्ध आहे अशा प्राधिकरणाकडे संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीचा अर्ज त्यांना प्राप्त झाल्यापासून ५ दिवसाच्या आत पाठवून त्याची एक प्रत अर्जदारास देणे भाग आहे. या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीचा माहितीसाठीचा अर्ज त्यांना प्राप्त झाल्यानंतर ३० दिवसाच्या आत त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती देऊन, अपिलार्थीच्या अर्जाची प्रत संबंधित तहसीलदारांकडे पाठवून त्याची एक प्रत अपिलार्थीस दिली असती तर कदाचित अपिलार्थी त्यांना अपेक्षित असलेली माहिती विहित मुदतीत प्राप्त करु शकले असते, तथापि संबधित जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी अशा प्रकारची कोणतीही कारवाई केल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येत नाही. संबधित जन माहिती अधिकारी श्री. आर. आर. देशमुख हे आता नियत वयोमानानुसार शासनाच्या सेवेतून निवृत्त झाले असल्याने, ते जरी या प्रकरणी अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीस पात्र ठरत असले तरी, त्यांच्यावर कारवाई करता येणार नाही, मात्र या प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जे जन माहिती अधिकारी यांचे सहाय्यक अधिकारी / कर्मचारी जबाबदार आहेत, त्यांना माहिती अधिकार अधिनियमातील कलम ५ (५) नुसार जन माहिती अधिकारी म्हणून समजावे अशी तरतूद आहे, त्यामुळे जन माहिती अधिकारी यांचे सर्व सहाय्यक मात्र या तरतुदीप्रमाणे कारवाई करण्यास खचितच पात्र ठरत आहेत.

सबब जिल्हाधिकारी, बीड यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी बीड जिल्ह्यातील ज्या तहसीलदारांनी अधिनियमातील

विहित केलेल्या मुदतीपेक्षा अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जास्त कालावधी लावलेला आहे त्या सर्वांवर त्यांनी प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य प्रशासकीय कारवाई हे आदेश निर्गमीत होताच दोन महिन्याच्या आत करुन तदनंतर आपला अनुपालन अहवाल आयोगास एक महिन्याच्या आत सादर करावा. अपिलार्थीस आता विनामूल्य माहिती प्राप्त झाली असल्याने त्यांना माहिती देण्यासंदर्भात कोणतेही आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालील प्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जिल्हाधिकारी, बीड यांनी, संबधित जन माहिती अधिकारी यांना सहाय्य करण्यासाठी, या प्रकरणी जे अधिकारी / कर्मचारी जबाबदार आहेत व ज्यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी अधिनियमातील विहित केलेल्या कालावधीपेक्षा जास्त विलंब लावला आहे, त्या सर्वांवर त्यांनी प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य प्रशासकीय कारवाई हे आदेश निर्गमीत होताच दोन महिन्याच्या आत करुन तदनंतर आपला अनुपालन अहवाल तदनंतर आयोगास एक महिन्याच्या आत सादर करावा.

औरंगाबाद
दिनांक ०१-०८-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. राजेंद्र गुरुराज बहिरे, माणिकनगर, माणिक चौक, उस्मानाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा जिल्हा पुरवठा अधिकारी, बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जिल्हाधिकारी, बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१४२२

निर्णय दिनांक ०१-०८-२००८

| | | |
|---|---|---|
| १ श्री. कावळे प्रभुलिंग जगन्नाथ,<br>मु. पो. बावी, तालुका वाशी,<br>जिल्हा उस्मानाबाद | : | अपिलार्थी |
| | विरुध्द | |
| १ जन माहिती अधिकारी<br>तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय,<br>बावी, तालुका वाशी, जिल्हा उस्मानाबाद | : | |
| २ जन अपिलीय अधिकारी<br>तथा गट विकास अधिकारी, पंचायत<br>समिती, वाशी, तालुका वाशी,<br>जिल्हा उस्मानाबाद | : | प्रतिवादी |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०१-०८-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस श्री. गिते बलभिम आंबादास, जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, बावी (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. संजीवन जालींदर दराडे, जन अपिलीय अधिकारी तथा गट

विकास अधिकारी, पंचायत समिती, वाशी (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत तर अपिलार्थी श्री. कावळे प्रभुलिंग जगन्नाथ हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने सर्वप्रथम त्यांच्याकडील दिनांक ०९-१०-२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे ग्रामपंचायतच्या ८ अ कर आकारणी अर्जाच्यासंदर्भात सन १९६२-६३ या कालावधीशी संबंधित खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

> " साल - सन १९६२/६३ चे ८ अ कर आकारणी रजिस्टर मधील घर नं. ३७८ ची प्रमाणित रेकॉर्ड मधील (मालमत्ता उतारा) नक्कल मिळणेबाबत. ग्रा.पं. बावी येथील."

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिश: अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २०-१०-२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस खालीलप्रमाणे उत्तर दिले.

" सन १९६२/६३ चे ८ अ कर आकारणी रजीस्टरमधील घर क्र. ३७८ ची नक्कल मागणी केली आहे या कार्यालयात सन १९६२/६३ चे ८ अ रजिस्टर प्रमाणीत केलेले दिसुन येत नाही. तरि आपण दिलेल्या माहीतीच्या आधीकाराच्या अर्जाच्या उत्तरी आपणास हि माहीती देण्यात आली."

जन माहिती अधिकारी यांच्या या उत्तराने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार, जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २१-११-२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येते.

अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणत्याही प्रकारे सुनावणी घेतल्याचे अथवा अपिलार्थीस यासंदर्भात कोणताही पत्रव्यवहार केल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येत नाही.

जन अपिलीय अधिकारी व जन माहिती अधिकारी यांच्याकडून मिळालेल्या अशा प्रकारच्या नकारात्मक प्रतिसादाने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये, राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २८-०१-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेऊन संबंधित ग्रामपंचायतचे प्रमाणित नमुना प्रत ८ अ कर आकारणी रजिस्टर कोणाच्या ताब्यात आहे या मुद्दयावर अतिरिक्त माहिती विचारल्याचे दिसून येते.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. त्यामुळे त्यांनी, आयोगाकडे सादर केलेल्या व्दितीय अपील अर्जामधील त्यांचे लेखी म्हणणे हाच त्यांचा युक्तिवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने ज्या रजिस्टरमधील माहिती त्यांच्याकडे मागितली आहे ते रजिस्टर त्यांच्या ताब्यात नाही. ते या पदावर सन २००५ पासून कार्यरत असून यापूर्वी या पदावर कार्यरत असलेल्या ग्रामसेवकाने त्यांना संबंधित रजिस्टर हस्तांतरीत केले नाही, त्यामुळे अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेली माहिती ते देऊ शकले नाहीत.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, जन माहिती अधिकारी यांनी ग्रामसेवक बावी या पदाचा पदभार स्वीकारण्यापूर्वी तेथे श्री. ए.

बी. शेख नावाचे ग्रामसेवक (सध्या ते ग्रामपंचायत डिकसळ तालुका कळंब येथे कार्यरत आहेत) कार्यरत होते, त्यांच्याकडून संबंधित रजिस्टर त्यांना प्राप्त झालेला नाही. श्री. शेख यांच्याकडून सदर रजिस्टर प्राप्त करुन घेऊन १५ ते २० दिवसाच्या आत अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती देण्यास ते तयार आहेत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, उस्मानाबाद जिल्हा परिषदेच्या ग्रामपंचायत स्तरावरील कारभार कशा पध्दतीने चालला आहे, हे दिसून येते. कोणत्याही ग्रामपंचायतीस त्यांच्या हद्दीतील मालमत्ता कर हा त्यांच्या उत्पन्नाचे प्रमुख साधन असते, तथापि या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी या पदाचा पदभार घेतल्यापासून म्हणजेच, २००५ या सालापासून बावी ग्रामपंचायतीकडे कर आकारणी रजिस्टर उपलब्ध नाही. (जुन्या काळातील कर आकारणी रजिस्टर उपलब्ध नाही) जन माहिती अधिकारी यांना त्यांच्या कार्यालयाशी संबंधित कोणतीही माहिती आयोगास स्पष्टपणे विषद करुन देता आली नाही. जन अपिलीय अधिकारी यांनी देखिल या पदाचा नव्याने पदभार घेतला असल्याने त्यांनाही या प्रकरणाविषयी आयोगास स्पष्टीकरण देता आले नाही, हे पाहता जन अपिलीय अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ज्या रजिस्टरमध्ये समाविष्ट आहे त्या रजिस्टरचा त्यांनी हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत कसोशीने शोध घ्यावा व जर संबंधित रजिस्टर गहाळ झाल्याचे त्यांना आढळले तर संबंधित दोषी व्यक्तीविरुध्द त्यांनी आवश्यकतेनुसार एफ.आय.आर. दाखल करावा.

उपरोक्त प्रकरणी संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मागितलेली माहिती देण्याचे नाकारुन, त्यांना माहिती देण्यासंबंधात कोणतीही सकारात्मक

कारवाई या घटनाक्रमाच्या कोणत्याही टप्प्यावर न करुन, त्यांनी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे. सबब असे आदेशित करण्यात येते की, जन माहिती अधिकारी यांनी दर्शविलेल्या आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांनी प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई हे आदेश निर्गमीत होताच २ महिन्याच्या आत करुन तदनंतर एक महिन्याच्या आत आपला अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा. अपिलार्थीस माहिती देण्याच्या दृष्टीने जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच २० दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालील प्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच २० दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

३. जन माहिती अधिकारी यांनी उपरोक्त प्रकरणी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा

परिषद, उस्मानाबाद यांनी प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई हे आदेश निर्गमीत होताच २ महिन्याच्या आत करुन तदनंतर एक महिन्याच्या आत आपला अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा.

४. जन अपिलीय अधिकारी यांनी वरील निणयामध्ये दिलेल्या आदेशाप्रमाणे कार्यवाही करावी.

औरंगाबाद
दिनांक ०१-०८-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. कावळे प्रभुलिंग जगन्नाथ, मु. पो. बावी, तालुका वाशी, जिल्हा उस्मानाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, बावी, तालुका वाशी, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, वाशी, तालुका वाशी, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१४२५

निर्णय दिनांक ०१-०८-२००८

१ श्री. सदाशिव सटवा रायबोळे, : अपिलार्थी

व्दारा : ॲड जि. एस. रायबोळे,

सरस्वती कॉलनी, किनवट,

जिल्हा नांदेड

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी :

तालुका कृषि अधिकारी कार्यालय, माहूर,

तालुका माहूर, जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा तालुका कृषि अधिकारी माहूर,

तालुका माहूर, जिल्हा नांदेड

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी : कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, माहूर, तालुका माहूर, जिल्हा नांदेड

**<u>निर्णय</u>**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०१-०८-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस श्री. बापूराव नामदेवराव बेबडे, जन माहिती

अधिकारी तथा कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, माहूर (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. दिगांबर माधवराव तपासकर, जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, माहूर (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत तर अपिलार्थी श्री. सदाशिव सटवा रायबोळे हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने सर्वप्रथम त्यांच्याकडील दिनांक १२-१२-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयातर्फे माहूर तालुक्यातील महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत केल्या जाणा-या जलसंधारण, कामासाठी धान्य, या राष्ट्रीय कार्यक्रमाअंतर्गत हाती घेतल्या गेलेल्या सर्व कामांची सन २००४ ते २००६ या कालावधीशी संबंधित खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

> “ (१) वरील कामावरील उपस्थित मजुरांची यादी, मजुरांचे नावा, गावा सहीत यादीची छायांकीत प्रत तसेच कामावर उपस्थित मजुरांचे भरलेल्या हजेरी मस्टरच्या यादीची छायांकीत प्रत (२) तसेच कामावर उपस्थित मजुरांना धान्य दिलेल्या स्वस्त धान्य दुकानदारांची नावा, गावासहीत माहिती देणे. (३) तसेच कुशल, अकुशल कामावर झालेल्या खर्चाची संपुर्ण माहिती देणे, (४) सर्व प्रकारच्या केलेल्या कामाची सद्यास्थिती काय आहे याची संपुर्ण माहिती देणे.”

अपिलार्थीने सदर माहिती शीघ्र टपालाने अपेक्षिली असून या अर्जामध्ये ते दारिद्र्य-रेषेखालील व्यक्ती असल्याचे नमूद केले आहे.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २९-१२-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस माहिती देण्याकामी

लागणारा खर्च रुपये १३,२६१ ची तरतूद त्यांच्याकडे नसल्याचे कळवून व या संदर्भात वरिष्ठ कार्यालयाकडून तरतूद प्राप्त होताच अपिलार्थीस माहिती देण्याचे आश्वासीत केले.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून मिळालेल्या अशा प्रकारच्या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार, जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १८-०१-२००७ रोजी प्रथम अपील केले.

अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २२-०२-२००७ रोजी त्यांच्या कार्यालयात सुनावणी आयोजित केली होती, तथापि अपिलार्थी या सुनावणीस अनुपस्थित राहिल्याने, अपिलार्थीचे काहीही म्हणणे नाही, असे जन अपिलीय अधिकारी यांनी अनुमान काढून त्यांच्याकडील दिनांक २२-०२-२००७ रोजीच्या आदेशानुसार त्यांनी अपिलार्थीचे अपील निकाली काढले.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये, राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०४-०५-२००७ रोजी व्दितीय अपील केले. या अपील अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येते.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. त्यामुळे त्यांनी, आयोगाकडे सादर केलेल्या व्दितीय अपील अर्जामधील त्यांचे लेखी म्हणणे हाच त्यांचा युक्तिवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना पुरविण्यासाठी एकूण १३,२६१ रुपये इतका खर्च होणार होता, अपिलार्थी हे दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असल्याने त्यांना अपिलार्थीस ही माहिती

विनामूल्य पुरवावी लागणार होती. अपिलार्थीस विनामूल्य माहिती उपलब्ध करुन देण्यासाठी त्यांच्याकडे आवश्यक त्या निधीची तरतूद नव्हती त्यामुळे अपिलार्थीस ते, त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती पुरवू शकले नाहीत, अपिलार्थीने मागितलेल्या माहितीमधील मस्टरच्या झेरॉक्स प्रती हा भाग वगळता उर्वरित सर्व मुद्दयावरील माहिती ते आता अपिलार्थीस १० दिवसाच्या आत विनामूल्य देण्यास तयार आहेत. अपिलार्थीचा मुलगा स्वत: ॲडव्होकेट असून वडिलाच्या नावाने तो सर्व सार्वजनिक प्राधिकरणाकडे अशा प्रकारच्या विस्तृत व्याप्ती असलेल्या माहितीची मागणी नेहमीच करत असतो. यापूर्वी अशा माहितीची मागणी अपिलार्थीने केल्यानंतर माहितीच्या स्वरुपाप्रमाणे त्यांना ती वेळोवेळी पुरविण्यात आली आहे, परंतु या ठिकाणी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी येणा-या खर्चाची तरतूद त्यांच्याकडे नसल्यामुळे त्यांना ही माहिती अपिलार्थीस पुरविता आली नाही. सदर तरतूद प्राप्त करुन घेण्याकरिता त्यांनी जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी, नांदेड यांच्याकडे दिनांक १५-०२-२००७ रोजी मागणी केली होती. तथापि अद्यापही त्यांना कार्यालयीन खर्चाकरिता आवश्यक ते अनुदान प्राप्त झाले नाही.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीच्या दिनांक १८-०१-२००७ रोजीच्या अपील अर्जावर त्यांनी दिनांक २२-०२-२००७ रोजी सुनावणी ठेवली होती, तथापि या सुनावणीस अपिलार्थी हे गैरहजर राहिल्याने त्यांनी अपिलार्थीचे दिनांक २२-०२-२००७ रोजीचे अपील निकाली काढले. अपिलार्थीने त्यांच्या मूळ माहितीमध्ये ज्या मस्टरचा संदर्भ दिला आहे, त्या मस्टरच्या प्रती त्यांच्या कार्यालयात उपलब्ध असून अपिलार्थीने मागणी केल्यास या प्रती अपिलार्थीस कार्यालयीन वेळेमध्ये ते पाहण्यासाठी उपलब्ध करुन देऊ शकतील.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे एकूण ४ मुद्दयावर माहिती मागविली असून या माहितीची व्याप्ती जरी विस्तृत प्रमाणात असली तरी ही माहिती अपिलार्थीस देणे, हे जन माहिती अधिकारी यांना अशक्यप्राय असे काम होते असे आयोगास वाटत नाही. जन माहिती अधिकारी यांचा, अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेल्या माहितीच्या मस्टरच्या छायांकीत प्रती देण्यासाठी आवश्यक ते अनुदान उपलब्ध नव्हते, हा मुद्दा जरी वादाप्रित्यर्थ ग्राह्य धरला तरी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील उर्वरित ३ मुद्दे, जसे उपस्थित मजुरांना स्वस्त धान्य दिलेल्या दुकानदारांची नांवा गावासह यादी, कुशल व अकुशल कामावर झालेला खर्च व कामाची सद्य:स्थिती या ३ मुद्दयावरील माहिती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात सर्वसाधारण परिस्थितीत उपलब्ध असणे अभिप्रेत आहे, कारण रोजगार हमी योजने अंतर्गत शासनाच्या प्रत्येक क्षेत्रीय कार्यालयाने केलेल्या कामासंदर्भातील (ज्यामध्ये सर्वसाधारणपणे या मुद्दयांचा समावेश असतो) अहवाल संबधित जिल्ह्याच्या जिल्हाधिका-यांना नियमितपणे पाठविण्याची पध्दत प्रचलीत आहे. जिल्हाधिका-यांना पाठविण्यात येणा-या माहितीमध्ये यातील काही मुद्दयांचा समावेश असतो. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे स्वस्त धान्य दुकानदारांच्या नावांच्या गावनिहाय यादीची मागणी केली आहे, ही यादी देखिल जन माहिती अधिकारी यांना त्यांच्या कार्यालयातील संबंधित क्षेत्रीय अधिका-यांकडून मागवून घेऊन अपिलार्थीस देणे अवघड होते असे आयोगास वाटत नाही, त्यामुळे आयोग असे अनुमान काढत आहे की, केवळ अपिलार्थीस द्यावयास लागणा-या माहितीपोटीच्या अनुदानाअभावी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस उर्वरित ३ मुद्दयावर माहिती देण्याचे सहेतुकपणे टाळले आहे.

जन माहिती अधिकारी यांनी आपल्या अशा कृतीव्दारे त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे, असे आयोगाचे मत आहे. त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल त्यांना आता आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत असून त्यांनी येथून पुढे, त्यांच्याकडे प्राप्त होणा-या माहिती अधिकार अधिनियमातील माहितीसाठीच्या अर्जावर अधिनियमातील तरतुदीप्रमाणे व सतर्कतेने कारवाई करावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी, नांदेड यांना असे सूचित करण्यात येत आहे की, त्यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी लागणा-या आवश्यक त्या खर्चाकरिता योग्य ते अनुदान जन माहिती अधिकारी यांना ४ महिन्याच्या आत उपलब्ध करुन द्यावे. अपिलार्थीस असे सूचित करण्यात येते की, त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे एक तर त्यांच्या कार्यालयात जाऊन माहितीच्या संबधित पृष्ठांची पहाणी करुन त्यातील आवश्यक ती माहिती स्वतः किंवा इतर प्रतिनिधीमार्फत लिहून काढावी किंवा जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयास आवश्यक ते अनुदान प्राप्त होण्याची वाटत पहावी. या प्रकरणी सचिव (कृषी) यांनी देखिल लक्ष घालून केवळ अनुदानाअभावी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीच्या अंमलबजावणीसंदर्भात त्यांच्या कार्यक्षेत्रात जेथे जेथे अशा अडचणी आहेत तेथे तेथे आर्थिक अनुदान तात्काळ पुरविण्यासंदर्भात आवश्यक ती कार्यवाही प्राधान्याने करावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

<u>आदेश</u>

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील मस्टर्सच्या प्रती हा मुद्दा वगळून उर्वरित सर्व मुद्दयावरील सर्व माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच १० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. जन माहिती अधिकारी यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत आहे.

औरंगाबाद
दिनांक ०१-०८-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. सदाशिव सटवा रायबोळे, व्दारा : ॲड जि. एस. रायबोळे, सरस्वती कॉलनी, किनवट, जिल्हा नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, माहूर, तालुका माहूर, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी माहूर, तालुका माहूर, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ सचिव (कृषि) मंत्रालय, मुंबई – ३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१४२७

निर्णय दिनांक ०२-०८-२००८

| | | |
|---|---|---|
| १ श्री. संतोष यल्हाजी बांगर,<br>रा. हिंगोली. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी<br>तथा मुख्याधिकारी,<br>नगर परिषद, हिंगोली<br>जि. हिंगोली. | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी<br>तथा उपआयुक्त (सा.प्र.),<br>विभागीय आयुक्त कार्यालय,<br>औरंगाबाद. | | |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०२.०८.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्री. संतोष यल्हाजी बांगर (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), श्री. विठ्ठल दिगंबरराव डाके, जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगरपरिषद, हिंगोली जि.हिंगोली (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. सोमनाथ गुंजाळ, जन अपिलीय अधिकारी तथा उपआयुक्त (सा.प्र.), विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजरआहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी सर्वप्रथम त्यांचेकडील दि.१२.२.२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे नगरपालिकेसंदर्भात २००० साली घेतल्या गेलेल्या सार्वजनिक निवडणूकीसंदर्भात खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

> " निवडणुक दरम्यान कर्मचाऱ्यांना देण्यात आलेला भता व किती कर्मचाऱ्यांना देण्यात आला व न देण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांची यादी. त्या संदर्भात संपूर्ण बजेट व मंजुरीनिधी यांची संपूर्ण कागदोपत्री माहिती मिळणे. "

अपिलार्थी यांनी सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ३.३.२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयात उपलब्ध असलेल्या माहितीचे अवलोकन करुन त्यातील आवश्यक त्या माहितीसाठीच्या शुल्काचा भरणा करुन माहिती हस्तगत करण्याचे सूचित केले.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या अशाप्रकारच्या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. २५.४.२००७ रोजी प्रथम अपील केले आहे. या नंतर परत जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. २६.४.२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती पुरविली. अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ६.६.२००७ रोजी अंतिम सुनावणी घेऊन या संदर्भातील आपले आदेश दि. २७.६.२००७ रोजी पारित केले. या आदेशाद्वारे त्यांनी अपिलार्थीचे अपील मान्य करुन अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती सविस्तर स्वरुपात सात दिवसांच्या आत देण्याचे जन माहिती अधिकारी यांना

सूचित केले. जन अपिलीय यांच्या निर्णयानुसार जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. १७.७.२००७ रोजी आवश्यक ती माहिती रजिस्टर्ड पोस्टाने पाठविली. या माहितीचे अवलोकन करता, ही माहिती अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीशी सुसंगत असल्याचे दिसून येते, तथापि जन अपिलीय अधिकारी यांचे आदेश पारित होण्यापूर्वीच दि. २५.६.२००७ रोजी अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलाची राज्य माहिती आयोगाचे कार्यालयात दि. २७.६.२००७ रोजी नोंद झाल्याचे दिसून येते. सदर अपील अर्जात त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येते.

आज रोजी झालेल्या सुनावणीचे वेळी अपिलार्थी यांनी त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त झाल्याचे व सदर माहितीने त्यांचे समाधान झाल्याचे मान्य केले आहे.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस आता आवश्यक ती माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाली असल्याने, अपिलार्थीचे आयोगाकडे त्यांनी केलेले द्वितीय अपील खारीज करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१ अपील क्र.१४२७/२००७ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०२-०८-२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. संतोष यल्हाजी बांगर, मंगळवारा बाजार, हिंगोली, जि.हिंगोली.

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपआयुक्त (सा.प्र.),विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१४२८

निर्णय दिनांक ०२-०८-२००८

| | | |
|---|---|---|
| १ श्री. ज्ञानेश्वर दगडू बोरसे,<br>औरंगाबाद. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी<br>तथा गट विकास अधिकारी,<br>पंचायत समिती, सिल्लोड,<br>जि.औरंगाबाद. | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी<br>तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,<br>जिल्हा परिषद, औरंगाबाद. | | |

प्रत्यक्ष जन अपिलीय अधिकारीः अति.मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, औरंगाबाद.

**<u>निर्णय</u>**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०२.०८.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी श्री. ज्ञानदेव अर्जुन जायभाये, विस्तार अधिकारी (पं), जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, सिल्लोड जि.औरंगाबाद यांचे प्रतिनिधी (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. अरुण लक्ष्मणराव डुबे, जन अपिलीय अधिकारी तथा अति. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी

असे संबोधण्यात येईल) हे हजरआहेत, तर अपिलार्थी श्री. ज्ञानेश्वर दगडू बोरसे (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) हे गैरहजरआहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी सर्वप्रथम त्यांचेकडील दि.१६.०३.२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

> " डि.एम.व्यवहारे, येथे कार्यरत असतांना (प.सं.)त्यांच्याकडे पाणीपुरवठा विभागाचा कार्यभार कुठून कुठल्या दिनांकापर्यंत होता, त्यांच्या कार्यकाळात झालेला एकून खर्च किती ? काढण्यात आलेल्या प्रत्येक देयकाची (बिलाची) तारीखवाईज छायांकित सत्यप्रत देण्यात यावी, सरकारी टँकर व खाजगी टँकर किती लावण्यात आले आणि लॉगबूकसहित आदीचा छायांकित प्रत देण्यात यावी. तसेच त्यांच्या कार्यकाळात झालेल्या अर्थिक व्यवहाराचे लेखा परिक्षण झाले आहे काय ? झाले असल्यास त्याची छायांकित सत्यप्रत देण्यात यावी.

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येत नाही. तथापि त्यांच्याकडील दि. ४.५.२००७ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटी शुल्क रु.२६२८०/- त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. दरम्यानच्या कालावधीत जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणत्याही प्रकारे माहिती न मिळाल्याने अपिलार्थीने माहितीचा

अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांचेकडे कलम १९(१) अन्वये दि. २५.४.२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १८.६.२००७ रोजी सुनावणी होऊन त्यांनी या  संदर्भातील आपले आदेश दि. २५.६.२००७ रोजी पारित केले आहेत. सदर सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित होते, असे जन अपिलीय अधिकारी यांनी सांगितले. जन अपिलीय अधिकारी यांनी या आदेशाद्वारे जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस पत्र देऊन त्यांच्याकडील अभिलेखे पाहणी करण्यासाठी एका विशिष्ट दिवशी बोलावून त्यातील अपिलार्थीस आवश्यक असलेल्या अशा कागदपत्रांच्या झेरॉक्स प्रती अपिलार्थीस देण्याचे सूचित केले. सदर माहिती अपिलार्थीस सशुल्क पुरवावी असेही त्यांनी या आदेशामध्ये म्हटले आहे. जन अपिलीय अधिकारी यांच्या या अपील निर्णयानुसार जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दि. ५.७.२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयात दि. २८.७.२००७ रोजी हजर राहण्याचे सूचित केले. तथापि जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १३.७.२००७ रोजी द्वितीय अपील करणे पसंत केले. या अपील अर्जामध्ये त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्या समोरील सुनावणीमध्ये जन माहिती अधिकारी यांनी खोटी बतावणी करुन, या बतावणीवर जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय दिल्याचे नमूद करुन, आपल्या मूळ माहितीची मागणी या अर्जामध्ये कायम ठेवली आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत, त्यामुळे त्यांनी दाखल केलेल्या द्वितीय अपील अर्जातील त्यांचे लेखी म्हणणे, हाच त्यांचा युक्तीवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने असा युक्तीवाद केला की, अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीची पृष्ठ संख्या व माहितीपोटीच्या शुल्काची कल्पना त्यांनी दि. १९.३.२००७ रोजी प्रत्यक्ष त्यांच्याबरोबर झालेल्या तोंडी चर्चेमध्ये दिली होती. तथापि या चर्चेसंदर्भातील कोणतीही लेखी कागदपत्रे त्यांच्याकडे आजरोजी उपलब्ध नाहीत. अपिलार्थीस त्यांनी त्यांच्याकडील दि. ४.५.२००७ रोजीच्या प्रथम पत्रान्वये त्यांनी मागणी केलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. २६,२८०/- त्यांच्या कार्यालयात भरणा करण्याचे सूचित केले. तथापि अपिलार्थीने शुल्क भरले नसल्याने त्यांनी अपिलार्थीस माहिती पुरविली नाही.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थीस दि. २५.४.२००७ रोजीच्या अपील अर्जावर त्यांनी दि. १८.६.२००७ रोजी सुनावणी घेतली व यासंदर्भातील आदेश दि. २५.६.२००७ रोजी पारित केले. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे हजर होते व त्यावेळी अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेल्या माहितीसाठी लागणाऱ्या शुल्काची कल्पना जन अपिलीय अधिकारी यांनी दिली होती. त्यांच्या समोर अपिलार्थीने सदर शुल्क जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात भरण्याचे कबूल केले. परंतु प्रत्यक्षात त्यांनी सदर शुल्क जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात अद्यापपावेतो भरले नाही व जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात समक्ष अभिलेखे पाहणीसाठी ते उपस्थित राहिले नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीच्या दि. १६.३.२००७ रोजीच्या प्रथम अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि. १९.३.२००७ रोजी तोंडी प्रतिसाद दिला, असे जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे आहे. तथापि या संदर्भात त्यांनी कोणताही ठोस पुरावा आयोगासमोर लेखी स्वरुपात सादर केला नाही. उपरोक्त कागदपत्रावरुन असे निदर्शनास येते की, अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी सर्वप्रथम दि. ४.५.२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क त्यांना कळविले. सदर प्रतिसाद अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीपेक्षा विलंबाने दिला असल्याने अधिनियमातील कलम ७(६) ची तरतुद येथे लागू होत आहे. आज सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगाने त्यांना सुनावणी नोटिशीमध्ये याची पूर्वसूचना देऊनही त्यांच्याकडील आवक-जावक नोंदवहीची प्रत आयोगास सादर केली नाही. यावरुन त्यांनी अपिलार्थीस प्रत्यक्षात पत्रव्यवहार केला आहे किंवा कसे हे कळण्यास मार्ग नाही. या सर्व कारणास्तव अपिलार्थी यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती विनामूल्य देय ठरते. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच २० दिवसांच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थीने व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्याने अपिलार्थीस असे सूचित करण्यात येते की, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात २० दिवसांचे आत स्वतः उपस्थित राहून जन माहिती अधिकारी यांच्याकडून ही माहिती विनामूल्य प्राप्त करुन घ्यावी. अपिलार्थीच्या कोणत्याही प्रतिनिधीस ( तो

अपिलार्थीने प्राधिकृत केलेला असला तरीही) ही माहिती देय राहणार नाही. तसेच हे आदेश निर्गमित झाल्यापासून २० दिवसांनंतर ही माहिती अपिलार्थीस देय राहणार नाही.

उपरोक्त प्रकरणी संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त होण्यापासून कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय दीर्घ कालावधीसाठी वंचित ठेवल्याचे दिसून येते. त्यांच्या अशाप्रकारच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांनी त्यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य प्रशासकीय कार्यवाही दोन माहिन्याचे आत करुन त्यानंतर एक महिन्याचे आत आपला अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१ अपील मान्य करण्यात येत आहे.

२ जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच वीस दिवसांचे आत विनामूल्य पुरवावी.

३ अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात व्यक्तिशः उपस्थित राहून त्यांना आवश्यक असलेली माहिती हस्तगत करावी

४ मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांनी संबंधित जन माहिती अधिकारी यांनी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल व बेपर्वाईबद्दल त्यांच्यावर प्रचलित सेवा नियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई हे आदेश निर्गमित होताच दोन महिन्याच्या आत करुन

आपला अनुपालन अहवाल तद्नंतर एक महिन्याच्या आत आयोगास सादर करावा.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०२-०८-२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. ज्ञानेश्वर दगडू बोरसे, एन-९,ए-११५, ३२/३, शिवनेरी कॉलनी, सिडको, औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, सिल्लोड जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१४३१

निर्णय दिनांक ०४-०८-२००८

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. कंजे मनोहरराव पंढरीनाथ,<br>क्रांती निवास, नरोड गल्ली, बिलोली,<br>जिल्हा नांदेड | : | अपिलार्थी |
| | विरुध्द | | |
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा तालुका कृषि अधिकारी कार्यालय,<br>लोहा, तालुका लोहा, जिल्हा नांदेड | : | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा तालुका कृषि अधिकारी,<br>तालुका कृषि अधिकारी कार्यालय, लोहा,<br>तालुका लोहा, जिल्हा नांदेड | : | प्रतिवादी |
| प्रत्यक्ष | जन माहिती अधिकारी | : | कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, लोहा, तालुका लोहा, जिल्हा नांदेड |

**<u>निर्णय</u>**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०४-०८-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. कंजे मनोहरराव पंढरीनाथ (यापुढे

त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), श्री. उत्तम गंगाराम मॅनमवार, जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, लोहा (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. नारायण टिकाराम गुट्टे, जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, लोहा (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने सर्वप्रथम त्यांच्याकडील दिनांक ०६-०३-२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रातील रोजगार हमी योजनेच्या कामाची सन २००५ ते २००६ या कालावधीशी संबंधित माहिती खालीलप्रमाणे मागितली होती.

> " मौजे मंगरुळ (पो) २/१४ एनबी, २ बी/१५, २/१६ मानाबा, कापसी (बु) ढाबंध दगडगाव १/९, वडेपूरी १/९, सोनखेड १/१, लोहा २०/४, मस्की ३/१३, ३/४, टेळकी १/१४-१/३-१/४, माळेगाव ४/१२-१/६-४/७, जानापूरी १/११, जोशीसांगवी ३C/८, सावरगाव न ३/२-३/४, रायवाडी ३/६-४/१-४/२-४/३, बोरगाव आ १/४, पारडी १/६ आदी गावातील मानाबा व शेतळ्यावरील उपस्थीत मजुरांच्या हजेरी पुस्तीका पेशीटच्या सत्यप्रती, कामाचे अंदाजपत्रक, ज्या शेतात कामे केली त्या शेतक-याचे पूर्ण नांव पत्ता व ७/१२ आदी संपूर्ण माहिती मिळणे बाबत."

अपिलार्थीने सदर माहिती टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०२-०४-२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या

माहितीपोटीची पृष्ठ संख्या व प्रतिपृष्ठ दर कळवून त्यांना जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात एकूण १२२० रुपये भरण्याचे या पत्राव्दारे सूचित केले.

जन माहिती अधिकारी यांनी सूचना देऊनही अपिलार्थीने त्यांच्या कार्यालयात शुल्क न भरुन माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार, जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १३-०४-२००७ रोजी प्रथम अपील केले.

अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्याकडे दिनांक ०७-०५-२००७ रोजी सुनावणी ठेवली होती, तथापि अपिलार्थीच्या गैरहजेरीमुळे सदर सुनावणी होऊ शकली नाही.

जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीच्या अपील अर्जावर कोणताही निर्णय प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये, राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २३-०७-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येते.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी मागणी केलेली त्यांच्या मूळ अर्जातील माहिती अद्यापपावेतो त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाली नाही, तसेच अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांचे कथित दिनांक ०२-०४-२००७ रोजीचे पत्र प्राप्त झाले नाही व त्यांना आजही त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागितलेल्या माहितीची आवश्यकता आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ०६-०३-२००७ रोजीच्या अर्जान्वये मागणी केलेल्या माहिती अर्जासंदर्भात

त्यांनी दिनांक ०२-०४-२००७ रोजी प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेल्या माहितीच्या संभावीत पृष्ठांची संख्या ६१० इतकी कळवून, यापोटी त्यांना भराव्या लागणा-या प्रती प्रतिपृष्ठ २ रुपये याप्रमाणे रुपये १२२० इतके शुल्क त्यांच्या कार्यालयात भरणा करण्याचे सुचविले. तथापि या शुल्काचा भरणा अपिलार्थीने त्यांच्या कार्यालयाकडे न केल्याने अपिलार्थीस ते माहिती पुरवू शकले नाहीत.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने दिनांक १३-०४-२००७ रोजी या विषयासंदर्भात त्यांच्या कार्यालयाकडे प्रथम अपील केले, त्यावेळी ते या पदावर कार्यरत नव्हते, त्यामळे संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या अपील अर्जाची सुनावणी का घेतली नाही याची कारणे ते आज रोजी सांगू शकत नाहीत. त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थीच्या प्रथम अपिलाची सुनावणी तत्कालीन जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०७-०५-२००७ रोजी ठेवली होती, तथापि या सुनावणीस अपिलार्थी हे गैरहजर राहिल्याने त्यांच्या प्रथम अपील अर्जावर त्यांनी कोणतेही आदेश पारित केले नाहीत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे दिसून येते की, अपिलार्थीच्या दिनांक ०६-०३-२००७ रोजीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील कलम ७ च्या विहित तरतुदीमध्ये दिनांक ०२-०४-२००७ रोजीच्या पत्राव्दारे अपेक्षित प्रतिसाद दिला आहे. या पत्रामध्ये त्यांनी अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटी भराव्या लागणा-या शुल्काचा संपूर्ण हिशोब, (पृष्ठांची संख्या व प्रतिपृष्ठ दर), जो जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील कलम ७ (३) च्या तरतुदीप्रमाणे देणे अभिप्रेत आहे,

त्यांना पुरविला आहे, त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील तरतुदीप्रमाणे विहित कालावधीत केलेली कारवाई येथे वैध ठरत आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस हे पत्र पाठविल्याचे त्यांच्याकडील जावक नोंदवहीच्या रजिस्टरवरुन सिध्द करुन दिले आहे, मात्र हे पत्र अपिलार्थीस प्राप्त झाले नाही, असे अपिलार्थी यांचे म्हणणे आहे. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती आज रोजी तयार असून, ते ती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच ८ दिवसाच्या आत सशुल्क पुरविण्यास तयार आहेत.

अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपोटीचे शुल्क जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस आवश्यक त्या हिशोबाच्या तपशिलासह अधिनियमाव्दारे विहित मुदतीत कळविले असल्यामुळे व अपिलार्थीने सदर शुल्काचा त्यांच्याकडे भरणा न केल्यामुळे, अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य देय होणार नाही. अपिलार्थीस शुल्क भरण्याचे पत्र पाठविल्याचे जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील जावक नोंदवहीवरुन सिध्द केले आहे, हे पाहता आता जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस ही माहिती सशुल्क द्यावी लागेल. सदर माहिती जन माहिती अधिकारी हे अपिलार्थीस ७ दिवसाच्या आत देण्यास तयार आहेत. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत सशुल्क पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२.  जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत सशुल्क पुरवावी.

औरंगाबाद
दिनांक   ०४-०८-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१  श्री. कंजे मनोहरराव पंढरीनाथ, क्रांती निवास, नरोड गल्ली, बिलोली, जिल्हा नांदेड.

२  जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, लोहा, तालुका लोहा, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३  जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, लोहा, तालुका लोहा, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४  निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१५४५

निर्णय दिनांक ०४-०८-२००८

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. प्रदीप वासुदेव पुरंदरे, | : | अपिलार्थी |
| | सहाय्यक प्राध्यापक, | | |
| | वाल्मी, औरगाबाद | | |
| | विरुध्द | | |
| १ | जन माहिती अधिकारी | : | |
| | वाल्मी, कांचनवाडी, | | |
| | औरंगाबाद | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी | : | प्रतिवादी |
| | तथा अधीक्षक अभियंता व सह संचालक, | | |
| | वाल्मी, औरंगाबाद | | |

| | | | |
|---|---|---|---|
| प्रत्यक्ष | जन माहिती अधिकारी | : | प्रशासकीय अधिकारी, वाल्मी, कांचनवाडी, औरंगाबाद |
| | जन अपिलीय अधिकारी | : | प्राध्यापक (पदोन्नती), वाल्मी, कांचनवाडी, औरंगाबाद |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०४-०८-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. प्रदीप वासुदेव पुरंदरे (यापुढे त्यांना

अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), श्री. मनोज रघुनाथ अवलगांवकर, जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, वाल्मी, औरंगाबाद (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. दत्तात्रय हरिश्चंद्र पवार, जन अपिलीय अधिकारी तथा प्राध्यापक (पदोन्नती), वाल्मी, औरंगाबाद (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने सर्वप्रथम त्यांच्याकडील दिनांक १०-०५-२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्रपाठक या पदावरुन प्राध्यापक या पदावर पदोन्नती करण्यामध्ये त्यांच्या कार्यालयामार्फत पाठविल्या जाणा-या पध्दतीविषयी खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

" Procedure for promotion of Reader to Professor under Career Advancement Scheme (CAS)

Ref: 1. WALMI No. ADM/EST-1/950/2006 dt. 1/7/2006 (Marathi circular – Seniority list of faculty members)

2. GOM/Higher & Technical Education Department (Marathi) No. USG-1210/(28/02)/ Vi Shi -4 dt. 27/02/2002.

It is requested to please inform me whether Ref-2 cited above is applicable to WALMI. If yes, whether it was scrupulously followed while giving promotion to Associate Professors as Professors in WALMI under CAS ? Whether the workload of Associate Professors designated as Professor (Promotion) is as per said Ref-2 ? "

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीमध्ये कोणताही प्रतिसाद दिला नसल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन आढळून येत आहे.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून विहित मुदतीत कोणताही प्रतिसाद न मिळाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार, जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १८-०६-२००७ रोजी प्रथम अपील केले.

जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीचा अपील अर्ज प्राप्त झाल्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक ३०-०६-२००७ रोजीच्या त्यांच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांना अपेक्षित असलेली माहिती दिनांक ३१ जुलै २००७ पर्यंत देण्यात येईल, असे कळविले व तदनंतर त्यांच्याकडील दिनांक ३१-०७-२००७ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीस अंशतः माहिती पुरविली आहे.

अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी न घेता जन माहिती अधिकारी यांना दिनांक ३१-०७-२००७ रोजी माहिती देण्याचे निर्देश देण्यात येत असल्याचे व याव्दारे त्यांचे दिनांक १८-०७-२००७ रोजीचा अपील अर्ज निकाली काढत असल्याचे त्यांच्याकडील दिनांक २७-०६-२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस कळविले.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये, राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०५-०९-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी, जन

माहिती अधिकारी यांनी, त्यांना अधिनियमाव्दारे विहित केलेली माहिती न देता माहिती देण्यास विलंब लावला, जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या अपील अर्जावर कोणताही निर्णय दिला नाही, जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक ३१-०७-२००७ रोजीच्या पत्राव्दारे दिलेली माहिती दिशाभूल करणारी आहे, त्यांनी अपिलार्थीस कोणतीही माहिती दिली नाही व त्यांच्या मूळ अर्जातील क्रमांक २ च्या प्रश्नावर कोणतेही उत्तर त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाले नाही, प्राध्यापक श्री. डी. एच. पवार यांची जन अपिलीय अधिकारी म्हणून केलेली नेमणूक योग्य नाही, कारण प्राध्यापक पवार यांना पदोन्नती प्राप्त झाल्यानंतर त्यांनी श्री. पवार यांच्या पदोन्नतीबाबत काही प्रश्न उपस्थित केले होते. वास्तविकत: त्यांनी मागितलेली माहिती श्री. पवार यांच्या पदोन्नतीशी संबंधित असल्याने श्री. पवार यांनी या अपिलाची सुनावणी घेण्याचे नाकारणे योग्य ठरले असते, अशा सर्व बाबींचा उल्लेख करुन, त्यांना त्यांनी दिनांक १०-०५-२००७ रोजीच्या अर्जाप्रमाणे माहिती मिळावी व जन माहिती अधिकारी यांच्याविरुध्द अधिनियमातील तरतुदीनुसार आवश्यक ती कारवाई करावी, अशी आयोगास विनंती केली आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी त्यांच्या दिनांक १०-०५-२००७ रोजीच्या अर्जामध्ये संदर्भ क्रमांक २ मध्ये निर्देशित केलेले परिपत्रक हे "वाल्मी" या संस्थेला लागू आहे किंवा कसे याची माहिती जन माहिती अधिकारी यांनी द्यावी, कारण सदर माहिती प्राप्त झाल्याने "वाल्मी" या संस्थेच्या प्रशासनामध्ये बदल संभवणार आहे. त्यांनी आपल्या युक्तिवादाच्या शेवटी आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जातील त्यांचे म्हणणे कायम असल्याचा पुनरुच्चार केला.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थी-च्या दिनांक १०-०५-२००७ रोजीच्या अर्जास माहिती अधिकार अधिनियमातील विहित मुदतीमध्ये त्यांच्याकडून कोणताही प्रतिसाद देण्यात आला नाही, अपिलार्थीने त्या महिन्यात माहितीसाठी एकूण १० अर्ज केल्याने त्यांना माहिती देण्यासाठी हा विलंब लागला आहे. त्यांनी आपल्या युक्तिवादामध्ये पुढे असे स्पष्ट केले आहे की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये संदर्भित केलेल्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या दिनांक २७-०२-२००२ च्या परिपत्रकातील सूचनांचे व तरतुदींचे त्यांनी पदोन्नती देतांना पालन केले नाही. सहयोगी प्राध्यापक या पदावरुन प्राध्यापक या पदावर पदोन्नती देतांना उच्च व तंत्र शिक्षण खात्याच्या दिनांक २७-०२-२००२ रोजीच्या परिपत्रकातील सुचनांचे पालन न केल्या गेल्याने अपिलार्थीस त्यांच्या अर्जातील उर्वरित मुद्दयावर माहिती देण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये त्यांच्या संस्थेला उच्च व तंत्र शिक्षण खात्याचे दिनांक २७-०२-२००२ रोजीचे परिपत्रक लागू आहे किंवा कसे असे विचारले आहे, याबाबत जन माहिती अधिकारी यांनी असे स्पष्ट केले आहे की, अपिलार्थीच्या या मुद्दयासंदर्भात शासनाचे दिनांक २७-०२-२००२ चे परिपत्रक त्यांच्या संसथेला लागू आहे किंवा कसे याबाबत त्यांना सदर बाब संबंधित समितीच्या पुढे विचारार्थ ठेऊन नंतर त्यावर निर्णय घ्यावा लागेल.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, ‘‘वाल्मी’’ या संस्थेने मूलतः जन अपिलीय अधिकारी या पदावर अधीक्षक अभियंता तथा सह संचालक, वाल्मी, या पदावरील अधिका-याची नेमणूक केली होती. पूर्वी या पदावर श्री. ए. के. घाटे हे अधीक्षक अभियंता तथा सह संचालक कार्यरत होते. श्री. घाटे हे दिनांक २५-०७-२००७ पासून रजेवर गेले. त्यांच्या रजेच्या कालावधीमध्ये तात्पूरती प्रशासकीय

व्यवस्था म्हणून त्यांच्याकडे (श्री. डी. एच. पवार – विषय : कृषि) जन अपिलीय अधिकारी या पदाचा कार्यभार सोपविला गेला होता. तदनंतर श्री. घाटे हे रजेवरुन परत आल्यानंतर काही कालावधीकरिता त्यांनी जन अपिलीय अधिकारी म्हणून कार्यभार सांभाळला, तथापि तदनंतर ते नियत वयोमानानुसार मे २००८ अखेरीस सेवानिवृत्त झाल्याने या पदाचा कार्यभार आता ते सांभाळत आहेत. विचाराधीन प्रकरणामध्ये सहयोगी प्राध्यापक या पदावर पदोन्नती देतांना शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या दिनांक ११-१२-१९९९ च्या परिपत्रकातील मार्गदर्शक तत्वाप्रमाणे पदोन्नती दिली गेली. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये संदर्भित केलेल्या दिनांक २७-०२-२००२ च्या उच्च व तंत्र शिक्षण खात्याच्या परिपत्रकातील मार्गदर्शक तत्वे ''वाल्मी'' या संस्थेला लागू करावयाची किंवा कसे याबाबतचा निर्णय घेण्यास ''वाल्मी'' या संस्थेतील नियामक मंडळ हे सक्षम प्राधिकरण आहे. अद्यापपावेतो त्यांच्याकडे हा विषय मांडला गेलेला नाही. या नियामक मंडळाचे अध्यक्ष जलसंपदा विभागाचे सचिव असतात.

''वाल्मी'' या संस्थेने जन अपिलीय अधिकारी या पदावर त्यांची दिनांक २५-०७-२००७ रोजी तात्पूरत्या स्वरुपात जन अपिलीय अधिकारी म्हणून नेमणूक केली. त्यांनी दिनांक २५-७-२००७ रोजी एक तात्पूरती प्रशासकीय व्यवस्था म्हणून पदभार स्वीकारला होता. त्यांनी पदभार स्वीकारते वेळी अंदाजे १५ अपील प्रकरणे निर्णयाअभावी प्रलंबीत होती, त्यामुळे त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक १८-०६-२००७ रोजीच्या अपील अर्जावर अधिनियमातील विहित मुदतीत निर्णय घेण्याच्या दृष्टीने सुनावणी न घेता अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक २७-०७-२००७ रोजीचे पत्रान्वये आपला निर्णय कळविला.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या दिनांक १०-०५-२००७ रोजीच्या अर्जान्वये मागणी केलेली माहिती मूळात माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या ‘‘माहिती’’ या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत नाही. त्यांच्या मूळ अर्जाचे अवलोकन केले असता असे दिसून येईल की, त्यांनी एकूण ३ प्रश्नार्थक मुद्दयांवर जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागितली होती, त्यापैकी पहिल्या मुद्दयामध्ये त्यांनी उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे दिनांक २७-०२-२००२ चे परिपत्रक ‘‘वाल्मी’’ संस्थेस प्रपाठक ते सहयोगी प्राध्यापक या पदावर पदोन्नती देण्यासाठी लागू आहे किंवा कसे ही माहिती विचारली आहे, तर प्रश्न क्रमांक २ वर जर हे परिपत्रक वाल्मी संस्थेस लागू असेल तर त्यांनी सहयोगी प्राध्यापक या पदावर पदोन्नती देतांना या परिपत्रकातील तरतुदींची कसोशीने अंमलबजावणी केली आहे किंवा कसे हा प्रश्न विचारला आहे तर यातील मुद्दा क्रमांक ३ मध्ये सहाय्यक प्राध्यापकांना प्राध्यापक हे पदनाम देतांना त्यांच्या मूळ पदावरील कार्यभार विचारात घेतला आहे किंवा कसे याची त्यांनी माहिती मागितली आहे. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मध्ये ‘‘माहिती’’ या शब्दाची व्याख्या व माहिती देणे या प्रक्रियेमध्ये अपेक्षिलेली कार्यवाही आणि जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागितलेली माहिती व अपेक्षिलेली कारवाई या दोन्ही बाबी अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत नाहीत. माहिती अधिकार अधिनियमामध्ये अपिलार्थीने प्रश्न विचारणे व त्याची जन माहिती अधिकारी यांनी उत्तरे देणे, अशा प्रकारची प्रक्रिया अभिप्रेत नाही. माहिती अधिकार अधिनियमामध्ये जन माहिती अधिकारी यांची भूमिका एक विश्वस्ताची असून, त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या माहितीचे जतन करणे

व मागणीनुसार ती अर्जदारांना पुरविण्याबाबत विहित मुदतीत निर्णय घेणे हे जन माहिती अधिकारी यांचे अधिनियमातील तरतुदीनुसार प्रमुख कर्तव्य आहे.

उपरोक्त प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या अर्जास अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणत्याही प्रकारचा प्रतिसाद दिलेला नाही. अपिलार्थीच्या दिनांक १०-०५-२००७ रोजीच्या मूळ अर्जातील माहिती त्यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक ३१-०७-२००७ रोजीच्या पत्रान्वये दिली आहे. या प्रकरणी मूळात उच्च व तंत्र शिक्षण खात्याच्या दिनांक २७-०२-२००२ च्या परिपत्रकातील तरतुदी ''वाल्मी'' या संसथेला लागू होतात किंवा कसे याची माहिती त्यांना हवी असल्याचे दिसून येत आहे. तथापि विचाराधीन प्रकरणामध्ये ''वाल्मी'' या संस्थेमध्ये उच्च व तंत्र शिक्षण खात्याच्या दिनांक २७-०२-२००२ च्या परिपत्रकातील सूचनेप्रमाणे अद्याप, या तरतूदी लागू होतात किंवा कसे याचा निर्णय झाला नसल्याचे दिसून येत आहे. तेव्हा उपरोक्त प्रकरणी त्यांनी संदर्भीय पदोन्नतीशी संबंधित नस्तीच्या तपासणीची जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केल्यास त्यांच्या शंकांचे समाधान होऊ शकेल, असे आयोगास वाटते. सबब त्यांना असे सूचविण्यात येते की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे संबंधित नस्तीच्या तपासणीची मागणी करावी.

अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्या नेमणुकीविरुध्द नोंदविलेले त्यांच्या व्दितीय अपिल अर्जामध्ये नोंदविलेले आक्षेप राज्य माहिती आयोग फेटाळून लावत आहे, कारण जन अपिलीय अधिकारी म्हणून कोणाची नेमणूक करावयाची याचे पूर्ण अधिकार ''वाल्मी'' या संस्थेला आहेत. त्यांनी एक तात्पूरती प्रशासकीय व्यवस्था म्हणून श्री. डी. एच. पवार यांची जन अपिलीय अधिकारी म्हणून नेमणूक केलेली आहे. जन अपिलीय

अधिकारी म्हणून कर्तव्य पार पाडत असतांना त्यांची नेमणूक एक अर्धन्यायिक प्राधिकरणाची असून त्यांनी उपरोक्त प्रकरणी, कोणती कारवाई करणे उचित राहिले असते यावर अपिलार्थीने व्दितीय अपील अर्जामध्ये अभिप्राय देणे उचित नाही, त्यामुळे अपिलार्थीचे जन अपिलीय अधिकारी यांच्यासंबंधाने उपस्थित केलेले मुद्दे आयोग फेटाळून लावत आहे, मात्र जन माहिती अधिकारी यांनी त्यांना विलंबाने माहिती दिल्याचे येथे निःसंशयपणे सिध्द होत आहे. अपिलार्थीच्या दिनांक १०-०५-२००७ रोजीच्या अर्जास सर्वसाधारण परिस्थितीत जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या अर्जाच्या संदर्भातील निर्णय दिनांक ०९-०६-२००७ रोजी अगर तत्पूर्वी पारित होणे अपेक्षित होते. उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी एकूण ५१ दिवस इतका विलंब लावल्याचे दिसून येत आहे. सदर विलंबाचे समर्थन करतांना त्यांनी अपिलार्थीने त्यांच्याकडे या महिन्यामध्ये माहितीसाठीचे १० अर्ज केल्याने अपिलार्थीस माहिती देण्यासाठी विलंब लागला असे स्पष्ट केले आहे. त्यांचा हा युक्तिवाद येथे मान्य करण्यात येत नाही, कारण माहिती अधिकार अधिनियमामध्ये कोणत्या नागरिकाने किती अर्ज करावेत यावर कोणतेही बंधन नाही, मात्र त्यांनी माहिती अधिकार अधिनियमामध्ये कलम ६ नुसार माहितीची मागणी केली असता ती तपासून त्यावर आपला निर्णय जन माहिती अधिकारी यांनी ३० दिवसात देणे हे अधिनियमातील कलम ७ च्या तरतुदीनुसार त्यांच्यावर बंधनकारक आहे.

उपरोक्त प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी अधिनियमाव्दारे घातलेले विहित मुदतीचे बंधन पाळलेले नाही. एवढेच नव्हे तर त्यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी लावलेल्या विलंबाची जी कारणे आयोगास त्यांच्या युक्तिवादामध्ये स्पष्ट केली आहेत ती कोणासही पटण्यासारखी नाहीत, कारण अपिलार्थीने मागितलेल्या माहितीचे स्वरुप हे सरळ व सोपे होते. अपिलार्थीस आवश्यक ती माहिती

अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीमध्ये देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना त्यांच्याकडील मनुष्यबळ अथवा त्यांच्या कार्यालयाची साधनसामुग्री प्रमाणाबाहेर वळवावी लागली असती अशातली कोणतीही बाब येथे संभवत नव्हती. अपिलार्थीने ज्यांच्याकडे माहितीची मागणी केली ते तत्कालीन जन माहिती अधिकारी आज रोजी सेवेत कार्यरत नाहीत. त्यामुळे त्यांना उपरोक्त प्रकरणी या टप्प्यावर त्यांच्या बचावाची संधी देणे आयोगास योग्य वाटते.

सबब संबंधित जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीस माहिती प्राप्त करुन घेण्याप्रीत्यर्थ कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय अधिनियमातील विहित कालावधीपेक्षा जास्त कालावधीकरिता वंचित ठेवल्याबद्दल त्यांचेवर विलंबाच्या प्रतिदिनी रुपये २५० /- याप्रमाणे (५१ दिवसांसाठी) एकूण रुपये १२,७५० /- (रुपये बारा हजार सातशे पन्नास) इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ३० दिवसाच्या आत सरळ आयोगास सादर करावा. विहित मुदतीत त्यांचा खुलासा आयोगाकडे प्राप्त न झाल्यास, त्यांना या प्रकरणी काहीही सांगावयाचे नाही असे गृहीत धरुन हेच आदेश अंतिम करण्यात येतील. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये प्रश्नार्थक स्वरुपात जन माहिती अधिकारी यांच्याकडे खुलासे अपेक्षित करणारी माहिती विचारली आहे ती त्यांना देय होत नाही, तथापि आज रोजी सुनावणीमध्ये उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी मूळ अर्जाव्दारे विचारलेल्या प्रश्नाबाबत अपिलार्थीस योग्य तो खुलासा १५ दिवसाच्या आत विनामूल्य करण्याचे मान्य केले आहे, हे पाहता त्यांनी अपिलार्थीस आवश्यक तो खुलासा कबूल केलेल्या मुदतीमध्ये द्यावा, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

प्रसंगावशात् उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने उच्च व तंत्र शिक्षण खात्याच्या दिनांक २७-०२-२००२ रोजीच्या परिपत्रकातील विहित पध्दतीचे ''वाल्मी'' या संस्थेने पालन केल्यास त्यायोगे ''वाल्मी'' च्या प्रशासकीय व क्षेत्रिय रचनेमध्ये व्यापक बदल होणे संभवत आहे असे प्रतिपादन केले आहे, त्यांच्या या मुद्दयाची गांभीर्याने दखल घेऊन, वाल्मी या संस्थेच्या नियामक मंडळाचे अध्यक्ष या नात्याने त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या या अर्जामध्ये उपस्थित केलेला प्रश्न प्राधान्याने सोडवावा असे सचिव (जलसंपदा) त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. संबंधित जन माहिती अधिकारी यांना त्यांनी अपिलार्थीस माहिती प्राप्त करुन घेण्याप्रीत्यर्थ कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय अधिनियमातील विहित कालावधीपेक्षा जास्त कालावधीकरिता वंचित ठेवल्याबद्दल त्यांचेवर विलंबाच्या प्रतिदिनी रुपये २५० /- याप्रमाणे एकूण रुपये १२,७५० /- (रुपये बारा हजार सातशे पन्नास) इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ३० दिवसाच्या आत सरळ आयोगास सादर करावा. विहित मुदतीत त्यांचा खुलासा आयोगाकडे प्राप्त न झाल्यास, त्यांना या प्रकरणी काहीही सांगावयाचे नाही असे गृहीत धरुन हेच आदेश अंतिम करण्यात येतील.

३.	सचिव (जलसंपदा) यांनी उच्च व तंत्र शिक्षण खात्याच्या दिनांक २७-०२-२००२ रोजीच्या परिपत्रकाची "वाल्मी" या संस्थेने अंमलबजावणी करण्यासंदर्भात योग्य तो निर्णय त्वरित घ्यावा.

औरंगाबाद
दिनांक	०४-०८-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१	श्री. प्रदीप वासुदेव पुरंदरे, सहाय्यक प्राध्यापक, वाल्मी, कांचनवाडी, औरगाबाद.

२	जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, वाल्मी, कांचनवाडी, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३	जन अपिलीय अधिकारी तथा प्राध्यापक (पदोन्नती), वाल्मी, कांचनवाडी, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४	सचिव (जलसंपदा विभाग), मंत्रालय, मुंबई – ३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५	निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१५४६

निर्णय दिनांक ०४-०८-२००८

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. सुनिल पंढरी शिरसाट,<br>मु. पो. घोडेगाव, तालुका गंगापूर,<br>जिल्हा औरंगाबाद | : | अपिलार्थी |
| | विरुध्द | | |
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक),<br>जिल्हा परिषद, औरंगाबाद | : | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी,<br>जिल्हा परिषद, औरंगाबाद | : | प्रतिवादी |

**<u>निर्णय</u>**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०४-०८-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. सुनिल पंढरी शिरसाट (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), श्री. श्रीकांत पंडितराव कुलकर्णी, उपशिक्षणाधिकारी, जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांचे प्रतिनिधी (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. अरुण

लक्ष्मणराव डुबे, जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने सर्वप्रथम त्यांच्याकडील दिनांक १०-०४-२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक २३-०२-२००७ या कालावधीशी संबंधित खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

> " जा. क्र. /जिपऔ/शिक्षण/प्रावि-११/२००७ कार्यालय जिल्हा परिषद, औरंगाबाद दिनांक २३-०२-२००७ या आदेशाची स्थळप्रत मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांनी स्वाक्षरी केलेला आदेश."

अपिलार्थीने सदर माहिती रजिस्टर्ड टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीने त्यांचा मूळ अर्ज मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांच्याकडे दिनांक २०-०४-२००७ रोजी प्रत्यक्षतः सादर केला. तदनंतर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांनी अपिलार्थीचा हा अर्ज शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांच्याकडे दिनांक २६-०४-२००७ रोजी पाठवून दिला.

अपिलार्थीच्या या अर्जास संबंधित जन माहिती अधिकारी तथा शिक्षणधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १०-०५-२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटी एकूण ३४ रुपये इतके शुल्क त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले.

संबंधित जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी यांनी दिलेल्या सुचनेनुसार अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात दिनांक २६-०६-२००७ रोजी

आवश्यक त्या शुल्काचा भरणा केल्यानंतर त्यांनी अपिलार्थीस दिनांक ०२-०७-२००७ रोजी माहिती पुरविली. तथापि जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार, जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १०-०७-२००७ रोजी प्रथम अपील केले.

अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २७-०८-२००७ रोजी सुनावणी घेऊन या संदर्भातील आपले आदेश दिनांक २९-०८-२००७ रोजी पारित केले आहेत. या आदेशामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांना, त्यांनी अपिलार्थीस दिलेली माहिती योग्य असल्याबाबत खात्री करुन घ्यावी व अपिलार्थीस पुनःश्च साक्षांकीत प्रत देण्यात यावी असे कळविले.

जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या या आदेशानुसार जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक ३०-०८-२००७ रोजी परत माहिती पुरविली आहे. तथापि जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या या माहितीने समाधान न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये, राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १८-०९-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी त्यांना चुकीची व दिशाभूल करणारी माहिती दिल्याचे नमूद करुन त्यांच्यावर अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे कारवाई करण्याची आयोगास विनंती केली आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, जन अपिलीय अधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस देण्यात आलेली माहिती योग्य असल्याची खात्री करुन तदनंतर साक्षांकीत प्रत

द्यावी, असे आदेश देऊनही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक ३०-०८-२००७ रोजी माहिती देतांना ती परत साक्षांकीत करुन दिलेली नाही, त्यामुळे त्यांच्यावर अधिनियमातील कलम २० प्रमाणे कारवाई करावी.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेला दिनांक २३-०२-२००७ रोजीचा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांनी स्वाक्षरी केलेला आदेश मूळात आस्त्विातच नाही. या प्रकरणी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांनी दिनांक २०-०९-२००६ रोजी अपिलार्थीच्या सेवाविषयक बाबीसंदर्भात एक आदेश पारित केला होता व सदर आदेश त्यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक ०२-०३-२००७ च्या पत्रान्वये पाठविला होता. याबाबतचा खुलासा त्यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक ०२-०७-२००७ रोजीच्या पत्रामध्ये केलेला आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीच्या दिनांक १०-०७-२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर त्यांनी दिनांक २७-०८-२००७ रोजी सुनावणी घेऊन यासंदर्भातील आपले आदेश दिनांक २९-०८-२००७ रोजी पारित केले आहेत. अपिलार्थीच्या प्रथम अपिलाच्या निर्णयामध्ये त्यांनी अपिलार्थीस माहिती साक्षांकीत करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित केले होते.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे, जन अपिलीय अधिकारी यांनी आदेश देऊनही जन माहिती अधिकारी यांनी साक्षांकीत स्वरुपात माहिती पुरविली नसल्यामुळे व्दितीय अपील केले आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जाचे अवलोकन करता, यामध्ये त्यांनी साक्षांकीत प्रतीची मागणी जन

माहिती अधिकारी यांच्याकडे केली नव्हती असे दिसून येत आहे, त्यामूळे मूलतः अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून साक्षांकीत माहिती देय होत नाही. जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयाचे जन माहिती अधिकारी यांनी तंतोतंत पालन का केले नाही, ही बाब जन अपिलीय अधिकारी यांची अंतर्गत प्रशासकीय बाब ठरु शकते, ती बाब माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींच्या व्याप्तीमध्ये येऊ शकत नाही, त्यामुळे अपिलार्थीचे हे अपील फेटाळण्यायोग्य आहे या निष्कर्षाप्रत आयोग आला आहे. सबब अपिलार्थीचे व्दितीय अपील फेटाळण्यात येत आहे.

प्रसंगावशात् येथे असे दिसून येते की, आज रोजी सुनावणीस उपस्थित असलेले जन माहिती अधिकारी यांना उपरोक्त प्रकरणाची कोणतीही माहिती नसल्याचे आयोगास आढळून आले आहे. येथून पुढे सुनावणीस संबंधीत अधिका-यांनी आयोगाकडे स्वतः हजर राहावे, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना असे आदेशित करण्यात येते की, आयोगाच्या सुनावणीस संबंधित जन माहिती अधिकारी यांना व्यक्तिशः उपस्थित राहणे अनिवार्य आहे (काही अपवादात्मक परिस्थिती वगळता) अशा अर्थाचे परिपत्रक त्यांनी हे आदेश निर्गमित होताच एक महिन्याच्या आत निर्गमित करावे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील फेटाळण्यात येऊन खालील प्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद
दिनांक ०४-०८-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. सुनिल पंढरी शिरसाट, मु. पो. घोडेगाव, तालुका गंगापूर, जिल्हा औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१५४७

निर्णय दिनांक   ०४-०८-२००८

श्री. सुनिल पंढरी शिरसाट, : अपिलार्थी
मु. पो. घोडेगाव, तालुका गंगापूर,
जिल्हा औरंगाबाद

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी :
तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, औरंगाबाद

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०४-०८-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. सुनिल पंढरी शिरसाट (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), श्री. श्रीकांत पंडितराव कुलकर्णी, उपशिक्षणाधिकारी, जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांचे प्रतिनिधी (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. अरुण

लक्ष्मणराव डुबे, जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने सर्वप्रथम त्यांच्याकडील दिनांक १०-०४-२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या सेवाविषयक बाबींची दिनांक ०१-०९-२००६ ते डिसेंबर २००६ या कालावधीशी संबंधित खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

> " जा. क्र. /जिपऔ/शिक्षण/प्रावि-११/२००७ कार्यालय जि. प. औरंगाबाद दि. २३-०२-२००७ नुसार मला पाठविलेल्या आदेशामध्ये अनाधिकृत गैरहजेरीचा कालावधी दि. १७-८-२००४ ते २९-०४-२००५ (२५६) हा अकार्यदिन म्हणून घोषीत का करण्यात येवू नये अशी अंतीम कारणे दाखवा नोटीस संदर्भ क्र-४ अन्वये देण्यात आली होती. सदरची नोटीस सबंधीतास तामील झाली आहे व त्यांनी खुलसा सादर केला आहे असे आदेशात लिहले आहे.
>
> म्हणून वरिल प्रकारची अंतीम कारणे दाखवा नोटीस मला कोणत्या तारखेस तामील झाली त्याची एक प्रत व त्या नोटीसनुसार मी सादर केलेल्या खुलाशाची एक प्रत पाठवावी."

अपिलार्थीने सदर माहिती रजिस्टर्ड टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीचा सदर माहितीसाठीचा अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक २६-०४-२००७ रोजी प्राप्त झाला.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १०-०५-२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांनी त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये ३४ त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले.

जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या सुचनेप्रमाणे अपिलार्थीने त्यांच्या कार्यालयात दिनांक २६-०६-२००७ रोजी आवश्यक त्या शुल्काचा भरणा केल्यानंतर अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ०५-०७-२००७ रोजी आवश्यक ती माहिती रजिस्टर्ड पोस्टाने पाठवून दिली.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार, जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १०-०७-२००७ रोजी प्रथम अपील केले.

अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २७-०८-२००७ रोजी सुनावणी घेऊन या संदर्भातील आपले आदेश दिनांक २९-०८-२००७ रोजी पारित केले आहेत. या आदेशामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांना, त्यांनी अपिलार्थीस दिलेली माहिती योग्य असल्याबाबत खात्री करुन घ्यावी व पुन:श्च साक्षांकीत प्रत देण्यात यावी असे कळविले.

जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या आदेशानुसार जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक ३०-०८-२००७ रोजीच्या पत्रान्व्ये परत माहिती पुरविली. तथापि जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम

१९ (३) अन्वये, राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १८-०९-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे.  या अपील अर्जामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी त्यांना चुकीची व दिशाभूल करणारी माहिती दिल्याचे नमूद करुन त्यांच्यावर अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे कारवाई करण्याची आयोगास विनंती केली आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, जन माहिती अधिकारी यांनी, त्यांना दिनांक ३०-०८-२००७ रोजी त्यांनी मागितलेली माहिती पुरविली नाही.  सदर माहिती चुकीची आहे त्यामुळे त्यांच्यावर अधिनियमातील तरतुदीप्रमाणे दंडात्मक व शिस्तभंगाची कारवाई करण्यात यावी.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी माहिती त्यांनी अपिलार्थीस दिनांक ०५-०७-२००७ व ३०-०८-२००७ रोजी दिलेली आहे.  अपिलार्थीने त्यांच्याकडे कारणे दाखवा नोटीस त्यांच्यावर कोणत्या तारखेस तामील झाली त्याची प्रत व त्यांनी शिक्षणाधिकारी यांच्याकडे सादर केलेल्या खुलाशाची प्रत मागितली होती.  त्याप्रमाणे त्यांना ती विहित मुदतीत देण्यात आलेली आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीच्या दिनांक १०-०७-२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर त्यांनी दिनांक २७-०८-२००७ रोजी सुनावणी घेऊन यासंदर्भातील आपले आदेश दिनांक २९-०८-२००७ रोजी पारित केले आहेत.  या आदेशामध्ये, त्यांनी जन माहिती अधिकारी यांना, त्यांनी अपिलार्थीस पूर्वी दिलेली माहिती पुनःश्च तपासणी करुन, अपिलार्थीस सदर माहिती साक्षांकीत करुन उपलब्ध करुन द्यावी, असे आदेश दिले आहेत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये त्यांना जिल्हा परिषदेमार्फत पारित करण्यात आलेल्या दिनांक २३-०२-२००७ रोजीच्या पत्रामध्ये संदर्भीत केलेल्या दिनांक १३-०९-२००६ रोजीच्या अंतिम कारणे दाखवा नोटिशीची तामीली त्यांना केव्हा झाली त्याबाबतची तामील प्रत व त्यावर अपिलार्थीने केलेल्या खुलाश्याची प्रत या माहितीची मागणी जन माहिती अधिकारी यांच्याकडे केली होती. जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कथित माहितीचे अवलोकन केले असता, जन माहिती अधिकारी यांनी, त्यांना त्यांच्याकडील दिनांक १८-०७-२००७ रोजीच्या पत्राची प्रत दिल्याचे दिसून येत आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस कोणत्याही टप्प्यावर त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली, जिल्हा परिषदेकडील दिनांक २३-०२-२००७/०२-०३-२००७ या तारखेच्या आदेशामध्ये क्रमांक ४ चा संदर्भ दिलेल्या दिनांक १३-०९-२००६ रोजीच्या आदेशाच्या प्रतीची माहिती पुरवली नाही. यावरुन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांना मूळ अर्जाव्दारे अपेक्षित असलेली माहिती दिली नाही, हा त्यांचा दावा सिध्द होतो. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांनी आवश्यक ते शुल्क भरल्यानंतरही त्यांना प्रथम अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती न देऊन माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० च्या तरतुदींचा नि:संशयपणे भंग केल्याचे येथे दिसून येत आहे. आपल्या या कृतीव्दारे त्यांनी स्वत:ला अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीस नि:संशयपणे पात्र ठरविले आहे.

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ५ (५) च्या तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस माहिती देण्यासाठी सहाय्य करणारे त्यांचे जे संबंधीत

सहाय्यक / कर्मचारी जबाबदार आहेत त्यांना देखील जन माहिती अधिकारी म्हणून समजावे अशी तरतूद आहे.

सबब मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना असे आदेशित करण्यात येते की, संबंधित जन माहिती अधिकारी व अपिलार्थीस माहिती देण्यासाठी सहाय्य करणारे त्यांचे सर्व सहाय्यक व कर्मचारी या सर्वांवर त्यांनी उपरोक्त प्रकरणी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई हे आदेश निर्गमित होताच २ महिन्याच्या आत करुन तदनंतर एक महिन्याच्या आत आपला अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा. अपिलार्थीस माहिती देण्याच्या दृष्टीने जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीस त्यांनी यापुर्वी चुकीची माहिती दिल्याचे सिध्द झाले असल्याने, त्यांनी अपिलार्थीकडून त्या माहितीपोटी घेतलेले शुल्क रुपये ३४ हे त्यांना हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत परत करावे व अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालील प्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाचे आत विनामूल्य पुरवावी.

३. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीकडून माहितीपोटी घेतलेले शुल्क रुपये ३४ हे त्यांना हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत परत करावे.

४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांनी, संबंधित जन माहिती अधिकारी व त्यांना अपिलार्थीस माहिती देण्यासाठी सहाय्य करणारे त्यांचे सहाय्यक / कर्मचारी यांच्यावर प्रचलित सेवा नियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई हे आदेश निर्गमित होताच २ महिन्याच्या आत करुन आपला अनुपालन अहवाल तदनंतर १ महिन्याच्या आत आयोगास सादर करावा.

औरंगाबाद
दिनांक ०४-०८-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. सुनिल पंढरी शिरसाट, मु. पो. घोडेगाव, तालुका गंगापूर, जिल्हा औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील

कार्यवाहीसाठी.

४ मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१४३३

निर्णय दिनांक ०६-०८-२००८

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. मो. मोईजखान मो. अस्गरखान,<br>४२७, प्र. नि. हा. जवळ, कैलासनगर,<br>नांदेड | : | अपिलार्थी |
| | विरुध्द | | |
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा नायब तहसीलदार (पुरवठा),<br>तहसील कार्यालय, नांदेड | : | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा तहसीलदार,<br>तहसील कार्यालय, नांदेड | : | प्रतिवादी |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०६-०८-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस श्री. काशीराम भिमराव गाजुलवाड, जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, नांदेड (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत तर अपिलार्थी श्री. मो.

मोईजखान मो. अस्गरखान व जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, नांदेड हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये, दिनांक १३-०८-२००७ रोजी दाखल केलेले व्दितीय अपील आयोगासमोर विचाराधीन आहे. अपिलार्थीच्या या व्दितीय अपिलाची नोंद राज्य माहिती आयोगाच्या कार्यालयात दिनांक १६-०८-२००७ रोजी झालेली आहे.

या अपील अर्जामध्ये जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक १४-०५-२००७ रोजी निर्णय देऊनही त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी हे अपील आयोगाकडे केले असल्याचे अपिलार्थीने नमूद करुन या अपिलामध्ये पुढे त्यांनी आपल्या प्रथम अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवलेली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने, त्यांच्या दिनांक ०२-०३-२००७ रोजीच्या प्रथम अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या कार्यालयातर्फे रॉकेल पुरवठा करण्यात येणारे सर्व हॉकर्स, परवानाधारकांची यादी, नेमून दिलेले ठिकाण, वेळ, पुरवठा देखरेखीसाठी नेमलेले कर्मचारी / तलाठी, त्यांच्याकडील खरेदी - विक्री हजेरीचा तपशील संबंधित कर्मचा-यांची यादी व मासिक केरोसीन पुरवठ्याचा तपशील ही माहिती मागितली होती. अपिलार्थीचा माहितीसाठीचा अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्राप्त झाल्यानंतर त्यांनी अधिनियमातील विहित तरतुदीमध्ये म्हणजेच दिनांक २०-०३-२००७ रोजी अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटी नियमानुसार शुल्क त्यांच्या कार्यालयात भरण्याचे

सूचित केले, तथापि या नंतर अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाशी माहितीकरिता संपर्क साधला नाही.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार, जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २८-०३-२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०५-०४-२००७ रोजी सुनावणी घेऊन सुनावणीमध्ये जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस ७ दिवसाच्या आत विनामूल्य माहिती पुरविण्याचे आदेशित केले. सदर आदेश जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या नस्तीवरच दिले आहेत. सदर आदेशाची प्रत त्यांनी अपिलार्थीस पाठविल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही.

जन अपिलीय अधिकारी यांनी आदेश दिल्यानंतर ७ दिवसाच्या आत अपिलार्थीस माहिती पुरविल्याचे उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर सांगितले, परंतु अपिलार्थीस ही माहिती मिळाल्याच्या त्यांच्या विधानापृष्ट्यर्थ त्यांना कोणताही पुरावा आयोगासमोर सादर करता आला नाही व अपिलार्थीस निश्चितपणे कोणत्या तारखेस माहिती दिली हे सांगता आले नाही, मात्र तदनंतर त्यांनी त्यांच्याकडील दिनांक ११-०७-२००८ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीस १८ पृष्ठांची माहिती विनामूल्य पुरविल्याचे दिसून येत आहे, मात्र ही माहिती प्राप्त होण्यापूर्वीच अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये, राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १३-०८-२००७ रोजी व्दितीय अपील केले होते.

आज सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे अनुपस्थित आहेत, यावरुन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली त्यांच्याकडील दिनांक

१६-०७-२००८ रोजी अंडर सर्टिफिकेट ऑफ पोस्टाने पाठविलेली माहिती प्राप्त झाल्याचे अनुमान आयोग काढत आहे. उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अर्जास जरी अधिनियमातील विहित मुदतीत प्रतिसाद दिला असला तरी या पत्रामध्ये अपिलार्थीस, त्यांना देण्यात येणा-या प्रस्तावित माहितीच्या पृष्ठांची संख्या व ही माहिती पुरविण्यासाठी प्रतिपृष्ठ दर कळविलेला नाही. जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीमध्ये अपिलार्थीस ७ दिवसाच्या आत विनामूल्य माहिती देण्याचे आदेशित करुनही अपिलार्थीस ही माहिती देण्यासाठी निर्णयानंतर ७ दिवसाच्या आत त्यांनी पुरविली नाही (ही माहिती त्यांनी ७ दिवसाऐवजी ३ महिन्यांनी दिल्याचे दिसून येते), ती अपिलार्थीस प्राप्त झाल्याप्रीत्यर्थ त्यांच्याकडून कोणती पोच घेतली नाही व यासंबंधीचा कोणताही आवश्यक तो पुरावा ते आयोगासमोर सादर करु शकले नाहीत. सबब संबंधित जन माहिती अधिकारी यांना राज्य माहिती आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत असून माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांच्याकडे प्राप्त होणा-या प्रत्येक अर्जावर त्यांनी येथून पुढे काळजीपूर्वक व सतर्कतेने कारवाई करावी व या विषयाशी संबंधित सर्व अभिलेखे व्यवस्थित जतन करुन ठेवावेत अशी त्यांना आयोगातर्फे सूचना देण्यात येत आहे. अपिलार्थीस आता माहिती प्राप्त झाल्याचे अनुमान आयोगाने या परिच्छेदामध्ये सुरुवातीस स्पष्ट केल्याने अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात कोणतेही आदेश नाहीत.

सबब वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१.  अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

३.  जन माहिती अधिकारी यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत आहे.

औरंगाबाद  ( वि. बा. बोरगे )
दिनांक  ०६-०८-२००८  राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१  श्री. मो. मोईजखान मो. अस्गरखान, ४२७, प्र. नि. हा. कैलासनगर, नांदेड.

२  जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३  जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४  निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१४३४

निर्णय दिनांक ०६-०८-२००८

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. संजय म. सोनवणे,<br>राजे संभाजीनगर (प), तुळजापूर,<br>जिल्हा उस्मानाबाद | : | अपिलार्थी |
| | विरुध्द | | |
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा वनपरिक्षेत्र अधिकारी, उपविभाग,<br>तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद | : | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा वन विभागीय अधिकारी, मध्यवर्ती<br>शासकीय इमारत, उस्मानाबाद | : | प्रतिवादी |

| | | | |
|---|---|---|---|
| प्रत्यक्ष | जन माहिती अधिकारी | : | वनपरिक्षेत्र अधिकारी, तुळजापूर,<br>मुख्यालय, उस्मानाबाद |
| | जन अपिलीय अधिकारी | : | उपविभागीय वन अधिकारी, मध्यवर्ती<br>प्रशासकीय इमारत, उस्मानाबाद |

## निर्णय

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०६-०८-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. संजय महादेवराव सोनवणे, (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), श्री. गुंडेराव शंकरराव साबळे, जन माहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी, तुळजापूर, मुख्यालय, उस्मानाबाद (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. राजेश्वर आशन्ना सातोलीकर, जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय वन अधिकारी, उस्मानाबाद (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये, दिनांक ०९-०८-२००७ रोजी दाखल केलेले व्दितीय अपील विचाराधीन आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने जन माहिती अधिका-याकडून त्यांनी मागणी केलेली माहिती त्यांच्या व्दितीय अपील अर्जाच्या दिनांकापर्यंत त्यांना प्राप्त झाली नसल्याने तसेच जन अपिलीय अधिकारी यांनीही त्यांच्या अपिलावर कोणतीही प्रतिक्रिया लेखी दिली नसल्याने जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्यावर कलम २० नुसार शास्ती लावून त्यांच्यावर योग्य ती कारवाई करण्याची आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने दिनांक ३०-०३-२००७ रोजी संबधित जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रातील सर्व्हे नंबर २१५, तुळजापूर येथे येडाई-तुळाई प्रकल्प राबविण्यात आला आहे काय, असल्यास त्याचे क्षेत्रफळ, प्रत्येक तुकड्यात लावण्यात आलेल्या झाडांची संख्या, या झाडांच्या संरक्षणाची जबाबदारी कोणत्या खात्याकडे आहे व तुळजापूर

बिटमध्ये किती वनरक्षक आहेत ही माहिती अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिश: अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २७-०४-२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील सर्व मुद्दयांवरील माहिती त्यांना अंडर सर्टिफिकेट ऑफ पोस्टाने कळविली आहे. त्यांच्या या विधानापृष्ट्यर्थ त्यांनी त्यांच्या कार्यालयातील उपलब्ध असलेल्या अपिलार्थीस पाठविलेल्या पत्राची दिनांक २७-०४-२००७ रोजीची पोस्टाची प्रत आयोगास सादर केली आहे. यावरुन त्यांनी अपिलार्थीस सदर माहिती दिनांक २७-०४-२००७ रोजी पाठविल्याचे सिध्द होत आहे. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिश: माहितीची मागणी केली आहे, तथापि जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ही माहिती पोस्टाने पाठविली आहे. सदर माहिती अपिलार्थीस पोस्टाने प्राप्त झाली असल्याचे अपिलार्थीने आज आयोगासमोर कबूल केले आहे. परंतु असे असूनही त्यांनी जन अपिलीय अधिकारी व राज्य माहिती आयोगाकडे अनुक्रमे दिनांक ०५-०५-२००७ रोजी व ०९-०८-२००७ अनुक्रमे प्रथम अपील व व्दितीय अपील केले आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पाठविलेल्या माहितीचे अवलोकन करता जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत व सुसंगत माहिती पुरविल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थीने व्यक्तिश: माहितीची मागणी केली असतांना जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पोस्टाने माहिती पाठविण्याचे कारण म्हणजे त्यांचा अपिलार्थीस अधिक सकारात्मक प्रतिसाद देण्याची इच्छा असल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थीस प्रत्यक्षत: ही माहिती त्यांना कधी प्राप्त झाली हे विचारले असता त्यांनी निश्चितपणे ही तारीख सांगता येणार नाही, असे आयोगास सांगितले. जन माहिती

अधिकारी यांनी माहिती पाठविली त्यावेळी ते परगावी गेले असल्याने व त्यांना त्यावेळी त्यांच्या घरुन माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी आयोगाकडे अपील केल्याचे सांगितले. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना आता प्रत्यक्षतः प्राप्त झाली आहे, सदर माहिती त्यांनी मागणी केलेल्या माहितीशी सुसंगत आहे, हे पाहता अपिलार्थीचे आयोगाकडे केलेले व्दितीय अपील फेटाळण्यायोग्य आहे, या निष्कर्षाप्रत आयोग आला आहे. सबब अपिलार्थीचे व्दितीय क्रमांक १४३४/२००७, दिनांक ०९-०८-२००७ हे अपील फेटाळण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील क्रमांक १४३४/०७, दिनांक ०९-०८-२००७ फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद
दिनांक ०६-०८-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. संजय म. सोनवणे, राजे संभाजीनगर (प), तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी, तुळजापूर, मुख्यालय, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय वन अधिकारी, मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१४३६

निर्णय दिनांक ०६-०८-२००८

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. गजानन संतुकराव देशमुख, | : | अपिलार्थी |
| | पिंपळगाव रेणुकाई, तालुका भोकरदन, | | |
| | जिल्हा जालना | | |
| | विरुध्द | | |
| १ | जन माहिती अधिकारी | : | |
| | तथा तालुका कृषि अधिकारी, बदनापूर, | | |
| | जिल्हा जालना | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी | : | प्रतिवादी |
| | तथा उपविभागीय कृषि अधिकारी, | | |
| | जालना | | |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०६-०८-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. गजानन संतुकराव देशमुख (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), श्री. प्रकाश बाबूराव अव्हाळे, जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, बदनापूर (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. नंदकुमार अनंतराव टाक, जन अपिलीय अधिकारी तथा

उपविभागीय कृषि अधिकारी, जालना (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने सर्वप्रथम त्यांच्याकडील दिनांक १५-०५-२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे श्री. एस. बी. पाटील यांच्या कार्यकाळात झालेले नियोजन, त्यासंदर्भात झालेला खर्च बाबनिहाय माहिती, ०६-०७ मध्ये रोहयो कामाची यादी व त्यासंबंधीची झालेल्या पगारपत्रकाची नक्कल सत्यप्रतीत माहिती मागितली होती.

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिश: अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०४-०६-२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती देण्यासाठी मोठा वेळ व साधनसामुग्री इत्यादी जास्त लागणार असल्याने सदरची माहिती देण्याऐवजी अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयात दिनांक १२-०६-२००७ रोजी येऊन प्रत्यक्ष माहिती पाहून त्यांची खात्री करण्याचे सूचित केले होते.

जन माहिती अधिकारी यांच्या अशा प्रकारच्या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार, जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १४-०६-२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपिलामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येत आहे.

अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २८-०८-२००७ रोजी सुनावणी घेऊन अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती १५ दिवसाच्या आत देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले.

तथापि अपिलार्थीच्या प्रथम अपिलाची सुनावणी होण्याच्या आधीच अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये, राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १८-०८-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. या व्दितीय अपील अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेऊन जन माहिती अधिकारी यांनी त्यांना माहिती दिलेली नाही व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपिलावर कोणतीही सुनावणी घेतली नसल्याचे नमूद आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीची त्यांना आजही आवश्यकता आहे. तसेच जन माहिती अधिकारी यांनी राज्य माहिती आयोगास दाखविलेल्या दिनांक ०३-०९-२००७ रोजीच्या पत्रावरील सही त्यांची नाही.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीच्या दिनांक १५-०५-२००७ रोजीच्या अर्जास त्यांनी दिनांक ०४-०६-२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रतिसाद देऊन त्यांनी मागणी केलेली माहिती त्यांच्या कार्यालयात समक्ष पाहणीविषयी त्यांना सुचविले होते. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीच्या झेरॉक्स प्रती काढून देण्याइतका निधी त्यांच्या कार्यालयाकडे उपलब्ध नव्हता. अपिलार्थीने त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क शासकीय कोषागारात जमा केल्यानंतर हे शुल्क राज्याच्या ‘‘महसूली’’ शिर्षाखाली जमा होत असल्याने अपिलार्थीकडून प्राप्त होणा-या शुल्काचा त्यांना अपिलार्थीस माहिती देण्यासाठी प्रत्यक्ष उपयोग करता येणार नव्हता. अपिलार्थीच्या अपिलाची सुनावणी जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या कार्यालयात दिनांक २८-०८-२००७ रोजी घेतल्यानंतर सुनावणीमध्ये जन अपिलीय अधिकारी यांच्या तोंडी आदेशान्वये त्यांनी अपिलार्थीस दिनांक ०३-०९-२००७ रोजी आवश्यक ती माहिती

दिली आहे.  सदर माहिती प्राप्त झाल्याप्रीत्यर्थ अपिलार्थी यांनी त्यांच्याकडे पोच दिली आहे.  या पोच पत्राची प्रत त्यांनी आयोगास दाखविली.  सदर पत्राचे अवलोकन केले असता अपिलार्थीने या पत्रामध्ये त्यांनी मागणी केलेली माहिती त्यांना मिळाली असून मिळालेल्या माहितीबाबत त्यांची कोणतीही तक्रार नसल्याचे नमूद केले आहे व त्यांचा दिनांक १५-०५-२००७ रोजीचा माहितीसाठीचा अर्ज निकाली काढण्याची विनंती तालुका कृषि अधिकारी यांना केली आहे.  अपिलार्थीचे हे पत्र तालुका कृषि अधिकारी यांना उद्देशून दिनांक ०३-०९-२००७ रोजी लिहिले असल्याचे दिसून येत आहे.  (ही सही अपिलार्थीची नाही असे त्यांनी त्यांच्या वरील युक्तिवादामध्ये स्पष्ट केले आहे)

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीसाठीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत प्रतिसाद दिला असला तरी, त्यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (३) च्या तरतुदीनुसार अपिलार्थीस हव्या असलेल्या माहितीपोटीचे शुल्क, त्यांना देण्यात येणा-या माहितीच्या पृष्ठांची संख्या, इत्यादी तपशील अपिलार्थीस न कळवून व अपिलार्थीने मागितलेली माहिती त्यांना देण्याऐवजी पाहण्याचे सूचित करुन अधिनियमातील कलम ७ (१) व (३) चा भंग केला केलेला आहे.  अपिलार्थीच्या दिनांक १४-०६-२००७ रोजीच्या अपील अर्जाची जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २८-०८-२००७ रोजी म्हणजेच, अधिनियमाव्दारे प्रथम अपिलासंबंधात निर्णय देण्याचा विहित कालावधी व्यपगत झाल्यानंतर सुनावणी ठेवली होती.  या आपल्या कृतीव्दारे त्यांनी कलम १९ (६) चा भंग केल्याचे दिसून येत आहे.  दिनांक २८-०८-२००७ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे झालेल्या सुनावणीमध्ये तोंडी आदेश मिळाल्यानंतर त्यांनी लेखी आदेश दिनांक

०७-०९-२००७ रोजीच्या पत्राव्दारे पारित केले आहेत. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून दिनांक ०३-०९-२००७ रोजी विनामूल्य माहिती प्राप्त झाली असल्याचे उपलब्ध कागदपत्रावरुन दिसून येत आहे. या दिनांक ०३-०९-२००७ रोजीच्या पत्रामध्ये केलेली सही अपिलार्थीची नाही, असे अपिलार्थी आज सुनावणीमध्ये सांगत आहेत, तथापि अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे सादर केलेल्या इतर कागदपत्रावरुन, त्यांच्या दिनांक ०३-०९-२००७ रोजीच्या पत्रावरील सही, त्यांच्या इतर सह्यांशी जुळत असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे अपिलार्थीचे त्यांनी सही केली नाही हे विधान, आयोग फेटाळून लावत आहे. जन माहिती अधिकारी यांच्याकडे आज रोजी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती तयार आहे. दिनांक ०३-०९-२००७ रोजी माहिती विनामूल्य उपलब्ध झाली असल्याचे आता अपिलार्थीस ही माहिती परत दुस-या वेळेस हवी असल्यास त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडे आवश्यक त्या शुल्काचा भरणा करुन ती प्राप्त करुन घ्यावी लागेल हे उघड आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

औरंगाबाद
दिनांक ०६-०८-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. गजानन संतुकराव देशमुख, पिंपळगाव रेणुकाई, तालुका भोकरदन, जिल्हा जालना.

२ जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, बदनापूर, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय कृषि अधिकारी, जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१४३७

निर्णय दिनांक ०६-०८-२००८

श्री. अंकुश एम. पवार, : अपिलार्थी
प्लॉट नं. एफ-४१/१२, एन-७, सिडको,
अयोध्यानगर, औरंगाबाद

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी :
तथा तालुका कृषि अधिकारी कार्यालय,
शिरुर अनंतपाळ, जिल्हा लातूर

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा उपविभागीय कृषि अधिकारी,
लातूर

| | | |
|---|---|---|
| प्रत्यक्ष | जन माहिती अधिकारी | : मंडळ कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, शिरुर अनंतपाळ, जिल्हा लातूर |
| | जन अपिलीय अधिकारी | : तालुका कृषि अधिकारी, शिरुर अनंतपाळ, जिल्हा लातूर |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०६-०८-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस श्री. बिभीषण तुकाराम काळदाते, जन माहिती

अधिकारी तथा मंडळ कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, शिरुर अनंतपाळ (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल), श्री. विठ्ठल विश्वनाथराव लहाने, जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, शिरुर अनंतपाळ (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. मोहन श्रीरंगराव भिसे, तत्कालीन जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय कृषि अधिकारी, लातूर हे हजर आहेत तर अपिलार्थी श्री. अंकुश एम. पवार हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने सर्वप्रथम त्यांच्याकडील दिनांक ०२-०४-२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक ०१-०१-२००७ ते १५-०३-२००७ या कालावधीतील त्यांच्या कार्यक्षेत्रामध्ये झालेल्या कामासंदर्भात खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

> “ आपल्या अधिकाराखाली शि. अनंतपाळ तालुक्यात रोजगार हमी योजने अंतर्गत झालेल्या कामांवरील (१) तळेगाव (बोरी) ग क्र १/२ सपाबा (२) उमरदरा ग क्र. १/५ सपाबा (३) उमरदरा ग. क्र. १/२ सपाबा (४) होणमाळ - सपाबा (५) कांबळगा ग. क्र. १/२ सपाबा (६) चांबारगा ग क्र १/२ सपाबा (७) थेरगांव ग क्र १/१ सपाबा (८) तळेगांव (बोरी) ग क्र १/८ सपाबा (९) चांभरगा ग क्र १/३ सपाबा (१०) कांबळगा ग. क्र. १/३ सपाबा (११) होणमाळ ग क्र १/१ सपाबा (१२) उमरी ग क्र १/२ सपाबा (१३) थेरगाव ग क्र २/१ सपाबा (१४) आरी ग क्र १/२ सपाबा (१५) उमरी सपाबा.
>
> या वरील तालुक्यातील गावांत झालेल्या कामांवरील वरीष्ठांनी पाया पाहणी केलेल्या अहवालांच्या तसेच मजुरांची नावे लिहिलेले हजेरीपट आणि मोजमाप पुस्तिका या सर्व मुद्दयांचा छायांकित प्रति मिळणे बाबत.”

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिश: व रजिस्टर्ड टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २६-०४-२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपोटी एकूण शुल्क रुपये १,०३६ इतके त्यांच्या कार्यालयास भरण्याची सूचना केली. या पत्रामध्ये त्यांनी अपिलार्थीस देण्यात येणा-या माहितीच्या पृष्ठांची अंदाजे ५१८ इतकी संख्या व माहिती देण्यासाठी प्रतिपृष्ठ दर रुपये २ हा तपशील अपिलार्थीस पुरविल्याचे दिसून येत आहे. सदर पत्र त्यांनी त्यांच्या कार्यालयातील दिनांक २६-०४-२००७ रोजीच्या १८४ क्रमांकाने पाठविले आहे. यासोबत त्यांनी त्यांच्याकडील जावक नोंदवहीची झेरॉक्स प्रत सादर केली असून त्याचे अवलोकन करता जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये १,०३६ इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले ही बाब येथे सिध्द होत आहे. तथापि अपिलार्थीने सदर शुल्काचा भरणा जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात न करता माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार, जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २३-०५-२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपिलामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येत आहे.

अपिलार्थीने सदर अपील उपविभागीय कृषि अधिकारी, लातूर यांना उद्देशून केले होते. त्यांनी अपिलार्थीचा दिनांक २३-०५-२००७ रोजीचा अपील अर्ज प्रत्यक्ष जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, शिरुर अनंतपाळ यांच्याकडे दिनांक ०८-०६-२००७ रोजीच्या पत्राने पाठविल्याचे दिसून येत आहे.

अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोठल्याही प्रकारची सुनावणी घेतल्याचे किंवा यासंदर्भात अपिलार्थीशी पत्रव्यवहार केल्याचे आयोगास

उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही, मात्र त्यांनी यासंदर्भात आजच्या सुनावणीच्या अंदाजे एक आठवडा आधी दिनांक २९-०७-२००८ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात भरण्याची सूचना केली आहे.

अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये, राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ३०-०८-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येत आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. त्यामुळे त्यांनी, आयोगाकडे सादर केलेल्या व्दितीय अपील अर्जामधील त्यांचे लेखी म्हणणे हाच त्यांचा युक्तिवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती आज रोजी त्यांच्याकडे तयार आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीचा प्रथम अपील अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाला त्यावेळी ते या पदावर कार्यरत नव्हते. त्यावेळी श्री. डी. जी. राचमाळी नावाचे अधिकारी कार्यरत होते, त्यामुळे अपिलार्थीच्या अपील अर्जावर त्यांनी विहित मुदतीत निर्णय न घेण्याची कारणे ते आज रोजी सांगू शकत नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप मोठे होते. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीमध्ये दिनांक २६-०४-२००७ रोजी अपिलार्थीस देण्यात येणा-या संभाव्य ५१८ पृष्ठांकरिता रुपये २ प्रतिपृष्ठ याप्रमाणे एकूण रुपये १०३६ इतक्या शुल्काचा भरणा त्यांच्या कार्यालयात करण्याचे रकमेच्या हिशोबासह सूचित केले होते. तथापि सदर शुल्काचा भरणा अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात न केल्याने ते स्वतः त्यांना माहिती मिळण्यासाठी वंचित ठेवण्याकरिता जबाबदार आहेत, असे आयोगाचे मत आहे. आज रोजी अपिलार्थीने त्यांच्या प्रथम अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे तयार आहे, हे पाहता अपिलार्थी यांना असे सूचित करण्यात येते की, त्यांनी उपरोक्त प्रकरणी संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना आवश्यक असलेली माहिती त्यांच्या कार्यालयातून सशुल्क उपलब्ध करुन घ्यावी. या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक २३-०५-२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर कोणत्याही प्रकारे सुनावणी न घेऊन अथवा अपिलार्थीशी कोणताही पत्रव्यवहार न करुन आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट करुन अधिनियमातील कलम १९ (६) चा निःसंशयपणे भंग केल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत आहे. त्यांच्या अशा प्रकारच्या कार्यशैलीची नोंद आयुक्त (कृषि), पुणे यांनी यथायोग्यरित्या घ्यावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. अपिलार्थीने त्यांना आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून सशुल्क उपलब्ध करुन घ्यावी.

औरंगाबाद
दिनांक ०६-०८-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. अंकुश एम. पवार, प्लॉट नं. एन-४१/१२, एन-७, सिडको, अयोध्यानगर, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा मंडळ कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, शिरुर अनंतपाळ, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, शिरुर अनंतपाळ, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ आयुक्त, (कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, शिवाजीनगर, पुणे – ०५ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१४३८

निर्णय दिनांक ०६-०८-२००८

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. नारायण ग्यानबा बापमारे,<br>मु. पो. मंगरुळ, नं. १, माजलगाव,<br>जिल्हा बीड | : | अपिलार्थी |
| | विरुध्द | | |
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा उप अभियंता,<br>जिल्हा परिषद (बां.), उपविभाग,<br>माजलगाव, तालुका माजलगाव,<br>जिल्हा बीड | : | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा कार्यकारी अभियंता,<br>बांधकाम विभाग क्रमांक २, जिल्हा परिषद,<br>बीड | : | प्रतिवादी |

### <u>निर्णय</u>

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०६-०८-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस श्री. विरभद्राप्पा मडीवालप्पा हान्नमसागर, जन माहिती

अधिकारी तथा उप अभियंता, जिल्हा परिषद (बां.), उपविभाग, माजलगाव (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. लिंबराज गणपतराव जांभळे जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग क्रमांक २, जिल्हा परिषद, बीड (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत तर अपिलार्थी श्री. नारायण ग्यानबा बापमारे, हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये, दिनांक ०४-०९-२००७ रोजी दाखल केलेले व्दितीय अपील विचाराधीन आहे. या अपील अर्जावर अपिलार्थीने दिनांक ०४-०८-२००७ अशी तारीख नोंदविली असून आयोगास हे अपील दिनांक ०४-०९-२००७ रोजी प्राप्त झाल्याचे दिसून येत आहे.

जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांना कोणत्याही प्रकारची माहिती न दिल्यामुळे त्यांच्यावर अधिनियमाच्या तरतुदीनुसार योग्य ती कारवाई करण्यात यावी, असे त्यांनी आपल्या अपील अर्जामध्ये म्हटले आहे. तसेच त्यांनी त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना विनामूल्य देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करावे अशीही विनंती, त्यांनी या अपील अर्जामध्ये केल्याचे दिसून येते.

या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्रथमतः दिनांक २९-०३-२००७ रोजी प्रथम अर्ज करुन जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या कार्यालयाकडून रामपिंपळगाव जोडरस्त्यावर सावरगांव शिवारात पाण्याची लेवल काढून पाणी पुर्ववत शिवावरुन जाण्याकरिता मोजणी केली असल्याचे नमूद करुन, या मोजणीचा नकाशा व सदर काम कधी करणार अशा प्रकारच्या, माहितीची मागणी केली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २३/२४-०४-२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन, त्यांच्या कार्यालयाकडून अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये नमूद केल्याप्रमाणे सावरगाव शिवारातील मोजणीबाबत कोणतेही आदेश दिले गेले नव्हते, अशी माहिती अपिलार्थीस पुरविली.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार, जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २८-०५-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपिलाची सुनावणी जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २७-०७-२००७ रोजी सुनावणी घेऊन त्याच दिवशी आपले आदेश पारित केले. या आदेशाव्दारे त्यांनी अपिलार्थीचे अपील निकाली काढले.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये, दिनांक ०४-०९-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी सुरुवातीच्या परिच्छेदात उल्लेख केल्याप्रमाणे आपले म्हणणे मांडले आहे.

आज आयोगासमोर सुनावणीस उपस्थित असलेले जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये नमूद केल्याप्रमाणे अशा प्रकारची कोणतीही कारवाई त्यांच्या कार्यालयाकडून प्रस्तावित केली गेली नव्हती व अशा प्रकारची कोणतीही सूचना त्यांच्या कार्यालयाने अद्यापपावेतो संबंधित क्षेत्रीय अधिका-यांना पारित केली नाही. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती वास्तवाशी धरुन नसून ती कोणाच्या तरी ऐकीव बातमीवरुन केल्याचे त्यांना आढळले. उपस्थित जन माहिती अधिकारी यांच्या या युक्तिवादावरुन मूळात अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या दिनांक २९-०३-२००७ रोजीच्या प्रथम अर्जाव्दारे सावरगाव

शिवारातील पाण्याचा निचरा होण्यासंदर्भात प्रस्तावित करण्यात आलेले काम कधी पूर्ण होणार याची भविष्यकाळातील माहिती मागितली आहे, जी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या "माहिती" या शब्दाच्या व्याख्येशी थोडीही सुसंगत नाही. माहिती अधिकार अधिनियमामध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती पुरविणे याचा अर्थ त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या माहितीपैकी अर्जदाराने विचारलेली माहिती त्यांना अधिनियमाव्दारे विहित केलेल्या तरतुदीनुसार पुरविणे असा आहे. जन माहिती अधिकारी यांचे पाण्याचा निचरा होण्यासंदर्भात काय नियोजन आहे हे जन माहिती अधिकारी यांनी अद्यापही निश्चित केले नाही, किंबहुना अशा प्रकारचा कोणताही प्रस्ताव त्यांच्याकडे विचाराधीन नव्हता. साहजिकच अपिलार्थीच्या या अर्जासंदर्भाने मागणी केलेली कोणतीही माहिती अधिनियमातील तरतुदीनुसार देय ठरत नाही, हे पाहता व जन माहिती अधिकारी यांचे दिनांक २४-०४-२००७ चे पत्र अपिलार्थीस प्राप्त झाले आहे हे पाहता, अपिलार्थीचे आज विचाराधीन असलेले आयोगापुढील व्दितीय अपील फेटाळण्यायोग्य आहे, या निष्कर्षाप्रत आयोग आला आहे.

सबब वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील फेटाळण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

<u>आदेश</u>

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद
दिनांक ०६-०८-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. नारायण ग्यानबा बापमारे, मु. पो. मंगरुळ, नं. १, माजलगाव, जिल्हा बीड.

२ जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, जिल्हा परिषद (बां.), उपविभाग, माजलगाव, तालुका माजलगाव, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग क्रमांक २, जिल्हा परिषद,बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१२५२

निर्णय दिनांक ०५-०८-२००८

१ श्री. कल्याण सोपानराव सोनवणे, : अपिलार्थी
औरंगाबाद.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी : प्रतिवादी
तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी
तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, औरंगाबाद

प्रत्यक्ष जन अपिलीय अधिकारीः अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, औरंगाबाद

त्रयस्थ पक्षः सचिव,
कलावती देवी रिक्रीएशन अँड
चॅरिटेबल ट्रस्ट,औरंगाबाद

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०५.०८.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी श्री. प्रल्हाद बाबूराव चव्हाण, जन माहिती अधिकारी तथा प्र.शिक्षणाधिकारी (प्राथमिक),जिल्हा परिषद,ओरंगाबाद (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल), श्री. अरुण लक्ष्मणराव डुबे, जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) व त्रयस्थ पक्ष श्री. संपत पाराजी जवळकर,

अध्यक्ष, कलावती देवी रिक्रीएशन अँड चॅरिटेबल ट्रस्ट, औरंगाबाद(यापुढे त्यांना त्रयस्थ पक्ष असे संबोधण्यात येईल) हे हजरआहेत, तर अपिलार्थी श्री. कल्याण सोपानराव सोनवणे (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी सर्वप्रथम त्यांचेकडील दि.२८.१२.२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे (१) कलावती देवी रिक्रीएशन अँड चॅरिटेबल ट्रस्ट, औरंगाबाद संचलित पी.डी.जवळकर पब्लिक स्कुल, (२) पॅरा मेडीकल कॉलेज,संग्रामनगर,सातारा, (३) जगदंबा प्रतिष्ठान शिक्षण संस्था संचलित प्रा.शाळा,गारखेडा परिसर या त्रयस्थ पक्षाच्या संस्थेसंदर्भात, संस्थेस मान्यता प्राप्त झाल्यापासून ते अपिलार्थीने अर्ज करेपर्यंतच्या कालावधीशी संबंधित खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

> " १) सदरील संस्थेची मान्यता प्रत किती वर्गापासून किती वर्गापर्यंत मान्यता दिली त्याची संच मान्यता सत्य प्रत २) सदरील संस्थेतील आवश्यक असलेल्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची वैयक्तिक मान्यता प्रत ३) सदरील संस्थेवर जि.प.शिक्षण विभागाने केलेल्या निरीक्षण अहवालाची सत्यप्रत ४) संस्था मान्यतेसाठी शासनास शिफारस करुन पाठविलेल्या प्रस्तावाची सत्यप्रत ५) सदरील संस्थेचे मुख्याध्यापकांचे मत्ता व दायित्त्वाचे विवरण पत्राची सत्यप्रत. "

अपिलार्थी यांनी सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. २६.०२.२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद दिला. या पत्रामध्ये त्यांनी संबंधित

शाळेचे मुख्याध्यापक हे माहिती अधिकारी व संबंधित संस्थेचे सचिव हे शिक्षण संचालनालयाकडून अपिलीय अधिकारी म्हणून घोषित केले गेले असल्याने अपिलार्थीस संबंधित संस्थेच्या मुख्याध्यापकाकडे माहितीसाठीचा अर्ज देण्याचे सूचित केले. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या अशाप्रकारच्या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. ०५.०३.२००७ रोजी प्रथम अपील केले आहे. या अपिलाची जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ९.४.२००७ रोजी सुनावणी घेऊन जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी पाठविलेल्या त्यांच्या दि. २६.२.२००७ रोजीच्या पत्रामध्ये मांडलेली त्यांची भूमिका मान्य करुन अपिलार्थीचे अपील त्यांच्या दि. १२.४.२००७ रोजीच्या आदेशान्वये निकाली काढले. जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ०७.०५.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. या अपील अर्जामध्ये त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवून संबंधित जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचेवर प्रतिदिनी रु.२५०/- प्रमाणे दंडात्मक कार्यवाही करावयाची आयोगास विनंती केली आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीचे वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत, त्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेल्या त्यांच्या द्वितीय अपील अर्जातील त्यांचे लेखी म्हणणे हाच त्यांचा युक्तीवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहेत.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, ते या पदावर दि. २३.७.२००८ पासून कार्यरत असून अपिलार्थीने अर्ज करतेवेळी श्री. व्ही.आर.नेटके नावाचे शिक्षणाधिकारी (प्राथ.) या पदावर कार्यरत होते. परंतु ते आता

नियत वयोमानानुसार शासकीय सेवेतून ऑगस्ट, २००७ पासून निवृत्त झाले आहेत. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती मोठया प्रमाणात असून सदर माहिती अपिलार्थीस देण्यासाठी अंदाजे तीन आठवडे इतका कालावधी लागेल. असे त्यांनी आपल्या युक्तीवादामध्ये असेही स्पष्ट केले की, अपिलार्थीने संबंधित ट्रस्टच्या पॅरामेडीकल कॉलेजसंदर्भात मागितलेली माहिती त्यांच्याकडे उपलब्ध नाही. कारण या कॉलेजवर त्यांचे कोणत्याही प्रकारे नियंत्रण नाही. या कॉलेजवर उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे नियंत्रण आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थीच्या दि. ५.३.२००७ रोजीच्या अपील अर्जावर त्यांनी दि. ९.४.२००७ रोजी सुनावणी घेऊन या संदर्भातील आपले आदेश दि. १२.४.२००७ रोजी पारित करुन अपील निकाली काढले आहे.

त्रयस्थ पक्षाने आपला युक्तीवाद लेखी पत्राद्वारे आयोगास सादर केला असून त्यामध्ये त्यांनी असे म्हटले आहे की, अपिलार्थीने त्यांना दि. १३.१०.२००६ रोजी ज्ञान प्रकाश विद्या मंदिर या शाळेसंदर्भात काही माहिती मागितली होती. ती माहिती अपिलार्थीस देण्यासाठी ते तयार होते. परंतु अपिलार्थीने त्यांना ब्लॅकमेल करुन खंडणी मागितली, त्यामुळे त्यांनी रीतसर पोलीसांकडे तक्रार केली व नंतर त्याप्रमाणे अपिलार्थीस त्यांच्याकडून, खंडणी घेताना पोलीसांनी रंगेहात पकडून दि. २२.११.२००६ रोजी त्यांच्यावर रीतसर गुन्हा दाखल केला आहे. या घटनेनंतर अपिलार्थी हे माहिती अधिकाराचा दुरुपयोग करुन त्यांना त्रास देत असून जीवे मारण्याच्या धमक्या देत आहेत. ही बाब देखील त्यांनी पोलीसांना परत कळविलेली आहे, त्यानंतर पोलीस विभागाकडून दि. १०.२.२००७ रोजी अपिलार्थीविरुध्द चॅप्टर केस क्र.१९/०७ दाखल केली आहे.

उपरोक्त प्रकरणी प्रथम अपिलीय अधिकारी म्हणून संबंधित संस्थेचे सचिव यांची नेमणूक केली आहे. परंतु अपिलार्थीने त्यांच्याकडे कधीही अपील केले नाही. त्यांच्या लेखी निवेदनासोबत त्यांनी औरंगाबाद येथून प्रसिध्द होणाऱ्या दैनिकाची दि. २३.११.२००६ रोजीची प्रत जोडली आहे. आपल्या युक्तीवादामध्ये पुढे त्यांनी असे सांगितले की, अपिलार्थीने शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांच्याकडे ज्या उर्वरित शैक्षणिक संस्थांची (पॅरा मेडीकल कॉलेज) माहिती मागितली आहे, त्यांचा शिक्षणाधिकारी (प्रा.) यांचेशी कोणताही संबंध नाही.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे एकाच वेळी दोन त्रयस्थ पक्षासंदर्भात माहिती मागितली आहे. त्यापैकी कलावतीदेवी रिक्रिएशन ॲण्ड चॅरिटेबल ट्रस्ट हा एक व जगदंबा शिक्षण प्रसारक मंडळ हा दुसरा त्रयस्थ पक्ष होय. अपिलार्थीने त्यांच्या अर्जामध्ये संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडे कलावतीदेवी रिक्रिएशन ॲण्ड चॅरिटेबल ट्रस्ट व पॅरामेडीकल कॉलेजच्या संबंधित माहिती मागितली ती माहिती जन माहिती अधिकारी यांच्या ताब्यात नाही. तसेच उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांच्याकडे उपलब्ध असलेल्या माहितीचीही मागणी शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांच्याकडे केली आहे. कोणत्याही अर्जदाराने मागितलेली माहिती संबंधित सार्वजनिक प्राधिकरणाकडे उपलब्ध नसेल तर व ती या प्राधिकरणाचा दुसरा भाग असलेल्या प्राधिकरणाकडे उपलब्ध असेल तर कशाप्रकारे कार्यवाही करावयाची याचे विवेचन माहिती अधिकार अधिनियम २०५ मधील कलम ६(३)(एक) मध्ये केलेले आहे. या तरतुदीनुसार अपिलार्थीचा दि. २८.१२.२००६ चा प्रथम अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्राप्त झाल्यानंतर त्यांनी

या अर्जाच्या प्रती संबंधित प्राधिकरणाकडे पाठविणे व त्याची प्रत अपिलार्थीस देणे, या तरतुदीप्रमाणे अभिप्रेत आहे. तथापि संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अशाप्रकारची कोणतीही कृती या टप्प्यावर केली नसल्याचे दिसून येते. अपिलार्थीच्या दि. २८.१२.२००६ रोजीचा प्रथम अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्राप्त झाल्यानंतर त्यांनी मूळात अपिलार्थीस प्रथम प्रतिसाद त्यांच्याकडील दि. २६.२.२००७ रोजीच्या पत्रान्वये दिलेला आहे. या टप्प्यावर देखील जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७(१) च्या भंग झाल्याचे स्पष्टपणे दिसून येत आहे. अपिलार्थीचा माहितीसाठीचा प्राप्त झालेला अर्ज व या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिलेला प्रतिसाद यामधील व्यपगत कालावधी पाहता व शिक्षणाधिकारी (मा) व शिक्षणाधिकारी (प्रा) हे दोघेही एकाच प्राधिकरणाचे दोन भाग असल्याने, शिक्षणाधिकारी (मा) यांच्याकडील माहितीदेखील शिक्षणाधिकारी (प्रा) यांनी त्यांच्याकडून त्वरेने मिळवून ती आता अपिलार्थीस देणे भाग आहे.

आज रोजी झालेल्या युक्तीवादाच्यावेळी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती तीन आठवडयाच्या आत देण्याचे आयोगासमोर कबूल केले आहे. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे एकूण पाच मुद्यांवर मागितलेल्या माहितीपैकी चार मुद्यांवरील माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय ठरत आहे. कारण अपिलार्थीने या चार मुद्यांद्वारे मागितलेली माहिती ही पूर्णतः त्यांच्या कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीशी संबंधित असल्याने ही माहिती त्यांच्याकडेच असावयास हवी होती. त्यांनी अपिलार्थीस उशिरा प्रतिसाद देऊनही त्या प्रतिसादाद्वारे कोणत्याही प्रकारे अपिलार्थीस माहिती देण्यासाठी सकारात्मक भूमिका घेतल्याचे आयोगास आढळून येत नाही. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा

क्र. ५ - सदरील संस्थेच्या मुख्याध्यापकाचे मत्ता व दायित्त्वाचे विवरणपत्राची नक्कल - ही माहिती अपिलार्थीस देय असणार नाही. मात्र अशाप्रकारची माहिती दिल्याने अधिनियमातील कलम ८ (ञ) चा भंग होणार असून त्रयस्थपक्षाच्या वैयक्तिक स्वातंत्र्यावर, आगंतुक हस्तक्षेप होणार आहे, असे आयोगास वाटते. उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही सकारात्मक प्रतिसाद न देऊन व अधिनियमातील कलम ६(३) (एक) चा भंग करुन जन माहिती अधिकारी यांनी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव व बेपर्वाई स्पष्ट केली आहे. तथापि तत्कालीन जन माहिती अधिकारी हे आता नियत वयोमानानुसार शासकीय सेवेतून निवृत्त झाले असल्याने त्यांच्यावर कोणतीही कारवाई करता येणार नाही, मात्र सध्याचे जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस सदर माहिती, त्यांच्या कार्यालयाने अपिलार्थीच्या प्रथम माहितीसाठीचा अर्जास अधिनियमातील विहित तरतुदीपेक्षा विलंबाने प्रतिसाद दिल्याने, अधिनियमातील कलम ७(६) च्या तरतुदीनुसार विनामूल्य पुरवावी लागेल. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. ५.३.२००७ रोजीच्या प्रथम अपीलावर त्यांच्याकडील दि. १२.३.२००७ रोजीच्या आदेशान्वये जो निर्णय दिलेला आहे, त्याचे अवलोकन करता, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती निश्चितपणे कोणाकडे उपलब्ध आहे, संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडे ती उपलब्ध असणे संभवते किंवा कसे, तसेच जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विलंबाने दिलेला प्रथम प्रतिसाद या बाबी त्यामध्ये विचारात घेतल्या नसल्याचे दिसून येते. इतःपर माहिती अधिकार अधिनियम २००५ द्वारे त्यांच्याकडे प्राप्त होणाऱ्या प्रथम अपील अर्जावर निर्णय देताना त्यांनी हे मुद्दे विचारात घेऊन आपले निर्णय द्यावेत, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जरी त्रयस्थ पक्षाशी संबंधित असली तरी ही माहिती सार्वजनिक स्वरुपाची असल्याने अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र. १ ते ४ मधील माहिती अपिलार्थीस, या माहितीचे स्वरुप "सार्वजनिक माहिती" असे असल्याने व माहिती देण्याचा अनुज्ञेय कालावधी आता व्यपगत झाल्याने त्यांना ही माहिती विनामूल्य द्यावी लागेल. जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या मुद्दा क्र. १ ते ४ संदर्भात संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच वीस दिवसांच्या आता विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. त्याचप्रमाणे अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील पॅरामेडीकल कॉलेज संदर्भात मागितलेली माहिती संबंधित संस्थेने त्यांना याच कालावधीमध्ये पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१ अपील मान्य करण्यात येत आहे.

२ जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली वरील निर्णयात स्पष्ट केल्याप्रमाणे देय असलेली संपूर्ण माहिती, त्यांना हे आदेश निर्गमित होताच वीस दिवसांचे आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

३ अध्यक्ष, कलावती देवी रिक्रीएशन अँड चॅरिटेबल ट्रस्ट, औरंगाबाद यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे त्यांच्या संस्थेशी संलग्न पॅरामेडीकल कॉलेज, संग्रामनगर साताराशी संबंधित माहिती

अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच वीस दिवसांचे आत विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०५-०८-२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. कल्याण सोपानराव सोनवणे, एन-११, के-४०/४,नवजीवन कॉलनी, हडको, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक),जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद, औरंगाबाद औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. त्रयस्थ पक्ष अध्यक्ष, कलावती देवी रिक्रीएशन अँड चॅरिटेबल ट्रस्ट,१९०,श्रीकृष्ण, उल्कानगर, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१३२६

निर्णय दिनांक ०५-०८-२००८

| | | |
|---|---|---|
| १ श्री. मोहियुद्दीन मोईनुद्दीन फारुकी,<br>रा.नांदेड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी<br>तथा कार्यकारी अभियंता,<br>विष्णुपूरी पंपगृह विभाग, नांदेड. | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी<br>तथा अधीक्षक अभियंता,<br>यांत्रिकी मंडळ (उ.सं.), नांदेड | | |
| १ सौ.शेहनाज परविन युसुफ खान | : | त्रयस्थ पक्ष |

**<u>निर्णय</u>**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०५.०८.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी श्री. पंढरीनाथ रंगनाथ गायकवाड, जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, विष्णुपूरी पंपगृह विभाग, नांदेड, श्री. रामकिशन भुजंगराव कंदकुर्तीकर तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, विष्णुपूरी पंपगृह विभाग, नांदेड, (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल), श्री. भानुदास भगवानदास सरवैया, जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता यांत्रिकी मंडळ (उ.सं.) नांदेड (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) व त्रयस्थ पक्ष सौ.शेहनाज परविन युसुफ खान (यापुढे त्यांना त्रयस्थ

पक्ष असे संबोधण्यात येईल) हे हजरआहेत, तर अपिलार्थी श्री. मोहीयुद्दीन मोईनुद्दीन फारुकी (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी सर्वप्रथम त्यांचेकडील दि.०२.०३.२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित दि. १.४.२००० ते २.३.२००७ या कालावधीमधील एकूण ७ मुद्यांद्वारे प्रश्नार्थक स्वरुपात खालीलप्रमाणे मागितली होती.

" १) श्री. वि. ना. द्रविड उ.का.अ.यांनी कोषागारातुन धनादेश क्र. ०८८८४३ दि. १७/११/२००५ नुसार रु. १३५,०००/- व धनादेश क्र.०७९२००४ दि. ७/६/२००६ नुसार रु.१९८,९००/- इतकी रक्कम आहरण करुन सौ.शहेनाज परविन युसूफ खान यांना प्रदान केली आहे. या दोन्ही रकमेची नोंद रोकडवहीत घेण्यात आलेली आहे ? याची माहिती द्यावी. सदर रक्कम कोणत्या कारणासाठी प्रदान केली. नियमानुसार त्यांना डिसीआरजी ची रक्कम किती देय होती. याची माहिती द्यावी. त्यांना डिसीआरजी ची रक्कम देय रकमेपेक्षा जास्त प्रदान केली आहे का ? केली असल्यास किती रक्कम प्रदान केली यांची माहिती द्यावी. अति प्रदान केलेली रक्कम त्यांच्या कडुन वसुल केली का ? केली असल्यास ती सौ. शहेनाज परविन युसूफ खान यांचेकडुनच वसुल केली याचे पुरावा काय आहे. या बाबत पत्रव्यवहार केला असल्यास त्या पत्राची छायाकींत प्रत द्यावी. वसुल केलेल्या रकमेची नोंद व वरील दोन्ही धनादेशाची नोंद रोकडवहीत घेण्यात आली का ? घेतली नसल्यास त्यास कोण

जबाबदार आहे यांची माहिती द्यावी. या प्रकरणात आहरण संवितरण अधिकारी म्हणुन श्री. वि.ना.द्रविड उ.का.अ.यांची कोणती जबाबदारी होती ती त्यांनी शासनाच्या नियमानुसार पार पाडलेली आहे का ? नसल्यास या प्रकरणी विभाग प्रमुख यांनी कोणती कार्यवाही केली यांची माहिती केलेल्या पत्रव्यवहाराच्या छायाप्रतीसह देण्यात यावी. या बाबत कोणाची लिखित तक्रार आली का ? या तक्रारीवर विभाग प्रमुख यांनी कोणती कार्यवाही केली यांची माहिती केलेल्या पत्रव्यवहाराच्या छायाप्रतीसह देण्यात यावी.

२. दि. १/११/२००६ पासून अर्जाच्या दिनांकापर्यंत विभागीय कार्यालयाने मंजुर केलेले श्री. सु.वि.खरात शाखा अभियंता यांचे सर्व अंदाजपत्रकांची व पतपत्र मर्यादे अंतर्गत त्यांनी मोजमापे केलेल्या व उप विवभागाने त्यांना प्रदान केलेल्या सर्व देयकाची छायाप्रत देण्यात यावी.

३. दिनांक १/११/२००६ पासुन अर्जाच्या दिनांकापर्यंत मंजुर अंदाजपत्रक नोंदवहीची छायाप्रत देण्यात यावी.

४. दि. १/४/२००२ पासुन ३१/१०/२००५ पर्यंत स्थापत्य विभागाची ठेव किती व कोणत्या कामासाठी आपल्या विभागात होती यापैकी किती ठेव खर्च करण्यात आली व किती ठेव विनाकाम केल्याने राहून गेली यांची माहिती द्यावी. सदर माहिती प्रकल्प प्रमाणे देण्यात यावी.

५. दि. ९/१/२००४, १०/१/२००४ व १७/१/२००४ रोजी झालेल्या केबलस्फोट मुळे शासनाचे किती रुपयाचे नुकसान झाले याची माहिती द्यावी. सदर स्फोट कश्यामुळे झाले. व यास जबाबदार कोण याची माहिती द्यावी. या बाबत लिखीत तक्रार आली का? या तक्रारीवर विभाग प्रमुख यांनी कोणती कार्यवाही केली यांची माहिती केलेल्या पत्रव्यवहाराच्या छायाप्रतीसह देण्यात यावी.

६. मे.ज्योती लिलमीटेड यांनी विष्णुपूरी प्रकल्पसाठी २०० के.व्ही.ए.आर.कॅपीसिटर ठरविलेला असतांना आजपर्यंत १०० के.व्ही.ए.आर.एवढाच कॅपीसिटर जोडण्यात आला आहे. यामुळे पावर फॅक्टर म.रा.वि.मंडळाच्या नियमानुसार ०.९ येत नसल्यामुळे शासनास आज पर्यंत किती रक्कमेचा दंड भरावा लागला याची माहिती द्यावी. यास कोण जबाबदार आहे यांची माहिती द्यावी. या बाबत लिखीत तक्रार योग्य मागे आली का ? या तक्रारीवर विभाग प्रमुख यांनी कोणती कार्यवाही केली यांची माहिती केलेल्या पत्रव्यवहाराच्या छायाप्रतीसह देण्यात यावी.

७. श्री. पांडे यांनी सुनामी निधीत रकमेचा दुरुपयोग केलेला आहे. या बाबत त्यांनी जबाबदारी लिखीत स्वरुपात स्विकारलेली आहे व शासनाने त्यांना या प्रकरणात दोषी ठरवुन त्यांची बदली उस्मानाबाद येथे शिक्षा म्हणुन केलेली आहे. असे असतांनाही त्यांना पुन्हा वरिष्ठ लिपीक म्हणुन शासनाच्या कोणत्या नियमानुसार घेतले याची माहिती द्यावी. कार्यभार देतांना कर्मचाऱ्यांची मागील वर्तणुक कार्यपध्दती बघीतली जाते. सुनामी

निधी प्रकरण घडुन अधिक कालावधी झालेला नसतांना या प्रकरणाकडे दुर्लक्ष का करण्यात आली यांची माहिती द्यावी. अश्या कर्मचारीस पुन्हा त्याच कार्यालयात त्याच शाखेत कार्यकरु देणे शासनाच्या नियमानुसार आहे का? यांची माहिती द्यावी. "

अपिलार्थी यांनी सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. २९.०३.२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन, ही माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी रु.४१२/- इतके शुल्क भरण्याचे त्यांना सूचित केले, सदर शुल्क अपिलार्थीने त्यांच्या कार्यालयात दि. ४.४.२००७ रोजी भरल्यानंतर त्यांना त्याच दिवशी म्हणजे दि. ४.४.२००७ रोजी त्यांनी काही माहिती पुरविली. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. ०७.०४.२००७ रोजी प्रथम अपील केले. सदर अपील अर्ज जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ९.४.२००७ रोजी प्राप्त झाला. या अपील अर्जामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना अपूर्ण माहिती मिळाली असल्याचे नमूद करुन जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता यांनी त्यांची माहिती मिळविण्याची विनंती जाणूनबुजून व दुष्ट हेतूने नाकारली व त्यांनी माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी एकप्रकारे अडथळा आणला असल्याचे नमूद केले आहे. तसेच या अपील अर्जामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्यावर रु.२५०/- प्रमाणे शास्ती लावण्याची जन अपिलीय अधिकारी यांना विनंती केली आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या अपील अर्जावर त्यांच्या कार्यालयाकडे दि. ५.५.२००७ रोजी प्रथम सुनावणी घेऊन

त्यांनी आपले निर्णय  दि. ३१.५.२००७ रोजी पारित केले आहेत. या आदेशान्वये त्यांनी, त्यांच्याकडे झालेल्या चर्चेअंती अपिलार्थीचे समाधान झाल्याने त्यांचे प्रथम अपील निकाली काढले. तथापि जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने  माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. २१.०८.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीशी ते सहमत नसल्याचे नमूद करुन, त्यांनी मागणी न केलेली माहिती देण्यात येऊन त्यांना जाणूनबुजून आर्थिक नुकसान होण्याच्यादृष्टीने आकारलेली फी, व्याजासह परत करावी, असे नमूद केले आहे. तसेच त्यांनी मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र. ५ व ६ च्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी त्यांना दिशाभूल करणारी व खोटी माहिती दिल्याचे नमूद केले आहे. तसेच आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवून संबंधित जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचेवर प्रतिदिनी रु.२५०/- प्रमाणे दंडात्मक कार्यवाही व जन अपिलीय अधिकारी यांच्यावर शासनाच्या नियमानुसार कार्यवाही करण्याची आयोगास विनंती केली आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीचे वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना मुद्दा क्र.१ च्या संदर्भात कोणतीही माहिती अद्यापपावेतो दिली नाही. त्यांच्याकडून माहिती देण्यापोटी जास्तीचे शुल्क आकारण्यात आले. मुद्दा क्र. ५ व ६ शी संबंधित त्यांना चुकीची माहिती प्राप्त झाली आहे व त्यांच्याकडून जादा आकारले गेलेले शुल्क त्यांना व्याजासह परत करावे. जन माहिती अधिकारी यांनी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, मुद्दा क्र. १

शी संबंधित माहिती ते आता अपिलार्थीस देण्यास व अपिलार्थीकडून अनावश्यक माहितीपोटीचे त्यांच्याकडून घेतले गेलेले शुल्क आता त्यांना परत देण्यास तयार आहेत.

जन अपिलीय अधिकारी यांनी असा युक्तीवाद केला की, अपिलार्थीच्या दि. ७.४.२००७ रोजीच्या अपील अर्जावर सुनावणी घेऊन निर्णय देताना ते या पदावर कार्यरत नव्हते.तत्कालीन जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. ७.४.२००७ रोजीच्या अपील अर्जावर दि. ५.५.२००७ रोजी सुनावणी घेऊन दि. ३१.५.२००७ रोजीच्या आदेशाद्वारे अपिलार्थीचे अपील निकाली काढले आहे.

त्रयस्थ पक्षातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थीने त्यांच्याशी संबंधित मागितलेली माहिती अपिलार्थीस देण्यासाठी त्यांची काहीही हरकत नाही.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या युक्तीवादामध्ये, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी मुद्दा क्र. १ शी संबंधित माहिती दिली नाही, हा मांडलेला मुद्दा सिध्द होत आहे. कारण जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ४.४.२००७ रोजीच्या पत्रामध्ये अपिलार्थीस ही माहिती त्यांच्या कार्यालयातील दि. २.१.२००७ रोजीच्या पत्रान्वये दिल्याचे म्हटले आहे. सदर पत्राचे अवलोकन करता अपिलार्थीस ही माहिती त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांनी केलेल्या एका वेगळया (दि. ४.१२.२००६) अर्जाच्या संबंधाने दिली असल्याचे दिसून येत आहे. येथे असे स्पष्ट करण्यात येत आहे की, अपिलार्थीस जरी जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या माहितीच्या अर्जामधील मुद्यातील माहिती या विचाराधीन अर्जापूर्वी वेगळया संदर्भाने दिली असली तरीही जन माहिती अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीने नव्याने अर्ज केल्यास त्यावर त्यांनी अधिनियमान्वये विहित केलेल्या मुदतीत कार्यवाही करणे व

संबंधित अर्जावर परत नव्याने निर्णय घेणे भाग आहे.अपिलार्थीने मागणी केलेल्या या माहितीसंदर्भातील माहितीचे अवलोकन करता असे दिसून येते की, अपिलार्थीने या मुद्याद्वारे संपूर्ण प्रश्नार्थक स्वरुपात जन माहिती अधिकारी यांच्याकडे सौ.शेहनाज परविन युसुफ खान यांना अदा करण्यात आलेल्या डी.सी.आर.जी.च्या रकमेसंदर्भातील आहे, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील या परिच्छेद क्र. १ चे अवलोकन केले असता, सौ.शेहनाज परविन युसुफ खान यांना प्रथमतः अदा करण्यात आलेल्या धनादेशाची रक्कम ज्या कॅशबुकमध्ये नोंदविलेली आहे त्या कॅशबुकच्या संबंधित पृष्ठाची झेरॉक्स प्रत व त्या नंतर त्यांच्याकडून वसूल करण्यात आलेल्या जादाच्या रकमेची नोंद ज्या रजिस्टरमध्ये जन माहिती अधिकारी यांच्याकडे नोंदली आहे व जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील कॅशबुकमध्ये ज्या पृष्ठावर याची नोंद झाली आहे, त्या दोन पृष्ठांच्या झेरॉक्स प्रती व त्यांनी या प्रकरणाशी संबंधित केलेल्या पत्रव्यवहाराची प्रती अपिलार्थीस दिल्यास अपिलार्थीस आवश्यक ती माहिती जन माहिती अधिकारी यांनी त्यांना दिल्यासारखे होईल. अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जातील मुद्दा क्र. ३ व ४ आयोगातर्फे मान्य करण्यात येत असून, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी अनावश्यक माहिती पुरविली असल्याचे व या न मागितलेल्या माहितीच्या अनुषंगाने अपिलार्थीकडून शुल्क आकारल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन सिध्द होत आहे. सबब जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस मुद्दा क्र. २ व ४ च्या मुद्याशी संबंधित त्यांच्याकडून प्राप्त करुन घेतलेल्या जादा शुल्काची रक्कम त्यांना परत द्यावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. अपिलार्थीने त्यांच्याकडे मुद्दा क्र. ५ व ६ च्या संदर्भाने केवळ स्फोटात शासनाच्या झालेल्या नुकसानीबद्दल काय कार्यवाही केली, हया नुकसानीस जबाबदार कोण, इत्यादी माहिती मागितली आहे. या माहितीमध्ये त्यांनी जन माहिती

अधिकारी यांच्याकडून त्यांना प्राप्त झालेल्या काही तक्रारींच्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांच्याकडून निश्चितपणे काय कार्यवाही झाली या माहितीचा समावेश होता तथापि जन माहिती अधिकारी आयोगासमोर या मुद्यावर स्पष्टपणे युक्तिवाद करु शकले नाहीत. सबब त्यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीस या मुद्यांसंदर्भातील माहिती हे आदेश निर्गमित होताच २० दिवसांच्या आत विनामूल्य द्यावी.

अपिलार्थीच्या मूळ अर्जाचे व त्यावर जन माहिती अधिकारी यांनी केलेल्या युक्तीवादाचे वरीलप्रमाणे विश्लेषण पाहता, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी मुद्दा क्र. १ शी संबंधित माहिती पुरविली नाही, मुद्दा क्र. २ व ४ शी संबंधित माहितीसाठी अपिलार्थीकडून जादा रक्कम प्राप्त करुन घेतली आहे, तर मुद्दा क्र. ५ व ६ या विषयाशी संबंधित माहिती दिली नसल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र. ५ च्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेले उत्तर मजेशीर आहे, त्यामध्ये जन माहिती अधिकारी यांनी असे म्हटले आहे की, " श्री. म.मा.स्वामी तत्कालीन उपअभियंता यांनी सदर नस्ती/पत्रव्यवहाराची कागदपत्रे स्वतःकडे दडवून ठेवली आहे." कोणत्याही शासकीय कर्मचाऱ्याने अशाप्रकारची कार्यालयीन माहिती/नस्ती स्वतःकडे दडवून ठेवणे ही निश्चितपणे प्रशासकीय स्वरुपाची गंभीर अनियमितता आहे, असे आयोगाचे मत आहे. श्री. स्वामी यांनी संबंधित नस्ती दडविल्याबद्दल त्यांच्यावर कोणती कारवाई केली याबाबत जन माहिती अधिकारी यांना विचारणा केली असता, ते आयोगास कोणतेही समर्थनीय उत्तर देऊ शकले नाहीत. श्री. स्वामी यांच्यावर आता तरी योग्य ती कारवाई करण्याची दक्षता संबंधित जन माहिती अधिकारी यांनी घ्यावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.
वरील परिच्छेदात उल्लेखिल्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस

त्यांच्याकडून अनावश्यक माहितीपोटी घेतलेली जादा शुल्काची रक्कम त्यांना परत द्यावी, असे त्यांना वर सूचित करण्यात आले आहे. तथापि अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या, या जादा शुल्काच्या रकमेवरील व्याजाच्या रकमेची, तिचे आकारमान पाहता, मागणी मात्र आयोग फेटाळून लावत आहे.

उपरोक्त प्रकरणी अशाप्रकारे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अर्धवट माहिती दिल्याचे निःसंशयपणे सिध्द होत आहे. जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या या कृतीद्वारे स्वतःला अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीस पात्र ठरविले आहे. त्यांनी अपिलार्थीस अर्धवट माहिती पुरवून आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे, असे आयोगाचे मत आहे. सबब मुख्य अभियंता (यांत्रिकी), जलसंपदा विभाग, नाशिक यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य प्रशासकीय कारवाई करण्याची आयोगाची शिफारस आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१ अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२ जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थी यांच्याकडून प्राप्त करुन घेतलेले जादाचे शुल्क त्यांना, हे आदेश निर्गमित होताच वीस दिवसांचे आत परत करावे.

३ जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस देय असलेली त्यांच्या प्रथम अर्जातील उर्वरित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच वीस दिवसांचे आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

४ मुख्य अभियंता (यांत्रिकी) जल संपदा विभाग, यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य प्रशासकीय कारवाई करण्याची शिफारस आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०५-०८-२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. मोहियुद्दीन मोईनुद्दीन फारुकी, नोमानियानगर, तरोडा (बु.) रा.नांदेड-४३१६०५

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, विष्णुपूरी पंपगृह विभाग, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता यांत्रिकी मंडळ, उ.सं.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य अभियंता (यांत्रिकी),जलसंपदा विभाग, वेदमंदिरासमोर, त्रंबकरोड, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१३२७

निर्णय दिनांक ०५-०८-२००८

| | | |
|---|---|---|
| १ श्री. चौधरी मोहम्मद मोईनोद्दीन गौस मनियार, रा. उस्मानाबाद | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| १ जन माहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी व सदस्य सचिव, विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती, औरंगाबाद विभाग,औरंगाबाद | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय समाज कल्याण अधिकारी, विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्र.१, औरंगाबाद | | |

त्रयस्थ पक्षः श्री. एस.एल.मुंढे, पोलीस निरीक्षक, दक्षता पथक,(जा.प्र.पडताळणी )

**<u>निर्णय</u>**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०५.०८.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी श्री. रामदास नारायण वैद्य, जन माहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी व सदस्य सचिव, विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती, औरंगाबाद (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. दत्तात्रेय प्र.वाकोडे, जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय समाजकल्याण अधिकारी जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्र.१, औरंगाबाद (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल), हे हजर आहेत, तर अपिलार्थी श्री. चौधरी मोहम्मद मोईनोद्दीन गौस मनियार ( यापुढे

त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) व त्रयस्थ पक्ष श्री. एस.एल.मुंढे (यापुढे त्यांना त्रयस्थ पक्ष असे संबोधण्यात येईल) हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी सर्वप्रथम त्यांचेकडील दि.११.०४.२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयातील पोलीस निरीक्षक (दक्षता पथक जात पडताळणी श्री. मुंढे) यांच्या संदर्भातील एकूण १४ मुद्यांवर विविध प्रकारची प्रश्नार्थक स्वरुपात माहिती मागितली होती.

अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीमध्ये,- पोलीस निरीक्षक श्री. मुंढे यांनी उस्मानाबाद शहराचा चार्ज घेतल्यापासून दि. १० मार्च, २००७ पर्यंत किती अर्जदारांची गृहचौकशी केली त्यापैकी मुस्लीम ओ.बी.सी. किती, हिंदू ओ.बी.सी.किती, त्यांची नावे, चौकशी करतांना सर्वांचे पंचनामे केले होते काय, केले असल्यास पंचांची नावे, पत्ते व दिनांक, पंचनामा करताना पंचांचे जवाब घेणे आवश्यक आहे का, तसेच उमेदवाराच्या रहिवासाच्या ठिकाणी जाऊन जवाब घेणे आवश्यक आहे का, या बाबतीतील शासन निर्णयाची प्रत, श्री. मुंढे हे दि. १० मार्च, २००७ पर्यंत कोण कोणत्या तारखेस उस्मानाबाद शहरात गृहचौकशीसाठी गेले, त्यांनी दि. १० मार्च, २००७ पर्यंत ज्या मुस्लीम ओ.बी.सी. (उस्मानाबाद शहर) अर्जदारांची गृहचौकशी केली त्यांची चौकशी झाल्यानंतर तपासाअंती त्यांची जात कोणती आहे हे त्यांच्या अहवालात नमूद केले आहे का, तसे करणे बंधनकारक आहे काय, याबाबतीतील शासन निर्णयाची प्रत, जात नमूद न करता, पंचनामा न करता व पंचांचे जवाब न घेता अहवाल पाठविला तर संबंधित अधिकाऱ्यावर काय कारवाई करता येते याबाबतची शासन निर्णयाची प्रत, पोलीस निरीक्षक यांनी जर अर्जदाराची जात नमूद न करता अहवाल पाठविला तर तो अहवाल स्वीकारुन जात पडताळणी समिती निर्णय देते का,श्री. मुंढे यांनी उस्मानाबाद

शहराचा चार्ज घेतल्यानंतर १० मार्च, २००७ पर्यंत उस्मानाबाद शहरातील ज्या मुस्लीम ओ.बी.सी.अर्जदारांची चौकशी केली त्या सर्व अर्जदारांचे पंचनामे त्यांनी स्वतः जागेवर जाऊन केले का, त्यांनी स्वतः पंचांचे जवाब घेतले का, हे पंचनामे स्वतःच्या हस्ताक्षरात लिहिले का, पोलीस निरीक्षक दक्षता समिती पथक यांचेकडे अर्जदाराची गृहचौकशीसाठी फाईल आल्यानंतर किती दिवसात गृह चौकशी करुन अहवाल पाठविणे बंधनकारक आहे. याबाबतची शासन निर्णयाची प्रत, वेळेवर गृहचौकशी करुन अहवाल पाठविण्यात आला नाही तर संबंधित अधिकाऱ्यावर कोणती कारवाई होऊ शकते याबाबतच्या शासन निर्णयाची प्रत, श्री. मुंढे १० मार्च, २००७ पर्यंत उस्मानाबाद शहरात गृहचौकशीसाठी गेले. त्यासाठी त्यांना किती टी.ए.डी.ए.मिळाला त्याची रक्कम, स्लीपच्या नकला व तारीखवार तपशील, श्री. मुंढे यांचे १० मार्च, २००७ पर्यंतच्या हजेरीपटाची नक्कल, श्री. मुंढे गृहचौकशीकरिता उस्मानाबाद शहरात आल्यानंतर कोणत्या कार्यालयात त्याची नोंद झाली, ते शहरात आल्यानंतर अर्जदारास कसे कळविले जाते, संपर्काचे माध्यम काय, ते कोठे थांबतात, याचा तपशील- इ. मुद्यांचा समावेश होता.

अपिलार्थी यांनी सदर माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. १८.०५.२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन त्यांना काही माहिती दिल्याचे दिसून येते. तथापि जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. १८.०५.२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येत आहे. या अपिलाची जन अपिलीय अधिकारी यांनी दि.१५.६.२००७ रोजी सुनावणी घेऊन

या संदर्भातील आपले आदेश दि.०४.०७.२००७ रोजी पारित केले. या आदेशाद्वारे त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुनःश्च् तात्काळ माहितीची प्रत देण्याचे सूचित करुन अपिलार्थीचे प्रथम अपील निकाली काढले आहे. अपिलार्थीचे सदर अपील फेटाळतांना त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. १८.५.२००७ रोजी माहिती दिल्याचे कारण दर्शविले आहे.जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १२.७.२००७ रोजी द्वितीय अपील केले आहे. सदर अपील अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येते.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. तथापि त्यांनी राज्य माहिती आयोगास त्यांच्याकडील दि. २५.७.२००८ रोजीच्या पत्रान्वये त्यांचा युक्तीवाद लेखी स्वरुपात सादर केला आहे. त्यामध्ये त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांनी निकालामध्ये सात दिवसांच्या आत माहिती द्यावी असे कळवून देखील जन माहिती अधिकारी यांनी त्यांना माहिती दिली नसल्याचे नमूद केले आहे. तसेच जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांचे अपिलावर दिलेला निर्णय त्यांना दि. ३०.७.२००७ रोजी प्राप्त झाला असून त्यामध्ये निर्णय दि. १५.६.२००७ असा लिहिलेला आहे. निकाल पाठविलेल्या पाकीटाच्या शिक्क्यावर दि. २७.७.२००७ अशी तारीख आहे, जन माहिती अधिकारी यांनी दि. १८.५.२००७ रोजी माहिती दिली, हे चुकीचे आहे. कारण या पत्राद्वारे जन माहिती अधिकारी यांनी त्यांना माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी आवश्यक ते शुल्क कळविलेले आहे, असे नमूद करुन आपल्या मूळ अर्जातील माहिती त्यांना विनामूल्य प्राप्त व्हावी, असे आदेशित करण्याची त्यांनी आयोगास विनंती केली आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थीचे दि. ११.४.२००७ रोजीच्या अर्जातील संबंधित माहिती त्यांना अपिलार्थीस त्यांच्याकडील दि. १८.५.२००७ रोजीच्या पत्रान्वये साध्या पोस्टाने विनामूल्य पाठविली होती.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थीच्या दि. १८.५.२००७ रोजीच्या अपील अर्जावर त्यांनी दि. १५.६.२००७ रोजी सुनावणी घेऊन या संदर्भातील आपले आदेश दि. ४.७.२००७ रोजी पारित केले. सदर सुनावणीच्यावेळी अपिलार्थी उपस्थित होते.

वरील घटनाक्रम, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे एकूण १४ मुद्यांवर श्री. मुंढे पोलीस निरीक्षक,(दक्षता पथक जात पडताळणी) यांच्याविषयी माहिती मागितली होती. त्यातील बहुतांश माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून खुलासे व उत्तरे अपेक्षित करणारी असल्याचे दिसून येते. अपिलार्थीच्या प्रथम अर्जाचा एकूण सूर पाहिला असता त्यांना श्री. मुंढे यांनी जात पडताळणी समितीत उस्मानाबाद शहरात काम करीत असताना, त्यांनी ज्या मुस्लिम ओ.बी.सी व हिंदू ओ.बी.सी. व्यक्तींचे पंचनामे केले आहेत, अशा व्यक्तींच्या संदर्भात माहिती मागितल्याचे दिसून येते. मूळात जन माहिती अधिकारी यांच्याकडे जात व धर्म यानुसार वेगळी माहिती ठेवणे, वेगळी कार्यवाही करणे, त्यांच्या प्रचलित कार्यपध्दतीमध्ये रुढ नाही. त्यामुळे अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी श्री. मुंढे यांनी ज्या व्यक्तींच्या संदर्भात पंचनामे केले आहेत, अशा व्यक्तिंच्या नावांची यादी - ही माहिती या हद्दीपर्यंत अपिलार्थीस देणे देय ठरते. उर्वरित मुद्यावरील माहितीसंदर्भात त्यांना माहिती अधिकार अधिनियमातील कलम ११ प्रमाणे कार्यवाही करुन निर्णय घ्यावा लागेल.

अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे श्री. मुंढे यांचे प्रवासाबाबत त्यांनी कोठे मुक्काम केला, विश्रामगृहाचे पत्ते, इ.स्वरुपाची माहिती विचारली आहे. या संदर्भात श्री. मुंढे यांनी दि. १० मार्च २००७ पर्यंत केलेल्या शासकीय कामाकरिता मागितलेल्या व त्यांना अदा केलेल्या प्रवासभत्ता बिलाच्या प्रती तसेच अपिलार्थीने त्यांचे मूळ अर्जामध्ये जात पडताळणी समितीची निर्णय घेण्याची, पंचनामान्याची पध्दत अशा वेगवेगळया कार्यालयीन पध्दतीबाबत जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागितली. या संदर्भात त्यांना असे सूचित करण्यात येते की, त्यांच्या प्रशासकीय विभागात या विषयासंदर्भात दि. ११.४.२००७ पर्यंत त्यांच्या वरिष्ठांनी वेळोवेळी जारी केलेली परिपत्रके, आदेश, मॅन्युअलमध्ये संबंधित पध्दत विशद केली असल्यास त्याच्या प्रती इत्यादी प्रती त्यांना अपिलार्थीस देणे भाग आहे. उपरोक्त प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. १८.४.२००७ रोजीच्या प्रथम पत्राद्वारे दिलेल्या प्रतिसादाचे अवलोकन करता त्यामध्ये जन माहिती अधिकारी यांनी अशाप्रकारची माहिती दिली नसल्याचे दिसून येते. जन माहिती अधिकारी यांना आता वर नमूद केल्याप्रमाणे आवश्यक ती माहिती, व्यपगत कालावधी पाहता, अपिलार्थीस विनामूल्य पुरवावी असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे. अपिलार्थीस माहिती देताना जन माहिती अधिकारी यांनी हेतुपूर्वक कोणतीही टाळाटाळ केल्याचे अथवा अपिलार्थीपासून माहिती दडविल्याचे निःसंशयपणे सिध्द होत नसल्याने जन माहिती अधिकारी यांच्यावर कार्यवाहीचे कोणतेही आदेश नाहीत. तथापि त्यांना असे सूचित करण्यात येते की, यापुढे त्यांच्याकडे माहिती अधिकारा अंतर्गत प्राप्त होणाऱ्या प्रत्येक अर्जावर त्यांनी सकारात्मक दृष्टीकोण ठेवून कार्यवाही करावी. जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी आयोगापुढे केलेल्या युक्तीवादावरुन असे स्पष्ट झाले आहे की, त्यांच्या कार्यालयामध्ये प्राप्त होणाऱ्या अर्जाची नोंद, त्यावर घेतले जाणारे निर्णय

अशाप्रकारच्या माहितीचे व्यवस्थापन त्यांच्या कार्यालयाकडून अद्ययावत पध्दतीने केले जात नाहीत. शासनाच्या जवळपास प्रत्येक कार्यालयामध्ये आता संगणकीकरण झाले आहे. जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयात अशाप्रकारच्या माहितीचे व्यवस्थापन करण्याच्या दृष्टीने संगणकीकरण होणे गरजेचे आहे, असे आयोगाचे मत आहे. सदर संगणकीकरणाची गरज वेळीच लक्षात घेऊन जातपडताळणी समितीच्या सर्व कार्यालयाच्या संगणकीकरणाचे व माहिती व्यवस्थापनाचे काम प्राधान्याने हाती घ्यावे, असे सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांना माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९(८) च्या तरतुदीनुसार सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१ अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२ जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली वरील निर्णयात स्पष्ट केल्याप्रमाणे देय असलेली संपूर्ण माहिती, त्यांना हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांचे आत विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०५-०८-२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. चौधरी मोहम्मद मोईनोद्दीन गौस मनियार,नेहरु चौक उस्मानाबाद, ता.जि.उस्मानाबाद
२. जन माहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी व सदस्य सचिव, विभागीय जाती

प्रमाणपत्र पडताळणी समिती क्र.(१), औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय समाजकल्याण अधिकारी, विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्र. १,सिडको एन-४, बी-२६ औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-३२

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१४७९

निर्णय दिनांक ०५-०८-२००८

| | | |
|---|---|---|
| १ श्री. गिरीष शिवानंद पुणे,<br>रा.अहमदपूर, जि.लातूर. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी<br>तथा मुख्याधिकारी,<br>नगर परिषद,अहमदपूर, जि.लातूर | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी<br>तथा उपआयुक्त (सामान्य प्रशासन),<br>विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद | | |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०५.०८.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी श्री. भारत प्रभाकरराव राठोड, जन माहिती अधिकारी तथा (प्र) मुख्याधिकारी, नगरपरिषद अहमदपूर, जि.लातूर (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. सोमनाथ गुंजाळ, जन अपिलीय अधिकारी तथा उपआयुक्त (सामान्य प्रशासन) विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत, तर अपिलार्थी श्री. गिरीष शिवानंद पुणे (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी सर्वप्रथम त्यांचेकडील दि.०५.१०.२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे सन २००० ते ऑक्टोबर, २००७ या कालावधीतील त्यांच्या कार्यालयाशी संबंधित खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

" १) अहमदपूर नगर परिषद हद्दीतील आरक्षण क्र. ९ चे एकूण चटई क्षेत्र किती स्के.मी. आहे ? फक्त आरक्षण क्र. ९ चा नकाशा व त्याच्या भोवती रस्त्याच्या नकाश द्यावा.

२) आरक्षण क्र. ९ च्या एकूण चटई क्षेत्रापैकी किती चटई क्षेत्रावर बांधकाम झाले आहे व किती चटई क्षेत्र बांधकाम विरहीत आहे ?

३) नगर परिषद आरक्षण क्र. ९ ची चर्तुःसिमासह नकाशा.

४) नगर परिषद सर्व साधारण सभा ठराव दि. २०/११/२००६ रोजी आपण दिलेल्या नक्कल प्रमाणे भुसंपादनाची कार्यवाही कागदोपत्री आज कुठपर्यंत झाली आहे व कोणत्या अवस्थेत आहे ?

५) आरक्षण क्र. ९ या आरक्षण जागेत आकृषी परवाना दिले गेला आहे काय ? आरक्षण क्र.९ या जागेत कोणास बांधकाम परवानगी, विद्युत पुरवठा ना हरकत, नळाद्वारे पाणी पुरवठा करण्यात आला आहे काय असेल तर त्याची एक प्रत द्यावी.

६) आज रोजीची नगर परिषद आरक्षण क्र. ९ ची '७/१२', ८ 'अ' ची प्रत द्यावी. "

अपिलार्थी यांनी सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ३०.१०.२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. ४/- इतक्या रकमेचा भरणा त्यांच्या कार्यालयात करण्याचे अपिलार्थीस सूचित केले. अपिलार्थीने सदर शुल्काचा भरणा दि. १.११.२००७ रोजी करुन त्यांना आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून हस्तगत करुन घेतली. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. ०६.१२.२००७ रोजी प्रथम अपील केले आहे. या

अपील अर्जामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी त्यांना दिशाभूल करणारी माहिती दिल्याचे नमूद करुन आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे. या अपिलाची जन अपिलीय अधिकारी यांनी दि.२५.१.२००८ रोजी सुनावणी घेऊन या संदर्भातील आपले आदेश दि.३१.०१.२००८ रोजी पारित केले. या आदेशाद्वारे त्यांनी अपिलार्थीचे प्रथम अपील अंशतः मान्य करुन संबंधित जन माहिती अधिकारी यांनी त्यांचेकडील सुनावणीच्या वेळी आणलेली पूरक माहिती अपिलार्थीस सात दिवसांचे आत विनामूल्य देण्याचे सूचित केले. त्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दि.२३.१.२००८  रोजीच्या पत्राद्वारे दि. १४.२.२००८ रोजी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना विनामूल्य हस्तांतरित केली. तथापि जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. २१.८.२००८ रोजी द्वितीय अपील केले आहे. या अपील अर्जामध्ये आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवून त्यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने संबंधितावर अधिनियमातील कलम २० प्रमाणे कार्यवाही करण्याची आयोगास विनंती केली आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. त्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जातील त्यांचे लेखी म्हणणे, हाच त्यांचा युक्तीवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थीने दि. ०५.१०.२००७ रोजीचा प्रथम अर्ज केल्यानंतर त्यांनी अपिलार्थीच्या या अर्जास अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत त्यांच्याकडील दि. ३०.१०.२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटी रु.

४/- इतके शुल्क त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. अपिलार्थीने सदर शुल्काचा भरणा त्यांच्याकडे दि. १.११.२००७ रोजी केल्यानंतर त्याच दिवशी त्यांना आवश्यक ती माहिती देण्यात आली. तथापि सदर माहितीने समाधान न झाल्याने त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपील केले. जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे झालेल्या सुनावणीमध्ये ठरल्याप्रमाणे व जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित केल्याप्रमाणे अपिलार्थीस त्यांनी त्यांच्याकडील दि. २३.१.२००८ रोजीच्या पत्राद्वारे दि. १४.२.२००८ रोजी व्यक्तिशः माहिती हस्तांतरित केली. ही माहिती अपिलार्थीस देण्यासाठी त्यांच्या कार्यालयातील शिपाई अपिलार्थी यांच्या निवासस्थानी दि. ११.२.२००८ रोजी गेला असता, अपिलार्थीने सदर माहिती स्वीकारण्याचे नाकारले.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थीच्या दि. ६.१२.२००६ रोजीचा प्रथम अपील अर्ज त्यांच्याकडे दि. २०.१२.२००७ रोजी प्राप्त झाला, त्यावर त्यांनी दि. २५.१.२००८ रोजी सुनावणी घेऊन आपले आदेश दि. ३१.१.२००८ रोजी पारित केले.

वरील घटनाक्रम, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जरी प्रश्नार्थक स्वरुपात असली तरीही जन माहिती अधिकारी यांनी त्यांना अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीमध्ये सकारात्मक प्रतिसाद देऊन आवश्यक ती माहिती दि. १.११.२००७ रोजी हस्तांतरित केली आहे. सदर माहिती चुकीची,दिशाभूल करणारी असल्याचे व काही माहिती दडविल्याचे अपिलार्थीस वाटल्यावरुन त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपिलाच्या सुनावणीपूर्वीच जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे

उपस्थित केलेल्या सर्व मुद्यांची मुद्देनिहाय माहिती तयार करुन ठेवली व जन अपिलीय अधिकारी यांच्या आदेशाप्रमाणे ती अपिलार्थीस दि. ११.२.२००८ रोजी शिपायामार्फत पाठविली. तथापि त्या दिवशी अपिलार्थी यांनी ही माहिती स्वीकारली नाही. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून दि. १४.२.२००८ रोजी स्वीकारली. यावरुन असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस प्रथमतः दि. १.११.२००७ व नंतर दि. १४.२.२००८ रोजी आवश्यक ती माहिती पुरविली आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस या दोन टप्प्यामध्ये पुरविलेल्या माहितीचे अवलोकन केले असता, त्यांनी अपिलार्थीस प्रथम माहितीच्या अर्जास योग्य तो सकारात्मक प्रतिसाद वेळोवेळी दिल्याचे दिसून येते. तसेच जन माहिती अधिकारी यांच्या युक्तीवादाचे खंडण करण्यासाठी आज अपिलार्थी गैरहजर असल्याने अपिलार्थीचे अपील फेटाळण्यायोग्य आहे, या निष्कर्षाप्रत आयोग आला आहे. या संपूर्ण घटनाक्रमामध्ये कोणत्याही टप्प्यावर जन माहिती अधिकारी यांनी माहिती दडविली, अपिलार्थीस दिशाभूल करणारी व चुकीची माहिती दिली, असे आयोगास उपलब्ध करुन दिलेल्या कागदपत्रांवरुन निःसंशयपणे दिसून येत नाही, त्यामुळे त्यांच्यावर कोणत्याही कारवाईचे आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील फेटाळण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०५-०८-२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. गिरीष शिवानंद पुणे, 'शिवकृपा'दुग्ध एजन्सीज, कोर्टरोड,चारटांगी, अहमदपूर जि,लातूर.
२. जन माहिती अधिकारी व मुख्याधिकारी, नगरपरिषद, अहमदपूर जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.
३. जन अपिलीय अधिकारी तथा उपआयुक्त (सामान्य प्रशासन) विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.
४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१४८०

निर्णय दिनांक ०५-०८-२००८

| | | |
|---|---|---|
| १ श्री. उरुज अहमद सिद्दीकी,<br>रा. औरंगाबाद. | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| १ जन माहिती अधिकारी<br>तथा जकात अधीक्षक,<br>महानगरपालिका, औरंगाबाद | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी<br>तथा उपआयुक्त (म),<br>महानगरपालिका, औरंगाबाद | | |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०५.०८.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्री. उरुज अहमद सिद्दीकी (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), श्री. तुकाराम गोपीचंद जाधव, जन माहिती अधिकारी तथा जकात अधीक्षक, महानगरपालिका औरंगाबाद (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. उध्दव रामकिशन घुगे, जन अपिलीय अधिकारी तथा उपआयुक्त (म), महानगरपालिका, औरंगाबाद (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल),हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी सर्वप्रथम त्यांचेकडील दि.१६.०४.२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे ऑक्टोबर २००५ या कालावधीशी संबंधित खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

" A) a copy of noting in filing (Sanchaika book) of Ladli Dulhan, Tilak path, Aurangabad.

B) a copy of panchnama

C) a copy of purchase bills.

D) a copy of receipt fine.

collected by Corporation. "

अपिलार्थी यांनी सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. १५.०५.२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे संकलीत करण्याचे काम चालू आहे व ती संकलीत होताच त्यांना पुरविण्यात येईल असे आश्वासित केले. तथापि सदर प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. १९.०५.२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जामध्ये त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येते. अपिलार्थीच्या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि.२८.६.२००७ रोजी सुनावणी घेऊन या संदर्भातील आपले आदेश दि.२८.६.२००७ रोजी पारित केले. या आदेशाद्वारे त्यांनी अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करुन अपिलार्थी यांनी मागणी केलेल्या माहितीची संचिका त्यांना दाखवून त्यातील आवश्यक ती कागदपत्रे अपिलार्थीस तात्काळ पुरविण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. जन अपिलीय अधिकारी यांनी

आदेश देऊनही अपिलार्थीस आवश्यक ती माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ६.८.२००७ रोजी द्वितीय अपील केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी आपले अपील मंजूर करुन जन माहिती अधिकारी यांच्यावर कायद्याने योग्य ती कारवाई करुन अपिलार्थीस माहिती पुरविण्याची आयोगास विनंती केली आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की,त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीची त्यांना आजही आवश्यकता आहे. सदर माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अद्यापही अप्राप्त आहे. जन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध न करुन दिल्याबद्दल त्यांच्यावर दंडात्मक कार्यवाही करण्यात यावी.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्या कार्यालयात त्यांनी कसोशीने शोध घेऊनही उपलब्ध होऊ शकली नाही, तथापि आता ते परत एकदा त्यांच्या कार्यालयातील अभिलेख्यात शोध घेऊन अपिलार्थीस आवश्यक ती माहिती तीस दिवसांच्या आत विनामूल्य देण्यास तयार आहेत. त्यांच्याकडे उपलब्ध असलेली व अपिलार्थीने मूळ अर्जाद्वारे मागितलेल्या मुद्दा – ‘D’ द्वारे मागणी केलेली माहिती अपिलार्थीस दि. ३०.५.२००७ रोजी विनामूल्य देण्यात आली. अपिलार्थीस माहिती दिल्याप्रीत्यर्थ अपिलार्थीची पोचसही असलेली त्यांच्याकडील पत्राची स्थळप्रत त्यांनी आयोगास दाखविली. यावरुन अपिलार्थी यांना मुद्दा क्र. ‘D’ शी संबंधित माहिती जन माहिती अधिकारी यांनी दि. ३०.५.२००७ रोजी विनामूल्य पुरविल्याचे सिध्द होत आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थीच्या दि. १९.५.२००७ रोजीच्या प्रथम अपिलावर त्यांनी दि. २८.५.२००७ रोजी सुनावणी घेऊन त्या संदर्भातील आदेश त्याच दिवशी पारित केले आहेत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने महानगरपालिका, औरंगाबादच्या जकात विभागाशी संबंधित 'लाडली दुल्हन' या दुकानाची माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितली होती. सदर दुकानदार मनपाचे जकात टाळत असताना जकात विभागाच्या एका पथकाने मे.लाडली दुल्हन या दुकानदाराचा माल पकडला व त्यानंतर संबंधित दुकानदारावर रु. ३,८८,१००/- इतका दंड आकारुन सदर प्रकरण नियमानुकूल करण्यात आले. २००५ सालापर्यंत जकातीची आकारणी महानगरपालिकेतर्फे करण्यात येत होती. त्यानंतर जकात आकारणीचे खाजगीकरण करण्यात आले.अपिलार्थीने अर्ज करते वेळी उपस्थित जन माहिती अधिकारी हे या पदावर कार्यरत नव्हते. त्यावेळी श्री. वाहुळ (सध्या प्रशासकीय अधिकारी) नावाचे अधिकारी या पदावर कार्यरत होते. उपरोक्त प्रकरणी, महानगरपालिका जकात विभागात माहे ऑक्टोबर २००५ मध्ये घडलेल्या घटनेची माहिती अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांना दि. ६.८.२००७ रोजी विचारली होती. अपिलार्थीने ज्या घटनेशी संबंधित माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून मागितली आहे, ती घटना व अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचा कालावधी लक्षात घेता अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे फार जुन्या कालावधीतील माहिती मागितली होती, असे आयोगास वाटत नाही. जन माहिती अधिकारी यांनी दि. १५.५.२००७ रोजीच्या त्यांच्या पत्राद्वारे अपिलार्थीस, त्यांनी मागणी केलेली माहिती संकलीत करण्याचे काम चालू असून ही

माहिती संकलीत होताच ती पुरविण्यात येईल, असे त्यांनी आश्वासन दिले. त्यानंतर जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीचे प्रथम अपील निर्णयावर दि. २८.६.२००७ रोजी आदेश पारित करुनही अपिलार्थीस आवश्यक ती नस्ती जन माहिती अधिकारी यांनी दाखविली नाही व आज रोजी युक्तीवादाच्यावेळी देखील जन माहिती अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीने मागणी केलेली माहिती निश्चित स्वरुपात उपलब्ध नाही, हे पाहता, अपिलार्थी हे जन माहिती अधिकारी यांच्याकडून निश्चितपणे त्यांना आवश्यक ती माहिती प्राप्त होण्यापासून अद्यापपर्यंत वंचित राहिले असल्याचे सिध्द होत आहे. अपिलार्थीने मूळ अर्जाद्वारे माहिती मागणे व आज रोजी देखील अपिलार्थीस माहिती न मिळणे यामध्ये लागलेल्या विलंबाचे कारण जन माहिती अधिकारी यांनी आपल्या युक्तीवादामध्ये जरी स्पष्ट केले असले तरी ते समर्थनीय आहे, असे आयोगास निश्चितपणे वाटत नाही. संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत न देऊन आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे, असे आयोगाचे मत आहे. त्यांच्या अशाप्रकारच्या कार्यशैलीमुळे ते अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीस निश्चितपणे पात्र ठरत आहेत. सबब महानगरपालिका आयुक्त, औरंगाबाद यांना त्यांनी उपरोक्त प्रकरणी संबंधित जन माहिती अधिकारी यांनी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर प्रचलित सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती, अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१ अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२ जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली उर्वरित माहिती, त्यांना हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांचे आत विनामूल्य पुरवावी.

३ आयुक्त, महानगरपालिका,औरंगाबाद यांना, संबंधित जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी दर्शविलेल्या कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य प्रशासकीय कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०५-०८-२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. ऊरुज अहमद सिद्दीकी,रा. घ.नं. ३-९-१८ वजीर मंजील, किराणाचावडी,औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा जकात अधीक्षक,महानगरपालिका, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपआयुक्त (म),महानगरपालिका, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. आयुक्त, महानगरपालिका, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१४८१

निर्णय दिनांक ०५-०८-२००८

१ श्री. शक्तिदास किसनराव मांजरीकर, : अपिलार्थी
रा. ढोकी, जि.उस्मानाबाद.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी : प्रतिवादी
तथा तहसीलदार,
उस्मानाबाद

२ जन अपिलीय अधिकारी
तथा उपविभागीय अधिकारी,
उस्मानाबाद.

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०५.०८.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी श्री. विकास वामनराव नाईक, जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, उस्मानाबाद (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत, तर अपिलार्थी श्री. शक्तिदास किसनराव मांजरीकर (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) व जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार उस्मानाबाद (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी सर्वप्रथम त्यांचेकडील दि.२१.०५.२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. १८.४.२००७ ते २१.५.२००७

या कालावधीमधील त्यांनी दि. १८.४.२००७ रोजी केलेल्या तक्रार अर्जावरील कार्यवाहीबाबत खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

> " मी दि. १८.४.२००७ रोजी संजय गांधी निराधार/अपंग/वयोवृध्द योजनेअंतर्गत निराधार/अपंग/वयोवृध्द पेन्शनपूर्ववत करण्याबाबत अर्ज दिला आहे. सदर अर्जावर केलेली कार्यवाही कार्यालयीन टिप्पणीसह मूळ अर्ज -अर्जाच्या छायाप्रती. "

अपिलार्थी यांनी सदर माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. २८.०६.२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद दिला. या पत्रामध्ये त्यांनी अपिलार्थीस ज्या लाभार्थ्यांची तपासणी करुन त्यांना अंतिम अनुदान बंद करण्यात आले होते, त्यांची यादी अपिलार्थीस पुरविली. तसेच या यादीतील अनुक्रमांक २४ ते ३४ या लाभार्थीचे अर्ज संबंधित सं.गां.यो.समितीच्या बैठकीमध्ये निर्णयासाठी ठेवण्यात येतील व अनुक्रमांक ३५ ते ४४ या लाभार्थीचे नव्याने अर्ज भरुन घेऊन त्यांचे कार्यालयात सादर करण्यासाठी अपिलार्थीस सूचित केले. जन माहिती अधिकारी यांच्या या पत्राचे अवलोकन केले असता त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या दिनांक २८.६.२००७ रोजीच्या पत्रामध्ये दिलेली माहिती पूर्णतया चुकीची व दिशाभूल करणारी असल्याची खात्री पटते. जन माहिती अधिकारी यांच्याकडून मिळालेल्या अशाप्रकारच्या नकारात्मक प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. ०४.०७.२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जामध्ये त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवून जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २०(१) व २०(२) प्रमाणे कारवाई करण्याची जन अपिलीय अधिकारी यांना विनंती केली. अपिलार्थीच्या अपील अर्जावर जन

अपिलीय अधिकारी यांनी दि.२३.७.२००७ रोजी सुनावणी घेऊन या संदर्भातील आपले आदेश दि.२४.७.२००७ रोजी पारित केले. या आदेशाद्वारे त्यांनी अपिलार्थीस तात्काळ माहिती द्यावी, असे जन माहिती अधिकारी यांना आदेशित केले. तथापि जन अपिलीय अधिकारी यांनी आदेश देऊनही अपिलार्थीस आवश्यक ती माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १४.८.२००७ रोजी द्वितीय अपील केले आहे.अपिलार्थी यांनी आपल्या अर्जामध्ये ज्या लाभार्थींना सं.गां.नि.यो. व वयोवृध्द योजनेअंतर्गत अनुदान मिळत नाही, त्यांना अनुज्ञेय दिनांकापासून मागील पूर्ण बाकीसह अनुदान द्यावे, त्यांना तात्काळ पेन्शन देण्यात यावे व संबंधित लाथार्थींच्या हक्कावर गदा फिरविणाऱ्या अधिकाऱ्यांवर अधिनियमातील कलम २० (१) व २०(२) प्रमाणे कार्यवाही करावी,अशी विनंती केली आहे. अपिलार्थीच्या या अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ अर्जातील माहितीशी संबंधित माहिती त्यांना मिळण्याबाबत कोणतीही विनंती आयोगास केल्याचे आयोगास आढळून येत नाही. मात्र त्यांनी या अर्जाद्वारे त्यांचे वैयक्तिक गाऱ्हाणे मांडून त्याचे निराकरण आयोगाकडून अपेक्षित करण्याचा प्रयत्न केल्याचे दिसून येते.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. त्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेल्या द्वितीय अपील अर्जातील त्यांचे लेखी म्हणणे हाच त्यांचा युक्तीवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थीच्या दि. ४.७.२००७ रोजीच्या प्रथम अपिलावर दि. २३.७.२००७ रोजी ११.०० वा. सुनावणीसाठी अपिलार्थीस बोलाविले होते. तथापि अपिलार्थी हे ठरलेल्या वेळेनंतर दोन तास उलटून गेल्यानंतरही उपस्थित न झाल्याने १.०० वाजता ते त्यांच्या कार्यालयातून दौऱ्यावर निघून गेले. अपिलार्थी त्यांच्या कार्यालयात उशीरा उपस्थित झाल्यानंतर त्यांनी

आपले लेखी म्हणणे त्यांच्या कार्यालयात सादर केले व या लेखी निवेदनाचा आधार घेऊन त्यांनी आपले आदेश दि.२४.७.२००७ रोजी पारित केले. या आदेशामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस तात्काळ माहिती देण्यासाठी सूचित केले आहे.

वरील घटनाक्रम, जन अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, मूळातच अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांनी केलेल्या दि. १८.४.२००७ रोजीच्या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी कोणती कार्यवाही केली याची माहिती त्यांच्या कार्यालयाच्या टिपणीसह व अपिलार्थीच्या या अर्जाची छायांकित प्रत अशा प्रकारची माहिती मागितली होती. तथापि जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेला दि. २८.६.२००७ रोजीचा प्रतिसाद पाहता, या पत्रामध्ये (या पत्रामध्ये जन माहिती अधिकारी यांनी ज्या लाभार्थीचे अनुदान बंद केले आहे, त्याची व इतर अर्जदार यांची यादी दिली आहे) अपिलार्थीस त्यांनी पूर्णतया चुकीची माहिती दिल्याचे दिसून येते. जन माहिती अधिकारी यांच्या अशाप्रकारच्या पूर्णतः चुकीच्या प्रतिसादाचे कोणतेही समर्थन असू शकत नाही, असे आयोगाचे मत आहे. कारण अपिलार्थीने ज्या मुद्यावर माहिती विचारली आहे, त्यापैकी कुठल्याही माहितीचा समावेश जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस लिहिलेल्या या पत्रामध्ये केलेला नाही, एवढेच नव्हे तर, या पत्रामध्ये ज्या लाभार्थ्यांचे अनुदान बंद केले आहे, त्या लाभार्थ्यांची यादी अपिलार्थीस देऊन अपिलार्थीस अनुक्रमांक ३५ ते ४४ या लाभार्थ्यांचे अर्ज नव्याने भरुन घेऊन त्यांचे कार्यालयात सादर करावयाचे त्यांना सूचित केले आहे. जन माहिती अधिकारी यांनी एकप्रकारे आपली अकार्यक्षमता या पत्राद्वारे अपिलार्थीसमोर सिध्द केल्याचे दिसून येते. अपिलार्थीस कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय त्यांना देय असलेल्या माहितीपासून वंचित ठेवल्यामुळे जन माहिती अधिकारी येथे निश्चितपणे अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीस पात्र

ठरत आहेत, या निष्कर्षाप्रत आता आयोग आला असून उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय प्रदीर्घ कालावधीकरिता त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त होण्यापासून वंचित ठेवल्याबद्दल त्यांच्यावर विलंबाच्या प्रतिदिनी रु.२५०/- याप्रमाणे एकूण रु.२५,०००/- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी एक महिन्याचे आत सरळ आयोगास सादर करावा. विहित मुदतीत त्यांचा खुलासा प्राप्त न झाल्यास याबाबत त्यांचे काहीही म्हणणे नाही, असे गृहीत धरुन हेच आदेश अंतिम करण्यात येतील,याची त्यांनी नोंद घ्यावी व अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी त्यांना केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी, असे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात येत आहे.

अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये संजय गांधी निराधार योजनेअंतर्गत ज्या लाथार्थीचे अनुदान तपासणीअंती बंद करण्यात आले आहे, त्यांचे अनुदान पूर्ववत चालू करण्याची आयोगास विनंती केली आहे, तथापि अशाप्रकारची विनंती मान्य करण्याची अधिकारिता आयोगास नसल्याने अपिलार्थीची ही विनंती आयोगास मान्य करता येणे शक्य नाही, असे येथे स्पष्ट करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१ अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२ जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती, त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांचे आत विनामूल्य पुरवावी.

३ जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी अपिलार्थीस माहिती प्राप्त करुन घेण्याप्रित्यर्थ कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय अधिनियमातील विहित कालावधीपेक्षा जास्त कालावधीसाठी वंचित ठेवल्याबद्दल त्यांच्यावर प्रतिदिनी रु. २५०/- याप्रमाणे एकूण रुपये २५०००/- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमित झाल्यापासून तीस दिवसाच्या आत सरळ आयोगास सादर करावा. विहित मुदतीत खुलासा आयोगाकडे प्राप्त न झाल्यास, त्यांना या प्रकरणी काहीही सांगावयाचे नाही, असे गृहीत धरुन हेच आदेश अंतिम करण्यात येतील, याची त्यांनी नोंद घ्यावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : ०५-०८-२००८** **राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. शक्तिदास किसनराव मांजरीकर,रा.दत्तनगर, ढोकी, ता. जि.उस्मानाबाद.
२. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.
३. जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.
४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१४३९
निर्णय दिनांक ०७-०८-२००८

| | | |
|---|---|---|
| १ श्री. भास्कर नारायण लहाने,<br>भाग्यनगर, अहमदपूर जि. लातूर. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी<br>तथा कार्यकारी अभियंता,<br>पाटबंधारे प्रकल्प मजबुतीकरण विभाग,<br>उमरगा, जि. उस्मानाबाद | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी<br>तथा अधीक्षक अभियंता,<br>उस्मानाबाद पाटबंधारे मंडळ,<br>उस्मानाबाद. | | |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०७.०८.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी श्री. बळीराम गुरलींगाप्पा पालापुरे, जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, पाटबंधारे प्रकल्प, मजबुतीकरण विभाग, उमरगा जि.उस्मानाबाद, श्री. दत्तात्रय व्यंकटराव हांद्राळे, तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, पाटबंधारे प्रकल्प, मजबुतीकरण विभाग, उमरगा जि.उस्मानाबाद (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. अरुण रामचंद्र कांबळे, जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, उस्मानाबाद पाटबंधारे मंडळ, उस्मानाबाद (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत, तर अपिलार्थी श्री. भास्कर नारायण लहाने (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी सर्वप्रथम त्यांचेकडील दि.१७.०१.२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे लातूर जिल्हयातील तालुकानिहाय व गावनिहाय भूकंप पुनर्वसन निधीतून मजबूतीकरण केलेल्या तलावांची यादी व केलेला खर्च या संदर्भातील एका विशिष्ट प्रपत्रात खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

" लातूर जिल्हयातील तालुका निहाय व गावनिहाय भुकूंप पुर्नवसन

निधीतून मजबूतीकरण केलेल्या तलावांची यादी व झालेला खर्च

प्रत्येक तलावावर झालेल्या खर्चाची माहिती.

तालुक्याचे नाव

| अ.क्र. | गावांचे नाव | तलावांचा प्रकार व तलावाचा क्रमांक लघु तलाव/ मध्यम तलाव/ मोठा तलाव/ पाझर तलाव किंवा इतर प्रकारचा तलाव | झालेला खर्च | कोणत्या बाबीवर खर्च केला त्या बाबीची माहिती | निधी उपलब्ध कोणाकडून झाला जागतिक बॅन्क किंवा पाटबंधारे खाते |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |

"

अपिलार्थी यांनी सदर माहिती टपालाद्वारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. १४.०२.२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु.१००/- इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. त्यानंतर परत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दि. २६.२.२००७ रोजीच्या पत्रान्वये सदर शुल्क भरणा करण्याकरिता स्मरणपत्र दिले. त्यानंतर अपिलार्थी यांनी रु.१००/- ची मनिऑर्डर त्यांच्या नावाने पाठविली व ती जन माहिती अधिकारी यांना दि. १२.३.२००७ रोजी प्राप्त झाली. आवश्यक ते शुल्क प्राप्त झाल्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दि. २९.३.२००७ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस माहिती पाठविली तथापि जन माहिती अधिकारी

यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. ०३.०५.२००७ रोजी प्रथम अपील केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी त्यांना जाणूनबुजून चुकीची व दिशाभूल करणारी माहिती दिली, हवी असलेली माहिती दडवून ठेवली, मागणी केलेली माहिती अद्याप दिली नाही, जास्तीच्या शुल्काची आकारणी केली व संपूर्ण पत्रव्यवहार अधिनियमास अपेक्षित असलेल्या विहित नमुन्यात केलेला नाही. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांच्यावर शास्ती व शिस्तभंगाची कारवाई करण्याची त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे विनंती केली होती. अपिलार्थीच्या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि.०५.६.२००७ रोजी सुनावणी घेऊन या संदर्भातील आपले आदेश दि.१३.६.२००७ रोजी आदेश पारित केले. या आदेशामध्ये त्यांनी कोणताही एक असा निश्चित निर्णय दिला नसून त्यांच्याकडे अर्ज सादर होईपर्यंतच्या घटनाक्रमावर स्वतःचे भाष्य केले आहे, याचे सर्वसाधारणतः अवलोकन केले असता अपिलार्थीचे अपील त्यांनी अंशतः मान्य केले, असे अनुमान काढण्यात येत आहे. जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने त्यांना सर्व कामाच्या बीलांच्या छायाप्रती जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितल्या होत्या, त्याप्रमाणे जन अपिलीय अधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांना सदर बीलाच्या प्रती अपिलार्थीस तीस दिवसांच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन देण्याचे सूचित केले. सदर सूचनेनुसार जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. २५.६.२००७ रोजी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना उपलब्ध करुन दिली. सदर माहिती दि. २५.६.२००७ रोजी प्राप्त झाल्याप्रीत्यर्थ अपिलार्थीने त्यांची पोचसही जन माहिती अधिकारी यांच्याकडील दि. २५.६.२००७ रोजीच्या पत्राच्या स्थळप्रतीवर दिली आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी आदेश

देऊनही अपिलार्थीस आवश्यक ती माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ०५.९.२००७ रोजी द्वितीय अपील केले आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थी यांनी त्यांना जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती दिली नाही, त्यांनी जाणूनबुजून चुकीची,अर्धवट व दिशाभूल करणारी माहिती दिली व त्यांच्या प्रथम अपिलामध्ये त्यांनी मांडलेले मुद्दे सिध्द झाल्याचे नमूद केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. त्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेल्या द्वितीय अपील अर्जातील त्यांचे लेखी म्हणणे हाच त्यांचा युक्तीवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.अपिलार्थीच्या द्वितीय अपील अर्जाचे अवलोकन करता, अपिलार्थीने द्वितीय अपील करण्याचे कारण म्हणजे जन माहिती अधिकारी यांनी त्यांना विहित मुदतीत माहिती दिली नाही, जाणूनबुजून, अर्धवट, चुकीची व दिशाभूल करणारी माहिती दिली, हे दिले असल्याचे दिसून येते.

आज रोजी झालेल्या सुनावणीचे वेळी जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थी यांच्या दि. १७.१.२००७ रोजीच्या मूळ माहितीच्या अर्जास विहित मुदतीत त्यांनी त्यांच्याकडील दि. १४.२.२००७ रोजीच्या पत्रान्वये, अपिलार्थीस माहितीपोटीचे शुल्क रु.१००/- त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. अपिलार्थीने दि. १२.३.२००७ रोजी सदर शुल्क भरल्यानंतर त्यांनी दि. २९.३.२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस माहिती पुरविली. अपिलार्थीस प्रथमतः माहिती पुरवितांना एकूण सात तलावांची माहिती त्यामध्ये चुकीने टंकलिखित करण्यात आली होती. सदर चुकीचा समावेश असलेली माहिती अपिलार्थीस देण्यामागे त्यांचा कोणत्याही प्रकारचा गैरहेतू नव्हता किंवा सदर चुक त्यांनी जाणूनबुजून केलेली नाही. मात्र ही चूक त्यांच्या लक्षात आणून दिल्यानंतर त्यांनी या चुकीची दुरुस्ती करुन

अपिलार्थीस परत दि. २५.६.२००७ रोजी पूर्णतः अचूक माहिती पुरविली. या माहितीमध्ये अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे झालेल्या सुनावणीमध्ये उपस्थित केलेल्या मुद्याच्या अनुपालनाप्रीत्यर्थ त्यांनी संबंधित कामांच्या बीलांच्या प्रती देखील अपिलार्थीस विनामूल्य पुरविल्या आहेत.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, दि. ३.५.२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर दि. ५.६.२००७ रोजी सुनावणी घेऊन या संदर्भातील आपले आदेश दि. १३.६.२००७ रोजी पारित केले आहेत.

वरील घटनाक्रम, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दि. १७.१.२००७ रोजीच्या अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीसंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी जरी अपिलार्थीस त्यांच्याकडील दि. १४.२.२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद दिला असला तरीही सदर प्रतिसाद चुकीचा, अवैध ठरत आहे. कारण त्यांनी अपिलार्थीस उद्देशून लिहिलेल्या या पत्रामध्ये अधिनियमातील कलम ७(३) प्रमाणे अपेक्षित असलेल्या माहितीपोटीच्या शुल्काचा हिशोबासह तपशील दिलेला नाही. या पत्रामध्ये त्यांनी अपिलार्थीस पुरविण्यात येणाऱ्या माहितीच्या अंदाजित पृष्ठांची संख्या व प्रतिपृष्ठ दर कळविलेला नाही. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. २९.३.२००७ रोजी दिलेल्या माहितीमध्ये एकूण ८७ तलावांची माहिती दिलेली आहे. तर अपिलार्थीने अपेक्षित केलेल्या माहितीमध्ये ८० तलावांच्या संदर्भातील माहिती असणे अपेक्षित होते. अपिलार्थीस देण्यात आलेल्या माहितीमध्ये एकूण तलावांच्या संख्येत सातने फरक पडला आहे, या सातपैकी तीन तलाव बीड (अपिलार्थीने मागितलेली माहिती लातूर जिल्हयाशी संबंधित होती.) जिल्हयातील होते, तर चार तलावांवर कोणताही खर्च झाला नव्हता, त्यामुळे ही माहिती अपिलार्थीस

अपेक्षित नव्हती. ही चूक जन माहिती अधिकारी यांच्याकडून नजरचुकीने व अनावधानाने झाली असल्याचे त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपील सुनावणीमध्ये व राज्य माहिती आयोगाकडील सुनावणीमध्ये कबूल केले आहे. अपिलार्थीस आता दि. २५.६.२००७ रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडून पूर्णपणे माहिती प्राप्त झालेली आहे. या संपूर्ण घटनाक्रमामध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस हेतुपूर्वक चुकीची,दिशाभूल करणारी माहिती दिली असल्याचे निःसंशयपणे सिध्द होत नाही. उलट अपिलार्थीच्या दि. १७.१.२००७ रोजीच्या अर्जास त्यांनी त्यांच्याकडील दि. १४.२.२००७ रोजीच्या पत्रान्वये विहित मुदतीत प्रतिसाद देऊन माहिती देण्याचा प्रयत्न केला आहे. तसेच अपिलार्थीने आवश्यक ते शुल्क भरले नसल्याने त्यांनी दि. २६.२.२००७ रोजी त्यांना स्मरणपत्र देखील पाठविले आहे. यावरुन जन माहिती अधिकारी यांची अपिलार्थीपासून माहिती दडविण्याची अथवा त्यांची दिशाभूल करण्याची इच्छा असेल, असे सिध्द होत नाही. अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडील प्रथम अपील सुनावणीमध्ये त्यांनी प्रत्येक कामांच्या सर्व बीलांच्या माहितीची मागणी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे केली व ती जन अपिलीय अधिकारी यांनी मान्य केली. येथे असे दिसून येते की, अपिलार्थीने मूलतः त्यांच्या प्रथम अर्जामध्ये "कोणत्या बाबीवर खर्च केला त्या बाबीची माहिती" अशाप्रकारची मोघम स्वरुपाची माहिती मागितली आहे. या माहितीमध्ये कोणत्याही विशिष्ट स्वरुपाच्या अथवा बीलांच्या प्रतींची मागणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे केलेली नाही. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस या रकान्यासंदर्भात प्रथम माहिती देताना या संदर्भात "धरण मजबूतीकरणसाठी मुरुम भराव" अशी माहिती दिली आहे. आयोगाच्या मते अपिलार्थीस या मुद्यावर जन माहिती अधिकारी यांनी प्रथमतः दिलेली माहिती बरोबर असून जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्याकडे झालेल्या सुनावणीमध्ये आवश्यक असलेल्या माहितीची व्याप्ती

वाढविल्यानंतर, वाढीव माहिती अपिलार्थीस देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित करणे माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार अभिप्रेत नाही. इतःपर त्यांनी त्यांच्याकडे प्रथम अपिलावर सुनावणीसंदर्भात घेण्यात येणारा निर्णय अपिलार्थीच्या मूळ माहितीच्या अर्जामधील मागणी केलेल्या माहितीपुरता सिमीत ठेवावा, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये जन माहिती अधिकारी यांनी त्यांना विहित मुदतीत माहिती दिली नसल्याचे नमूद केले आहे. जरी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस जाणूनबुजून चुकीची माहिती दिली नसली तरी अपिलार्थीस प्रथमतः अचूक माहिती प्राप्त झाली नाही, हा मुद्दा उरत आहे. अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन देण्यासाठी जन माहिती अधिकारी व त्यांचे सहायक व इतर अधिकारी यांना देखिल जन माहिती अधिकारी म्हणून समजावे, अशी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ५(५) अन्वये तरतुद आहे. हे पाहता, या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात त्यांना सहाय्य करणाऱ्या त्यांच्या सर्व सहायक अधिकारी/कर्मचारी यांच्यावर जन अपिलीय अधिकारी यांनी प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य प्रशासकीय कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

त्याचप्रमाणे येथे असे दिसून येते की, अपिलार्थीने आवश्यक ते शुल्क जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात दि. १२.३.२००७ रोजी भरल्यानंतर त्यांना जन माहिती अधिकारी यांनी दि. २९.३.२००७ रोजी माहिती पुरविली आहे. सदर कालावधी अधिनियमातील विहित केलेल्या कालावधीच्या मर्यादेत असल्याने अपिलार्थीचा त्यांना जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती न दिल्याचा मुद्दा आयोग फेटाळून लावत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

१ अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२ जन अपिलीय अधिकारी यांना, अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना सहाय्य करणाऱ्या सर्व सहायक अधिकारी/कर्मचारी यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य प्रशासकीय कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०७-०८-२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. भास्कर नारायणराव लहाने, भाग्यनगर, नांदेड रोड, अहमदपूर जि. लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, पाटबंधारे प्रकल्प मजबुतीकरण विभाग उमरगा जि.उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, उस्मानाबाद पाटबंधारे मंडळ, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१४४०

निर्णय दिनांक ०७-०८-२००८

| | | |
|---|---|---|
| १ श्री. ओमप्रकाश नानकरामजी लड्डा<br>औरंगाबाद. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी<br>तथा सहायक विक्रीकर आयुक्त,<br>औरंगाबाद. | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी<br>तथा विक्रीकर सहआयुक्त,<br>(व्हॅट प्रशासन), औरंगाबाद. | | |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०७.०८.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्री. ओमप्रकाश नानकरामजी लड्डा (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), श्रीमती पुष्पा शंकरराव नंदनवार, जन माहिती अधिकारी तथा सहायक विक्रीकर आयुक्त,औरंगाबाद (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. सय्यद अब्दुल खलील काझी, जन अपिलीय अधिकारी तथा विक्रीकर सहआयुक्त (व्हॅट प्रशासन) औरंगाबाद (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी सर्वप्रथम त्यांचेकडील दि.१२.०३.२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. १५.११.२००५ ते ११.३.२००७ या कालावधीमधील त्यांच्या कार्यालयाशी संबंधित एकूण सात मुद्यावर खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

" 1. Under Section 17 of MVAT Act, whether Sales Tax Department has power to INVALIDATE the previous "Certificates of Registration" if dealers do not apply for Fresh Certificates of Registration ?

2.If answer to the above information is 'Yes', then such dealers cannot engage in business as a dealer, they cannot collect VAT from purchasers and cannot avail set off of VAT paid by them, then what is the meaning of 'Without prejudice to the other provisions of this Act' stated in Section 17(4).

3. Following information required for Aurangabad District only for the period:

(1) Total number of TIN application forms (No.108) issued and total amount received from sale of such forms.(2) Total number of the dealers to whom TINs are allotted.(3) Total number of the dealers whose 'Certificates of Registration' became invalid w.e.f. 1-1-2006 because of non-filing of TIN applications.(4)Total number of the dealers who have taken Voluntary Registration, whose Certificates of Registration were cancelled w.e.f. 1-1-2006 because of non-filing of TIN applications but they wanted to be Registered Dealers and give the total amount received from such dealers as fees.(5)Total number of the dealers who have paid penalty of Rs 2000/- each for late filing of TIN applications and total amount received from such dealers.

4. Whether 'Tax Payer's Identification Number (TIN)' is 'Registration Certificate Number' as required under MVAT Act/Rules? If yes, under which section/Rule/Notification/GR? Kindly give documentary proof ,if any.

5. Whether 'Allotment of TIN' is the PURPOSE of the MVAT Act, 2002? If yes , under which Section/Rule? Notification /GR? Kindly give the documentary proof, if any.

6.In 'TIN Certificates' issued, at the place of 'Date:' at the bottom of the certificate, date written is '01-Apr-2006'. It means date of signing is 1.4.2006 and on that date all the certificates were ready to issue. However, TIN Certificates issued in August-September, 2006 to VAT dealers and in January, 2007 onwards to VAT+ CST dealers. So kindly give in detail the reason for this inordinate delay. And give relevant copies of documentary proof, if any.

7. As per Rule 9(1) 'Certificates of Registration' are to be signed/issued by the 'registering authority' as defined in Rule 2(1) but all the certificates issued are signed/issued by the Registration Officer in Mumbai. Kindly give all the details along with documentary proof of this authority given to the registration officer."

अपिलार्थी यांनी सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. १३.०४.२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस माहिती पुरविली तथापि या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि.३०.०४.२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ११.६.२००७ रोजी सुनावणी घेऊन जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीचे अपील निकाली काढले. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील मुद्दे कायदेशीर बाबीशी संबंधित असल्याने याबाबतचे स्पष्टीकरण विक्रीकर आयुक्त यांच्या कार्यालयाकडून प्राप्त करुन घेण्याचे त्यांनी अपिलार्थीस निर्देशित केले. तथापि जन अपिलीय अधिकारी

यांच्याकडून प्राप्त झालेल्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ०७.९.२००७ रोजी द्वितीय अपील केले आहे. यामध्ये त्यांनी अपिलार्थी यांना माहिती दिली नाही, दिलेली माहिती चुकीची आहे व बरोबर माहिती दिली नाही, असे नमूद केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, Maharashtra Value Added Tax Act, २००२ मधील कलम १७ मधील तरतुदीन्वये त्यांचे वापरात असलेले नोंदणीपत्र अवैध ठरविण्याचे अधिकार विक्रीकर खात्यास आहेत किंवा कसे, याची माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून हवी होती. जन माहिती अधिकारी यांनी माहिती देऊनही त्यांच्या कार्यालयातील जन अपिलीय अधिकारी यांनी त्यावर कोणतेही अभिप्राय व्यक्त न करता ही माहिती विक्रीकर आयुक्त, मुंबई यांच्या कार्यालयाकडून प्राप्त करुन घेण्याचे त्यांना सूचित केले. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस या अधिनियमामधील कलम १७ अन्वये अपिलार्थीचे प्रमाणपत्र रद्द करण्याचे अधिकार असल्याचे कळविले आहे. तथापि या कलमातील तरतुदींचे अवलोकन करता, अशाप्रकारचे अधिकार विक्रीकर विभागातील अधिकाऱ्यांना नाहीत, असे अपिलार्थी यांचे म्हणणे आहे. अपिलार्थीचे नोंदणीपत्र रद्द करण्यासंदर्भात, विक्रीकर विभागाने त्यांना शासनाच्या दि. २१.११.२००५ च्या अधिसूचनेचा संदर्भ दिला आहे, तथापि या अधिसूचनेमध्ये देखील अशाप्रकारची कोणतीही तरतुद नाही, याचाच अर्थ जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेली माहिती चुकीची आहे, असा होतो. या विषयासंदर्भात विक्रीकर खात्याने वेळोवेळी वर्तमानपत्रात जारी केलेल्या नोटीसांमधून सदर कायद्याविषयी काही शंका असल्यास विक्रीकर खात्याच्या संबंधित अधिकाऱ्याशी संपर्क साधण्याचे सूचित केले होते. त्यामुळे त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे

स्पष्टीकरण मागितले आहे. त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. २ चे उत्तर जन माहिती अधिकारी यांनी त्यांना दिले नाही, त्यांना मुद्दा क्र. ४ ची सत्य माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून हवी आहे. जन माहिती अधिकारी यांनी या संदर्भात त्यांना दिलेली माहिती चुकीची आहे. जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना मुद्दा क्र. ५ व ६ च्या संदर्भात प्राप्त झालेली माहिती चुकीची आहे. जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या उत्तरात त्यांच्या कार्यालयाच्या परिपत्रकाचा संदर्भ दिला आहे. तथापि हे परिपत्रक कायदा होऊ शकत नाही. त्यांच्या अर्जातील मुद्दा क्र. ७ बाबत कोणताही कायदेशीर पुरावा जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेला नाही.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थीने त्यांच्या दि. १२.३.२००७ रोजीच्या अर्जान्वये मागितलेली माहिती त्यांना दि. १३.४.२००७ रोजी पुरविली आहे. ही माहिती त्यांनी अपिलार्थीस उपलब्ध कागदपत्रांच्या आधारे दिलेली आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थीच्या दि. ३०.४.२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर दि. ११.६.२००७ रोजी सुनावणी घेऊन या संदर्भातील आपले आदेश त्याच दिवशी पारित केले. या संदर्भातील अपिलार्थीचे प्रथम अपील त्यांनी फेटाळले आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांचे म्हणणे लेखी स्वरुपात सादर केले असून त्यामध्ये त्यांनी आयोगास अशी माहिती दिली आहे की, अपिलार्थीने मा.उच्च न्यायालयाकडे दावा क्र.२०४२/२००६ दि. ३.३.२००६ अन्वये याच विषयासंदर्भात दावा दाखल केला असून या दाव्यामध्ये त्यांनी विक्रीकर खात्याच्या नवीन नोंदणी प्रक्रियेवर ‘स्टे’ ची मागणी केलेली आहे. मा. उच्च न्यायालयाकडे सध्या हा दावा निर्णयासाठी प्रलंबित आहे. मा. उच्च न्यायालयाकडे दावा दाखल केल्यानंतर त्यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार

त्यांच्याकडे प्रश्नार्थक स्वरुपात कायद्याचा अर्थ विचारणारी मागणी केली आहे. मूळात हा प्रश्न सध्या उच्च न्यायालयाकडे सुनावणीसाठी प्रलंबित असल्याने अपिलार्थीचे अपील फेटाळण्यात यावे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे एकूण सात मुद्यांवर माहिती मागितली आहे. यापैकी मुद्दा क्र. ३ व मुद्दा क्र. ७ शी संबंधित माहिती अपिलार्थीस या प्रकरणी देय ठरत होती. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १,२,४,५ व ६ द्वारे मागितलेली माहिती ही प्रश्नार्थक स्वरुपात व जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांचे खुलासे/स्पष्टीकरण अपेक्षित करणारी असल्याचे दिसून येते, जी माहिती अधिकार अधिनियम २००५ मध्ये स्पष्ट केलेल्या 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत नाही, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) मध्ये 'माहिती' या शब्दाची व्याख्या पुरेशा प्रमाणात स्पष्ट केली आहे, जी खालीलप्रमाणे आहे.

> **" 'माहिती' याचा अर्थ, कोणत्याही स्वरुपातील कोणतेही साहित्य असा असून त्यामध्ये, अभिलेख, दस्तऐवज, ज्ञापने, ई-मेल, अभिप्राय, सूचना, प्रसिध्दिपत्रके, परिपत्रके, आदेश, रोजवह्या, संविदा, अहवाल, कागदपत्रे, नमुने, प्रतिमाने (मॉडेल), कोणत्याही इलेक्ट्रॉनिक स्वरुपातील आधारसामग्री आणि त्या त्या वेळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यान्वये सार्वजनिक प्राधिकरणास मिळविता येईल अशी कोणत्याही खाजगी निकायाशी संबंधित माहिती, यांचा समावेश होतो."**

वरील व्याख्येचे अवलोकन करता असे दिसून येते की, अपिलार्थीने मुद्दा क्र. ३ व ७ वगळता उर्वरित मुद्यांद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती या

व्याख्येशी सुसंगत नसल्याचे दिसून येते. माहिती अधिकार अधिनियमानुसार प्राप्त होणाऱ्या अर्जाबाबत कोणत्याही अर्जदारास माहिती देताना जन माहिती अधिकारी यांची भूमिका ही एका विश्वस्ताची असते. त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती, अर्जदाराने विहित प्रपत्राच्या नमुन्यामध्ये त्यांच्याकडे मागणी केल्यास ती देण्यासंदर्भात माहिती अधिकार अधिनियमातील विहित तरतुदींप्रमाणे कार्यवाही करणे हे त्यांचे प्रथम कर्तव्य असते. त्यांच्याकडे घेण्यात आलेल्या निर्णयावर त्यांनी कोणत्याही प्रकारे भाष्य करणे, कोणत्याही अर्जदाराने प्रश्न विचारल्यास त्याचे उत्तर अथवा त्याचे स्पष्टीकरण करणे हे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीमध्ये अर्जदारास 'माहिती देणे' या प्रक्रियेमध्ये अभिप्रेत नाही. अपिलार्थीस व्हॅट ॲक्टबाबत बऱ्याच शंका असाव्यात, असे या अर्जावरुन आयोग अनुमान काढत आहे. या शंकांचे निरसन यथायोग्यरित्या विक्रीकर खात्याच्या सक्षम प्राधिकरणाकडून त्यांनी अपेक्षित करावे, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. माहिती आयोगाची कक्षा, फक्त माहिती पुरविणे या संदर्भातील प्रक्रियेशी संबंधित आहे. त्यामुळे कोणत्याही कायदेशीर बाबीचा, नियमांचा अर्थ लावून त्याद्वारे संबंधित प्रशासनामध्ये आगंतुक हस्तक्षेप होईल, अशाप्रकारचे आदेश देणे आयोग उचित समजत नाही. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ३ व ७ ची माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिल्याचे दिसून येते. सदर माहिती जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या सद्सद्विवेकबुध्दीला अनुसरुन दिलेली आहे. अपिलार्थीने मुद्दा क्र. ७ द्वारे– नोंदणी दाखला हा संबंधित नोंदणी अधिकाऱ्याने सही करुन द्यावयाचा अशी तरतुद असताना सर्व नोंदणी दाखल्यांवर मुंबई येथील नोंदणी अधिकाऱ्याने सहया केल्याचे जन माहिती अधिकारी यांच्या निदर्शनास आणून नोंदणी अधिकारी, मुंबई यांना अशाप्रकारचे अधिकार दिल्याबाबतचा विक्रीकर खात्याकडे उपलब्ध असलेला लेखी पुरावा त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितला आहे. अपिलार्थीच्या या मुद्यावर

माहिती देताना जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या विभागातर्फे पालन करण्यात येणाऱ्या पध्दतीचे विवेचन त्यांच्या दि. १३.४.२००७ रोजीच्या पत्रामध्ये केले आहे. यावरुन अशाप्रकारची कार्यवाही ही प्रचलित संकेताप्रमाणे विक्रीकर विभाग करीत असावा, असे अनुमान काढण्यास वाव आहे. तथापि जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्या युक्तीवादावरुन अशाप्रकारचे अधिकार मुंबई येथील एकाच नोंदणी अधिकाऱ्याला दिल्याचे कोणतेही परिपत्रक त्यांच्या कार्यालयाकडे उपलब्ध नसल्याचे दिसून येते. सबब विक्रीकर आयुक्त यांना असे सूचित करण्यात येते की, त्यांच्या विभागाने जर सर्व नोंदणी दाखल्यांवर सही करण्यासाठी इतर क्षेत्रिय अधिकारी सक्षम असूनही मुंबई येथील नोंदणी अधिकाऱ्यासच प्राधिकृत केले असेल तर, अशाप्रकारचे स्पष्ट आदेश त्यांनी आपल्या स्तरावरुन निर्गमित करुन, नोंदणी अधिकारी, मुंबई यांना सहया करण्यासाठी, एका विशिष्ट परिपत्रकाद्वारे प्राधिकृत करावे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील फेटाळण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१ अपील फेटाळण्यात येत आहे.

२ विक्रीकर आयुक्त, मुंबई यांनी त्यांच्या विभागातर्फे देण्यात येत असलेल्या नोंदणी दाखल्यांवर स्वाक्षरी करण्याचे अधिकार देण्यासंदर्भात आपले स्पष्ट आदेश, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत जारी करावेत.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०७-०८-२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री.ओमप्रकाश नानकरामजी लड्डा, कांचनगंगा, प्लॉट नं. १७, सी-१, टाऊन सेंटर, सिडको, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक विक्रीकर आयुक्त, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विक्रीकर सहआयुक्त (व्हॅट प्रशासन), औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. विक्रीकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, विक्रीकर भवन, माझगाव,मुंबई-१० यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१४४२

निर्णय दिनांक ०७-०८-२००८

| | | |
|---|---|---|
| १ श्रीमती शिला निवृत्ती कांबळे,<br>ता. पैठण जि.औरंगाबाद. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी<br>तथा मुख्याधिकारी,<br>नगर परिषद, पैठण जि.औरंगाबाद | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी<br>तथा उपआयुक्त (सामान्य प्रशासन),<br>विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद | | |

**<u>निर्णय</u>**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०७.०८.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी श्री. आशुतोष चिंचाळकर, जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, पैठण जि.औरंगाबाद (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. सोमनाथ गुंजाळ जन अपिलीय अधिकारी तथा उपआयुक्त (सा.प्र.),विभागीय आयुक्त कार्यालय,औरंगाबाद (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत, तर अपिलार्थी श्रीमती शिला निवृत्ती कांबळे (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) या गैरहजर आहेत

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी सर्वप्रथम त्यांचेकडील दि.२०.०३.२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. ०२.०९.२००६ ते २०.३.२००७ या कालावधीतील त्यांच्या कार्यक्षेत्रातील श्री. नंदु खैरे यांचे घर ते गवळीसर यांच्या

घरापर्यंत नगरपरिषदेमार्फत बांधल्या गेलेल्या रस्त्यासंदर्भात खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

> " वरील विषयांकीत काम देतांना किती निविदा (स्पर्धी) दाखल झाल्या होत्या त्यांच्या सर्व प्रती. संबंधित कामाचे इस्टीमेट प्रत. ज्या कंत्राटदारास सदर काम देण्यात आले त्याने बांधकाम विभाग/तत्सम योग्य त्या वर्गाच्या नोंदणीपत्राची प्रमाणीत प्रत त्याची आयकर खात्याची प्रमाणित प्रत, विक्रीकर खात्याचे अद्यायावत क्लिअरन्स प्रमाणपत्र, कंत्राटदाराची सद्यस्थितीत नगर परिषदेमार्फत चालु असलेल्या कामांची यादी व त्यात त्याने केलेल्या पुर्तता कागदपत्रांच्या प्रती सर्व कामांच्या प्रती. कंत्राटदाराकडे असलेल्या कुशल व्यक्तींची सविस्तर माहिती, त्याचेकडे असलेल्या साहित्य याबाबत सविस्तर माहिती मालकीहक्कासह पुरावे. आदी परिपुर्ण माहिती मला देण्यात यावी.''

अपिलार्थी यांनी सदर माहिती व्यक्तिश/टपालाद्वारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. १६.४.२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस असे कळविले की,- अपिलार्थीने ज्या कामाविषयी माहिती विचारली आहे ती "श्री.कृष्णा सुबुगडे या बेकार अभियंत्यास देण्यात आले असून संबंधित विभागास देय माहिती देण्याबाबत कळविले आहे." या नंतर त्यांनी दि. २७.४.२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेली माहिती घेऊन जाण्यापोटी रु. ७५/- इतके शुल्क त्यांच्या कार्यालयात जमा करण्याचे सूचित केले. जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि.

२९.५.२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी त्यांना विहित मुदतीत माहिती दिली नसल्याचे नमूद केले आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या अपील अर्जावर दि. १३.८.२००७ रोजी सुनावणी घेऊन या संदर्भातील आपले आदेश दि. १८.८.२००७ रोजी पारित केले आहेत. या आदेशाद्वारे त्यांनी अपिलार्थीचे अपील मान्य करुन जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस सात दिवसांचे आत विनामूल्य माहिती देण्याचे आदेशित केले आहे. जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून आदेश प्राप्त होऊनही अपिलार्थीस माहिती न मिळाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ११.९.२००७ रोजी द्वितीय अपील केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येते.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी या गैरहजर आहेत, त्यामुळे त्यांनी आयोगाकडे दाखल केलेल्या त्यांच्या द्वितीय अपील अर्जातील त्यांचे लेखी म्हणणे हाच त्यांचा युक्तीवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, त्यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दि. २६.७.२००७ रोजीच्या पत्रान्वये संपूर्ण माहिती दिली असून, माहिती प्राप्त झाल्याप्रीत्यर्थ अपिलार्थीने पोचसही दिली आहे. अपिलार्थीस नेमकी कोणती माहिती दिली, याबाबत आज सुनावणीचे वेळी आयोगाने विचारणा केल्यानंतर, जन माहिती अधिकारी ही माहिती आयोगास दाखवू शकले नाहीत, ही माहिती त्यांच्याकडे उपलब्ध नसल्याचे त्यांनी सांगितले. त्यांनी  दि. २७.४.२००७ रोजी अपिलार्थीस

आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु.७५/- भरणा करण्याचे सूचित केले असता, सदर शुल्क भरणा न करता अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी व आयोगाकडे अपील केले, असे त्यांनी पुढे आपल्या युक्तीवादामध्ये सांगितले.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थीच्या दि. २९.५.२००७ रोजीच्या प्रथम अपिलावर दि. १३.८.२००७ रोजी सुनावणी घेऊन दि. १८.८.२००७ रोजी आदेश पारित करुन अपिलार्थीस संपूर्ण माहिती देण्याचे सूचित केले आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी  आयोगाकडे सादर केलेली कागदपत्रे व अपिलार्थी यांचे राज्य माहिती आयोगाकडे केलेला द्वितीय अपील अर्ज यातील अपिलार्थीच्या सहयांमध्ये विसंगती आहे. जन माहिती अधिकारी यांनी आज आयोगासमोर अशी विनंती केली की, आयोगाने अपिलार्थीस बोलावून सदर सहया त्यांच्याच आहेत किंवा कसे याबाबत खात्री करुन घ्यावी. मूळात अपिलार्थीच्या मूळ अर्जातील व द्वितीय अपील अर्जातील सहयामध्ये फरक असल्यामुळे अपिलार्थी यांचे सदर अपील फेटाळण्यायोग्य आहे, या निष्कर्षाप्रत आयोग आला आहे. एवढे असूनही या प्रकरणी एक गोष्ट प्रामुख्याने लक्षात घेतली पाहिजे की, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रक्कम रु.७५/-इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे दि. २७.४.२००७ रोजीच्या पत्राद्वारे सूचित केले होते.सदर पत्र अधिनियमातील तरतुदीपेक्षा विलंबाने दिले असल्याने अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य देय ठरते व जन अपिलीय अधिकारी यांनी देखील त्यांच्या प्रथम अपील निर्णयामध्ये अशाच प्रकारचे आदेश दिलेले आहेत.

आज रोजी आयोगाने अपिलार्थीस कोणती माहिती दिली, याची जन माहिती अधिकारी यांना विचारणा केली असता सदर माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध नसल्याचे त्यांनी आयोगास सांगितले.

या संपूर्ण घटनाक्रमामध्ये जन माहिती अधिकारी यांचे वर्तन संशयास्पद असल्याने संचालक, नगरपालिका प्रशासन, मुंबई यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर उपरोक्त प्रकरणी त्यांनी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य प्रशासकीय कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील फेटाळण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

१ अपील फेटाळण्यात येत आहे.

२ संचालक, नगरपालिका प्रशासन, मुंबई यांना, संबंधित जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल त्यांचेवर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य प्रशासकीय कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०७-०८-२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्रीमती शिला निवृत्ती कांबळे, मु.पो. यशवंतनगर, पैठण ता.पैठण जि.औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद पैठण जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपआयुक्त सामान्य प्रशासन, विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. आयुक्त तथा संचालक, नगर परिषद संचालनालय, शासकीय परिवहन सेवा इमारत, ३ रा मजला, सर पोचखानवाला मार्ग, सी-फेस, वरळी, मुंबई– ४०० ०३०यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१४४३

निर्णय दिनांक ०७-०८-२००८

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री.अन्सारी वहाजोदीन वझीयोदीन<br>रा. केज, जि.बीड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा अधीक्षक,<br>सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,<br>उस्मानाबाद. | : | प्रतिवादी |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा सहायक धर्मादाय आयुक्त,<br>उस्मानाबाद. | | |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०७.०८.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी श्री.शेख गुलाम मुस्तफा, जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, उस्मानाबाद (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. भुमेश लक्ष्मीनारायण गोडे, जन अपिलीय अधिकारी तथा सहायक धर्मादाय आयुक्त, उस्मानाबाद (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत, तर अपिलार्थी श्री. अन्सारी वहाजोदीन वझीयोदीन (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) हे गैरहजर आहेत.

आज रोजी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल केलेले द्वितीय अपील विचाराधीन आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी त्यांना विहित कालावधी

ओलांडून गेल्यानंतरही माहिती देण्यासंदर्भात कोणतीही कार्यवाही न केल्याने जन माहिती व अपिलीय अधिकारी यांना दंड करुन त्यांना विनाशुल्क माहिती देण्याचे आदेश देण्याची आयोगास विनंती केली आहे. आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. २३.४.२००७ रोजीच्या अर्जान्वये माहिती अधिकार अधिनियमातील कलम ६ अन्वये आफ्रीन शिक्षण संस्था,भूम ता.भूम जि.उस्मानाबाद यांच्या संदर्भातील काही माहिती मागितली होती. अपिलार्थी यांनी सदर माहिती शीघ्र पोस्टाने अपेक्षिली होती.

प्रथम अर्जातील या माहितीमध्ये त्यांनी - " संस्थेचे परिशिष्ट १,२ व १० च्या सत्यप्रती, संस्थेच्या घटनेची सत्यप्रत, ऑडीट रिपोर्टच्या सत्यप्रती, संस्थेच्या अंतर्गत दाखल वाद, तक्रार बदल अर्ज व त्यावर झालेल्या अंतिम निर्णयाची सत्यप्रत, सदर संस्थेची कायदेशीर कार्यकारिणी कोणती"- या मुद्यांचा समावेश असलेली माहिती अपेक्षित केली होती. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या मूळ अर्जाद्वारे आफ्रीन शिक्षण संस्थेशी संबंधित एकूण पाच मुद्यावर माहिती मागितली आहे, ही सर्व माहिती अधिनियमातील 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत आहे.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. १०.५.२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस अपेक्षित असलेली माहिती त्यांच्या कार्यालयात दि. १९.५.२००७ रोजी हजर राहून व आवश्यक त्या फीचा भरणा करुन घेऊन जाण्याचे सूचित केले. सदर पत्र त्यांनी अपिलार्थीस अंडर सर्टीफिकेट ऑफ पोस्टींगद्वारे पाठविले आहे. अपिलार्थीस लिहिलेल्या या पत्रामध्ये जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील कलम ७(३) प्रमाणे आवश्यक असलेल्या माहितीपोटीच्या शुल्काचा हिशोब व एकूण शुल्क (माहितीच्या एकूण पृष्ठांची संख्या, त्यासाठी

आकारण्यात येणारा प्रतिपृष्ठ दर व एकूण शुल्काची रक्कम) कळविल्याचे आढळून येत नाही.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. २०.६.२००७ रोजी प्रथम अपील केले आहे. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येत नाही. मात्र त्यांनी त्यांच्याकडील दि. २.८.२००७ रोजीच्या आदेशान्वये अपिलार्थीचे प्रथम अपील फेटाळले आहे. सदर अपील फेटाळतांना त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पाठविलेल्या दि. १०.५.२००७ व २४.५.२००७ रोजीच्या पत्राचा आधार घेतला आहे. दि. १०.५.२००७ रोजीच्या जन माहिती अधिकारी यांच्या पत्रामध्ये त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयात प्रत्यक्ष हजर राहून, आवश्यक ते शुल्क भरुन माहिती हस्तगत करण्याचे सूचित केले आहे, तर दि. २४.५.२००७ रोजीच्या स्मरणपत्राद्वारे माहिती घेऊन जाण्यासंबंधाने परत सूचित केले आहे. सदर पत्रव्यवहार जन माहिती अधिकारी यांनी अंडर सर्टीफिकेट ऑफ पोस्टींगने केलेला आहे. या दोन पत्रास अपिलार्थीने कोणताही प्रतिसाद न दिल्याने माहिती घेण्यासाठी ते इच्छूक नाहीत, असे अनुमान काढून जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या अपील अर्जासंदर्भात वरील प्रमाणे निर्णय घेतल्याचे दिसून येत आहे.

आज सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत, त्यामुळे त्यांनी आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जातील त्यांचे लेखी म्हणणे हाच त्यांचा युक्तीवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती ते अपिलार्थीस देण्यास तयार आहेत. अपिलार्थीच्या मूळ अर्जास अनुसरुन त्यांनी तीस दिवसांचे आत म्हणजेच दि. १०.५.२००७ रोजी अपिलार्थीस ही माहिती त्यांच्या कार्यालयात प्रत्यक्ष उपस्थित राहून आवश्यक ते शुल्क भरुन हस्तगत करण्याचे सूचित केले होते. तथापि अपिलार्थी यांना त्यांनी सदर पत्र व त्यानंतरचे दि. २४.५.२००७ रोजीचे स्मरणपत्र पाठवून देखील अपिलार्थी हे त्यांच्या कार्यालयात कधीही उपस्थित झाले नाहीत व त्यामुळे अपिलार्थीस माहिती प्राप्त करुन घेण्यामध्ये फारसे स्वारस्य नसल्याचे अनुमान काढून त्यांनी ही माहिती अपिलार्थीस दिली नाही.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, मूळात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस जरी त्यांच्या दि. २३.४.२००७ रोजीच्या अर्जावर त्यांच्याकडील दि. १०.५.२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद दिला असला तरी सदर प्रतिसाद अधिनियमातील कलम ७(३) प्रमाणे नाही. जन माहिती अधिकारी यांच्या या पत्रामध्ये अपिलार्थीस पुरविण्यात येणाऱ्या संभाव्य माहितीची अंदाजित पृष्ठसंख्या, माहिती पुरविण्यासाठी प्रतिपृष्ठ दर व अपिलार्थीस निश्चितपणे किती रक्कम भरावी लागणार, याबाबत कुठल्याही प्रकारचा उल्लेख या पत्रामध्ये केल्याचे आढळून येत नाही. तसेच अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये माहिती शीघ्र पोस्टाने मागितली असता, त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयामध्ये प्रत्यक्ष हजर राहण्याचे सूचित केले आहे. जन माहिती अधिकारी यांच्या या दोन्ही कृती माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींशी पूर्णपणे विसंगत आहेत. त्यामुळे आता अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस अधिनियमातील कलम ७(६) प्रमाणे

विनामूल्य देणे भाग आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी माहिती अधिकार अधिनियमातील कलम ७(३) नुसार कार्यवाही न करुन आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट केल्याबद्दल त्यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१ अपील मान्य करण्यात येत आहे.

२ जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांचे आत विनामूल्य पुरवावी.

३ जन माहिती अधिकारी यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०७-०८-२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. अन्सारी वहाजोदीन वझीयोउदीन आखेब मंजील, टिपू सुलतानचौक, कळंब रोड, केज, ता.केज जि.बीड

२. जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक धर्मादाय आयुक्त, उस्मनाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१४४५

निर्णय दिनांक ०८-०८-२००८

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. विठ्ठल पांडूरंग काळम,<br>रा. उस्माननगर, तालुका कंधार,<br>जिल्हा नांदेड | : | अपिलार्थी |
| | विरुध्द | | |
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय,<br>उस्माननगर, तालुका कंधार,<br>जिल्हा नांदेड | : | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा गट विकास अधिकारी, पंचायत<br>समिती, कंधार, तालुका कंधार,<br>जिल्हा नांदेड | : | प्रतिवादी |

**<u>निर्णय</u>**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०८-०८-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. विठ्ठल पांडूरंग काळम (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), श्री. राजकुमार माणिकराव बकवाड, जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, उस्माननगर (यापुढे त्यांना जन माहिती

अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. विठ्ठल गणपतराव आमले, जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, कंधार (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने सर्वप्रथम त्यांच्याकडील दिनांक १८-०५-२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, ग्रामपंचायत उस्माननगर कार्यक्षेत्रात झालेल्या आमदार निधी, खासदार निधी, केंद्र व राज्य सरकारच्या विकास योजनेअंतर्गत सन १९९४ ते २००० या कालावधीतील कामासंदर्भात माहिती मागविली होती, तसेच ग्रामपंचायतीच्या वर्ष १९९५ ते २००० पर्यत कर उत्पन्नातून किती निधी जमा झाला, कोणत्या कामावर किती खर्च झाला व किती कर वसुली बाकी आहे याबद्दलचा संपूर्ण तपशील मागितला होता, ग्रामपंचायत उस्माननगरच्या मालकीच्या जागेचे सिटी सर्व्हे नंबर, जागा मोकळी आहे की बांधलेली आहे, कोणाच्या ताब्यात आहे व त्याचा विनियोग, ग्रामपंचायतच्या हद्दीत पाण्यासाठी बोअर व हातपंप किती आहेत, नळ पाणी योजनेसाठी किती निधी मंजूर झाला व त्याचा खर्च कोठे करण्यात आला, दलित वस्तीसुधार योजने अंतर्गत प्राप्त झालेला निधी व दरवर्षी झालेला विनियोग, जवाहर ग्राम समृध्दी योजना, आश्वसीत रोजगार योजना, या योजनाकरिता किती निधी उपलब्ध झाला, शिल्लक निधी किती, आश्वसीत रोजगार योजनेअंतर्गत ज्या मजुरांना वेळेत रोजगार देण्यात आला त्यांची नावे, पत्ते, सन २००२ ते २००७ यासंदर्भात, माहिती मागितली होती.
अपिलार्थीने सदर माहिती नोंदणीकृत टपालव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २२-०६-२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद दिला, तसेच या पत्राव्दारे त्यांनी अपिलार्थीस एकूण २१२ पृष्ठांची माहिती दिल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येते.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार, जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २९-०६-२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी त्यांना अपूर्ण, खोटी व चुकीची माहिती दिल्याचे नमूद करुन त्यांनी मागितलेली माहिती सत्य स्वरुपात देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्याची विनंती केली आहे.

अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारे सुनावणी घेतल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही.

जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीच्या अपील अर्जावर कोणत्याही प्रकारची सुनावणी झाली नाही व जन माहिती अधिकारी यांच्याकडून मिळालेली माहिती चुकीची व खोटी असल्याचे वाटल्यावरुन व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये, राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १३-०९-२००७ रोजी व्दितीय अपील केले. या अपील अर्जामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी त्यांना दिलेली माहिती कशा प्रकारे चुकीची आहे याचे सविस्तर विवेचन करुन संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना सत्य माहिती मिळवून देण्याची व त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्याची आयोगास विनंती केली आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, उपरोक्त प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक २९-०६-२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतली नाही. सदर सुनावणी न घेण्याचे कारण त्यांना विचारले असता, अपिलार्थीने अशाच प्रकारची माहिती त्यांच्याकडे दिनांक ०९-०४-२००७ रोजीच्या पत्रान्वये

मागविली असता, सदर माहिती अपिलार्थीस दिनांक १८-०४-२००७ रोजी प्राप्त झाल्याप्रीत्यर्थ अपिलार्थीने त्यांच्याकडे दिलेली पोच सहीची पावती आयोगास दाखविली. अपिलार्थीने दुस-या अर्जासंदर्भात विचारलेली अशाच प्रकारची माहिती त्यांनी पुरविली असल्याने, त्यांनी अपिलार्थीस विचाराधीन प्रथम अर्जाव्दारे विचारलेली माहिती दिली नाही. जन अपिलीय अधिकारी यांची ही कृती चुकीची असून अपिलार्थीच्या माहितीसाठी-च्या प्रत्येक अपिलावर जे जे प्रथम अर्ज प्राप्त होतील त्या त्या सर्व प्रथम अपिलावर जरी त्यांनी अपिलार्थीने मागितलेली माहिती पूर्वीच्या वेगळ्या संदर्भाने त्यांना पुरविली असली तरीही, प्रत्येक अपिलावर स्वतंत्रपणे निर्णय घेण्यास ते अधिनियमातील तरतुदीप्रमाणे जबाबदार आहेत. सबब उपरोक्त प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक २९-०६-२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जाची सुनावणी, सुनावणीकरिता यापूर्वीचा व्यपगत झालेला कालावधी क्षमापीत करुन, या अपील अर्जावर हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय लेखी स्वरुपात त्यानंतर जास्तीत जास्त ७ दिवसाच्या आत पारित करावा. सुनावणीसाठी त्यांनी अपिलार्थी यांना किमान १५ दिवस आधी रजिस्टर्ड पोस्टाने नोटीस पाठवावी व सदर पत्र अपिलार्थीस प्राप्त झाल्याची खात्री करुन घ्यावी, जेणेकरुन अपिलार्थीस त्यांच्या प्रथम अपिलावरील म्हणणे मांडण्याची योग्य ती संधी प्राप्त होईल.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालील प्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी यांनी, अपिलार्थीच्या दिनांक २९-०६-२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जाची सुनावणी, सुनावणीकरिता यापूर्वीचा व्यपगत झालेला

कालावधी क्षमापीत करुन, हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत घेऊन, आपला निर्णय त्यानंतर जास्तीत जास्त ७ दिवसाच्या आत पारित करावा.  या निर्णयाने समाधान न झाल्यास अपिलार्थी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) प्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर करु शकतील.

औरंगाबाद                                                  ( वि. बा. बोरगे )
दिनांक  ०८-०८-२००८                                राज्य माहिती आयुक्त,
                                                          खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. विठ्ठल पांडूरंग काळम, रा. उस्माननगर, तालुका कंधार, जिल्हा नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, उस्माननगर, तालुका कंधार, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, कंधार, तालुका कंधार, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१४४६

निर्णय दिनांक ०८-०८-२००८

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. सुभाष साहेबराव नाकलगांवकर,<br>सम्राट अशोकनगर, माजलगांव,<br>तालुका माजलगाव, जिल्हा बीड | : | अपिलार्थी |
| | विरुध्द | | |
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा प्राचार्य, माजलगाव कला, विज्ञान<br>आणि वाणिज्य महाविद्यालय, माजलगाव,<br>जिल्हा बीड | : | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा कार्यवाहक, मराठवाडा शिक्षण<br>प्रसारक मंडळ, स्टेशन रोड,<br>बन्सीलालनगर, औरंगाबाद | : | प्रतिवादी |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०८-०८-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. सुभाष साहेबराव नाकलगांवकर (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), श्री. मा. भ. गाढवे, जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, माजलगाव कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, माजलगाव

(यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. मुकूंदराज चंद्रप्रकाश सोळंके, सदस्य स्था. नि. मंडळ, माजलगाव कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, माजलगाव, जन अपिलीय अधिकारी तथा कार्यवाहक, मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ, औरंगाबाद यांचे प्रतिनिधी (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने सर्वप्रथम त्यांच्याकडील दिनांक २१-०५-२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कनिष्ठ महाविद्यालयामधील शिष्यवृत्ती व कर्मचा-यांच्या महाराष्ट्र दर्शनाबाबतची, सन २००५ ते २००७ या कालावधी-तील खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

“ १. सन २००६-२००७ मध्ये कनिष्ट महाविद्यालयातील तुकडी निहाय विद्यार्थी संख्या किती ? त्यात भारत सरकार शिष्यवृत्ती (जीओआय) लाभार्थी किती.

२. सन २००६-०७ वर्षातील कनिष्ट महाविद्यालयात शिष्यवृत्ती विद्यार्थांची एकुन रक्कम किती, त्यातील शैक्षणिक शुल्क किती, ती शासनास भरली का भरली आसेल तर चलनाच्या प्रतीची छायांकित प्रत जर भरली नसेल तर का भरली नाही व ति कुठे खर्च केली त्या खर्चाची पावती प्रत याची माहिती.

३. सन २००५-२००६ साली ११ वी १२ (तिनी शाखा) ला पास झालेल्या विद्यार्थांची टि. सी. ची फिस कुठे जमा केली त्या चलनाची पावती छायांकित तसेच एस. एस. कोड नियमाप्रमाणे टि. सी. फिस किती घेतली जाते याची माहिती.

४. आपल्या ज्युनिअर कॉलेजमध्ये किती कर्मचा-यांचा स्टाफ आहे त्यात संचमान्यता किती लोकांची आहे. मान्यपदांपैकी किती लोकांनी महाराष्ट्रदर्शन घेतले महाराष्ट्र दर्शन आदेशाची प्रत द्यावी तसेच त्या आदेशास शिक्षण उपसंचालकाची मान्यता आहे काय ? आसेल तर मान्यतेची छायकिंत प्रत दयावी.''

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिश: अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीकडून त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये २२ इतके स्वीकृत करुन त्यांना दिनांक २३-०६-२००७ रोजी त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती दिल्याचे दिसून येत आहे.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार, जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १९-०७-२००७ रोजी प्रथम अपील केले.

अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारे सुनावणी घेतल्याचे अथवा यासंदर्भात अपिलार्थीशी पत्रव्यवहार केल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही. उपस्थित जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी, जन अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर सुनावणी न घेण्याची कारणे आयोगास सांगू शकले नाहीत.

जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून कोणताही निर्णय प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये,

राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १४-०९-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येते.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी मागितलेल्या माहितीपैकी मुद्दा क्रमांक २ व्दारे विचारलेल्या, संस्थेने शासनास शैक्षणिक शुल्क भरलेल्या चलनाची प्रत त्यांना प्राप्त झाली नाही, तसेच ११ वी, १२ वी पास झालेल्या विद्यार्थ्यांची टी. सी. फीस एस. एस. कोड प्रमाणे किती घेतली जाते व टी. सी. फीची रक्कम जमा केलेल्या चलनाची व महाराष्ट्र दर्शन आदेशास शिक्षण उपसंचालक यांनी दिलेल्या मान्यतेची प्रत जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाली नाही. ही माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य अपेक्षित आहे. महाराष्ट्र दर्शन याविषयासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी, त्यांना दिलेल्या माहितीमध्ये खाडाखोड आहे असेही त्यांनी आयोगाच्या निदर्शनास, आपल्या युक्तिवादाच्या शेवटी आणले.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक २१-०५-२००७ रोजीच्या अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांनी अपिलार्थीस आवश्यक ते शुल्क २२ रुपये इतके त्यांच्याकडून स्वीकृत करुन घेऊन दिनांक २३-०६-२००७ रोजी व्यक्तिशः हस्तांतरीत केली. त्यांच्या या विधानापृष्ठ्यर्थ त्यांनी आयोगास अपिलार्थीस माहिती मिळाल्याची पोचसही दाखविली. महाराष्ट्र दर्शन या योजनेखाली त्यांच्या महाविद्यालयातील सदर सवलतीचा लाभ कर्मचा-यांना देय आहे अशा कर्मचा-यांना त्यांच्या खर्चाची प्रतिपुर्ती जिल्हा परिषदेच्या शिक्षण अधिकारी कार्यालयाकडून केली जाते. अपिलार्थीने त्यांच्या युक्तिवादामध्ये शिक्षण उपसंचालकांकडून या खर्चास मान्यता घेतली आहे किंवा कसे हा प्रश्न उपस्थित केला आहे, याबाबत त्यांनी आयोगास असे सांगितले की, शिक्षण उपसंचालकांकडून अशा प्रकारच्या खर्चाच्या प्रतिपुर्तीकरिता

मान्यता त्यांच्या कार्यालयाकडून घेतली जात नाही. अपिलार्थीस पुरविण्यात आलेल्या माहितीमध्ये झालेली खाडाखोड ही "१९९७" या वर्षाच्या आकड्यावर झाली असून, खाडाखोड केल्याप्रीत्यर्थ संबंधितांची स्वाक्षरी पूर्वी घेतलेली नाही. अपिलार्थीने माहितीसाठीच्या केलेल्या अर्जास अनुसरुन त्यांनी त्यांच्याकडे उपलब्ध असलेली सर्व माहिती अपिलार्थीस पुरविलेली आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीच्या मुद्दा क्रमांक २ मध्ये शैक्षणिक शुल्क शासनास भरले आहे किंवा कसे, भरले असल्यास त्याच्या चलनाची प्रत मागितली आहे. ही माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस लिखीत स्वरुपात दिली असून, या पृष्ठ्यर्थ त्यांनी अपिलार्थीस सदर फीस शासकीय कोषागारामध्ये भरलेल्या चलनची प्रत अथवा त्यांच्याकडील कॅशबुकाची प्रत त्यांना दिली नाही व हाच प्रकार विद्यार्थ्यांच्या टी. सी. फीसंदर्भात अपिलार्थीने विचारलेल्या माहितीमध्ये झाल्याचे आढळून येत आहे. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांनी त्यांना, महाराष्ट्र दर्शन या मुद्दयावर दिलेल्या माहितीमध्ये खाडाखोड असल्याचा आक्षेप घेतलेला आहे, परंतु येथे असे दिसून येते की, या माहितीमध्ये जन माहिती अधिकारी यांनी, त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या माहितीची झेरॉक्स प्रत अपिलार्थीस दिली आहे, या प्रतीवरुन असे दिसून येते की, खाडाखोड मूळ प्रतीवर झालेली आहे व ती साक्षांकीत केलेली नाही. सदर खाडाखोड ही रबरी शिक्क्यावरील १९९७ या आकड्यावर केल्याचे दिसून येते. सदर खाडाखोड साक्षांकीत का केली नाही किंवा ही खाडाखोड वैध आहे यासंदर्भात प्रशासकीय चौकशी करावी, असे जन माहिती अधिकारी यांना येथे सुचविण्यात येत आहे. अपिलार्थीने महाराष्ट्र दर्शनाच्या सवलतीचा लाभ त्यांच्याकडील प्राध्यापकांना देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी शिक्षण उपसंचालकांच्या मान्यतेचे पत्र उपलब्ध नाही असे

त्यांच्या युक्तिवादामध्ये स्पष्ट केले आहे, तथापि महाराष्ट्र दर्शन ही योजना शिक्षण संस्थेमधील प्राध्यापकांकरिता किंवा इतर कर्मचा-यांकरिता कशा प्रकारे राबविली जाते याचे विवेचन जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर केले आहे, यावरुन असे दिसून येते की, या अनुदानाची प्रतिपुर्ती जिल्हा परिषदेच्या शिक्षण अधिकारी कार्यालयाकडून परस्पर केली जाते, सदर रक्कम संबधित प्राध्यापकांच्या / शिक्षकांच्या खात्यावर जिल्हा परिषद कार्यालयाकडून परस्पर जमा केली जाते हे पाहता या प्रक्रियेमध्ये शिक्षण उपसंचालकांची मान्यता जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाने घेण्याचा प्रश्न उद्भवत नाही, असे आयोगाचे मत आहे. जर मान्यता घ्यावयाचीच असेल तर ती शिक्षण अधिकारी यांच्या कार्यालयास संबंधितांकडून घ्यावी लागणार आहे, तथापि अशा प्रकारचे कोठलेही संकेत प्रचलीत कार्यपध्दतीमध्ये रुढ असावेत असे आयोगास वाटत नाही, कारण हे आदेश शासनातर्फे निर्गमित होत असल्यामुळे शिक्षण उपसंचालकाची मान्यता सर्वसाधारण परिस्थितीत या मुद्दयावर आवश्यक आहे असे आयोगास वाटत नाही.

वरील वस्तुस्थिती पाहता येथे असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी माहितीपोटीचे आवश्यक ते शुल्क त्यांच्या कार्यालयात भरले असता, अपिलार्थीस आवश्यक ती माहिती पुरविली आहे, मात्र अपिलार्थीस प्राप्त झालेल्या माहितीमध्ये त्यांनी भारतसरकारकडून शिष्यवृत्तीपोटी प्राप्त झालेल्या अनुदानातील शैक्षणिक खर्चाची रक्कम कोठे भरणा केली याचे लेखी स्वरुपात विवेचन केले आहे, परंतु सदर रक्कम शासकीय कोषागारात भरल्याप्रीत्यर्थ त्याच्या चलनाची व त्यांच्या कार्यालयाच्या कॅशबुकची प्रत अपिलार्थीस दिली नाही व स्थानिक नियामक मंडळाकडे टी. सी. फीची रक्कम जमा करतांना भरलेल्या चलनाची व कॅशबुकच्या संबंधित पृष्ठाची प्रत अपिलार्थीस दिली नाही एवढे दोनच मुद्दे विचारार्थ राहत आहेत. या संपूर्ण घटनाक्रमामध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी लावलेला विलंब हा त्यांनी

हेतूपुरस्सर किंवा माहिती दडविण्यासाठी लावल्याचे नि:संशयपणे सिध्द होत नाही, मात्र येथून पुढे त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीप्रमाणे त्यांच्याकडील प्राप्त झालेल्या प्रथम अर्जावर अधिक सतर्कतेने कारवाई करावी असे त्यांना येथे सूचित करण्यात येत आहे व त्यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने मागणी केलेली व वर स्पष्ट केल्याप्रमाणे उर्वरित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

प्रसंगावशात् येथे असे दिसून येते की, जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जाची सुनावणी न घेतल्यामुळे, अपिलार्थीस राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील करण्यासाठी धाव घ्यावी लागली. यामध्ये टाळता येण्याजोगा खर्च व कालापव्यय झाला आहे. जर जन अपिलीय अधिकारी यांना अपिल सुनावणी वेळेवर घेता येत नसेल तर जन अपिलीय अधिकारी म्हणून दुस-याची नेमणूक करण्याचा त्यांनी विचार करावा असे त्यांना सूचविण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशत: मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील उर्वरित माहिती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

औरंगाबाद<br>
दिनांक ०८-०८-२००८

( वि. बा. बोरगे )<br>
राज्य माहिती आयुक्त,<br>
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. सुभाष साहेबराव नाकलगांवकर, सम्राट अशोकनगर, माजलगांव, तालुका माजलगाव, जिल्हा बीड.

२ जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, माजलगाव कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, माजलगाव, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यवाहक, मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ, स्टेशन रोड, बन्सीलालनगर, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१४४७

निर्णय दिनांक ०८-०८-२००८

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. गोडबोले चंद्रकांत तुळशीराम,<br>देगावचाळ, बी. ए. नगर, वजिराबाद,<br>नांदेड | : | अपिलार्थी |
| | विरुध्द | | |
| १ | जन माहिती अधिकारी<br>तहसील कार्यालय,<br>नांदेड, जिल्हा नांदेड | : | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा तहसीलदार, तहसील कार्यालय,<br>नांदेड, जिल्हा नांदेड | : | प्रतिवादी |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०८-०८-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. गोडबोले चंद्रकांत तुळशीराम (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत तर जन माहिती अधिकारी तहसील कार्यालय, नांदेड व जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, नांदेड हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १९-०९-२००७ रोजी केलेल्या व्दितीय अपिलाची सुनावणी विचाराधीन आहे. सदर अपील अर्जावर अपिलार्थीने दिनांक १७-०९-२००७ अशी तारीख नोंदविलेली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक १३-०३-२००७ रोजीच्या माहिती अधिकार अधिनियमांतर्गत केलेल्या प्रथम अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे अतिवृष्टी / महापूर ऑगस्ट २००६ या वर्षी मिळालेल्या आर्थिक मदतीसंदर्भात काही माहिती मागविली होती. या माहितीमध्ये अपिलार्थीस, जन माहिती अधिकारी यांच्याकडून दिनांक २५-०८-२००६ व दिनांक २९-०८-२००६ रोजी लाभार्थ्यांना वाटण्यात आलेली रक्कम उचलतांना अंगठ्याच्या ठश्याची रंगीत छायांकीत प्रत, तसेच त्यांच्या स्वाक्षरीच्या प्रती आणि तलाठी श्री. कानगुले यांचे संपूर्ण नांव, व कायमचा पत्ता ही माहिती मागितली होती. तथापि अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही, तसेच त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०४-०६-२००७ रोजी केलेल्या प्रथम अपिलावर देखिल जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय दिला नाही, त्यामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने वर निर्देशित केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना भरपूर विलंबाने माहिती प्राप्त झाली व जी माहिती प्राप्त झाली ती अपूर्ण आहे. सदर माहिती आपल्याला अपूर्ण का वाटते, असे अपिलार्थीस विचारले असता, अपिलार्थीने त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे रंगीत झेराक्स प्रती मागितल्या असता जन माहिती अधिकारी यांनी त्यांना कृष्णधवल प्रत दिली तसेच तलाठी श्री. कानगुले यांचा पत्ता पूर्णत: दिला नसल्याचे आयोगास सांगितले.

अपिलार्थीने आयोगास पुढे असेही सांगितले की, त्यांना सदर माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून दिनांक १०-१२-२००७ रोजी प्राप्त झाली आहे. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीचे अवलोकन करता असे दिसून येते की, सदर माहिती अपिलार्थीस निश्चितपणे जन माहिती अधिकारी यांनी केव्हा दिली या तारखेचा अपिलार्थीस दिलेल्या माहितीमध्ये कोठेही स्पष्टपणे उल्लेख नाही, मात्र अपिलार्थीस प्राप्त झालेल्या माहितीच्या प्रतीवर अपिलार्थीने स्वतःच्या हस्ताक्षरात ही माहिती "पेशकारसाहेबांनी दिनांक १०-१२-२००७ रोजी अर्ज दिनांक १४-०३-२००७ अन्वये प्रती दिल्या" असे अभिप्राय नोंदविले आहेत.

आज सुनावणीस जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी हे स्वतः किंवा त्यांचे कोणीही प्रतिनिधी अपिलार्थीच्या या विधानाचे खंडण करण्यासाठी उपस्थित नाहीत, हे पाहता अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून दिनांक १०-१२-२००७ रोजी प्राप्त झाल्याचे अपिलार्थीचे म्हणणे ग्राह्य धरण्यात येत आहे. अपिलार्थीने त्यांच्या युक्तिवादामध्ये त्यांनी रंगीत झेरॉक्स प्रत मागितली असतांना जन माहिती अधिकारी यांनी त्यांना कृष्णधवल रंगातील झेरॉक्स प्रत दिली असल्याचे नमूद केले आहे. आज रोजी प्रचलीत असलेल्या कायद्यातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांची ही कृती बरोबर आहे, असे आयोग मानतो, कारण अपिलार्थीस माहिती देण्यासाठी विहीत केलेल्या नियमावलीमध्ये, अर्जदारास त्यांनी कोणत्या रंगाची झेरॉक्स प्रत द्यावयाची याचा स्पष्ट उल्लेख नाही. अपिलार्थीने आयोगासमोर आज उपस्थित केलेल्या दुस-या मुद्दयामध्ये त्यांना जन माहिती अधिकारी यांनी श्री. कानगुले, तलाठी यांचा संपूर्ण पत्ता दिला नसल्याचे म्हटले आहे. यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस श्री. कानगुले तलाठी यांच्या सेवापुस्तिकेच्या प्रथम पृष्ठाची झेरॉक्स प्रत दिली आहे. यामध्ये श्री. कानगुले, तलाठी यांच्या सध्याच्या पत्त्याचा उल्लेख आहे. त्यामुळे अपिलार्थीस या मुद्दयावर माहिती

जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती मिळाली आहे असे अनुमान काढण्यात येत आहे. अपिलार्थीने या संदर्भात असा युक्तिवाद केला की, त्यांना श्री. कानगुले, तलाठी यांच्या नोकरीच्या ठिकाणचा सध्याचा पत्ता व कायमचा पत्ता असे दोन्ही पत्ते हवे आहेत, तथापि अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे केलेल्या मूळ अर्जाचे अवलोकन केले असता, या अर्जामध्ये अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे "श्री. कानगुले, तलाठी यांचा पत्ता" एवढीच माहिती मागविल्याचे दिसून येत आहे, त्यामुळे अपिलार्थीस अपूर्ण माहिती मिळाली हा त्यांचा मुद्दा आयोग फेटाळून लावत आहे, मात्र अपिलार्थीने त्यांच्या युक्तिवादामध्ये, जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना विलंबाने माहिती प्राप्त झाली हा मुद्दा येथे नि:संशयपणे सिध्द होत आहे. उपरोक्त प्रकरणी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या अनुक्रमे प्रथम व अपील अर्जास कोणताही प्रतिसाद न देऊन, त्यांच्या प्रथम अपिलावर कोणताही निर्णय न देऊन आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे, असे आयोगाचे मत आहे. या संपूर्ण घटनाक्रमामध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीमध्ये माहिती न देऊन स्वत:ला माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० च्या तरतुदीस पात्र ठरविले आहे.

सबब संबंधित जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी अपिलार्थीस माहिती प्राप्त करुन घेण्याप्रित्यर्थ कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय अधिनियमातील विहित कालावधीपेक्षा जास्त कालावधीसाठी वंचित ठेवल्याबद्दल त्यांच्यावर विलंबाच्या प्रतिदिनी रुपये २५० /- याप्रमाणे एकूण रुपये २५०००/- (अक्षरी रुपये पंचवीस हजार) इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमित झाल्यापासून ३० दिवसाच्या आत सरळ आयोगाकडे सादर करावा असे त्यांना आदेशित करण्यात येऊन विहित मुदतीत खुलासा आयोगाकडे प्राप्त न झाल्यास, त्यांना या प्रकरणी काहीही

सांगावयाचे नाही असे गृहीत धरुन हेच आदेश अंतिम करण्यात येतील याची नोंद घेण्याचे सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. संबंधित जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी अपिलार्थीस माहिती प्राप्त करुन घेण्याप्रित्यर्थ कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय अधिनियमातील विहित कालावधीपेक्षा जास्त कालावधीसाठी वंचित ठेवल्याबद्दल त्यांच्यावर विलंबाच्या प्रतिदिनी रुपये २५० /- याप्रमाणे एकूण रुपये २५,०००/- (अक्षरी रुपये पंचवीस हजार) इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमित झाल्यापासून ३० दिवसाच्या आत सरळ आयोगाकडे सादर करावा. विहित मुदतीत खुलासा आयोगाकडे प्राप्त न झाल्यास, त्यांना या प्रकरणी काहीही सांगावयाचे नाही असे गृहीत धरुन हेच आदेश अंतिम करण्यात येतील.

औरंगाबाद<br>
दिनांक ०८-०८-२००८

( वि. बा. बोरगे )<br>
राज्य माहिती आयुक्त,<br>
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. गोडबोले चंद्रकांत तुळशीराम, देगावचाळ, बी. ए. नगर, वजिराबाद, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तहसील कार्यालय, नांदेड, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, नांदेड, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१४५१

निर्णय दिनांक १२-०८-२००८

१ श्री. राजकुमार नामदेवराव पडलवार, : अपिलार्थी
मु.मलकागुडा ता.माहूर जि.नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी : प्रतिवादी
तथा कनिष्ठ अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
शाखा सारखणी ता.किनवट, जि.नांदेड.

२ जन अपिलीय अधिकारी :
तथा सहायक अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
किनवट उपविभाग, किनवट, जि.नांदेड.

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी : सहायक अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी
मर्यादित, किनवट उपविभाग,
किनवट, जि.नांदेड

जन अपिलीय अधिकारीः कार्यकारी अभियंता (सं. व सु.)
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी
मर्यादित, भोकर विभाग, जि. नांदेड.

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १२.०८.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी श्री.बालाजी नारायण कोटलवार, जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, किनवट, उपविभाग किनवट, जि.नांदेड (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत, तर जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी

अभियंता (सं. व सु.) महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, भोकर विभाग, जि. नांदेड (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) व अपिलार्थी श्री. राजकुमार नामदेव पडलवार (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १८.९.२००७ रोजी दाखल केलेले द्वितीय अपील निर्णयार्थ विचाराधीन आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणतीही माहिती प्राप्त झाली नसल्याचे नमूद करुन त्यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले असता, जन अपिलीय अधिकारी यांनी देखील त्यांना कागदपत्रांच्या प्रतींची संख्या जास्त दाखवून आवश्यक ते शुल्क त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सांगितले व जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी त्यांना माहिती देण्यास टाळाटाळ केल्याचे म्हटले आहे. या अर्जामध्ये त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येत आहे. आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने सर्वप्रथम त्यांच्याकडील दि. २८.४.२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रातील विद्युत पुरवठ्यासंदर्भात व त्यांच्या कार्यालयाशी संबंधित एकूण ८ मुद्यांवर माहिती मागितली होती. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीमध्ये- त्यांच्या कार्यालयातील ३ व ५ वर्षापेक्षा जास्त कार्यकाळ असलेले कर्मचारी, त्यांचे नाव, पद, रुजू झाल्याची तारीख, सारखणी ते माहोर ११ के.व्ही. यंत्रणेवर दिलेल्या प्रायव्हेट केबल टि.व्ही. वायरिंग करण्यात आली त्यास विद्युत वितरण कंपनीकडून मासिक शुल्क आकारण्यात येते का, येत असल्यास किती, सन २००५ ते २००७ या

कालावधीमध्ये शेती पंपासाठी किती कोटेशन भरण्यात आले व किती शेतकऱ्यांना विद्युत पुरवठा वितरीत करण्यात आला, त्यांचा ग्राहक क्रमांक,ए.जी.पंप क्रमांक, नाव,गाव,सर्व्हेनंबर, सन २००५ ते २००७ मध्ये घरगुती वापरासाठी दिलेल्या विज जोडण्यांची संख्या, ग्राहक क्रमांक,मिटर क्रमांक, ग्राहकाचे नाव,गाव व घरनंबर अशाप्रकारचा तपशील, सन २००५ ते २००७ या कालावधीमध्ये घरगुती वापरासाठी, शेतीपंपासाठी व उद्योग व्यवसायासाठी दिलेल्या जोडणीसंदर्भात सर्व तपशील, सारखणी पॉवर स्टेशनमध्ये अस्तित्त्वात असलेल्या कूपनलिकांवर झालेला खर्च, सारखणी ता.किनवट येथील महावितरण कंपनीच्या जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे पद व कार्यालयाची माहिती आणि जन माहिती अधिकारी यांच्या कार्यक्षेत्रातील सारखणी शाखेअंतर्गत एकूण ग्राहकांची संख्या, नाव,दुकानांची नावे व त्यातील कायमस्वरुपी विद्युतपुरवठा खंडीत झालेली नावे,गावे व प्रत्येकाकडे असलेली थकबाकी – या मुद्यांवरील माहितीचा समावेश होता. अपिलार्थी यांनी सदर माहिती व्यक्तिश अपेक्षिली होती.

अपिलार्थीने मूलतः माहितीसाठीचा अर्ज कनिष्ठ अभियंता, म.रा.विद्युत वितरण कंपनी, शाखा सारखणी यांच्याकडे केला होता. अपिलार्थीच्या या अर्जास संबंधित जन माहिती अधिकारी यांनी दि. २९.५.२००७ रोजी प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती देण्यासंदर्भात त्यांना कोणत्याही प्रकारचे अधिकार नसल्याने अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात त्यांनी असमर्थता व्यक्त केली. कनिष्ठ अभियंता यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) अन्वये सहायक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कं.म. उपविभाग किनवट यांच्याकडे दिनांक २४.६.२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जास सहा.अभियंता. विद्युत वितरण कंपनी मर्यादित यांनी त्यांच्याकडील दि. २०.७.२००७

रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती एकूण ९९६ पृष्ठांची व सदर माहिती पोस्टाने पाठविण्याकरिता येणारा खर्च रु. २००/- इतका असल्याने अपिलार्थीस माहितीपोटी रु. ११९६/- इतके शुल्क त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. सहा.अभियंता यांच्या या पत्राने  व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे, सुरवातीच्या परिच्छेदात वर्णन केल्याप्रमाणे दि. १८.९.२००७ रोजी द्वितीय अपील केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन या प्रकरणी असे दिसून येते की, मूळात अपिलार्थीने माहितीसाठीचा मूळ अर्ज कनिष्ठ अभियंता, जे जन माहिती अधिकारी म्हणून विद्युत वितरण कंपनीतर्फे नेमणूक केले गेले नव्हते, त्यांच्याकडे दि. २८.४.२००७ रोजी केला होता. या अर्जावर कार्यवाही करण्यासाठी संबंधित कनिष्ठ अभियंता सक्षम नसल्याने त्यांनी अधिनियमातील कलम ६(३)(एक) च्या तरतुदीनुसार अपिलार्थीचा हा अर्ज, या प्रकरणी ज्यांची जन माहिती अधिकारी म्हणून नेमणूक केली गेली आहे, अशा सहा.अभियंता यांच्याकडे पाठवून त्याची एक प्रत अपिलार्थीस देणे भाग होते, तथापि त्यांनी अशाप्रकारची कोणतीही कृती न करता, अपिलार्थीचा प्रथम माहितीसाठीचा अर्ज त्यांच्याकडे विनाकार्यवाही ठेवून घेतला. त्यानंतर कनिष्ठ अभियंता यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने सहा.अभियंता, जे प्रत्यक्षात जन माहिती अधिकारी म्हणून विद्युत वितरण कंपनीतर्फे नेमले गेलेले आहेत, त्यांच्याकडे प्रथम अपील केले अपिलार्थीचे प्रथम अपील हे त्यांचा माहितीसाठीचा प्रथम अर्ज आहे, असे समजून सहा.अभियंता यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दि. २०.७.२००७ रोजीच्या पत्रान्वये माहितीपोटीचे आवश्यक ते शुल्क रु.११९६/- इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. सहा.अभियंता यांची जन माहिती अधिकारी म्हणून ही कृती जरी अधिनियमाद्वारे

विहित केलेल्या मुदतीत व जन माहिती अधिकारी या नात्याने बरोबर असली तरी त्यांनी अपिलार्थीने त्यांच्याकडे केलेला प्रथम अपील अर्ज हा अपील अर्ज म्हणून समजला असता तर, त्यांना कदाचित त्याचवेळी अपिलार्थीने व त्यांच्या नियंत्रणाखालील कनिष्ठ अभियंता यांनी केलेली चूक लक्षात आली असती व अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात त्यांच्या पातळीवर निर्णय होऊ शकला असता, तथापि अशाप्रकारची कार्यवाही संबंधित सहा.अभियंता यांनी केल्याचे दिसून येत नाही.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर अपिलार्थीने प्रथम अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती तयार असल्याचे स्पष्ट करुन त्यांनी अपिलार्थीस सशुल्क माहिती पुरविण्याची तयारी दर्शविली आहे.

या संपूर्ण घटनाक्रमामध्ये, अपिलार्थीची प्रथम माहितीसाठीचा अर्ज करण्याची पध्दत जरी चुकीची असेल तरी संबंधित कनिष्ठ अभियंता यांनी अपिलार्थीचा अर्ज त्यांच्या सहा.अभियंता, जे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार माहिती अधिकारी म्हणून नेमले गेले आहेत, त्यांच्याकडे अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत पाच दिवसांच्या आत पाठविला असता तर कदाचित अपिलार्थीस आवश्यक ती माहिती प्राप्त करुन घेण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांच्याकडून विहित मुदतीत निर्णय प्राप्त होऊ शकला असता.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी हे त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त होण्यासाठी प्रदीर्घ कालावधीसाठी निश्चितपणे वंचित राहिल्याचे सिध्द होत आहे. अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन देण्यासाठी जन माहिती अधिकारी व त्यांचे सहायक व इतर अधिकारी यांना देखिल जन माहिती अधिकारी म्हणून समजावे, अशी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ५(५) अन्वये तरतुद आहे. हे पाहता,उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपासून वंचित ठेवण्यासाठी

संबंधित कनिष्ठ अभियंता हे निश्चितपणे जबाबदार असल्याचे आयोगास आढळून येत आहे. त्यांनी आपल्या अशाप्रकारच्या चुकीच्या कृतीद्वारे आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे, असे आयोगाचे मत आहे. आपल्या वर स्पष्ट केलेल्या कार्यशैलीने त्यांनी स्वतःला अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीस पात्र ठरविले आहे. सबब मुख्य अभियंता, विद्युत वितरण कंपनी मर्यादित, लातूर यांना संबंधितांवर प्रचलित सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

या संपूर्ण घटनाक्रमामध्ये अपिलार्थीचा कोणताही दोष नसताना त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपासून वंचित राहावे लागल्याने व अपिलार्थीस माहिती देण्यास अधिनियमाद्वारे विहित केलेला कालावधी आता व्यपगत झाला असल्याने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७(६) ची तरतुद लक्षात घेता, जन माहिती अधिकारी तथा सहा.अभियंता यांना आता असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांचे आत व्यक्तिशः विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थीस असे सूचित करण्यात येते की, त्यांनी त्यांच्या दि. २८.४.२००७ रोजीच्या प्रथम अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत कार्यालयीन दिवशी व वेळेत उपस्थित राहून, ही माहिती त्यांच्याकडून विनामूल्य हस्तगत करुन घ्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१ अपील मान्य करण्यात येत आहे.

२ जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांचे आत विनामूल्य पुरवावी.

३ मुख्य अभियंता, विद्युत वितरण कंपनी मर्यादित, लातूर यांना संबंधित कनिष्ठ अभियंता यांनी उपरोक्त प्रकरणी दर्शविलेल्या आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल त्यांचेवर प्रचलित सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : १२-०८-२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. कॉ. राजकुमार नामदेवराव पडलवार,मु.मलकागुडा ता.माहूर जि.नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, किनवट, उपविभाग किनवट जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी भोकर विभाग, भोकर, जि. नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य अभियंता, विद्युत वितरण कंपनी मर्यादित, लातूर, झोन लातूर, विद्युत भवन, साळेगल्ली, लातूर-४१३ ५१२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१४५२

निर्णय दिनांक १२-०८-२००८

| | | |
|---|---|---|
| १ श्री. गौतम अमृतराव रोहिणकर,<br>रा. गंगाखेड जि.परभणी | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| १ जन माहिती अधिकारी<br>तथा तहसीलदार, पालम,<br>जि.परभणी. | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी<br>तथा उपविभागीय अधिकारी, परभणी<br>जि.परभणी | : | |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १२.०८.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्री. गौतम अमृतराव रोहिणकर (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, पालम, जि. परभणी (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, परभणी, जि.परभणी (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. २०.९.२००७ रोजी दाखल केलेले द्वितीय अपील निर्णयार्थ विचाराधीन आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने -शेत सर्व्हे नं. ५९ (२० एकर १२ गुंठे) आकार २२ रु.२८ पै. शिवार मौ. बोरगाव (बु) ता.पालम जि.परभणी या जमिनीवर हैद्राबाद कुळ कायद्यान्वये सिताराम योगाजी राठोड यांचे कुळ

डिक्लेअर झालेले असून ७/१२ च्या उताऱ्यातील इतर अधिकारामध्ये तशी नोंद होती. परंतु सदर कुळाची नोंद कोणत्या आदेशानुसार वगळण्यात आलेली आहे, त्या आदेशाची मागणी त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे केली तथापि त्यांच्याकडून सदर माहितीची प्रत अपिलार्थीस न मिळाल्याने त्यांनी सदर अपील आयोगाकडे केल्याचे दिसून येते.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने सर्वप्रथम त्यांच्याकडील दि. १५.५.२००७ रोजीच्या अर्जान्वये वरील माहितीची मागणी केली होती. सदर माहिती अपिलार्थी यांनी शीघ्र टपालाद्वारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास संबंधित जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ५.६.२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद दिला. या पत्रामध्ये त्यांनी अपिलार्थीस - मौ. बोरगाव (बू) येथील सर्व्हेनंबरचे मूळ मालक श्री. एकनाथ पी.शामराव यांच्याकडून श्री. किशनबुवा नरहरीबुवा यांनी फेर क्र.११० दि. २६.१०.१९६९ नुसार आहेत. सालसन १९६८-६९ ची ७/१२ पाहिल्यास सदर स.नं.च्या इतर हक्क रकान्यामध्ये सं.कु.सीताराम योगाजी १९५५ कबजा नाही अशी नोंद आहे. परंतु साल १९७०-७१ च्या ७/१२ पाहिला असता उक्त स.नं.मधील इतर हक्कातील स.कु. सिताराम योगाजी या नावास कुंडली मारल्याचे दिसून येत आहे. ही कुंडली कशाच्या आधारे मारली याची नोंद दिसून येत नसल्याने सदर नोंद कोणत्या आदेशानुसार वगळण्यात आली याचा बोध होत नाही. त्यामुळे अपिलार्थीने मागणी केलेल्या आदेशाची सत्यप्रत किंवा नक्कल देणे सुलभ होत नसल्याचे कळविले आहे. तसेच या पत्राबरोबर त्यांनी अपिलार्थीस सन ६८-६९ व ७०-७१ च्या ७/१२ च्या सत्यप्रती माहितीस्तव पाठविल्याचे दिसून येते.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) अन्वये

दि. ८.६.२००७ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपील अर्जामध्ये त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारे सुनावणी घेतल्याचे दिसून येत नाही. मात्र त्यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दि. २१.७.२००७ रोजीच्या पत्रान्वये, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पाठविलेल्या दि. ५.६.२००७ रोजीच्या पत्रासारखेच उत्तर दिले आहे. जन अपिलीय अधिकारी यांच्या या पत्राने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात निर्देशित केल्याप्रमाणे आयोगाकडे द्वितीय अपील केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यापैकी कोणीही उपस्थित नाहीत. आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीस स.नं. ५९ मौ. बोरगाव (बू) ता.पालम यातील ७/१२ च्या उताऱ्यावरील 'सीताराम योगाजी राठोड' यांचे 'इतर अधिकार' या रकान्यातील नाव या स.नं.च्या ७/१२ च्या उताऱ्यावरुन कोणत्या आदेशाद्वारे वगळले गेले, याची प्रत हवी आहे. तथापि खुद्द तहसीलदार व उपविभागीय अधिकारी, ज्यांच्याकडे अशाप्रकारच्या नोंदीसंदर्भात कागदपत्रे उपलब्ध असतात त्यांच्याकडून अपिलार्थीस अशाप्रकारच्या आदेशाची प्रत त्यांच्याकडे उपलब्ध नसल्याचे त्यांनी कळवून, ही माहिती अपिलार्थीस देण्यास असमर्थता व्यक्त केली आहे. यावरुन अपिलार्थीस आता तहसीलदार व उपविभागीय अधिकारी यांच्याकडून सदर आदेशाची प्रत प्राप्त होऊ शकणार नाही, हे उघड आहे. त्यामुळे अपिलार्थीस त्यांचे  या जमिनीच्या मालकीहक्कासंदर्भात किंवा ७/१२ च्या उताऱ्यातील नोंदी बदलासंदर्भातील काही गाऱ्हाणे असेल तर त्यांनी उपजिल्हाधिकारी (भुसूधार), जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी यांच्याकडे अर्ज दाखल करावा, असे त्यांना सूचविण्यात येत आहे.

उपरोक्त प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अर्जास अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत प्रतिसाद देऊन त्यांनी अपिलार्थीने मागितलेल्या माहितीसंदर्भात पूरक माहिती देऊन अपिलार्थीस त्यांच्याकडून होईल तितके सहकार्य केले असल्याने त्यांच्यावर कोणत्याही कारवाईचे आदेश नाहीत.

प्रसंगावशात्, तहसीलदार व उपविभागीय अधिकारी हे जमिनीसंदर्भाच्या कागदपत्रांचे विश्वस्त असूनही त्यांच्याकडे अशाप्रकारच्या नोंदींची माहिती उपलब्ध नाही ही बाब खेदजनक आहे, असे आयोगास वाटते. सबब जिल्हाधिकारी, परभणी यांना असे सूचित करण्यात येते की, त्यांनी उपरोक्त प्रकरणी स्वतः जातीने लक्ष घालून अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेली माहिती देण्यासाठी प्रयत्न करावा.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१ अपील निकाली काढण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : १२-०८-२००८** **राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. गौतम अमृतराव रोहिणकर, मु.पो.ता.गंगाखेड (जुना मोंढा) जि.परभणी

२. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, पालम जि. परभणी यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, परभणी, जि.परभणी यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जिल्हाधिकारी, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१४५३

निर्णय दिनांक १२-०८-२००८

१ श्री. अविनाश आसाराम कव्हळे, : अपिलार्थी
रा.जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी : प्रतिवादी
तथा तालुका कृषी अधिकारी,
बदनापूर, जि.जालना

२ जन अपिलीय अधिकारी :
तथा उपविभागीय कृषी अधिकारी, जालना
जि.जालना

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १२.०८.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी श्री. प्रकाश बाबूराव आव्हाळे, जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषी अधिकारी, बदनापूर, जि.जालना (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. नंदकुमार अनंतराव टाक, तंत्र अधिकारी, जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय कृषी अधिकारी, जालना, जि.जालना यांचे प्रतिनिधी (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत, तर अपिलार्थी श्री. अविनाश आसाराम कव्हळे (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. २६.९.२००७ रोजी दाखल केलेले द्वितीय

अपील निर्णयार्थ विचाराधीन आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने, जन माहिती अधिकारी यांच्याकडे रो.ह.यो.अंतर्गत प्रत्येक कामाचे दोन हजेरीपटाची मागणी केली असून सदर माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाली नसल्याचे नमूद केले आहे. आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी सर्वप्रथम अपिलार्थीने संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. १.४.२००७ ते जुलै २००७ अखेरपर्यंतच्या कालावधीतील त्यांच्या कार्यक्षेत्रातील रो.ह.यो.अंतर्गत प्राप्त झालेला निधी ज्या मजूरांना वाटप करण्यात आला होता त्या मजूरांचे कामनिहाय हजेरीपटाच्या (प्रत्येक कामाचे दोन याप्रमाणे) प्रतींची मागणी त्यांच्या दि. २७.७.२००७ रोजीच्या अर्जान्वये केली होती.- सदर माहिती अपिलार्थीने टपालाद्वारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास संबंधित जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. १७.८.२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. ३८,३०४/- इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. या पत्रामध्ये त्यांनी अपिलार्थीस एकूण पृष्ठांची संख्या १९,१५२ इतकी कळविलेली आहे.त्याचवेळी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी आवश्यक तो निधी उपलब्ध करुन देण्यासाठी त्यांनी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, जालना यांना देखील पत्र लिहिल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थीस पाठविलेले दि. १७.८.२००७ रोजीचे पत्र त्यांनी त्यांच्या कार्यालयाकडील १३७३ या क्रमांकाने पाठविले असून त्यांनी अपिलार्थीस सदर पत्र पाठविल्यापृष्ठयर्थ पुरावा म्हणून आयोगास सादर केलेल्या जावक नोंदवहीच्या झेरॉक्स प्रतीवर इतर तपशील जसे जावक तपासणी क्र., वर्गीकरण, टपालखर्च इ. तपशील भरला नसल्याचे दिसून येते. जन माहिती अधिकारी यांचे कथित पत्र अपिलार्थीस पोहोचले किंवा कसे हे कळण्यास, अपिलार्थी सुनावणीस गैरहजर असल्याने, मार्ग नाही. जन माहिती

अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) अन्वये दि. ४.९.२००७ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या अर्जावर कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येत नाही. मात्र त्यांच्याकडील दि. १४.९.२००७ रोजीच्या पत्राद्वारे त्यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती अपिलार्थीस देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना सूचित केले व या पत्राची एक प्रत त्यांनी अपिलार्थीस पाठविली.

जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय देऊनही अपिलार्थीस माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी वरील परिच्छेदामध्ये वर्णिल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी गैरहजर आहेत, त्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे सादर केलेल्या द्वितीय अपील अर्जातील त्यांचे लेखी म्हणणे हाच त्यांचा युक्तीवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थीने त्यांच्याकडे मागणी केलेली माहिती अपिलार्थीस देण्यासाठी त्यांना एकूण रु. ३८,३०४/- इतक्या निधीची आवश्यकता होती व त्याप्रमाणे त्यांनी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी , जि. जालना यांच्याकडे निधीची मागणी दि.१७.८.२००७ रोजी नोंदविली होती. तथापि अद्यापही जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांच्याकडून त्यांना अनुदान प्राप्त झालेले नाही. त्यांच्या विभागाने दिलेल्या सूचनेनुसार अपिलार्थीकडून माहितीपोटीचे शुल्क त्यांच्या कार्यालयात प्राप्त झाल्यानंतर ते ‘महसूली जमा’ या लेखाशीर्षाखाली शासकीय कोषागारात वर्ग करण्यात येत असल्याने त्यांना अपिलार्थीस माहिती देण्यासाठी प्रत्यक्षतः

हातात कोणतेही अनुदान उपलब्ध नसते. अपिलार्थीस माहिती देण्यासाठी येणाऱ्या खर्चाकरिता त्यांना जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांच्याकडून कार्यालयीन खर्चासाठी अनुदान प्राप्त होण्याची वाट पहावी लागत असते. उपरोक्त प्रकरणी त्यांना हे अनुदान प्राप्त झाले नाही व अपिलार्थीने देखील त्यांच्याकडे आवश्यक त्या शुल्काचा भरणा न केल्याने ते अपिलार्थीस माहिती पुरवू शकले नाहीत. मात्र अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांनी अपिलार्थीने दि. १४.९.२००७ रोजी दाखविली. सदर माहिती अपिलार्थीने दि. १४.९.२००७ रोजी पाहून समाधान व्यक्त केले व त्यांचा दि. २७.७.२००७ रोजीचा मूळ अर्ज रद्द समजण्यात यावा, असा जवाब त्यांनी याचदिवशी स्टॅम्पपेपरवर लिहून दिला आहे. त्यांच्या या विधानापृष्ठयर्थ त्यांनी अपिलार्थीचे दि. १४.९.२००७ रोजीच्या जवाबाची सत्य झेरॉक्सप्रत आयोगास सादर केली आहे. यावरुन अपिलार्थीस आवश्यक ती माहिती मूलतः जन माहिती अधिकारी यांच्याकडे आवश्यक ते अनुदान उपलब्ध नसल्याने व माहितीपोटीचे शुल्क अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात भरले नसल्याने त्यांना प्राप्त झाली नाही, हे सिध्द होत आहे. तसेच अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. १४.९.२००७ रोजी त्यांचा दि. २७.७.२००७ रोजीचा मूळ अर्ज रद्द करण्याची विनंती केली आहे. मात्र त्यांनी आयोगाकडे या जवाबानंतर म्हणजेच दि. २६.९.२००७ रोजी द्वितीय अपील केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी त्यांना माहिती दिली नाही, हे द्वितीय अपील करण्याचे कारण दर्शविले आहे. अपिलार्थीने या प्रकरणी दि. १४.९.२००७ रोजी व दि. २६.९.२००७ रोजी घेतलेल्या दोन भूमिकांमध्ये विसंगती आहे, या विसंगतीचे स्पष्टीकरण करण्यासाठी व जन माहिती अधिकारी यांच्या युक्तीवादाचे खंडण करण्यासाठी आज आयोगासमोर अपिलार्थी अनुपस्थित आहेत, हे पाहता अपिलार्थीचे अपील फेटाळण्यायोग्य आहे, या निष्कर्षाप्रत आयोग आला आहे.

प्रसंगावशात्, तालुका कृषी अधिकारी यांनी आयोगास त्यांच्या युक्तीवादापृष्ठयर्थ सादर केलेली कागदपत्रे आयोगाच्या मनात संशय निर्माण करत आहेत. सबब आयुक्त (कृषी) यांना असे सूचित करण्यात येते की, त्यांनी तालुका कृषी अधिकारी, बदनापूर यांच्या कार्यालयाची विशेषतः पत्रव्यवहार शाखेची त्यांच्या विभागातील दक्षता पथकामार्फत तात्काळ तपासणी करावी व या प्रकरणी आपला अनुपालन अहवाल आयोगास दोन महिन्याचे आत सादर करावा, या सूचनेसह वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील फेटाळण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१ अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : १२-०८-२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. अविनाश आसाराम कव्हळे, दैनिक जालना दर्शन, साई कॉम्प्लेक्स लक्कडकोट, बसस्टॅण्ड जवळ, जालना, ४३१ २०३

२. जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषी अधिकारी, बदनापूर जि.जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय कृषी अधिकारी, जालना जि.जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ आयुक्त (कृषी) कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, शिवाजीनगर, पुणे – ०५ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१४५४

निर्णय दिनांक १२-०८-२००८

| | | |
|---|---|---|
| १ श्री. साहेबराव तुकाराम पावडे,<br>रा. ता.जि.नांदेड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी<br>तथा जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी,<br>नांदेड | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी<br>तथा कृषि उपसंचालक,<br>जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी कार्यालय,<br>नांदेड | | |

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारीः सहा.प्रशासन अधिकारी, जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी कार्यालय, नांदेड.

जन अपिलीय अधिकारीः कृषि उपसंचालक, जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी कार्यालय, नांदेड.

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १२.०८.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी श्री.नथ्थुजी बाळकृष्ण कोलपवार, जन माहिती अधिकारी तथा सहा.प्रशासन अधिकारी, जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी कार्यालय, नांदेड (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. अण्णाराव राजकुमार हसणाबादे, जन अपिलीय अधिकारी तथा कृषि उपसंचालक, जिल्हा अधीक्षक

कृषि अधिकारी कार्यालय, नांदेड (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत, तर अपिलार्थी श्री. साहेबराव तुकाराम पावडे (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी सर्वप्रथम त्यांचेकडील दि.०२.०६.२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी तथा जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयातील खालील क्रमांकाच्या वाहनांच्या दि. १.६.२००५ ते २.६.२००७ या कालावधीतील लॉगबुकच्या झेरॉक्स प्रती मागितल्या होत्या.

" MXV-6154 हदगाव.
MH-12-P-657,
MH 24-7243
MXV-9998
MH 12-8832.
MH-20-8349."

अपिलार्थी यांनी सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीने मागितलेल्या एकूण सहा वाहनांच्या लॉगबुकच्या प्रती जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. ११.७.२००७ ते ३१.७.२००७ या कालावधीमध्ये प्राप्त झाल्या. अपिलार्थीने एकूण सहा वाहनांच्या लॉगबुकच्या प्रती जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितल्या होत्या. तथापि त्यातील MH-12-P-657, MH-24-7243 ही दोन वाहने जन माहिती अधिकारी यांच्याकडील नव्हती. त्यामुळे या संदर्भात अपिलार्थीस माहिती देण्याचा प्रश्न उद्‌भवत नव्हता. जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. ०६.०७.२००७ रोजी प्रथम अपील केले. सदर अपील जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयात दि. ०७.०७.२००७ रोजी प्राप्त झाल्याचे दिसून येते. याचवेळी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस

त्यांचेकडील दिनांक ११.०७.२००७ रोजीच्या पत्राद्वारे त्यांच्याकडे त्यावेळेपावेतो जी माहिती उपलब्ध होती, ती देण्यासाठी एकूण रु.२४०/- इतके शुल्क त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले.

जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या अपील अर्जावर कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येत नाही. तथापि त्यांनी अपिलार्थीशी त्यांच्या प्रथम अपील अर्जासंदर्भात त्यांच्याकडील दि. ९.८.२००७ रोजीच्या पत्राद्वारे काही पत्रव्यवहार केल्याचे दिसून येते. या पत्रामध्ये त्यांनी अपिलार्थीच्या अपील अर्जावर कोणताही निश्चित अशा स्वरुपाचा निर्णय दिला नाही, मात्र अपिलार्थीस "आपण दिनांक ९.८.२००७ रोजी उपस्थीत राहीलात. अपिलीय अधिकारी यांनी आपले शंकाचे समाधान केले. तसेच आपण मागणी केलेली माहिती उपलब्ध आहे " असे वाक्य असलेले एक पत्र लिहिलेले आहे. या पत्रावर अपिलार्थीची सही असून या सहीवर त्यांनी "समाधान झाले नाही", असे त्यांचे अभिप्राय नोंदविल्याचे दिसून येते. याच दिवशी म्हणजे, दि. ९.८.२००७ रोजी त्यांनी अपिलार्थीस एकूण १८७ पृष्ठांची माहिती दिल्याचे दिसून येते. यावरुन अपिलार्थीस ही माहिती जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून दि. ९.८.२००७ रोजी प्राप्त झाल्याचे दिसून येते. जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. २७.०९.२००७ रोजी द्वितीय अपील केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी त्यांना चुकीची माहिती दिल्याचे नमूद केले असून या लॉगबुकमध्ये वाहनचालकाचे नाव व जिल्हा कृषी अधीक्षक यांच्या जीपचालकाचे नाव लिहिले नसल्याचे नमूद केले आहे. लॉगबुकच्या प्रतीमध्ये वाहनचालकाचे नाव नसल्यामुळे अपिलार्थीस ही माहिती चुकीची वाटत असल्याचे दिसून येते.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत, त्यामुळे त्यांनी आयोगाकडे दाखल केलेल्या त्यांच्या द्वितीय अपील अर्जातील त्यांचे लेखी म्हणणे हाच त्यांचा युक्तीवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थीस पुरविण्यात आलेल्या तालुका कृषि अधिकारी, हदगाव यांच्याकडील वाहन क्र MXV-६१५४ च्या लॉगबुकच्या प्रतीमध्ये वाहनचालकाचे नाव नाही. अपिलार्थीने त्यांच्या द्वितीय अपील अर्जामध्ये जिल्हा कृषि अधिकारी कार्यालयाच्या जीपच्या चालकाचे नाव मागितले तथापि त्यांना मूळ अर्जातील ही माहिती जिल्हा कृषि अधीक्षक यांच्या कार्यालयातील जन माहिती अधिकारी यांनी, न दिल्याने त्यांना अपिलार्थीस ही माहिती पुरवता आली नाही.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की,अपिलार्थीने जी माहिती त्यांच्या दि. २.६.२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितली होती, ती त्यांना सर्वसाधारण परिस्थितीत दि. १.७.२००७ रोजी अगर तत्पूर्वी, अधिनियमातील तरतुदीप्रमाणे प्राप्त होणे,अभिप्रेत होते. जन माहिती अधिकारी यांच्या म्हणण्याप्रमाणे अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्या कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील संबंधित तालुका कृषि अधिकारी यांच्या वाहनाशी संबंधित होती. शासकीय वाहनाचे लॉगबुक हे सर्वसाधारणपणे त्या वाहनातच ठेवले जाते व हे लॉगबुक संबंधित वाहनचालकाच्या ताब्यात असते. त्यामुळे नांदेड जिल्हयातील वेगवेगळया तालुका कृषि अधिकाऱ्यांच्या वाहनांच्या लॉगबुकच्या प्रती, संबंधित तालुका कृषि अधिकारी यांच्या वाहन चालकांच्या

ताब्यात असणार, हे उघड आहे. त्यामुळे या प्रकरणी जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी यांनी, अपिलार्थीच्या प्रथम अर्जाची प्रत सदर अर्ज त्यांना प्राप्त झाल्यापासून पाच दिवसांचे आत सर्व संबंधित तालुका कृषि अधिकारी यांच्याकडे पाठवून देऊन त्याची एक प्रत त्यांनी अपिलार्थीस देणे, अधिनियमातील कलम ६ (३)(एक) च्या तरतुदीप्रमाणे आवश्यक होते. तथापि त्यांनी अशाप्रकारची कोणतीही कार्यवाही न करता, त्यांनी स्वतः अपिलार्थीस माहिती पुरविण्यासाठी संबंधित कार्यालयाशी पत्रव्यवहार करुन त्यांच्याकडून ती माहिती प्राप्त करुन घेऊन, ती एकत्रित स्वरुपात अपिलार्थीस देण्यासाठी प्रयत्न केला.

या सर्व घटनाक्रमामध्ये अपिलार्थीस अधिनियमाद्वारे विहित केलेल्या तरतुदीपेक्षा उशिराने माहिती पुरवून देखील जन माहिती अधिकारी यांनी यापूर्वी दि. ११.७.२००७ रोजीच्या पत्राद्वारेअपिलार्थीस या माहितीपोटीचे आवश्यक ते शुल्क भरण्याचे त्यांना सूचित केले. त्यांची ही कार्यवाही अपिलार्थीस सशुल्क माहिती देण्यासाठी मुदत टळून गेल्याने, चुकीची ठरली आहे. अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केल्यानंतर त्या अपिलाच्या सुनावणीच्या दिवशी दि. ९.८.२००७ रोजी त्यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडे उपलब्ध असलेली एकूण १८७ पृष्ठांची माहिती त्यांना विनामूल्य दिली. सदर माहिती अपिलार्थीस प्राप्त झाल्याप्रित्यर्थ अपिलार्थी यांची त्यावर सही आहे. सदर माहिती अपिलार्थीस चुकीची वाटते. अपिलार्थीस सदर माहिती चुकीची वाटल्याच्या कारणावरुन त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपील अर्ज केला आहे, एका वाहनाच्या लॉगबुकमध्ये त्या वाहनाच्या चालकाचे नाव नसल्याने त्यांना ही माहिती अर्धवट वाटत आहे. माहिती अधिकार अधिनियमाच्या तरतुदीनुसार कोणत्याही अर्जदारास माहिती देणे याचा अर्थ जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती ज्या स्वरुपात उपलब्ध आहे, त्या स्वरुपात ती संबंधित अर्जदारास अधिनियमातील तरतुदीप्रमाणे देण्यासाठी निर्णय घेणे, असे सर्वसाधारणतः या प्रक्रियेमध्ये अभिप्रेत आहे. जर तालुका कृषी अधिकारी, हदगाव यांनी

त्यांच्या वाहनाच्या लॉगबुकमध्ये मूळात वाहन चालकाचे नाव लिहिले नसेल तर अर्थातच अपिलार्थीस जी माहिती प्राप्त झाली, त्या प्रतीमध्ये संबंधित वाहनाच्या वाहनचालकाचे नाव नसणार, हे उघड आहे. संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडे ज्या स्वरुपात माहिती उपलब्ध झाली, त्या स्वरुपात त्यांनी ती अपिलार्थीस दि.९.८.२००७ रोजी हस्तांतरित केली. यात जन माहिती अधिकारी यांचा काही दोष आहे, असे आयोगास वाटत नाही. माहिती अधिकार अधिनियमाद्वारे कोणत्याही अर्जदारास जर प्राप्त झालेल्या माहितीमध्ये काही त्रूटी आढळून आल्यास, त्यांचे निराकरण त्यांनी संबंधित प्राधिकरणाकडून करुन घेणे हे सर्वसाधारण परिस्थितीत अभिप्रेत आहे. त्यामुळे तालुका कृषि अधिकारी, हदगाव यांच्या वाहनावरील वाहनचालकाच्या नावाकरिता अपिलार्थी यांनी जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी यांच्याकडे विचारणा करावी अथवा या कालावधीमध्ये कुणीही वाहनचालक या वाहनावर कार्यरत नसेल तर त्याप्रमाणे जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी यांनी अपिलार्थीस कळवावे. तथापि, शासकीय वाहनाचे लॉगबुकमध्ये वाहन चालकाचे नाव नसणे, मात्र वाहन वापरले जाणे, ही अत्यंत गंभीर अनियमितता या प्रकरणी झाली आहे, असे आयोग मानतो. सबब, आयुक्त (कृषि) यांना सूचित करण्यात येते की, त्यांनी उपरोक्त प्रकरणी त्यांच्या स्तरावर सखोल चौकशी करुन अशाप्रकारच्या अनियमिततेस जे अधिकारी जबाबदार असतील त्यांच्यावर प्रचलित सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई करावी.

अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात येथे असे दिसून येते की, जरी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. ३१.७.२००७ रोजी माहिती तयार होती, असे गृहित धरले व अपिलार्थी हे त्यांच्याकडे माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी व्यक्तिशः उपस्थित झाले नाही, असे गृहित धरले तरीही सदर माहिती तयार करण्यासाठी देखील जन माहिती अधिकारी यांना एकूण २९ दिवसांचा विलंब लागल्याचे दिसून येत आहे. हा विलंब त्यांना संबंधितांकडून माहिती प्राप्त न झाल्याने लागल्याचे दिसून येत आहे. जन माहिती अधिकारी

यांना माहिती देण्यासाठी सहाय्य करणारे त्यांचे सर्व सहायक/कर्मचारी यांना देखील जन माहिती अधिकारी म्हणून समजावे, अशी माहिती अधिकार अधिनियमातील कलम ५(५) मध्ये तरतुद आहे, हे पाहता, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस विलंबाने माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना सहाय्य करणारे इतर सहायक/कर्मचारी देखील जबाबदार ठरत आहेत. शासकीय वाहनाचे लॉगबुक रोजच्या रोज पूर्णपणे भरुन अद्ययावत ठेवणे हे संबंधित अधिकाऱ्याचे प्राथमिक कर्तव्य आहे व त्यांनी तसे करणे हे अभिप्रेतही आहे. त्यामुळे ही माहिती मागितल्यानंतर विहित कालावधीत अपिलार्थीस देण्याकरिता संबंधित जन माहिती अधिकारी यांना विशेष असे कष्ट पडले नसते. थोडक्यात या विलंबाकरिता कोणतेही समर्थन असू शकत नाही, असे आयोगाचे मत आहे, सबब या प्रकरणी जन माहिती अधिकारी व अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात त्यांना सहाय्य करणारे त्यांचे सर्व सहायक अधिकारी/कर्मचारी यांनी अपिलार्थीस मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती पुरविण्याप्रित्यर्थ २९ दिवसांसाठी लावलेल्या असमर्थनीय विलंबाबद्दल त्यांना माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २०(१) च्या तरतुदीअन्वये विलंबाच्या प्रतिदिनी रु.२५०/- प्रमाणे (२९ दिवसांसाठी) एकूण रुपये रु.७२५०/- (अक्षरी रु. सात हजार दोनशे पन्नास) इतकी शास्ती लावण्यात येत आहे. संबंधित जन माहिती अधिकारी व त्यांचे या प्रकरणाशी संबंधित असलेले सहायक अधिकारी/कर्मचारी यांनी सदर शास्तीची रक्कम शासकीय कोषागारात पुढील लेखाशीर्षाखाली माहे सप्टेंबर, २००८ पासून जास्तीत जास्त पाच हप्त्यात भरावी.

**लेखाशीर्ष-“००७०-इतर प्रशासनिक सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१) ”**

जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी, नांदेड यांनी या शास्तीची कर्मचारी/अधिकारीनिहाय विभागणी हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत

करावी व यासंबंधीचा आपला अनुपालन अहवाल तद्नंतर सात दिवसांच्या आत आयोगास सादर करावा, तसेच संबंधित जन माहिती अधिकारी व त्यांचे सहकारी हे शास्तीची रक्कम नियमितपणे कोषागारात भरतील याची खात्री करावी व आपला अनुपालन अहवाल यापुढे दरमहा शास्तीची रक्कम पूर्णपणे कोषागारात भरणा होईपर्यंत आयोगास सादर करावा.

अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडे ज्या स्वरुपात माहिती उपलब्ध होती, त्या स्वरुपात त्यांना दि. ९.८.२००७ रोजी त्यांना विनामूल्य पुरविली असल्याने अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात कोणतेही आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## <u>आदेश</u>

१ अपील निकाली काढण्यात येत आहे.

२ जन माहिती अधिकारी व अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात त्यांना सहाय्य करणारे त्यांचे सर्व सहायक अधिकारी/कर्मचारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती पुरविण्याप्रित्यर्थ लावलेल्या २९ दिवसांच्या असमर्थनीय विलंबाबद्दल त्यांना माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २०(१) च्या तरतुदीअन्वये विलंबाच्या प्रतिदिनी रु.२५०/- प्रमाणे (२९ दिवसांसाठी) एकूण रुपये ७२५० (अक्षरी रुपये सात हजार दोनशे पन्नास) इतकी शास्ती लावण्यात येत आहे. सदर शास्तीचा भरणा त्यांनी वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे करावा.

३ जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी, नांदेड यांनी उपरोक्त आदेश क्र.२ प्रमाणे शास्तीची कर्मचारी/अधिकारीनिहाय विभागणी हे आदेश निर्गमित होताच सात

दिवसांच्या आत करावी व यासंबंधीचा अनुपालन अहवाल तद्नंतर सात दिवसांच्या आत आयोगास सादर करावा.

४ संबंधित जन माहिती अधिकारी व त्यांचे सहकारी हे शास्तीची रक्कम माहे सप्टेंबर, २००८ पासून नियमितपणे कोषागारात भरतील याची जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी, नांदेड यांनी खात्री करावी व आपला अनुपालन अहवाल सप्टेंबर,२००८ पासून दरमहा शास्तीच्या रकमेचा पूर्णपणे शासकीय कोषागारात भरणा होईपर्यंत, दरमहा आयोगास सादर करावा.

**औरंगाबाद**
**दिनांक : १२-०८-२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. साहेबराव तुकाराम पावडे,मगणपूरा, बिल्ले यांचा वाडा, नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा सहा.प्रशासन अधिकारी,जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी कार्यालय, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कृषि उपसंचालक, जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी कार्यालय,नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी कार्यालय,नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. जिल्हा कोषागार अधिकारी, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१४५५

निर्णय दिनांक १२-०८-२००८

१ श्री. हनुमंत गोविंदराव महाजन, : अपिलार्थी
रा. बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी : प्रतिवादी
तथा विशेष भूसंपादन अधिकारी,
जायकवाडी प्रकल्प बीड ता. जि.बीड
२ जन अपिलीय अधिकारी
तथा अपर जिल्हाधिकारी, बीड

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १२.०८.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी श्री. शंकर तुकाराम कावळे, जन माहिती अधिकारी तथा विशेष भूसंपादन अधिकारी,जायकवाडी प्रकल्प, बीड जि.बीड (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत, तर जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, बीड (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) व अपिलार्थी श्री. हनुमंत गोविंदराव महाजन (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी सर्वप्रथम त्यांचेकडील दि.०९.७.२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे कुर्ला-माळापूरी ता.बीड येथील गावतलावासाठी संपादित केलेल्या जमिनीच्या वाढीव मावेजाबद्दल जन माहिती अधिकारी

यांच्याकडे दि. २९.१.२००५ ते ०९.७.२००७ या कालावधीशी संबंधित माहिती खालीलप्रमाणे मागितली होती.

" कुर्ला-माळापुरी, ता.बीड येथील गावतलावासाठी आपल्या कार्यालयामार्फत मंजूर झालेल्या कामासाठी जमिनी संपादित करण्यात आल्या होत्या. या तलावाचे काम करण्यासाठीची यंत्रणा लघु पाटबंधारे, स्थानिक स्तर यांना आदेशित करण्यात आले होते. जमिनी संपादित झाल्यानंतर ज्या शेतकऱ्यांच्या जमिनी या तलावासाठी संपादित केलेल्या होत्या, त्या शेतकऱ्यांनी जिल्हा न्यायालय, बीड येथे एल.ए.आर.नं.३३/२००२ हे दाखल केले होते. जिल्हा न्यायालयाने त्याचा निकाल दि. २९-०१-२००५ रोजी दिलेला आहे. या बद्दल खालील माहिती द्यावी.

१) या निकालानंतर निकालाच्या नाराजीने आपण उच्च न्यायालयात अपील दाखल केलेले आहे किंवा नाही, याची माहिती द्यावी.

२) विधी व न्याय विभाग, औरंगाबाद यांनी दिलेल्या अभिप्रायाप्रमाणे त्या अभिप्रायाची अंमलबजावणी करण्यासाठी आपण जी कार्यवाही केली, त्या संदर्भातील कागदपत्रांच्या प्रती द्याव्यात.

३) या प्रकरणी जिल्हा न्यायालयाने दिलेल्या निकालाप्रमाणे १५% व्याज देणे आवश्यक आहे. आपल्या कार्यालयाने जर अपील दाखल केलेले नसेल तर आजपर्यंत ही रक्कम का दिली गेली नाही, या बद्दलची माहिती द्यावी.

४) आपल्या कार्यालयातील दिरंगाईमुळे व मा. जिल्हा न्यायालयाच्या निकालाप्रमाणे जी १५% व्याजाची रक्कम मिळणार आहे, त्यामध्ये

वाढ होत आहे व शासनास या प्रकरणात विनाकारण व्याजाचा भुर्दंड सहन करावा लागणार आहे. त्यामुळे या कृतीसाठी वरील कालावधीत आपल्या कार्यालयातील कोणकोणते कर्मचारी व अधिकारी दोषी आहेत व दिरंगाई कोणामुळे झालेली आहे, त्या सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांची नावे, पद व पत्ते इत्यादी माहिती द्यावी.

५) या प्रकरणातील कोर्टाच्या आदेशाप्रमाणे वाढीव मावेजा शेतकऱ्यांना देण्या संदर्भात आपल्या कार्यालयास नेमकी कोणती अडचण आहे, याबद्दलची माहिती देऊन ही अडचण निवारण्यासाठी आपण कोणकोणते प्रयत्न केले, या बद्दलची माहिती वरील कालावधीतील द्यावी.''

अपिलार्थी यांनी सदर माहिती शीघ्र टपालाद्वारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीमध्ये कोणताही प्रतिसाद दिल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येत नाही. जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. २७.८.२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवून जन माहिती अधिकारी यांच्यावर कलम २०(१) व २०(२) च्या तरतुदीप्रमाणे कारवाई करण्याचे व जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य माहिती देण्याचे त्यांना आदेशित करण्याची विनंती त्यांनी केली होती. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांचा निर्णय दि. १२.९.२००७ रोजी देऊन अपिलार्थीचे अपील मान्य करुन जन माहिती अधिकारी यांना

अपिलार्थीस तात्काळ विनामूल्य माहिती देण्याचे सूचित केले आहे. या आदेशामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्यावर अपिलार्थीस माहिती देण्यासाठी कोणतीही कालमर्यादा निश्चित केल्याचे आढळून येत नाही. जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित करुनही माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये १९(३) राज्य माहिती आयोगाकडे दि. २७.९.२००७ रोजी द्वितीय अपील केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी, त्यांना जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस विनामूल्य माहिती देण्याचे आदेशित करण्याची व जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २०(१) व २०(२) प्रमाणे कारवाई करण्याची आयोगास विनंती केली आहे. अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील केल्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीबरोबर एकूण तीन वेळा पत्रव्यवहार केल्याचे दिसून येत असून त्यातील दि. ११.१०.२००७ रोजीच्या प्रथम पत्राद्वारे त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयाकडे उच्च न्यायालयाकडे अपील दाखल करण्यासंबंधाने कोणताही पत्रव्यवहार झाल्याचे उपलब्ध माहिती वरुन दिसून येत नाही, असे कळविले तर दि. ५.३.२००८ व १३.३.२००८ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीने ज्या प्रकरणाशी संबंधित माहिती मागितली आहे, तिची सद्यःस्थिती कळविली आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत, त्यामुळे त्यांनी आयोगाकडे दाखल केलेल्या त्यांच्या द्वितीय अपील अर्जातील त्यांचे लेखी म्हणणे हाच त्यांचा युक्तीवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, ते या पदावर दि. ११.१०.२००७ पासून कार्यरत आहेत. त्यांच्याकडे येथे नेमणूक झाल्यापासून दोन इतर अधिकाऱ्यांच्या पदाचा अतिरिक्त कार्यभार सोपविला असून त्यांच्याकडे अपिलार्थीस माहिती देण्यासाठी पुरेसा कर्मचारीवृंद उपलब्ध नव्हता. अपिलार्थीस वेळेवर

माहिती न पुरविण्याचे कारण म्हणजे त्यांच्याकडे अपिलार्थीस माहिती देण्यासाठी आवश्यक असलेले अभिलेखे उपलब्ध नव्हते, असे त्यांनी सांगितले. अपिलार्थीने ज्या प्रकरणाशी संबंधित माहिती त्यांच्याकडे मागितली आहे, ते प्रकरण अंतिमतः पूर्ण होण्यासाठी ते प्रयत्नशील आहेत, त्यादृष्टीने त्यांनी सदर प्रस्ताव विभागीय आयुक्त कार्यालयाकडे सादर केला आहे. सदर प्रस्ताव शासनाकडून मंजूर होऊन आल्यास अपिलार्थीस योग्य ती रक्कम अदा करण्याची कार्यवाही करण्यात येईल. अपिलार्थीस माहिती देण्यासाठी लागलेला विलंब क्षमापित करावा, अशी त्यांनी आयोगास विनंती केली.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मागणी केलेल्या मूळ अर्जाची कशाप्रकारे उपेक्षा केली आहे, याचे पुरेपूर दर्शन होते. जन अपिलीय अधिकारी यांनी देखील अपिलार्थीच्या प्रथम अपीलावर निर्णय देताना- "जन माहिती अधिकारी यांना नोटीस देऊनही ते गैरहजर आहेत, त्यांचे म्हणणे सादर करण्याची संधी देऊनही त्यांच्याकडे त्यांचे लेखी म्हणणे सादर केले नाही."- असे त्यांचे निरीक्षण त्यांच्या दिनांक १२.९.२००७ रोजीच्या आदेशामध्ये नोंदविले आहे. "जन माहिती अधिकारी यांचे अशाप्रकारचे वर्तन नियमानुसार बरोबर नाही", असेही आपले अभिप्राय त्यांनी या निर्णयामध्ये नोंदविले आहेत. जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तीवादामध्ये उपस्थित केलेल्या त्यांच्या कर्मचारीवृंदाच्या उपलब्धतेविषयी कितीही अडचणी उपस्थित केल्या असल्या तरी, जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीमध्ये देणे फारसे अवघड होते, अशातील बाब येथे कोणत्याही प्रकारे संभवत नाही. अपिलार्थीच्या दि. ०९.७.२००७ रोजीच्या प्रथम अर्जाचे अवलोकन केले असता त्यामध्ये

असे दिसून येते की, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे एकूण पाच मुद्यांवर माहिती मागितली होती. त्यापैकी मुद्दा क्र. ३ व ४ मधील मुद्यांशी संबंधित अपिलार्थीने मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना देय होत नाही. कारण अपिलार्थीने मुद्दा क्र. ३ द्वारे - आजपर्यंत ही रक्कम का दिली गेली नाही.- अशी कारणवजा माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितली आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार माहिती देणे या प्रक्रियेमध्ये अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांना प्रश्न विचारणे व त्यांचे जन माहिती अधिकारी यांनी उत्तर अथवा त्यांच्या कृतीचे कारण देणे हे अभिप्रेत नाही. सदर बाब अधिनियमातील कलम २(च) मध्ये स्पष्ट केलेल्या 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येचे अवलोकन केल्यानंतर स्पष्ट होते. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ४ द्वारे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील दिरंगाईमुळे शासनाला जो व्याजाचा भुर्दंड सहन करावा लागत आहे, त्यास जबाबदार कोण होते, त्या कर्मचाऱ्यांची नावे, त्यांचे पत्ते इ.माहिती मागितली आहे. मूळात या प्रकरणी अद्यापही शासनास भुर्दंड पडला आहे किंवा कसे, निश्चित किती रकमेचा भुर्दंड पडला आहे किंवा कसे याबाबत कोणतीही स्पष्टता जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाकडे नाही. अपिलार्थीने या मुद्यावर मागितलेली माहिती पूर्णतः काल्पनिक स्वरुपाची असल्याने ती अपिलार्थीस देय ठरत नाही. त्यामुळे या मुद्यांसंदर्भात जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती प्रलंबित असणे हे कोणत्याही प्रकारे संभवत नाही. परिणामी ही माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. मात्र अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १,२ व ५ शी संबंधित माहिती जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस द्यावी लागेल. वरील परिच्छेदात उल्लेखिल्याप्रमाणे अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीशी प्रथम सकारात्मक पत्रव्यवहार दि. ५.३.२००८ रोजी व त्यानंतर दि. १३.३.२००८ रोजी केल्याचे

दिसून येते.  या पत्रव्यवहारामध्ये त्यांनी अपिलार्थीस मुद्दा क्र. ५ वगळता उर्वरित सर्व माहिती दिल्याचे दिसते. मात्र या संदर्भातील कार्यवाहीशी संदर्भित कागदपत्रे त्यांनी अपिलार्थीस दिली नसल्याचे दिसून येते. सदर पत्रव्यवहाराच्या प्रती त्यांना आता अपिलार्थीस विनामूल्य देणे भाग आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली व त्यांना देय असलेली संपूर्ण माहिती त्यांना मुद्देनिहाय व सर्व कागदपत्रांसह हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत माहिती न देऊन व मूळात सकारात्मक प्रतिसाद प्रथमतः दि. ५.३.२००८ रोजी व नंतर दि. १३.३.२००८ रोजी देऊन जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीचा भंग केल्याचे निःसंशयपणे सिध्द होत आहे. त्यांनी आपल्या अशाप्रकारच्या कृतीद्वारे अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त होण्यापासून दीर्घ कालावधीसाठी कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय वंचित ठेवले असल्याने, त्यांच्यावर उपरोक्त प्रकरणी त्यांनी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल प्रचलित सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई करण्याची शिफारस सचिव (महसूल) यांच्याकडे करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१ अपील मान्य करण्यात येत आहे.

२ जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली देय असलेली माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांचे आत विनामूल्य पुरवावी.

३ सचिव (महसूल) यांना, उपरोक्त प्रकरणात संबंधित जन माहिती अधिकारी यांनी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल प्रचलित सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : १२-०८-२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. ॲड. हनुमंत गोविंदराव महाजन, गणेश मंदिराजवळ, भाग्यनगर, बीड,ता. जि.बीड

२. जन माहिती अधिकारी तथा विशेष भूसंपादन अधिकारी, जायकवाडी प्रकल्प बीड ता.जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. सचिव (महसूल), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१४५६

निर्णय दिनांक १२-०८-२००८

| | | |
|---|---|---|
| १ श्री. सतिष जनार्दनराव आहेर,<br>रा.पैठण जि.औरंगाबाद. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी<br>तथा मुख्याधिकारी,<br>नगरपरिषद, पैठण जि.औरंगाबाद | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी<br>तथा उपआयुक्त (सा.प्र.),<br>विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद. | | |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १२.०८.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्री. सतिष जनार्दनराव आहेर (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), श्री. आशुतोष दिगंबरराव चिंचाळकर, जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगरपरिषद, पैठण जि.औरंगाबाद (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. सोमनाथ गुंजाळ, जन अपिलीय अधिकारी तथा उपआयुक्त (सा.प्र.), विभागीय आयुक्त कार्यालय,औरंगाबाद (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी सर्वप्रथम त्यांचेकडील दि. २५.०४.२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. १.४.२००६ ते ३१.३.२००७ या कालावधीतील त्यांच्या कार्यक्षेत्रातील विद्युत साहित्याचा पुरवठा व वापराबद्दल खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

" १) सन २००६-०७ या वर्षात विदयूतसाहित्य पुरवठा टेंडरची एकूण किती निविदा (कोऱ्या) वितरीत करण्यात आल्या.(२) दर भरुन आलेल्या निविदांची प्रत्येकी १ नक्कल (३) मंजूर निविदांचा आदेश (ठराव) नक्कल (४) २००६-०७ मधील न.प.ने खरेदी केलेल्या विदयूत साहीत्याचे विवरण (ऑर्डरची नक्कल) व खरेदी केलेले विदयूत साहीत्य कोठे व कसे ? (दैनंदीन लावण्यात आल्याचे विवरण नक्कल) (५) खराब विदयूत साहीत्याची नोंद नक्कल (६) विदयूत साहीत्य खरेदीपोटी अदा करण्यात आलेल्या देयकाचे दिनांक व रक्कम यांचा तपशिल."

अपिलार्थी यांनी सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीमध्ये कोणताही प्रतिसाद दिला नाही व परिणामी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त झाली नाही. माहिती प्राप्त न झाल्याने, अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. २८.०६.२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी त्यांना माहिती देण्यासाठी नाकारले, असे नमूद करुन, आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवली. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ३१.०७.२००७ रोजी सुनावणी घेऊन यासंदर्भातील आपले आदेश दि. १०.८.२००७ रोजी पारित केले. या आदेशाद्वारे त्यांनी अपिलार्थीचे अपील मान्य करुन जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ५ ची संपूर्ण माहिती सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरविण्याचे आदेशित केले.  जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून आदेश पारित होऊनही माहिती

प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. २८.०९.२००७ रोजी द्वितीय अपील केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी त्यांना अपूर्ण व दिशाभूल करणारी माहिती दिल्याचे नमूद करुन जन अपिलीय अधिकारी यांच्या देखील आदेशाचे जन माहिती अधिकारी यांनी पालन केले नसल्याचे म्हटले आहे व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, जन माहिती अधिकारी यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्या आदेशाचे पालन न केल्याने व त्यांना अद्यापही मुद्दा क्र. ५ ची माहिती प्राप्त न झाल्याने त्यांच्यावर अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे कारवाई करावी. त्यांना प्राप्त झालेल्या माहितीमधील, मुद्दा क्र. ४ नुसार प्राप्त माहितीमध्ये नगर परिषदेने खरेदी केलेले सोडियम व्हेपरचे दिवे कोठे व कसे लावले, याची माहिती त्यांना अद्यापही अप्राप्त आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र. ५ वगळता उर्वरित सर्व मुद्यांची संपूर्ण माहिती अपिलार्थीस त्यांनी दि. २७.६.२००७ रोजी विनामूल्य दिली आहे. मुद्दा क्र. ५ च्या संदर्भात माहिती त्यांच्याकडे उपलब्ध नसल्याबाबत, त्यांनी अपिलार्थीस दि. १.८.२००७ रोजी कळविले आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थीच्या दि. २८.६.२००७ रोजीच्या अपील अर्जावर दि. ३१.७.२००७ रोजी सुनावणी घेऊन या संदर्भातील आपले आदेश दि. १०.८.२००७ रोजी पारित केले व या आदेशाद्वारे त्यांनी अपिलार्थीचे अपील मान्य करुन अपिलार्थीस मुद्दा क्र. ५ शी संबंधित माहिती सात दिवसांच्या आत विनामूल्य देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना सूचित

केले. त्यांच्याकडे झालेल्या सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी ही माहिती अपिलार्थीस दोन दिवसांच्या आत पुरविण्याचे कबूल केले होते.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी येथे एकूण दोन बाबी प्रामुख्याने आयोगाच्या निदर्शनास आल्या आहेत. त्यापैकी प्रथम बाब म्हणजे अपिलार्थीचा दि. २५.४.२००७ रोजीचा अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. २९.४.२००७ रोजी प्राप्त झाला. त्यास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील विहित मुदतीत कोणताच प्रतिसाद दिला नाही. जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ३१.७.२००७ रोजी झालेल्या सुनावणीमध्ये जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने जन अपिलीय अधिकारी यांना दोन दिवसांच्या आत माहिती देण्याचे आश्वासित करुनही त्यांनी मुद्दा क्र. ५ ची माहिती अपिलार्थीस दिली नाही. या संदर्भात त्यांनी अपिलार्थीस "ही माहिती उपलब्ध नाही", एवढीच त्रोटक माहिती दिली. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. २५.४.२००७ रोजी केलेल्या अर्जामध्ये दि. १.४.२००६ ते ३१.३.२००७ या नजिकच्या कालावधीतील माहिती मागितली होती. त्यामुळे ही माहिती लगतचे आर्थिक वर्ष संपल्यानंतर सहा महिन्याच्या आत उपलब्ध नसणे, ही बाब जन माहिती अधिकारी यांच्याकडील विद्युत विभागाच्या कारभाराबद्दल आयोगाच्या मनात संशय निर्माण करीत आहे. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी पुरविलेल्या माहितीचे अवलोकन करता, असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ४ च्या संदर्भात खरेदी केलेल्या विद्युत साहित्य (सोडियम व्हेपरचे दिवे) विद्युत विभागाने कोठे व कसे लावले, याची विचारणा नगर परिषदेस केली होती. तथापि त्यांनी अपिलार्थीस सोडियम व्हेपरच्या दिव्यांबाबतची ही माहिती दिली नसल्याचे दिसून येते. तसेच अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ५ मध्ये -विद्युत विभागातील

खराब विद्युत साहित्याच्या नोंदीच्या नकलेची प्रत जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितली असता, सदर माहिती उपलब्ध नाही, असे जन माहिती अधिकारी यांनी दि. १.८.२००७ रोजी अपिलार्थीस कळविले. सदर बाब देखील आयोगास संशयास्पद वाटते. ही माहिती नगरपरिषदेच्या ज्या कर्मचाऱ्याच्या ताब्यात होती, त्यांच्यावर सरकारी कागदपत्रे गहाळ केल्याप्रकरणी आवश्यक वाटल्यास जन माहिती अधिकारी यांनी फौजदारी स्वरुपाची कारवाई करणे येथे योग्य होईल, असे आयोगाचे मत आहे. जन माहिती अधिकारी यांनी देखील आज आपल्या युक्तीवादामध्ये मुद्दा क्र. ५ ची माहिती त्यांच्याकडे उपलब्ध नाही, असे आयोगास शपथपत्राद्वारे लिहून दिले आहे. या शपथपत्राची प्रत त्यांनी अपिलार्थीस पुरवावी म्हणजे अपिलार्थीस या शपथपत्राच्या आधारे त्यांच्या वरिष्ठांकडे दाद मागणे सुकर होईल.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचा दि. २५.४.२००७ रोजीचा प्रथम माहितीचा अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. २९.४.२००७ रोजी प्राप्त झाला. त्यामुळे अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून दि. २८.५.२००७ पर्यंत प्राप्त होणे सर्वसाधारण परिस्थितीत अभिप्रेत होते. तथापि जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ही माहिती देण्यासाठी एकूण २९ दिवसांचा विलंब कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय लावल्याचे या प्रकरणी दिसून येत आहे. जन माहिती अधिकारी हे पैठण नगरपरिषदेचे मुख्याधिकारी असून त्यांनी, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे प्रत्यक्ष उपलब्ध नसल्यास, त्यांच्याकडील विद्युत विभागाकडून प्राप्त करुन घेणे भाग होते. विद्युत विभागाने त्यांच्याकडे उशिरा माहिती सादर केल्याने, त्यांना अपिलार्थीस सदर माहिती अपिलार्थीस देण्यासाठी विलंब लागला आहे, असा त्यांनी आयोगासमोर युक्तीवाद केला आहे. अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात लागलेला, हा विलंब संबंधितांकडून लागल्याचे दिसून येत आहे. जन माहिती अधिकारी यांना माहिती देण्यासाठी सहाय्य करणारे त्यांचे सर्व

सहायक/कर्मचारी यांना देखील जन माहिती अधिकारी म्हणून समजावे, अशी माहिती अधिकार अधिनियमातील कलम ५(५) मध्ये तरतुद आहे, हे पाहता, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस विलंबाने माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना सहाय्य करणारे त्यांचे सहायक/कर्मचारी देखील जबाबदार ठरत आहेत, सबब जन माहिती अधिकारी व अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात त्यांना सहाय्य करणारे त्यांचे सर्व सहायक अधिकारी/कर्मचारी यांनी अपिलार्थीस मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती पुरविण्याप्रित्यर्थ २९ दिवसांसाठी लावलेल्या असमर्थनीय विलंबाबद्दल त्यांना माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २०(१) च्या तरतुदीअन्वये विलंबाच्या प्रतिदिनी रु.२५०/- प्रमाणे (२९ दिवसांसाठी) एकूण रुपये रु.७२५०/- (अक्षरी रु. सात हजार दोनशे पन्नास) इतकी शास्ती लावण्यात येत आहे. संबंधित जन माहिती अधिकारी व त्यांचे या प्रकरणाशी संबंधित असलेले सहायक अधिकारी/कर्मचारी यांनी सदर शास्तीची रक्कम शासकीय कोषागारात पुढील लेखाशीर्षाखाली जास्तीत जास्त पाच हप्त्यात भरावी.

**लेखाशीर्ष-“००७०-इतर प्रशासनिक सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१) ”**

उपआयुक्त (सा.प्र.), विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांनी या शास्तीची कर्मचारी/अधिकारीनिहाय विभागणी हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत करावी व यासंबंधीचा आपला अनुपालन अहवाल तद्नंतर सात दिवसांच्या आत आयोगास सादर करावा, तसेच संबंधित जन माहिती अधिकारी व त्यांचे सहकारी हे शास्तीची रक्कम नियमितपणे माहे सप्टेंबर, २००८ पासून कोषागारात भरतील याची खात्री करावी व आपला अनुपालन अहवाल यापुढे दरमहा शास्तीची रक्कम पूर्णपणे कोषागारात भरणा होईपर्यंत आयोगास सादर करावा.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१ अपील मान्य करण्यात येत आहे.

२ जन माहिती अधिकारी व अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात त्यांना सहाय्य करणारे त्यांचे सर्व सहायक अधिकारी/कर्मचारी यांनी अपिलार्थीस मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती पुरविण्याप्रित्यर्थ लावलेल्या २९ दिवसांच्या असमर्थनीय विलंबाबद्दल त्यांना माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २०(१) च्या तरतुदीअन्वये विलंबाच्या प्रतिदिनी रु.२५०/- प्रमाणे (२९ दिवसांसाठी) एकूण रुपये ७२५० (अक्षरी रुपये सात हजार दोनशे पन्नास) इतकी शास्ती लावण्यात येत आहे. सदर शास्तीचा भरणा त्यांनी वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे करावा.

३ उपआयुक्त (सा.प्र.), विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांनी उपरोक्त आदेश क्र.२ प्रमाणे शास्तीची कर्मचारी/अधिकारीनिहाय विभागणी हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत करावी व यासंबंधीचा आपला अनुपालन अहवाल तद्नंतर सात दिवसांच्या आत आयोगास सादर करावा.

४ संबंधित जन माहिती अधिकारी व त्यांचे सहकारी हे शास्तीची रक्कम माहे सप्टेंबर, २००८ पासून नियमितपणे कोषागारात भरतील याची उपआयुक्त (सा.प्र.) यांनी खात्री करावी व आपला अनुपालन अहवाल ऑक्टोबर,२००८ पासून दरमहा शास्तीच्या रकमेचा शासकीय कोषागारात पूर्णपणे भरणा होईपर्यंत आयोगास सादर करावा.

**औरंगाबाद**
**दिनांक : १२-०८-२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. सतिष जनार्दनराव आहेर,मु. पो. ‘स्वयंभू’ निवास, जैनपूरा, पैठण ता.पैठण जि.औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगरपरिषद, पैठण जि. औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपआयुक्त (सा.प्र.), विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. उपकोषागार अधिकारी, पैठण, जि. औरंगाबाद

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१४५७

निर्णय दिनांक १३-०८-२००८

१ श्री. सुरेश किष्टन्ना इरपनवार, : अपिलार्थी
रा. सरस्वती विद्यामंदिर परिसर, हनुमान मंदिर जवळ, किनवट, तालुका किनवट, जिल्हा नांदेड

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी :
तथा उप अभियंता (एनआयडी), व्यवस्थापन विभाग, गोकूंदा, किनवट, तालुका किनवट, जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा उप अभियंता, एनआयडी, (व्यवस्थापन विभाग), कार्यालय, सिंचन विभाग, किनवट, तालुका किनवट, जिल्हा नांदेड

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी : कार्यकारी अभियंता, नांदेड पाटबंधारे विभाग, नांदेड
जन अपिलीय अधिकारी : अधीक्षक अभियंता, नांदेड पाटबंधारे मंडळ, नांदेड

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १३-०८-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस श्री. राजेंद्र नामदेवराव वानखेडे, उपविभागीय

अधिकारी, ल. पा. व्यवस्थापन विभाग, किनवट, जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, नांदेड पाटबंधारे विभाग, नांदेड यांचे प्रतिनिधी (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत तर अपिलार्थी श्री. सुरेश किष्टन्ना इरपनवार व जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, नांदेड पाटबंधारे मंडळ, नांदेड हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने सर्वप्रथम त्यांच्याकडील दिनांक ११-०५-२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे सन २००५ ते २००७ या कालावधी-तील त्यांच्या कार्यालयांतर्गत झालेल्या कामाची तलावनिहाय माहिती खालीलप्रमाणे मागितली होती.

> “ किनवट व माहुर तालुका अंतर्गत असलेल्या आपल्या अधिनिस्त कार्यालया अंतर्गत तलावाची तालुका निहाय माहिती तसेच प्रतितलाव दुरुस्ती व सदर तलावा, अंतर्गत येणा-या कॅनल दुरुस्तींची विवरणयुक्त कामकाज व कार्यालया अंतर्गत केले असले काम तर त्या कामाचे विवरण ठेकेदारा मार्फत काम केले असले त्या ठेकेदाराचे नांव व कामांचा तपशिल व कामाचा देयके याचे माहिती मिळणे बाबत.”

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिश: अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीमध्ये कोणत्याही प्रकारचा प्रतिसाद दिल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येत नाही.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार, पुन्हा जन

माहिती अधिकारी यांच्याकडेच दिनांक ०३-०७-२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जामध्ये त्यांनी, आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येते.

अपिलार्थीने सदर अपील जन माहिती अधिकारी यांच्याकडेच केल्याचे दिसून येते. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर सुनावणी झाली किंवा कसे हे कळण्यास आवश्यक त्या कागदपत्रांच्या अनुपलब्धतेमुळे काहीही मार्ग नाही, मात्र जन माहिती अधिकारी यांच्या उपस्थित प्रतिनिधीने यासंदर्भात अपिलार्थीस दिनांक १२-०७-२००७ व दिनांक ०७-११-२००७ रोजी दिलेली कथित माहिती आयोगास दाखविली. यावरुन अपिलार्थीच्या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी अथवा कोणताही निर्णय न घेता जन माहिती अधिकारी व उप अभियंता यांच्या दोन वेगवेगळ्या कार्यालयां-मार्फत माहिती पुरविण्याचा प्रयत्न केल्याचे दिसून येत आहे.

अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून त्यांना कोणत्याही प्रकारे निर्णय प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये, राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०१-०९-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी, आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येते.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. त्यामुळे त्यांनी, आयोगाकडे सादर केलेल्या व्दितीय अपील अर्जामधील त्यांचे लेखी म्हणणे हाच त्यांचा युक्तिवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जामध्ये व्यक्तिशः माहितीची मागणी केली होती, त्याप्रमाणे ते त्यांच्या कार्यालयात एक दोनदा येऊन गेले. अपिलार्थीस माहिती देण्यासाठी विलंब लागल्याचे त्यांनी मान्य केले. त्यांनी अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेली माहिती

दिनांक १२-०७-२००७ व ०७-११-२००७ रोजीच्या पत्रान्वये दिली असून यासंदर्भात त्यांनी अपिलार्थीची घेतलेली पोचसही आयोगास दाखविली.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ११-०५-२००७ रोजीच्या अर्जामध्ये मागणी केलेली माहिती सर्वसाधारण परिस्थितीमध्ये त्यांना दिनांक १०-०६-२००७ रोजी अगर तत्पूर्वी प्राप्त होणे अधिनियमातील तरतुदीप्रमाणे आवश्यक होते. तथापि अपिलार्थीच्या प्रथम अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी त्यांना प्रथम प्रतिसाद दिला तोच मुळात दिनांक १२-०७-२००७ रोजी, म्हणजेच अंदाजे १ महिना इतक्या विलंबाने व अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०३-०७-२००७ रोजी प्रथम अपील केल्यानंतर. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती फार क्लिष्ट होती अथवा ती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना त्यांच्या कार्यालयाची साधनसामुग्री प्रमाणाबाहेर वळवावी लागत होती अशातली बाब या प्रकरणी संभवत नाही. जन माहिती अधिकारी यांचे कार्यालय हे क्षेत्रीय कार्यालय असून त्यांचे कार्यालय सिंचन व्यवस्थापनाचे प्रमुख काम करत असते. कोणत्याही कामाच्या व्यवस्थापनाशी संबंधीत अशा प्रकारची जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीने विचारलेली माहिती, जन माहिती अधिकारी यांच्याकडे सहज उपलब्ध असणे हे चांगल्या व्यवस्थापन प्रक्रियेमध्ये अभिप्रेत आहे, त्यामुळे अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीमध्ये त्यांना न देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांच्याकडे कोणतेही समर्थनीय कारण असू शकत नाही. जन माहिती अधिकारी यांच्या उपस्थित प्रतिनिधीने अपिलार्थीस विलंबाने माहिती दिल्याचे मान्य केले, व ही माहिती घेण्यासाठी अपिलार्थी हे व्यक्तिशः एक दोन वेळेस त्यांच्या कार्यालयात आल्याचे मान्य केले आहे हे पाहता, अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती मिळण्यासाठी

संबंधित जन माहिती अधिकारी हे नि:संशयपणे जबाबदार ठरत आहेत, असे आयोगाचे मत आहे. जन माहिती अधिकारी यांना कोणत्याही अर्जदाराने मागितलेली माहिती देण्यासाठी त्यांचे इतर जे सहाय्यक व कर्मचारी जबाबदार आहेत त्यांना देखिल जन माहिती अधिकारी म्हणून समजावे अशी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ५ (५) मध्ये तरतूद आहे हे पाहता, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस आवश्यक ती माहिती विहित मुदतीत प्राप्त होण्यापासून वंचित ठेवण्यासाठी संबंधित जन माहिती अधिकारी व अपिलार्थीस माहिती देण्यासाठी त्यांना सहाय्य करणारे त्यांच्या कार्यालयातील सर्व सहाय्यक व कर्मचारी हे एकत्रितरित्या जबाबदार ठरत आहेत. उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी एकूण ३१ दिवासांचा असमर्थनीय विलंब लावल्याचे येथे दिसून येत आहे. त्यांच्या या अशा प्रकारच्या कृतीव्दारे त्यांनी अधिनियमाच्या कलम २० मधील तरतुदीस स्वत:ला पात्र ठरविले आहे, असे आयोगाचे मत आहे.

सबब संबंधीत जन माहिती अधिकारी व अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जबाबदार असणारे त्यांचे सर्व सहाय्यक / कर्मचारी यांनी उपरोक्त प्रकरणी कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती देण्यासाठी लावलेल्या विलंबाबाबत विलंबाच्या प्रतिदिनी रुपये २५० /- प्रमाणे एकूण रुपये ७,७५० /- (अक्षरी- रुपये सात हजार सातशे पन्नास) इतकी शास्ती लावण्यात येत आहे.

सदर शास्तीचा भरणा जन माहिती अधिकारी व त्यांचे सहकारी यांनी शासकीय कोषागारात लेखा शिर्ष संकेतांक - ००७०-इतर प्रशासनिक सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१) - या लेखाशीर्षाखाली जास्तीत जास्त पाच हप्त्यात करावा.

सदर शास्तीची कर्मचारीनिहाय विभागणी अधीक्षक अभियंता, नांदेड पाटबंधारे मंडळ, नांदेड यांनी हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत करावी व संबंधीत

अधिकारी / कर्मचारी हे सदर शास्तीचा भरणा नियमीतपणे सप्टेंबर २००८ पासून शासकीय कोषागारात करतील असे पहावे व आपला यासंदर्भातील अनुपालन अहवाल ऑक्टोबर २००८ पासून पुढे दरमहा, सदर शास्तीची रक्कम शासकीय कोषागारात पूर्णपणे भरुन होईपर्यंत आयोगास सादर करावा.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन माहिती देण्यासंदर्भात असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस प्रथमतः थोडी माहिती त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केल्यानंतर दिली व उर्वरित माहिती त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केल्यानंतर दिल्याचे दिसून येते. तसेच त्यांनी अपिलार्थीस दिनांक १२-०७-२००७ रोजी दिलेल्या माहितीचे अवलोकन करता, सदर माहिती कोणीही वाचू शकणार नाही इतपत अस्पष्ट असल्याचे दिसून येते. अपिलार्थीस पुरविण्यात आलेल्या माहितीमध्ये जन माहिती अधिकारी यांनी संबंधित तलाव ज्या तालुक्यात आहे त्या तालुक्याचे नांव व सदर तलावावर झालेला खर्च याची माहिती त्यांना दिल्याचे दिसून येत नाही, ही माहिती त्यांनी आता अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. संबंधीत जन माहिती अधिकारी व अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जबाबदार असणारे त्यांचे सर्व सहाय्यक / कर्मचारी यांना उपरोक्त प्रकरणी कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती

देण्यासाठी लावलेल्या विलंबाबाबत विलंबाच्या प्रतिदिनी रुपये २५० /- प्रमाणे एकूण रुपये ७,७५० /- (अक्षरी- रुपये सात हजार सातशे पन्नास) इतकी शास्ती लावण्यात येत आहे. सदरील शास्तीचा भरणा त्यांनी वरील निर्णयामध्ये दिलेल्या सुचनेप्रमाणे करावा.

३. अधीक्षक अभियंता, नांदेड पाटबंधारे मंडळ, नांदेड यांनी वरील आदेश क्रमांक क्रमांक २ चे पालन होईल असे पहावे.

४. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेल्या माहितीमध्ये संबंधित तलावांच्या तालुक्याचे नाव व कामावरील खर्च दिलेला नाही. सदर माहिती त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

औरंगाबाद
दिनांक १३-०८-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. सुरेश किष्टन्ना इरपनवार, रा. सरस्वती विद्यामंदिर परिसर, हनुमान मंदिर जवळ, किनवट, तालुका किनवट, जिल्हा नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, नांदेड पाटबंधारे विभाग, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, नांदेड पाटबंधारे मंडळ, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जिल्हा कोषागार अधिकारी, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१४५८

निर्णय दिनांक १३-०८-२००८

१ श्री. संजय लक्ष्मण पोकळे, : अपिलार्थी
मु. पो. बेलगाव, तालुका आष्टी,
जिल्हा नांदेड

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी :
तथा समाजकल्याण अधिकारी,
जिल्हा परिषद, बीड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा समाजकल्याण अधिकारी,
जिल्हा परिषद, बीड

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी : मुख्याध्यापक, छत्रपती शाहु महाराज निवासी अपंग माध्यमिक विद्यालय, आष्टी, जिल्हा बीड

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १३-०८-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. संजय लक्ष्मण पोकळे (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), ॲडव्होकेट श्री. ए. डी. अघाव, जन माहिती अधिकारी

तथा मुख्याध्यापक, छत्रपती शाहु महाराज निवासी अपंग माध्यमिक विद्यालय, आष्टी यांचे प्रतिनिधी (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. उमेश मल्हारराव घुले, जन अपिलीय अधिकारी तथा समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, बीड (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने सर्वप्रथम त्यांच्याकडील दिनांक २५-०१-२००७ रोजीच्या अर्जान्वये, जन माहिती अधिकारी यांच्याकडे छत्रपती शाहु महाराज अपंग पुनर्वसन संस्था, आष्टी संचलित छत्रपती शाहु महाराज निवासी अपंग विद्यालय, आष्टी संदर्भात खालीलप्रमाणे माहितीची मागणी केली होती.

"१. छत्रपती शाहु महाराज अपंग पुर्नवसन संस्था आष्टी संचालित छत्रपती शाहु महाराज निवासी अपंग विद्यालय आष्टी ता. आष्टी जि. बीड या शाळेतील सर्व कर्मचा-यांची सह्या केलेल्या रजिस्टरची स. नं. १९९५ ते १९९८ या पर्यंतच्या झेरॉक्स देणे बाबत. (कालावधी ३० दिवसाच्या आत)

२. छत्रपती शाहु महाराज निवासी अपंग विद्यालयातील कर्मचारी (१) खिल्लारी दिलीप धोडीबा या कर्मचारी (नि. सौ. अधिकरी) फिजीओथेरपी च्या प्रमाणपत्राची झेरॉक्स प्रत व कोणत्या साली फिजीओथेरपी केली त्यांची माहीती देणे बाबत तसेच श्री. खिल्लारी दिलीप धोडिबा या कर्मचा-याचे शिक्षण किती व कोणत्या साली झाले याची माहीती देणे बाबत."

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०९-०२-२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक ती माहिती पुरविली. सदर पत्र त्यांनी अपिलार्थीस दिनांक १५-०२-२००७ रोजी पाठविल्याचे दिसून येते. या पत्रामध्ये त्यांनी अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये २६२

त्यांच्या कार्यालयात जमा करण्याचे सूचित केले असून कर्मचा-यांच्या हजेरीपत्रकाच्या प्रती सोडून इतर मुद्दयांवरील माहिती अपिलार्थीस दिल्याचे दिसून येत आहे.

सदर शुल्क अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात दिनांक २०-०३-२००७ रोजी भरल्यानंतर त्याच दिवशी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती दिल्याचे दिसून येते. तथापि या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १८-०४-२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जामध्ये त्यांनी, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना, चुकीची व दिशाभूल करणारी माहिती दिली असल्याचे नमूद करुन, जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या सहीचे मूळ रेकॉर्ड नष्ट केल्याचे म्हटले आहे.

अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ३१-०५-२००७ रोजी सुनावणी घेऊन यासंदर्भातील आपले आदेश दिनांक ०१-०६-२००७ रोजी पारित केले. अपिलार्थीच्या या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही ठोस निर्णय न देता, सकृतदर्शनी अपिलार्थीने त्यांना दाखविलेली माहिती व माहितीचे रेकॉर्ड बनावट व खोटे असल्याचे दिसून येते व जन माहिती अधिकारी यांनी त्यांना, प्रथमतः दिलेली माहिती बरोबर वाटते, एवढेच आपले अभिप्राय नोंदविले आहेत. जन अपिलीय अधिकारी यांनी काढलेल्या अशा प्रकारच्या निष्कर्षावरुन अपिलार्थीचे प्रथम अपील त्यांनी फेटाळून लावल्याचे अनुमान काढण्यास हरकत नसावी.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये, राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २१-०६-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्यावर, या संपूर्ण घटनाक्रमातील त्यांच्या

वर्तनाबाबत आक्षेप घेऊन, त्यांच्यावर अधिनियमातील कलम २० (१) व २० (२) नुसार कारवाई करण्याची व त्यांना अपिलार्थीस विनामूल्य माहिती देण्याचे आदेशित करण्याची, आयोगास विनंती केली आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, ते १९९५ ते १९९८ या कालावधीमध्ये या संस्थेमध्ये भांडारपाल या पदावर कार्यरत होते. या संस्थेमध्ये ते भांडारपाल म्हणून कार्यरत असतांना, त्यांनी संस्थेच्या हजेरीपटावर नियमितपणे सह्या केलेल्या आहेत, मात्र त्यांच्या सेवासमाप्तीपूर्वीच्या सहा महिन्याच्या कालावधीमध्ये त्यांना, संबंधित शाळेच्या व्यवस्थापनाने हजेरपटावर सह्या करण्यास मज्जाव केला. सदर हजेरीपटावर त्यांचे नांव असून, त्यांना सह्या करण्यास मज्जाव करण्यात आल्याने त्यांनी यावर या कालावधीमध्ये सह्या केल्या नाहीत. आता या संस्थेमध्ये कार्यरत असल्याबाबतचा पुरावा म्हणून त्यांनी, दिनांक १५-०८-१९९६, २२-१०-१९९६, २६-०१-१९९७ व दिनांक ३१-०१-१९९७ रोजी शाळेच्या मुख्याध्यापकाने अपिलार्थीस उद्देशून काढलेल्या नोटीसा व परिपत्रकाच्या झेरॉक्स प्रती आयोगाकडे सादर केल्या आहेत. संबधित मुख्याध्यापकाने त्यांच्या सह्या असलेले सन १९९५ ते १९९८ या सालचे हजेरीपट बदलले असून त्यांना आता देण्यात आलेल्या माहितीमधील दिलेले हजेरीपट बनावट आहेत असे त्यांचे म्हणणे आहे, त्यामुळे त्यांच्या सह्या असलेल्या हजेरीपटाच्या प्रती त्यांना मिळाव्यात, अशी त्यांनी त्यांच्या युक्तिवादाच्या शेवटी आयोगास विनंती केली.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीतर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी अपिलार्थीस दिनांक २०-०३-२००७ रोजी दिलेली माहिती त्यांच्याकडील उपलब्ध अभिलेख्यावरुन दिली असून, अपिलार्थीस याबाबत काही शंका असल्यास ते संबंधित अभिलेख्याच्या मूळ प्रती अपिलार्थीस दाखविण्यास तयार आहेत.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीच्या अपिलावर निर्णय देतांना ते या पदावर कार्यरत नव्हते, तरीही त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या अपिलावर तत्कालीन जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय दिलेल्या आदेशामध्ये, संदर्भित केलेली कागदपत्रे त्यांनी तपासली असता, त्यांना ती बनावट आढळली नाहीत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीच्या या प्रकरणामध्ये संबंधित जन माहिती अधिकारी यांनी, त्यांनी मागितलेली मूळ माहिती नष्ट केली आहे. त्यांच्या मते ते या संस्थेमध्ये सन १९९५ ते १९९८ या सालामध्ये कार्यरत होते. त्यांचा हा मुद्दा सिध्द करण्यासाठी त्यांनी संस्थेकडून त्यांना मुख्याध्याकाकडून वेळोवेळी देण्यात आलेल्या कागदपत्रांच्या झेरॉक्स प्रती दाखविल्या, तथापि सदर झेरॉक्स प्रतींचे अवलोकन करता, या झेरॉक्स प्रती सत्यप्रती असल्याबाबत साक्षांकीत केल्या गेल्याचे दिसून येत नाही, त्यामुळे अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे ते या संस्थेमध्ये कामाला होते याप्रीत्यर्थ दाखल केलेला पुरावा, आयोगास ग्राह्य धरता येणार नाही. अपिलार्थीने त्यांच्या युक्तिवादामध्ये असेही म्हटले आहे की, १९९८ साली त्यांना सदर संस्थेने सेवेतून काढण्यापूर्वी सहा महिने त्यांना हजेरीपत्रकावर सह्या करण्यास, त्यांचे नाव हजेरीपत्रकात असूनही मज्जाव करण्यात आला. या त्यांच्या विधानाबाबत त्यांनी कोठलाही पुरावा आयोगासमोर सादर केलेला नाही. अपिलार्थीकडील त्यांनी आयोगास दाखविलेल्या झेरॉक्स प्रतीचे अवलोकन करता त्या, अपिलार्थी या संस्थेमध्ये कामाला होते, त्यांनी सदर हजेरीपत्रकावर सह्या केल्या होत्या हे सिध्द करण्याइतपत ठोस पुरावा आहेत, असे म्हणता येणार नाही हे पाहता अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील फेटाळण्यायोग्य आहे, या निष्कर्षाप्रत आयोग आला आहे.

या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने सदर संस्थेवर माहिती व जुने अभिलेखे नष्ट केल्याचा गंभीर आरोप केला आहे, या आरोपास अनुसरुन आयुक्त, अपंग कल्याण आयुक्तालय, पुणे यांना असे सूचित करण्यात येते की, त्यांनी छत्रपती शाहु महाराज अपंग पुनर्वसन संस्था, आष्टी, जिल्हा बीड, या संस्थेच्या अभिलेख्यांची, सह संचालक, अपंग कल्याण या पदाहून कमी दर्जाचे पद नसलेल्या अधिका-याकडून, अपिलार्थीने केलेल्या तक्रारीसंदर्भात सखोल चौकशी हे आदेश निर्गमित होताच ३ महिन्याच्या आत करावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील फेटाळण्यात येऊन खालील प्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

<u>आदेश</u>

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद
दिनांक १३-०८-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. संजय लक्ष्मण पोकळे, मु. पो. बेलगाव, तालुका आष्टी, जिल्हा नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, छत्रपती शाहु महाराज निवासी अपंग माध्यमिक विद्यालय, आष्टी, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा जन अपिलीय अधिकारी तथा समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ आयुक्त, अपंग कल्याण आयुक्तालय, श्री चर्च पथ, महाराष्ट्र राज्य, पुणे – ०१ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१४६०

निर्णय दिनांक १३-०८-२००८

१ श्री. भालचंद्र माधवराव बंडे, : अपिलार्थी
जिल्हा कार्याध्यक्ष, भ्रष्टाचार विरोधी जन
आंदोलन, नांदेड, व्दारा- व्हाईट हाऊस
टेलर्स, मेन रोड, मुखेड, जिल्हा नांदेड

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी :
तथा उप दक्षता अधिकारी कार्यालय,
महाराष्टर राज्य विज वितरण कं. मर्या.
विद्युत भवन, नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा डायरेक्टर ऑफ व्हिजीलंस, महाराष्ट्र
राज्य विज वितरण कं. मर्या. ४ था मजला,
हाँगकाँग बँक बिल्डींग, महात्मा गांधी रोड,
फोर्ट, मुंबई

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी : उप संचालक, दक्षता, सुरक्षा व
अंमलबजावणी, पुणे परिक्षेत्र, महाराष्ट्र राज्य
विद्युत वितरण कंपनी मर्यादित, पुणे – ११

जन अपिलीय अधिकारी : विशेष पोलीस महानिरीक्षक व संचालक,
दक्षता व महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण
कंपनी मर्यादित, मुंबई

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १३-०८-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस श्री. शिवाजी शंकरराव इंदलकर, जन माहिती अधिकारी तथा उप संचालक, दक्षता, सुरक्षा व अंमलबजावणी, पुणे परिक्षेत्र, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, पुणे (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत तर अपिलार्थी श्री. भालचंद्र माधवराव बंडे व जन अपिलीय अधिकारी तथा विशेष पोलीस महानिरीक्षक व संचालक, दक्षता व महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, मुंबई हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने सर्वप्रथम त्यांच्याकडील दिनांक २३-०४-२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे श्री. नागोराव जोगदंड रा. दापडा राजा, तालुका मुखेड व त्यांनी स्वतः वीज कंपनीकडे कनिष्ठ अभियंता श्री. स्वामी व श्री. चव्हाण यांच्या विरोधात दाखल केलेल्या तक्रारीबाबतची कारवाई जाणून घेण्याकरिता खालीलप्रमाणे माहितीची मागणी केली होती.

“ अ) श्री. नागोराव जोगदंड ह्यांनी आपणाकडे दि. ५-१-०४, दि. ६-२-०४ व दि. १८-३-०४ रोजी तक्रार केलेली होती त्यावरुन आपण केलेल्या चौकशीच्या अहवालाची प्रत देणे.

२) अहवालावरुन केलेल्या कार्यवाहीचा तपशिल देणे.

३) चौकशी केली नसल्यास कारणे देणे.

ब) मी आपणाकडे दि. २१-१२-०६, दि. २६-१२-०६, दि. ८-३-०७ रोजी मुखेड येथे तत्कालीन कार्यरत कनिष्ठ अभियंता श्री. स्वामी व श्री. चव्हाण ह्यांचे विरोधात पुराव्यासह तक्रार दाखल केलेली होती १) त्यावरुन आपण केलेल्या कार्यवाहीचा अहवाल तपशिलवार देणे २) अहवालावरुन कार्यवाही केल्याच्या कागदपत्राची प्रत देणे ३) चौकशी चालू असेल तर त्याची माहिती देणे ४) चौकशी झाली नसेल तर कारणे देणे ५) चौकशी कधी करणार वा करणार किंवा नाही ह्याचा खूलासा करणे."

या अर्जामध्ये अर्जदाराने माहितीशी संबंधित कालावधी दिनांक ०१-०१-२००४ ते ३१-०३-२००७ असा दर्शविला आहे.

अपिलार्थीने सदर माहिती रजिस्टर्ड टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येत नाही.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०४-०६-२००७ रोजी प्रथम अपील केले.

अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतल्याचे अथवा यासंदर्भात अपिलार्थीशी कोणताही पत्रव्यवहार केल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही. या अपील अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येत आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून कोणताही निर्णय प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये, राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०१-०९-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी, जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या अर्जाची दखल घेतली नाही व जन अपिलीय अधिकारी यांनी स्मरणपत्र देऊन देखिल योग्य ती कारवाई केली नाही, असे नमूद करुन जन माहिती अधिकारी यांच्यावर दंडात्मक कारवाई आदेशित करण्याची आयोगास विनंती केली आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. त्यामुळे त्यांनी, आयोगाकडे सादर केलेल्या व्दितीय अपील अर्जामधील त्यांचे लेखी म्हणणे हाच त्यांचा युक्तिवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, उपरोक्त प्रकरणी ते स्वतः महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मध्ये उपसंचालक (दक्षता, सुरक्षा व अंमलबजावणी) या पदावर कार्यरत आहेत. अपिलार्थीने त्यांच्याकडे अर्ज करण्याअगोदर सदर प्रथम अर्ज उप दक्षता अधिकारी, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, नांदेड यांच्याकडे प्रथमतः केला होता. त्यांच्याकडून सदर अर्ज त्यांना दिनांक ०४-०६-२००७ रोजी प्रथमतः प्राप्त झाला. यानंतर अपिलार्थीस त्यांचे अधिनस्त उप दक्षता अधिकारी, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, नांदेड यांच्याकडील दिनांक १२-०७-२००७ रोजीच्या पत्रान्वये या प्रकरणाची सद्य:स्थिती (अभिप्राय) कळविली. जन माहिती अधिकारी यांच्या कथित दिनांक १२-०७-२००७ च्या पत्राचे अवलोकन करता अपिलार्थीस ही माहिती उप दक्षता अधिकारी, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, नांदेड जे या प्रकरणी जन माहिती अधिकारी नाहीत यांच्या कार्यालयाकडून दिनांक १२-०७-२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस त्यांनी याच विषयावर दिनांक २१-०३-२००७ रोजी केलेल्या वेगळ्या

अर्जासंदर्भात माहिती दिली असल्याचे दिसून येत आहे. यावरुन अपिलार्थीच्या प्रथम अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी स्वत: जन माहिती अधिकारी या नात्याने अशी कोणतीही कारवाई केली नसल्याचे सिध्द होत आहे. अपिलार्थीचा प्रथम अपील अर्ज जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्राप्त न झाल्याने जन अपिलीय अधिकारी अपिलार्थीच्या अपील अर्जावर कोणतीही कारवाई करु शकले नाहीत, असे जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर स्पष्ट केले.

अपिलार्थीने ज्या तक्रारीच्या चौकशीबाबत जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागविली होती, त्या चौकशीबाबत जन माहिती अधिकारी यांनी असे स्पष्टीकरण दिले की, अपिलार्थीने त्यांच्याकडे श्री. स्वामी व श्री. चव्हाण यांच्या विरोधात दिलेल्या तक्रारीवर त्यांच्या कार्यालयातर्फे चौकशी करण्यात आली असून या चौकशीमध्ये श्री. चव्हाण व श्री. स्वामी हे दोषी असल्याचे त्यांना आढळले आहे. श्री. चव्हाण व श्री. स्वामी यांच्यावर करावयाची पुढील कारवाई त्यांच्या कार्यालयातर्फे सध्या प्रगतीत आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने सर्वप्रथम माहितीसाठीचा अर्ज करतांना तो प्रथमत: जन माहिती अधिकारी यांच्याकडे न करता त्यांचे सहाय्यक, उप दक्षता अधिकारी, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, नांदेड यांच्याकडे केला. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ६ (३) (एक) च्या तरतुदीनुसार अपिलार्थीचा सदर अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाल्यानंतर त्यांनी तो अर्ज ज्या प्राधिकरणाशी संबंधित आहे त्यांच्याकडे पाच दिवसाच्या आत पाठवून त्या पत्राची प्रत अपिलार्थीस देणे भाग होते, तथापि त्यांनी अशा प्रकारची कोणतीही कृती न करता अपिलार्थीचा प्रथम अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक ०४-०६-२००७ रोजी म्हणजेच ४२ दिवसाच्या विलंबाने पाठवून दिल्याचे दिसून

येत आहे. जन माहिती अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीचा प्रथम अर्ज प्राप्त झाला त्यावेळी अपिलार्थीच्या तक्रार अर्जावर कोणत्याही प्रकारची कारवाई जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाने सुरु केली नव्हती, त्यामुळे संबंधित जन माहिती अधिकारी यांनी त्यावेळेस अपिलार्थीस चौकशीची सद्य:स्थिती कळविण्यास काहीही हरकत नव्हती, तथापि तसे करण्याऐवजी त्यांनी अपिलार्थीच्या तक्रारीचा निपटारा कशा प्रकारे करता येईल यादृष्टीने तदनंतर ही चौकशी करण्यास प्रारंभ केला व अंतिमत: श्री. स्वामी व श्री. चव्हाण हे दोषी असल्याचे त्यांना दिसून आले. उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस कोणत्याही प्रकारची माहिती विहित मुदतीत पुरविलेली नाही. अपिलार्थीचा दिनांक ०४-०६-२००७ रोजीचा अपील अर्ज जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे सादर केला असल्याचे अपिलार्थीच्या दिनांक १६-०७-२००७ रोजीच्या पत्रावरुन जन अपिलीय अधिकारी यांना समजले. हे पत्र जन अपिलीय अधिकारी यांना दिनांक २५-०७-२००७ रोजी प्राप्त झाल्यानंतर त्यांनी लगेच अपिलार्थीशी दूरध्वनीव्दारे संपर्क साधून त्यांचा प्रथम अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाला नसल्याचे अपिलार्थीस अवगत केले. त्यानुसार अपिलार्थीने दिनांक ०६-०८-२००७ रोजीच्या पत्रासोबत त्यांच्या अर्जाची झेरॉक्स प्रत जन अपिलीय अधिकारी यांना पाठविली. ती त्यांना दिनांक १६-०८-२००७ रोजी प्राप्त झाली. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप अवगत झाल्यानंतर जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयाने अपिलार्थीस दिनांक १४-०९-२००७ रोजीच्या त्यांच्या पत्रान्वये अपिलार्थीस त्यांच्या तक्रार अर्जाची तत्कालीन सद्य:स्थिती कळवून चौकशी पूर्ण झाल्यानंतर अपिलार्थीस अहवालाची प्रत पाठविण्यात येईल असे त्यांना आश्वासीत केले. त्यानुसार अपिलार्थीस त्यांनी या प्रकरणी झालेल्या चौकशी अहवालाच्या प्रती (एकूण पृष्ठे ३३) जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयाने त्यांच्याकडील पत्र क्रमांक १८७६ दिनांक ३०-०७-२००८ नुसार पाठविल्या आहेत.

अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक 'अ' च्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे स्पष्ट केले की, श्री. नागोराव जोगदंड यांच्या दिनांक ०५-०१-२००४, दि. ०६-०२-२००४ व दि. १८-३-०४ रोजीच्या तक्रारी त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाल्या नाहीत, त्यामुळे त्यावर पुढील कारवाई करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. त्यांच्या या म्हणण्यापृष्ठ्यर्थ त्यांनी त्यांच्या कार्यालयातील आवक रजिस्टरची नोंदवही आणली असून, यामध्ये या दिनांकास जन माहिती अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीने संदर्भित केलेले पत्र प्राप्त झाले नसल्याचे दिसून येत आहे.

अपिलार्थीने मागणी केलेल्या 'अ' व 'ब' या मुद्दयांमध्ये जन माहिती अधिकारी यांनी चौकशी केली नसेल तर त्याची कारणे देणे, चौकशी कधी करणार याचा खुलासा करणे इत्यादी प्रकारची माहिती मागविल्याचे दिसून येत आहे. सदर माहिती, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत नसल्याने व माहिती अधिकार अधिनियमाव्दारे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस खुलासा देण्याचे अभिप्रेत नसल्याने अपिलार्थीच्या 'अ' मुद्दयातील क्रमांक ३ व 'ब' मुद्दयातील क्रमांक ४ व ५ ची माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय ठरत नाही, मात्र त्यांनी केलेल्या तक्रारीवरील चौकशीचा अहवाल त्यांना देय ठरत आहे. सदर चौकशी अहवालाच्या प्रती जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक ३०-०७-२००८ रोजीच्या पत्रान्वये पाठविल्या असल्याच्या त्यांनी आयोगाकडे केलेल्या लेखी निवेदनावरुन दिसून येत आहे. उपरोक्त प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीमध्ये कोणत्याही प्रकारे प्रतिसाद न दिल्याने व त्याव्दारे स्वत:ला माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० (२) च्या तरतुदीस पात्र ठरविल्यामुळे त्यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे प्रशासकीय कारवाई करण्याची शिफारस

व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लिमिटेड, मुंबई यांच्याकडे करण्यात येत आहे. अपिलार्थीस माहिती पाठविल्याचे जन माहिती अधिकारी यांनी आयोगाकडे सादर केलेल्या त्यांच्या निवेदनामध्ये म्हटले आहे, तथापि अपिलार्थीस सदर माहिती निश्चितपणे प्राप्त झाली किंवा कसे याची जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या नांदेड येथील क्षेत्रीय अधिका-याकडून परत खात्री करावी, असे त्यांना सुचविण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालील प्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, उपरोक्त प्रकरणी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लिमिटेड, मुंबई यांना प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्यरित्या प्रशासकीय कारवाई करण्याची शिफारस आयोग करीत आहे.

३. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस जन अपिलीय अधिकारी यांच्या दिनांक ३०-०७-२००८ रोजीच्या पत्रानुसार माहिती प्राप्त झालेली आहे किंवा कसे याची पुन:श्च खात्री करुन घ्यावी.

औरंगाबाद
दिनांक १३-०८-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. भालचंद्र माधवराव बंडे, जिल्हा कार्याध्यक्ष, भ्रष्टाचार विरोधी जन आंदोलन, नांदेड, व्दारा- व्हाईट हाऊस टेलर्स, मेन रोड, मुखेड, जिल्हा नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा उप संचालक, दक्षता, सुरक्षा व अंमलबजावणी, पुणे परिक्षेत्र, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, खोली नं. ४०५/अ/ब, ३ रा मजला, रास्ता पेठ, पुणे – ११ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा विशेष पोलीस महानिरीक्षक व संचालक, दक्षता व महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, हॉगकॉग बॅक इमारत, ३ रा मजला, महात्मा गांधी मार्ग, फोर्ट, मुंबई – ४०० ००१ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लिमिटेड, प्रकाशगड, ५ वा मजला, बांद्रा (पुर्व), मुंबई – ४०० ०५१ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१४६१

निर्णय दिनांक  १३-०८-२००८

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. बस्वराज विश्वनाथ मतकट्टे, | : | अपिलार्थी |
| | व्दारा- पी. आय. मांटे निवास, | | |
| | पिपल्स बॅक कॉलनी, | | |
| | जालना | | |

विरुध्द

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी | : | |
| | गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभाग, | | |
| | मंत्रालय, मुंबई – ३२ | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी | : | प्रतिवादी |
| | गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभाग, | | |
| | मंत्रालय, मुंबई – ३२ | | |

| | | | |
|---|---|---|---|
| प्रत्यक्ष | जन माहिती अधिकारी | : | कक्ष अधिकारी (प्रशा ३), गृहनिर्माण विभाग, मंत्रालय, मुंबई – ३२ |
| | जन अपिलीय अधिकारी | : | अवर सचिव, गृहनिर्माण विभाग, मंत्रालय, मुंबई – ३२ |

**<u>निर्णय</u>**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १३-०८-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस श्री. सुरेंद्र वसंत मोरे, जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, गृहनिर्माण विभाग, मंत्रालय, मुंबई (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. संतोष हरिदास भोगले, जन अपिलीय अधिकारी तथा अवर सचिव, गृहनिर्माण विभाग, मंत्रालय, मुंबई (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत तर अपिलार्थी श्री. बस्वराज विश्वनाथ मतकट्टे हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने सर्वप्रथम त्यांच्याकडील दिनांक ०३-११-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या विभागाअंतर्गत गट "ब" पदावर शासन निर्णय दिनांक ०८-०३-१९९९ नुसार अनियमित नियुक्त्या नियमीत केल्यासंदर्भात दिनांक ०८-०३-१९९९ या कालावधीशी संबंधित खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

" १) आपल्या विभागाअंतर्गत गट "ब" पदावर शासननिर्णय ८-३-९९ नुसार अनियमीत नियुक्या नियमीत केल्या आहेत त्यांची माहिती खालीलप्रमाणे द्यावी.

| कर्मचारी नांव | सामावून घेण्यापुर्वीची माहिती द्यावी | | | | | | | सामावले नंतरची माहिती | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | पद नाम | प्रथम नियुक्ती काला वधी | जाहि रात दिली काय | लेखी परीक्षा घेतली काय | सेवे तील एकूण खंड | सामा वणे पूर्व सलग सेवा | सामा वणे पूर्व वेतन श्रेणी | सामा वलेले पद | सामाव लेनंतर वेतनश्रे णी | पहिली वेतनवाढ दिल्याची दिनांक |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ |

वरील प्रमाणे ११ मुद्देनिहाय गट ‘‘ब’’ पदावर किती कर्मचा-यांच्या अनियमित नियुक्त्या नियमीत केल्या यांची माहिती द्यावी. सदर गट ‘‘ब’’ पदे राजपत्रीत का अराजपत्रित आहेत याचीपण माहिती द्यावी. ’’

अपिलार्थीने सदर माहिती रजिस्टर्ड टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील तरतुदीनुसार कोणताही प्रतिसाद दिला नाही, त्यामुळे अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २२-०१-२००७ रोजी प्रथम अपील केले, तथापि अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतली असल्याचे, अथवा यासंदर्भात अपिलार्थीशी कोणताही पत्रव्यवहार केल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही.

जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून मिळालेल्या अशा प्रकारच्या नकारात्मक प्रतिसादाने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये, राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १८-०६-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी, आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येत आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे अनुपस्थित असल्यामुळे त्यांनी, आयोगाकडे सादर केलेल्या व्दितीय अपील अर्जामधील त्यांचे लेखी म्हणणे हाच त्यांचा युक्तिवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने सामान्य प्रशासन विभागाने पारित केलेल्या दिनांक ०८-०३-१९९९ च्या आदेशाच्या

अनुषंगाने त्यांच्या विभागाने, त्यांच्या कार्यकक्षेतील अनियमित नियुक्त्या नियमित करण्याबाबत काय कारवाई केली, याची माहिती मागितली होती, तथापि अपिलार्थीने ज्यावेळी त्यांच्याकडे माहितीची मागणी केली होती त्यावेळी संबंधित नस्ती त्यांच्याकडे उपलब्ध नसल्याने ते अपिलार्थीस कोणतीही माहिती देऊ शकले नाहीत व त्याप्रमाणे अपिलार्थीस त्यांनी त्यांच्याकडील दिनांक ०७-०७-२००७ रोजीच्या पत्राने सदर माहिती त्यांच्याकडे उपलब्ध नसल्याचे कळविले.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने प्रथम अपील करतेवेळी ते या पदावर कार्यरत नसल्यामुळे अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी का होऊ शकली नाही, याची कारणे त्यांना आता आयोगास सांगता येणार नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने मूळात जन माहिती अधिकारी यांच्याकडे सामान्य प्रशासन विभागाकडून त्यांच्या दिनांक ०८-०३-१९९९ च्या निर्णयाप्रमाणे गृहनिर्माण विभागातील ज्या ८ पदांच्या अनियमित नियुक्त्या नियमित केल्या आहेत, त्या पदावरील नियुक्त्यांसंदर्भात तपशीलवार माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्याकडील दिनांक ०३-११-२००६ रोजीच्या अर्जान्वये, म्हणजेच अंदाजे सात वर्षाचा कालावधी लोटून गेल्यानंतर मागितली होती. सदर नस्ती जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध नसल्याने ते ही माहिती अपिलार्थीस देऊ शकले नाहीत, असा युक्तिवाद त्यांनी आयोगासमोर केला, तथापि त्यांचा हा युक्तिवाद, त्यामध्ये कोणतेही समर्थन कारण आयोगास न आढळल्याने सदर युक्तिवाद आयोग अमान्य करत असून, त्यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या

दिनांक ०३-११-२००६ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी संबधित जन माहिती अधिकारी यांनी या संपूर्ण घटनाक्रमामध्ये कोणत्याही टप्प्यावर कोणत्याच प्रकारे सकारात्मक कारवाई न केल्याबद्दल त्यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात यत असून अपिलार्थीचे आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाचे आत विनामूल्य पुरवावी.

३. जन माहिती अधिकारी यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत आहे.

औरंगाबाद
दिनांक १३-०८-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. बस्वराज विश्वनाथ मतकट्टे, व्दारा- पी. आय. मांटे निवास, पिपल्स बँक कॉलनी, जालना.

२ जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, गृहनिर्माण विभाग, मंत्रालय, मुंबई – ३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अवर सचिव, गृहनिर्माण विभाग, मंत्रालय, मुंबई – ३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१४६२

निर्णय दिनांक १३-०८-२००८

१ श्री. सत्तार चांद पटेल, : अपिलार्थी
(जिल्हा उपाध्यक्ष शेतकरी संघटना),
मु. पो. भिसे वाघोली, तालुका लातूर,
जिल्हा लातूर

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी :
तथा सहाय्यक शिक्षण उपसंचालक,
शिक्षण उपसंचालक कार्यालय,
औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा शिक्षण उपसंचालक,
औरंगाबाद विभाग, औरंगाबाद

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १३-०८-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस श्री. शंकर दत्तात्रेय पडलवार, मुख्य लिपीक, जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक शिक्षण उपसंचालक, शिक्षण उपसंचालक कार्यालय, औरंगाबाद यांचे प्रतिनिधी (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व

श्री. मधुकर किसनराव देशमुख, शिक्षण उपनिरिक्षक, जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षण उपसंचालक, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांचे प्रतिनिधी (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत तर अपिलार्थी श्री. सत्तार चांद पटेल हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने सर्वप्रथम त्यांच्याकडील दिनांक ०२-०७-२००७ रोजीच्या अर्जान्वये, जन माहिती अधिकारी यांच्याकडे श्री. सय्यद ख्रॉजामियॉ चॉंदसाहेब यांना डॉ. जाकिर हुसेन, कनिष्ठ महाविद्यालय, परभणी येथे दिनांक ०७-०७-२००३ पासून पूर्णवेळ अरेबिक शिक्षक (शिक्षण सेवक) म्हणून मान्यता मिळण्याबाबत, याविषयासंदर्भात एकूण ६ मुद्दयांवर खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

- मुख्याध्यापक डॉ. जाकिर हुसेन कनिष्ठ महाविद्यालय, परभणी यांचे पत्र दिनांक २३/०१/२००७ अन्वये श्री. सय्यद ख्राजामियॉ हे दिनांक ०७/०७/२००३ पासून अरेबिक या विषयाचे २६ तासिकेचे अध्यापन करीत आहेत म्हणजेच ते पुर्णवेळ शिक्षक आहेत तर आपण शैक्षणिक वर्ष २००३-०४ मध्ये त्यांचे अरेबिक विषयाचे पद पुर्णवेळ म्हणून शासनाकडे का प्रस्तावित केले नाही ? अर्धवेळ पद म्हणून का प्रस्तावित केले ? याचा खुलासा सादर करणे.

- मा. शिक्षण संचालक, उच्च माध्यमिक महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र. एचएससी/पदांचा आढावा/नपवा/०३-०४/१२ एचएस/६२६२ दिनांक १५/०५/२००७ अन्वये मा. शिक्षण संचालक, उच्च माध्यमिक, पुणे यांनी श्री. सय्यद ख्रॉजामियॉं यांचे अरेबिक विषयाचे पद पुर्णवेळ म्हणून प्रस्तावित न केल्याबद्दल मागविलेल्या खुलासेची प्रत व खुलासा न सादर केल्यास प्रलंबित ठेवण्याची कारणे काय आहेत ? याची माहिती देणे.

- मा. श्री. दिलीपरावजी देशमुख आमदार विधान परिषद महाराष्ट्र राज्य, मुंबई (रा. लातूर) यांचे दिनांक २६/०६/२००७ च्या पत्रावर केलेली कार्यवाहीच्या अहवालाची प्रत व कार्यवाही अद्यापही न केल्यास त्याची कारणे व विलंबाबाबत जबाबदार व्यक्तीवर काय कार्यवाही केली. त्याची माहिती व जबाबदार व्यक्तीवर कार्यवाही न केल्यास त्याची कारणे देणे.
- मुख्याध्यापक डॉ. जाकिर हुसेन कनिष्ठ महाविद्यालय, परभणी यांने सन- २००३ पासून प्रतीवर्षी अरेबिक या विषयास ४२ तासिकेचा प्रस्ताव सादर केल्याच्या आधारे आपण दरवर्षी ४१ तासिकेस मंजूरी ही दिलेली आहे. परंतु शैक्षणिक वर्ष – २००६- ०७ च्या प्रस्तावामध्ये ४२ तासिकेचा उल्लेख असतांना देखील आपण फक्त ३७ तासिकेस मंजूरी दिलेली आहे. कोणत्या आधारे ५ तासिका कमी करण्यात आल्या याची माहिती द्यावी.
- मुख्याध्यापकाच्या प्रस्तावानुसार अरेबिक या विषयाचे श्री. एस. एस. चिश्ती एमएस्सी. गणित व एम. ए. अरेबिक बी. एड यांना ४२ पैकी १५ तासिका दर्शविलेले असल्याने संच मान्यता २००६-०७ च्या पान ४ वर उर्वरित २७ तासिका श्री. सय्यद खॉजामियाँ यांच्यानावासमोर दर्शविणे जरुरीचे असतांना देखील ते ४२ – १५ = २७ न दर्शविता फक्त आ. ता. १५/घ. ता. १० का दर्शविल्या याचा खुलासा सादर करण्यात यावा.
- आपले पत्र (संचमान्यता) जा. क्र. कमवि-१/२००६-२००७/कॅम्प/१ दिनांक १३/११/२००६ अन्वये पान ४ वर नमूद केल्याप्रमाणे श्री. सय्यद खॉजामियाँ यांना दिनांक ०७/०७/२००३ पासून रु. २५०० /- मानधनावर अर्धवेळ शिक्षण सेवक म्हणून ३ वर्षासाठी मान्यता देण्यात येवून शिक्षण

सेवकाचा कालावधी पुर्ण झाल्याने दिनांक ०७/०७/२००६ पासून अर्धवेळ शिक्षकाच्या वेतनश्रेणीत (३६१३-५५२५) मान्यता देण्यात आलेली आहे.

डॉ. जाकिर हुसेन कनिष्ठ महाविद्यालयात शैक्षणिक वर्ष २००३-२००४ मध्ये १८ पायाभूत पदे मान्य असून श्री. एस. एस. चिश्ती यांना गणिताचा अर्धवेळ कार्यभार आणि अरेबिक विषयाचा अर्धवेळ कार्यभार देण्यात येवून उर्वरित अरेबिक विषयाच्या अर्धवेळ अनुदानित पदावर श्री. सय्यद ख्वॉजामियाँ यांची नियुक्ती करण्यात आली व अर्धवेळ विना अनुदानित पद मान्यतेसाठी शासनाकडे प्रस्तावित करण्यात आला. म्हणून श्री. सय्यद ख्वॉजामियाँ यांना दिनांक ०७/०७/२००३ ते ०७/०७/२००६ (तीन वर्षे) या कालावधीचे अर्धवेळ अनुदानित शिक्षण सेवक पदाचे मानधन रु. २५०० /- प्रमाणे मंजूर करुन दिनांक ०७/०७/२००६ रोजी शिक्षण सेवकाचा कालावधी पुर्ण झाल्याने दिनांक ०७/०७/२००६ ते ३१/०८/२००६ (एक महिना २४ दिवस) या कालावधीचे अर्धवेळ शिक्षकाच्या वेतन श्रेणीत (३६१३-५५२५) मान्यता देऊन शासनाच्या तरतुदीनुसार सप्टेंबर २००६ पासून पुर्णवेळ शिक्षकाच्या वेतनश्रेणीत (७२२५-११०५०) मान्यता देणे जरुरीचे असतांना देखील श्री. सय्यद ख्वॉजामियाँ यांना फक्त ०७/०७/२००६ पासून (३६१३-५५२५) वेतन श्रेणीत मान्यता का देण्यात आली ? बारकाईने पाहणी करुन कृपया सविस्तर माहिती देणे."

अपिलार्थीने सदर माहिती रजिस्टर्ड टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १३-०७-२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस पूर्णतः माहिती पुरविल्याचे दिसून येत आहे, तथापि अपिलार्थीचे जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या

माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार, जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २४-०७-२००७ रोजी प्रथम अपील केले.

या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ३०-०८-२००७ रोजी सुनावणी घेऊन यासंदर्भातील आपले आदेश दिनांक ३०-०८-२००७ रोजी पारित केले आहेत. या आदेशामध्ये त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जासंदर्भात आवश्यक तो खुलासा केला आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये, राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २८-०९-२००७ रोजी व्दितीय अपील केले. या अपील अर्जामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी चुकीची माहिती दिली व जन अपिलीय अधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांच्या चुकीच्या माहितीवर खोटे शिक्कामोर्तब केल्याने जन माहिती अधिकारी यांच्यावर शास्तीची कारवाई व जन अपिलीय अधिकारी यांचे वेतन रोखण्याचे आदेशित करण्याची तसेच श्री. सय्यद ख्रॉजामियाँ यांना त्यांचा पूर्णवेळ शिक्षकाचा हक्क मिळवून देण्याचे आदेश करण्याची आयोगास विनंती केली आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. त्यामुळे त्यांनी, आयोगाकडे सादर केलेल्या व्दितीय अपील अर्जामधील त्यांचे लेखी म्हणणे हाच त्यांचा युक्तिवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने दिनांक ०२-०७-२००७ रोजीच्या केलेल्या अर्जास त्यांनी दिनांक १३-०७-२००७ रोजी प्रतिसाद देऊन त्यांना आवश्यक ती माहिती पुरविली आहे, तसेच जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीने प्रथम अपील केल्यानंतर त्यावरील निर्णय देतांना देखिल जन

अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक ३०-०८-२००७ रोजीच्या निर्णयामध्ये आवश्यक ते स्पष्टीकरण दिलेले आहे. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये ज्या ज्या कागदपत्रांच्या प्रतींची मागणी केली होती, त्या त्या सर्व कागदपत्रांच्या प्रती त्यांना पुरविण्यात आल्या आहेत. अपिलार्थीने संदर्भ दिलेली व्यक्ती ही डॉ. जाकिर हुसेन कनिष्ठ महाविद्यालय, परभणी येथे अर्धवेळ शिक्षक म्हणून कार्यरत असून त्यांना पूर्णवेळ शिक्षक म्हणून नेमणूक हवी असल्याने त्यांनी अशा प्रकारची माहिती, त्यांच्या गा-हाण्याच्या निपटाराप्रित्यर्थ, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांच्याकडे मागण्याची व्यवस्था केली.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ०२-०७-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडून मागितलेली या अर्जातील मुद्दा क्रमांक २ व ३ चा अंशतः भाग वगळता, उर्वरित सर्व माहिती त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडून खुलासे अपेक्षित करणारी अशी मागितली आहे. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) मध्ये "माहिती" या शब्दाची व्याख्या खालीलप्रमाणे स्पष्ट करण्यात आली आहे.

**कलम २ (च)**

" "माहिती" याचा अर्थ, कोणत्याही स्वरुपातील कोणतेही साहित्य असा असून त्यामध्ये, अभिलेख, दस्तऐवज, ज्ञापने, ई-मेल, अभिप्राय, सूचना, प्रसिध्दिपत्रके, परिपत्रके, आदेश, रोजवह्या, संविदा, अहवाल, कागदपत्रे, नमुने, प्रतिमाने (मॉडेल), कोणत्याही इलेक्ट्रॉनिक स्वरुपातील आधारसामग्री आणि त्या त्या वेळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यान्वये सार्वजनिक प्राधिकरणास मिळविता येईल अशी कोणत्याही खाजगी निकायाशी संबंधित माहिती, यांचा समावेश होतो. "

माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार कोणत्याही अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्रश्नार्थक स्वरुपात माहितीची मागणी करणे, त्यांच्याकडून निर्णयाबद्दल खुलासे अपेक्षित करणे व कोणताही निर्णय व घेतलेल्या निर्णयाबाबत जन माहिती अधिकारी यांनी अर्जदारास खुलासा देणे, स्पष्टीकरण देणे अशा प्रकारच्या प्रक्रिया अभिप्रेत नाहीत. माहिती अधिकार अधिनियमामध्ये जन माहिती अधिकारी यांची भूमिका ही एका विश्वस्ताची असून, त्यांच्याकडे ज्या स्वरुपात माहिती उपलब्ध आहे ती माहिती अर्जदारांना वेळोवेळी मागणी केल्यानंतर त्यांना देण्यासंदर्भात निर्णय घेणे अशा प्रकारची कृती त्यांच्याकडून माहिती अधिकार अधिनियमामध्ये मूलतः अभिप्रेत आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या दिनांक १३-०७-२००७ रोजीच्या पत्राव्दारे दिलेली माहिती पाहता, ही माहिती अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी सुसंगत असल्याचे दिसून येत आहे, तसेच या माहितीबरोबर त्यांनी अपिलार्थीने मागणी केलेल्या कागदपत्रांच्या प्रती त्यांना पुरविल्या आहेत हे पाहता, जन माहिती अधिकारी यांनी त्यांचे कर्तव्य पार पाडल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील अर्ज करतांना वेगवेगळ्या शंका उपस्थित केल्या आहेत. त्यांचे देखिल जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक ३१-०८-२००७ रोजीच्या अपील निर्णयामध्ये योग्य प्रकारे निरसन करण्याचा प्रयत्न केला आहे हे पाहता, व विशेषतः अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपिलातील, अपिलार्थीने निर्देशित केलेले श्री. सय्यद ख्रॉजामियॉं यांना पूर्णवेळ नेमणूक हवी आहे, याबाबत संबंधित विभागाच्या प्रशासकीय अधिकारात हस्तक्षेप करण्याची अधिकारिता आयोगास नसल्यामुळे या मुद्दयावर आयोगास कोणतीही कारवाई करता येणार नाही. मूळात अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे केलेल्या मूळ माहितीच्या अर्जाचे चुकीचे स्वरुप, जन माहिती अधिकारी यांनी

अपिलार्थीस विहित मुदतीत दिलेली सुसंगत माहिती व आयोगाच्या अधिकारतेची कक्षा लक्षात घेता अपिलार्थीचे अपील फेटाळण्यायोग्य आहे, या निष्कर्षाप्रत आयोग आला आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील फेटाळण्यात येऊन खालील प्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद
दिनांक १३-०८-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. सत्तार चांद पटेल, (जिल्हा उपाध्यक्ष शेतकरी संघटना), मु. पो. भिसे वाघोली, तालुका लातूर, जिल्हा लातूर.

२ जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक शिक्षण उपसंचालक, शिक्षण उपसंचालक कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षण उपसंचालक, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपीले**

**अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१५४८,१५४९,१५५०,१५५१,१५५२,१५५३, १५५४,१५५५ ,१५५६,१५५७ व १५५८**

निर्णय दिनांक १४-०८-२००८

१ श्री.मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ : **अपिलार्थी**

रा. नांदेड

**विरुध्द**

**१ (अपील क्रमांक १५४८)**

| | | | |
|---|---|---|---|
| जन माहिती अधिकारी,<br>जिल्हा पुरवठा अधिकारी कार्यालय,<br>उस्मानाबाद | जन अपिलीय अधिकारी<br>तथा अपर जिल्हाधिकारी,<br>उस्मानाबाद | : | **प्रतिवादी** |

**प्रत्यक्ष** जन माहिती अधिकारीः जिल्हा पुरवठा अधिकारी,उस्मानाबाद

**२ (अपील क्रमांक १५४९)**

| | | | |
|---|---|---|---|
| जन माहिती अधिकारी<br>जिल्हा पुरवठा अधिकारी कार्यालय,<br>लातूर | जन अपिलीय अधिकारी<br>तथा जिल्हा पुरवठा अधिकारी,<br>लातूर | : | **प्रतिवादी** |

**प्रत्यक्ष** जन माहिती अधिकारीः जिल्हा पुरवठा अधिकारी, लातूर

जन अपिलीय अधिकारीः अपर जिल्हाधिकारी, लातूर

**३ (अपील क्रमांक १५५०)**

| | | | |
|---|---|---|---|
| जन माहिती अधिकारी<br>जिल्हा पुरवठा अधिकारी कार्यालय,<br>बीड | जन अपिलीय अधिकारी<br>तथा जिल्हा पुरवठा अधिकारी,<br>बीड | : | **प्रतिवादी** |

**प्रत्यक्ष** जन माहिती अधिकारीः जिल्हा पुरवठा अधिकारी, बीड

जन अपिलीय अधिकारीः अपर जिल्हाधिकारी, बीड

४ **(अपील क्रमांक १५५१)**

| | | | |
|---|---|---|---|
| जन माहिती अधिकारी<br>जिल्हा पुरवठा अधिकारी कार्यालय,<br>जालना | जन अपिलीय अधिकारी<br>तथा जिल्हा पुरवठा अधिकारी,<br>जालना | : | **प्रतिवादी** |

**प्रत्यक्ष** जन माहिती अधिकारीः जिल्हा पुरवठा अधिकारी, जालना

जन अपिलीय अधिकारीः अपर जिल्हाधिकारी, जालना

५ **(अपील क्रमांक १५५२)**

| | | | |
|---|---|---|---|
| जन माहिती अधिकारी<br>जिल्हा पुरवठा अधिकारी कार्यालय,<br>औरंगाबाद | जन अपिलीय अधिकारी<br>तथा जिल्हा पुरवठा अधिकारी,<br>औरंगाबाद | : | **प्रतिवादी** |

**प्रत्यक्ष** जन माहिती अधिकारीः जिल्हा पुरवठा अधिकारी, औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारीः अपर जिल्हाधिकारी, औरंगाबाद

६ **(अपील क्रमांक १५५३)**

| | | | |
|---|---|---|---|
| जन माहिती अधिकारी<br>तथा नायब तहसीलदार (पुरवठा),<br>तहसील कार्यालय,परभणी | जन अपिलीय अधिकारी<br>तथा तहसीलदार,<br>परभणी | : | **प्रतिवादी** |

७ **(अपील क्रमांक १५५४)**

| | | | |
|---|---|---|---|
| जन माहिती अधिकारी<br>नायब तहसीलदार (पुरवठा),<br>तहसील कार्यालय,जिंतूर,जि.परभणी | जन अपिलीय अधिकारी<br>तथा तहसीलदार, जिंतूर,<br>जि.परभणी | : | **प्रतिवादी** |

**प्रत्यक्ष** जन माहिती अधिकारीः तहसीलदार, जिंतूर

जन अपिलीय अधिकारीः उपविभागीय अधिकारी, सेलू, जि.परभणी

८ **(अपील क्रमांक १५५५)**

| | | | |
|---|---|---|---|
| जन माहिती अधिकारी<br>तथा नायब तहसीलदार (पुरवठा),<br>तहसील कार्यालय,वसमत,जि.हिंगोली | जन अपिलीय अधिकारी<br>तथा तहसीलदार,वसमत,<br>जि.हिंगोली | : | **प्रतिवादी** |

**९ (अपील क्रमांक १५५६)**

| | | | |
|---|---|---|---|
| जन माहिती अधिकारी<br>नायब तहसीलदार (पुरवठा),<br>तहसील कार्यालय,हिंगोली | जन अपिलीय अधिकारी<br>तथा तहसीलदार,<br>हिंगोली | : | **प्रतिवादी** |

**प्रत्यक्ष** जन माहिती अधिकारीः तहसीलदार, हिंगोली

**प्रत्यक्ष** जन अपिलीय अधिकारीः उपविभागीय अधिकारी, हिंगोली

**१० (अपील क्रमांक १५५७)**

| | | | |
|---|---|---|---|
| जन माहिती अधिकारी<br>नायब तहसीलदार (पुरवठा),<br>तहसील कार्यालय,उमरी,जि.नांदेड | जन अपिलीय अधिकारी<br>तथा तहसीलदार, उमरी,<br>जि.नांदेड | : | **प्रतिवादी** |

**११ (अपील क्रमांक १५५८)**

| | | | |
|---|---|---|---|
| जन माहिती अधिकारी<br>तथा नायब तहसीलदार (पुरवठा),<br>तहसील कार्यालय,मुखेड,जि.नांदेड | जन अपिलीय अधिकारी<br>तथा तहसीलदार, मुखेड,<br>जि.नांदेड | : | **प्रतिवादी** |

## निर्णय

वरील अकरा अपीलांची एकत्रित सुनावणी आज दिनांक १४.०८.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्री.मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, रा.नांदेड (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), श्री. सुभाष डहाळे, लघुलेखक, जन माहिती अधिकारी क्र. १ तथा जिल्हा पुरवठा अधिकारी (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी क्रमांक १ असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी क्र.१ तथा अपर जिल्हाधिकारी, उस्मानाबाद (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी क्रमांक १ असे संबोधण्यात येईल) यांचे प्रतिनिधी, श्री.सातप्पा गुरुपादप्पा नंजुंडे, सहायक जिल्हा पुरवठा अधिकारी, जन माहिती अधिकारी क्र.२ तथा जिल्हा पुरवठा अधिकारी, लातूर यांचे प्रतिनिधी (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी क्रमांक २ असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी क्र. २ तथा अपर जिल्हाधिकारी, लातूर ( यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी क्र. २ असे संबोधण्यात येईल) यांचे प्रतिनिधी, श्री. मोहन बालचंद कट्टे, जन माहिती अधिकारी क्र.३ तथा जिल्हा पुरवठा अधिकारी, बीड (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी क्रमांक ३ असे

संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी क्र.३ तथा अपर जिल्हाधिकारी, बीड (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी क्रमांक ३ असे संबोधण्यात येईल) यांचे प्रतिनिधी, श्री. आण्णासाहेब मारोतराव शिंदे, जन माहिती अधिकारी तथा जिल्हा पुरवठा अधिकारी, जालना (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी क्रमांक ४ असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, जालना (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी क्रमांक ४ असे संबोधण्यात येईल) यांचे प्रतिनिधी, श्री. लिंबचंद परशराम राठोड, प्र.सहायक जिल्हा पुरवठा अधिकारी, जन माहिती अधिकारी क्र.५ तथा जिल्हा पुरवठा अधिकारी, औरंगाबाद (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी क्रमांक ५ असे संबोधण्यात येईल) यांचे प्रतिनिधी व जन अपिलीय अधिकारी क्र.५ तथा अपर जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांचे प्रतिनिधी (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी क्रमांक ५ असे संबोधण्यात येईल), श्री. किशोर अवचितराव देशमुख, जन माहिती अधिकारी क्र. ६ तथा नायब तहसीलदार (पुरवठा) तहसील कार्यालय, परभणी (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी क्रमांक ६ असे संबोधण्यात येईल), श्री. एस.एन.जमादार, जन माहिती अधिकारी क्र. ७ तथा तहसीलदार, जिंतूर जि.परभणी (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी क्र. ७ असे संबोधण्यात येईल), श्रीमती अरुणा गणेशराव संगेवार , जन माहिती अधिकारी क्र.८ तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, वसमत, जि.हिंगोली (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी क्र. ८ असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, वसमत जि.हिंगोली (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी क्रमांक ८ असे संबोधण्यात येईल) यांच्या प्रतिनिधी, सौ. विमल राघव भालेराव, ना.त.पुरवठा, जन माहिती अधिकारी क्र. ९ तथा तहसीलदार, हिंगोली, जि.हिंगोली यांच्या प्रतिनिधी (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी क्र. ९ असे संबोधण्यात येईल), श्री. सुभान दत्तात्रय गिरी, जन माहिती अधिकारी क्र.१० तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, उमरी जि. नांदेड (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी क्र.१० असे संबोधण्यात येईल), श्री. प्रदीपसिंह केशवसिंह ठाकुर, जन माहिती अधिकारी क्र. ११ तथा नायब तहसीलदार (पुरवठा) तहसील कार्यालय, मुखेड जि.नांदेड ( यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी क्र. ११

असे संबोधण्यात येईल), श्री. जयराम सिताराम पवार,जन अपिलीय अधिकारी क्र.६ तथा तहसीलदार, परभणी (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी क्र.६ असे संबोधण्यात येईल) श्री. रमेश सायन्ना मुंडलोड, जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, उमरी (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी क्र. १० असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत, तर जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, सेलू जि.परभणी (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी क्र. ७ असे संबोधण्यात येईल), जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, हिंगोली (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी क्र.९ असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, मुखेड जि.नांदेड (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी क्र. ११ असे संबोधण्यात येईल) हे गैरहजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी क्रमांक १,२,३,४,५,१० व ११ यांच्याकडून दिनांक २०.३.२००७ रोजीच्या स्वतंत्र अर्जाद्वारे, जन माहिती अधिकारी क्रमांक ६ व ७ यांच्याकडून दिनांक ०१.०५.२००७ रोजीच्या स्वतंत्र अर्जाद्वारे व जन माहिती अधिकारी क्रमांक ८ व ९ यांच्याकडून दिनांक ०७.०५.२००७ रोजीच्या स्वतंत्र अर्जाद्वारे त्यांच्या कार्यक्षेत्रातील रॉकेल विक्रेत्यांना विविध कालावधीसाठी केलेल्या रॉकेलच्या नियतनाचा तपशील व इतर माहिती खालीलप्रमाणे मागितली होती.

१. १.१ जन माहिती अधिकारी क्रमांक १-प्रथम अर्ज दिनांक २०.०३.२००७ - माहिती संबंधित कालावधी -०१.०१.२००७ ते २०.३.२००७

"उस्मानाबाद जिल्हयातील एकूण घाऊक रॉकेल विक्रेते व अर्धघाऊक रॉकेल विक्रेते यांचे नांव, पत्ता व परवाना क्रमांक आणि फोन नंबर सहीत यादयांच्या सत्यप्रती तसेच त्यांना शासनाकडून मिळणारे रॉकेलकिती के.एल. प्रमाणात आहे याचा तपशीलवार माहितीच्या सत्यप्रती मिळणेबाबत."

१.२ जन माहिती अधिकारी क्रमांक ६- प्रथम अर्ज दिनांक ०१.०५.२००७ - माहिती संबंधित कालावधी ०१.०४.२००४ ते ३०.०४.२००७ पर्यंत

" परभणी तालुक्यातील एकूण अर्धघाऊक रॉकेल विक्रेते १) द्वारकादास रामकृष्ण झरी ता. परभणी (२) अझरोदीन मझरोदीन इनामदार लोहगाव (३) मे. एम.डब्ल्यू. मिश्रीकोटकर परभणी (४) मे. उमेदमल भिकुलाल परभणी या चार अर्धघाऊक रॉकेल विक्रेत्यांना शासनाकडून दिल्या गेलेल्या रॉकेलच्या के.एल.प्रमाणे रॉकेलच्या वितरण व स्टॉक रजिस्टराच्या सत्यप्रती तसेच त्यांना संलग्न असलेले किरकोळ रॉकेल परवानेधार यांना दिल्या गेलेल्या पावत्यांच्या सत्यप्रती तसेच किरकोळ रॉकेल परवानेधारक यांना केलेल्या रॉकेलचे वितरण व स्टॉक रजिस्टराच्या सत्यप्रती (किरकोळ रॉकेल परवानेधारकांचे) तसेच वरील अर्धघाऊक रॉकेल विक्रेत्यांना शासनाकडुन दिल्या गेलेल्या रॉकेल टॅन्करच्या पोच पावत्यांच्या सत्यप्रती मिळणे बाबत."

२ जन माहिती अधिकारी क्रमांक २, ३,४ व ५ यांचेकडून दिनांक २०.०३.२००७ रोजीच्या स्वतंत्र अर्जान्वये, ०१.०१.२००७ ते २०.०३.२००७ या कालावधीची अनुक्रमांक १.१ प्रमाणे त्यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधित माहिती मागितली होती..

३ जन माहिती अधिकारी क्रमांक ७ यांचेकडून प्रथम अर्ज दिनांक ०१-०५-२००७ अन्वये दि. ०१.०४ २००४ ते ३०.०४.२००७ या कालावधीची वरील अनुक्रमांक १.२ प्रमाणे त्यांचे कार्यक्षेत्रातील खालील ८ अर्धघाऊक रॉकेल विक्रेत्यासंबंधी माहिती मागितली होती.

सदर माहिती जिंतुर तालुक्यातील अर्धघाऊक रॉकेल विक्रेते बी.एन.कुलकर्णी, परवाना क्र. ९४/पुरवठा/केईआर-२, व्ही.टी.पुराणिक, परवाना क्र. ५/९४, जी.आर.तोष्णीवाल, परवाना क्र. सब डीलर १/८१, शिवनाथ चिमाजी डाके, परवाना क्र. सब डीलर १/९३, शिल्पा ऑईल डेपो येलदरी, परवाना क्र.३/९४, मे. बालाजी किराणा बोरी, परवाना क्र. ३/९४, सुभाषचंद्र किशोरीमल डोसी, सब डीलर, परवाना क्र. ६/९४, गोविंद तुकाराम कोकडवार सब डीलर, परवाना क्र.१/८९ यांचेशी संबंधित होती.

४. जन माहिती अधिकारी क्र. ८ यांना प्रथम अर्ज दिनांक ०७.०५.२००७ अन्वये दि. ०१.०४.२००० ते ३०.०४.२००७ या कालावधीची वरील अनुक्रमांक १.२ प्रमाणे माहिती मागितली होती.

सदर माहिती वसमत तालुक्यातील अर्धघाऊक रॉकेल विक्रेते उमेदमल भिकुलाल व वसमत ऑईल एजंसी यांचेशी संबंधित होती.

५. जन माहिती अधिकारी क्र. ९ यांना प्रथम अर्ज दिनांक ०७.०५.००७ अन्वये दिनांक ०१.०४.२००० ते ३०.०४.२००७ या कालावधीची वरील अनुक्रमांक १.२ प्रमाणे माहिती मागितली होती.

सदर माहिती हिंगोली तालुक्यातील ६ अर्धघाऊक रॉकेल विक्रेते बी.टी.खुराणा, एम.बी.राठोड, ए.पी.पटेल अँड कंपनी, सुभाष चौधरी अँड कंपनी, राजस्थान ट्रेडींग कंपनी व रमेशचंद्र मोहनलाल कन्हेरगाव यांचेशी संबंधित होती.

६. जन माहिती अधिकारी क्र. १० यांना प्रथम अर्ज दि. २०.३.२००७ अन्वये दिनांक ०१.०४.२००५ ते मार्च, २००७ पर्यंत या कालावधीची वरील अनुक्रमांक १.२ प्रमाणे माहिती मागितली होती.

सदर माहिती उमरी तालुक्यातील अर्धघाऊक रॉकेल विक्रेते अनिल रामराव गुंडावार, मोहन दिगांबर उत्तरवार, श्रीमती जमुनाबाई देवाजी येमेवार यांचेशी संबंधित होती.

७. जन माहिती अधिकारी क्र.११ यांना प्रथम अर्ज दि. २०.०३.२००७ अन्वये दि. १.०४.२००५ ते मार्च, २००७ पर्यंतच्या कालावधीची वरील अनुक्रमांक १.२ प्रमाणे माहिती मागितली होती.

सदर माहिती मुखेड तालुक्यातील अर्धघाऊक रॉकेल विक्रेते लक्ष्मीकांत बालाजी चौधरी, नंदकुमार माधवराव मडगुलवार, दिपक गणपतराव प्रेमलवाड, उत्तम किशन पंदीलवार यांचेशी संबंधित होती.

अपिलार्थीने उपरोक्त सर्व अर्जांद्वारे मागितलेली माहिती साधारण टपालाद्वारे अपेक्षिली होती.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी उपलब्ध कागदपत्रांची तपासणी केली असता खालील बाबी आढळून आल्या.

जन माहिती अधिकारी क्र. १,४,५,७,१० व ११ यांनी अपिलार्थीच्या प्रथम अर्जास अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत प्रथम प्रतिसाद दिल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येते.

जन माहिती अधिकारी क्र.१ यांनी त्यांच्याकडील दि. ९.४.२००७ रोजीच्या पत्रान्वये व दि. २१.४.२००७ रोजीच्या स्मरणपत्रान्वये अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. १५७२/- भरण्याचे सूचित केले, जन माहिती अधिकारी क्र. ४ यांनी त्यांच्याकडील दि. ४.४.२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क भरण्यास कळविले. तथापि सदर पत्रामध्ये अपिलार्थीस देण्यात येणाऱ्या माहितीच्या संभावित पृष्ठांची संख्या, प्रतिपृष्ठ दर व एकूण शुल्क याचा तपशील दिल्याचे दिसून येत नाही. जन माहिती अधिकारी क्र.५ यांनी दि. २९.३.२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस त्यांच्या प्रथम अर्जासंदर्भात दि. २.४.२००७ रोजी सुनावणीस हजर राहणेबाबत कळविले व त्यानंतर त्यांच्याकडील दि. २५.४.२००७ रोजीच्या पत्रान्वये माहिती पाठविल्याचे दिसून येते. जन माहिती अधिकारी क्र. ७ यांनी त्यांच्याकडील दि. १९.५.२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. २३०४/- भरण्याचे सूचित केले. सदर पत्रामध्ये त्यांनी अपिलार्थीस देण्यात येणाऱ्या माहितीच्या एकूण पृष्ठांची संख्या व प्रतिपृष्ठ दर कळविल्याचे दिसून येते. जन माहिती अधिकारी क्र.१० यांनी त्यांच्याकडील दि. २६.३.२००७ रोजीच्या पत्रान्वये संबंधित अर्धघाऊक व किरकोळ विक्रेत्यांकडून अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या माहितीच्या पृष्ठसंख्येची विचारणा करुन हेच पत्र अपिलार्थीस माहितीपोटीचे शुल्क भरणेबाबत अग्रेषित केले. अपिलार्थीस या पत्राद्वारे शुल्क भरावयास कळविताना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांना देण्यात येणाऱ्या माहितीच्या संभावित पृष्ठांची एकूण संख्या माहित असणे शक्य नसल्याने, कारण त्यांनी याच पत्राद्वारे अर्धघाऊक व किरकोळ विक्रेत्यांकडून माहितीच्या पृष्ठांची विचारणा केली आहे, साहजिकच त्यांच्याकडे ही माहिती देखील त्यावेळी तयार नसेल, हे उघड असूनही त्यांनी कशाच्या

आधारे अपिलार्थीस माहितीपोटीचे शुल्क भरण्याचे सूचित केले, याचा बोध होत नाही. जन माहिती अधिकारी क्र. ११ यांनी त्यांच्याकडील दि. १२.४.२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस माहिती पाठविल्याचे दिसून येते. तर जन माहिती अधिकारी क्र. २,३,६,८ व ९ यांनी अपिलार्थीच्या प्रथम अर्जास अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येत नाही. यापैकी जन माहिती अधिकारी क्र. ३ व ८ यांनी अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज त्यांच्या कार्यालयात प्राप्त झाला नसल्याचे आयोगासमोर सांगितले.

काही जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत मिळालेल्या प्रतिसादाने तर उर्वरित जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न मिळाल्याने, व्यथित होऊन अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) संबंधित जन अपिलीय अधिकारी क्र. १ यांच्याकडे दि. २४.०५.२००७ रोजी, जन अपिलीय अधिकारी क्र. २ यांच्याकडे दि. ५.५.२००७ रोजी, जन अपिलीय अधिकारी क्र. ३ व ४ यांच्याकडे स्वतंत्ररित्या दि. ४.५.२००७ रोजी, जन अपिलीय अधिकारी क्र.५ यांच्याकडे दि. २६.४.२००७ रोजी, जन अपिलीय अधिकारी क्र. ६,७,८ व ९ यांच्याकडे स्वतंत्ररित्या दि. १५.०६.२००७ रोजी व जन अपिलीय अधिकारी क्र. १० व ११ यांच्याकडे स्वतंत्ररित्या दि.३०.४.२००७ रोजी प्रथम अपील केल्याचे दिसून येते.

जन अपिलीय अधिकारी क्र.१ यांनी त्यांच्याकडील दि. ८.६.२००७ रोजीच्या आदेशान्वये जन माहिती अधिकारी यांनी सूचित करुनही अपिलार्थीने माहितीपोटीचे आवश्यक ते शुल्क न भरल्याने अपिलार्थीचे अपील फेटाळले व जन अपिलीय अधिकारी क्र. ६ यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर दि. १०.७.२००७ रोजी सुनावणी घेऊन त्यांच्याकडील दि. १४.०७.२००७ रोजीच्या आदेशान्वये अपिलार्थीने मागितलेल्या माहितीसंदर्भात प्रमाणाबाहेर साधनसामग्री वळवावी लागत असल्याचे नमूद करुन

अपिलार्थीचे अपील निकाली काढले असल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येते.

जन अपिलीय अधिकारी क्र.२,३,४,५,७,८,९,१० व ११ यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर कोणत्याही प्रकारे सुनावणी घेतल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येत नाही. तथापि जन अपिलीय अधिकारी क्र.२,३,७ व ११ यांनी त्यांच्याकडे अपिलार्थीचे प्रथम अपील प्राप्त न झाल्याचे आयोगास सांगितले, जन अपिलीय अधिकारी क्र.४ यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलासंदर्भात त्यांना त्यांच्याकडील दि. २१.५.२००७ रोजीच्या पत्रान्वये माहितीपोटीचे शुल्क रु. १६ भरण्याचे सूचित केले, तर जन अपिलीय अधिकारी क्र. ८ यांनी त्यांच्या कार्यालयास अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज प्राप्त न झाल्याने, अपिलार्थीचा त्यांना प्राप्त झालेला प्रथम अपील अर्ज हाच अपिलार्थीचा मूळ माहितीसाठीचा अर्ज समजून त्यांच्याकडील दि. २५.७.२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस आवश्यक ती फी भरुन माहिती घेऊन जाण्याचे कळविले.जन अपिलीय अधिकारी क्र.१० यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर दि. २८.५.२००७ रोजी सुनावणी ठेवल्याचे अपिलार्थीस त्यांच्याकडील दि. १८.५.२००७ व १९.५.२००७ रोजीच्या पत्रान्वये कळविले परंतु अपिलार्थी गैरहजर असल्यामुळे सुनावणी न घेता, दि. २५.५.२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेली माहिती विनामूल्य घेऊन जाण्याचे कळविल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येत आहे.

जन अपिलीय अधिकारी क्र. ५ व ९ यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर कोणत्याही प्रकारे सुनावणी घेतल्याचे अथवा या संदर्भात अपिलार्थीशी कोणताही पत्रव्यवहार केल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येत नाही.

जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून प्राप्त निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. २४.७.२००७ अन्वये तीन, दि. २०.६.२००७ अन्वये चार, दि. २६.१०.२००७ अन्वये

तीन व दि. ११.०९.२००७ अन्वये एक अशी एकूण अकरा स्वतंत्र द्वितीय अपीले दाखल केली आहेत.

या द्वितीय अपील अर्जांमध्ये त्यांनी, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना जास्तीचे शुल्क भरण्यास कळविले, मागितलेली माहिती विहित मुदतीत दिली नाही, जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपिलाची सुनावणी घेऊन निर्णय दिला नाही, अशी कारणे संबंधित द्वितीय अपील करण्याची कारणे म्हणून नमूद केली आहेत.

अपिलार्थी यांनी सर्व अपिलासंदर्भात असा युक्तिवाद केला की, जन माहिती अधिकारी क्र.१ यांनी दि. ९.४.२००७ व २१.४.२००७ रोजीच्या पत्रान्वये माहितीपोटीचे आकारलेले शुल्क रु.१५७२/- हे जास्तीचे असून त्यांनी याबाबत जन माहिती अधिकारी यांना त्यांच्याकडील दि. १६.०४.२००७ रोजीच्या पत्रान्वये देखील तसे कळविले होते. त्यांनी मागणी केलेली माहिती फक्त चार ते पाच पृष्ठांची आहे. जन माहिती अधिकारी क्र.२ यांनी दि. २८.३.२००७ रोजी तहसीलदार, नांदेड यांचेमार्फत माहितीपोटीचे शुल्क रु. ६२ भरण्यासाठी कळविलेले पत्र, त्यांना प्राप्त न झाल्याने ते शुल्क भरु शकले नाहीत. जन माहिती अधिकारी क्र. ३ व ४ यांच्याकडून त्यांच्या मूळ अर्जास कोणताही प्रतिसाद न मिळाल्याने त्यांनी आर.पी.ए.डी. (नोंदणीकृत टपाल) द्वारे प्रथम अपील दाखल केले. तथापि याची कोणतीही दखल घेतली नाही तसेच त्यांना कोणतीही माहिती प्राप्त झाली नाही. जन माहिती अधिकारी क्र.५ यांच्याकडे केलेल्या माहितीच्या मूळ अर्जावर माहिती देण्याऐवजी त्यांनी सुनावणी ठेवल्याचे कळवून त्यांची दिशाभूल केली, तसेच त्यांच्याकडून आजपावेतो कोणतीही माहिती प्राप्त झाली नाही. जन माहिती अधिकारी क्र. ६ यांच्याकडील दि. ७.७.२००७ रोजीच्या पत्रावरील, दि. ७.७.२००७ रोजी पर्यंतची अद्ययावत माहिती मिळाली असल्याप्रीत्यर्थ केलेली सही त्यांची नाही. जन माहिती अधिकारी क्र. ८ यांना त्यांचा मूळ अर्ज प्राप्त झाला नसल्याचे त्यांचे म्हणणे त्यांना मान्य नाही. सदर अर्ज त्यांनी त्यांच्या कार्यालयास अंडर सर्टीफिकेट ऑफ पोस्टींगने पाठविला आहे. याप्रीत्यर्थ त्यांनी पोस्टाची पावती आयोगास दाखविली.

जन माहिती अधिकारी क्र.९ यांनी दि. १२.०६.२००७ अशी तारीख लिहिलेले पत्र त्यांनी दि. १९.०६.२००७ रोजी त्यांच्या कार्यालयातून म्हणजे अधिनियमाद्वारे विहित केलेली मुदत उलटून गेल्यानंतर पाठविले आहे. जन माहिती अधिकारी क्र. १० यांच्याकडून माहिती न मिळाल्याने त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १९.०५.२००७ रोजीच्या पत्रान्वये दि. २८.०५.२००७ रोजी सुनावणी ठेवल्याचे त्यांना कळविले, त्यावेळी त्यांनी त्यांच्याकडील दि. २८.०५.२००७ रोजीच्या पत्रान्वये त्यांच्या बहिणीची प्रकृती चिंताजनक असल्याने व ते औषधोपचारासाठी मुंबईस गेले असल्याने सुनावणीस उपस्थित राहू शकत नसल्याचे त्यांना कळविले होते. जन माहिती अधिकारी क्र. ११ यांनी दि. १२.४.२००७ रोजीच्या पत्रान्वये पाठविलेली माहिती त्यांना मिळाली नाही तसेच त्यांचा प्रथम अपील अर्ज जन अपिलीय अधिकारी क्र. ११ यांच्याकडे प्राप्त झाला नाही, असे जन अपिलीय अधिकारी यांचे म्हणणे चुकीचे आहे, कारण सदर अपील त्यांनी रजिस्टर्ड टपालाद्वारे पाठविले आहे.

सर्व जन माहिती अधिकारी यांनी अनुक्रमे त्यांच्याकडील माहितीसंदर्भात केलेला युक्तिवाद पुढीलप्रमाणे आहे-

१) अपील क्र. १५४८ संदर्भात जन माहिती अधिकारी क्र १ यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी दि. ९.४.२००७ व दि. २१.४.२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस माहितीपोटीचे एकूण ७८६ पृष्ठांसाठीचे शुल्क रु. १५७२ भरण्याचे सूचित केले होते. तथापि अपिलार्थी यांनी शुल्क न भरल्याने त्यांना माहिती देण्यात आली नाही. अपिलार्थीने त्यांच्या अर्जामध्ये नमूद केलेल्या तपशीलानुसार माहिती त्यांच्या कार्यालयात उपलब्ध नसल्याने, उपलब्ध नोंदवहीच्या संबंधित सर्व पृष्ठांची संख्या लक्षात घेऊन त्यांनी हे शुल्क कळविले होते. तसेच जन अपिलीय अधिकारी यांनीदेखील दि. ८.६.२००७ रोजीच्या आदेशान्वये याच कारणावरुन अपिलार्थीचे अपील फेटाळले आहे.तथापि अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपैकी घाऊक रॉकेल विक्रेते व अर्धघाऊक रॉकेल विक्रेते यांचे फोननंबर वगळता उर्वरित माहिती ही दहा ते पंधरा पृष्ठांच्या आसपास असल्याचे निदर्शनास आणून

दिल्यानंतर त्यांनी अपिलार्थीने मागितलेली माहिती दहा दिवसांच्या आत विनामूल्य देण्याचे मान्य केले.

२) अपील क्र. १५४९ संदर्भात जन माहिती अधिकारी क्र.२ यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने दि. २०.३.२००७ अन्वये मागणी केलेल्या माहितीसाठी रु. ६२ इतकी फीस चलनाने जमा करणेबाबत दि. २८.३.२००७ रोजीच्या पत्रान्वये तहसीलदार, नांदेड यांचेमार्फत त्यांना कळविण्यात आले होते. तथापि अपिलार्थीने शुल्क न भरल्याने दि. २०.६.२००७ रोजीच्या पत्रान्वये त्यांना याबाबत पुन्हा कळविण्यात आले. अपिलार्थीचा प्रथम अपील अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झालेला नाही. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे तयार असून ते ती आता अपिलार्थीस विनामूल्य देण्यास तयार आहेत.

३) अपील क्र. १५५० संदर्भात जन माहिती अधिकारी क्र. ३ यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज व प्रथम अपील अर्ज त्यांच्या कार्यालयास प्राप्त झालेले नाहीत. आयोगाकडील सुनावणी नोटीससोबत प्राप्त झालेल्या मूळ अर्ज व प्रथम अपिलाच्या प्रतींनंतर त्यांना याबाबत प्रथमतः कळाले. त्यानुसार त्यांनी माहिती तयार केली असून ते ती अपिलार्थीस विनामूल्य देण्यास तयार आहेत.

४) अपील क्र. १५५१ संदर्भात जन माहिती अधिकारी क्र. ४ यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीचा प्रथम अर्ज त्यांना दि. ३०.३.२००७ रोजी प्राप्त झाला. यानंतर त्यांनी त्यांच्याकडील दि. ४.४.२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस माहितीपोटीचे शुल्क भरण्याचे कळविले. सदर पत्र त्यांनी अपिलार्थीस रजिस्टर्ड पोस्टाने पाठविले आहे. तथापि शुल्क न भरताच अपिलार्थीने दि. ४.५.२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेतली नाही. तथापि दि. २१.५.२००७ रोजीच्या पत्रान्वये माहितीपोटीचे शुल्क रु. १६/- भरणेबाबत अपिलार्थीस सूचित केले.

५) अपील क्र. १५५२ संदर्भात जन माहिती अधिकारी क्र. ५ यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, दि. ०२.०४.२००७ रोजीच्या पत्रान्वये त्यांनी अपिलार्थीच्या प्रथम अर्जाप्रमाणे त्यांनी मागितलेली माहिती त्यांना पाठविण्यात आलेली आहे.

अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी झालेली नाही. अपिलार्थीने सदर माहिती मिळाली नसल्याचे सांगितल्यावर त्यांनी ती पुन्हा त्यांना विनामूल्य देण्याचे आयोगासमोर मान्य केले.

६) अपील क्र. १५५३ संदर्भात जन माहिती अधिकारी क्र. ६ यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही मोठया स्वरुपात असल्याने व सर्व माहिती त्यांच्याकडे उपलब्ध नसल्याने, तसेच अर्धघाऊक रॉकेल विक्रेत्यांसंबंधी विचारलेली माहिती त्यांच्याकडून प्राप्त करुन घेऊन ती अपिलार्थीस एकत्रितरित्या द्यावयाची असल्याने त्यांनी दि. ५.६.२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीकडून मुदत वाढवून देणेबाबत पत्राद्वारे कळविले. परंतु त्यांच्या या पत्रास अपिलार्थीने कोणताच प्रतिसाद दिला नाही व प्रथम अपील सादर केले. या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी क्र. ६ यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी अपिलार्थीच्या अपिलाच्या दि. २०.६.२००७ रोजी ठेवलेल्या सुनावणीस अपिलार्थी गैरहजर राहिल्याने त्यांनी पुन्हा दि. १०.७.२००७ रोजी सुनावणी ठेवली तथापि सदर सुनावणीसही अपिलार्थी गैरहजर होते. त्यामुळे त्यांनी दि. १४.७.२००७ रोजीच्या आदेशान्वये अपिलार्थीस त्यांनी दि. २०.३.२००७ रोजीच्या अर्जाद्वारे मागितलेली माहिती, अपिलार्थी यांनी त्यांच्या दि. १०.२.२००७ रोजीच्या पूर्वीच्या अर्जाच्या अनुषंगाने दि. ७.७.२००७ रोजी देण्यात आली असल्यामुळे, व तसे त्यांनी लिहून दिल्याने सदर माहिती कार्यालयात पाहण्याचे सूचित केले. जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांचे दि. ७.७.२००७ रोजीचे पत्र आयोगास दाखविले, यामध्ये अपिलार्थी यांनी दि.७.७.२००७ पर्यंतची अद्ययावत माहिती त्यांना मिळाल्याचे लेखी नमूद केलेले आहे. तथापि सदर पत्रावरील सही त्यांची नसल्याचे अपिलार्थीने आयोगास सांगितले.प्रस्तुत प्रकरणी मागितलेली माहिती न मिळाल्यामुळे व ती देणे आवश्यक असल्याचे सांगितल्यावर जन माहिती अधिकारी क्र. ६ यांनी टप्प्याटप्प्याने सर्व स्वस्त धान्य दुकानदारांना त्यांच्या कार्यालयात बोलावून घेऊन अपिलार्थीस तीस दिवसात विनामूल्य माहिती देण्याचे कबूल केले.

७) अपील क्र. १५५४ संदर्भात जन माहिती अधिकारी क्र. ७ यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीचा दि. १.५.२००७ रोजीचा अर्ज त्यांच्या कार्यालयात दि. ८.५.२००७ रोजी प्राप्त झाला. त्यानंतर त्यांनी त्यांच्याकडील दि.

१९.५.२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस माहितीपोटीचे शुल्क रु. २३०४ भरण्याचे सूचित केले, तथापि अपिलार्थीने सदर शुल्क भरलेले नाही. अपिलार्थीने दि. १५.६.२००७ अन्वये दाखल केलेले प्रथम अपील तहसीलदार, जिंतूर यांच्याकडेच दाखल केले, तथापि उपविभागीय अधिकारी, सेलू हे जन अपिलीय अधिकारी असल्याने सदर अपिलावर सुनावणी झाली नाही व ते प्रलंबित आहे. अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेली माहिती दाखविण्यास ते तयार असून, ३० दिवसात त्यांनी मागणी केलेली माहिती देण्यास तयार आहेत. अपिलार्थीने देखील जन माहिती अधिकारी यांच्या या म्हणण्यास सहमती दर्शविली.

८) अपील क्र. १५५५ संदर्भात जन माहिती अधिकारी क्र. ८ यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीचा मूळ माहितीचा अर्ज त्यांना प्राप्त झालेला नाही, तथापि अपिलार्थीने सदर अर्ज जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयास अंडर सर्टीफिकेट ऑफ पोस्टींगने पाठविल्याच्या पोस्टाच्या पावतीचा पुरावा आयोगासमोर सादर केला. जन माहिती अधिकारी यांनी पुढे असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीच्या दि. १५.६.२००७ रोजीच्या अपिलासोबत त्यांना प्रथम अर्जाची प्रत प्राप्त झाली व जन अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपील अर्ज मूळ माहितीचा अर्ज समजून दि. २५.७.२००७ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस माहितीपोटी शुल्क भरुन माहिती घेऊन जाण्याबद्दल कळविले, तथापि अपिलार्थीने दि. ४.८.२००७ रोजी मोफत माहिती देणेबाबत अर्ज केला असता, त्यांना दि. ९.८.२००७ अन्वये फीस भरुन माहिती घेऊन जाण्याबाबत कळविण्यात आले.तथापि आता त्यांचे कार्यालयात सदर माहिती तीस दिवसात दाखविण्याचे कबूल केले.

९) अपील क्र. १५५६ संदर्भात जन माहिती अधिकारी क्र. ९ यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीचा दि. ७.५.२००७ रोजीचा अर्ज त्यांच्या कार्यालयास दि. १६.५.२००७ रोजी प्राप्त झाला. त्या अनुषंगाने त्यांनी दि. १२.६.२००७ रोजीच्या पत्रान्वये माहितीच्या अंदाजित १०,२०० प्रतींसाठी रु. २०,४०० भरण्याचे अपिलार्थीस सूचित केले. तथापि अपिलार्थीने सदर पत्र दि. १९.६.२००७ रोजी जन

माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातून निर्गमित झाल्याचे आयोगास निदर्शनास आणून दिले. अपिलार्थीने दि. १५.६.२००७ रोजी जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार हिंगोली यांचेकडेच प्रथम अपील केले. तथापि उपविभागीय अधिकारी, हिंगोली हे या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी असून, या अपिलावर सुनावणी झाली नाही.

१०) अपील क्र. १५५७ संदर्भात जन माहिती अधिकारी क्र.१० व जन अपिलीय अधिकारी क्र. १० यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीस दि. २६.०३.२००७ रोजीच्या पत्रान्वये माहितीसाठीचे शुल्क भरणेबाबत कळविण्यात आले. तथापि त्यांनी सदर शुल्क भरले नाही. दि. २५.५.२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस विनामूल्य माहिती घेऊन जाणेबाबत कळविले तथापि ते याकरिता कार्यालयात उपस्थित झाले नाहीत. अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर दि. २८.०५.२००७ रोजी सुनावणी ठेवली होती. तथापि अपिलार्थी गैरहजर राहिल्याने सुनावणी घेतली नाही. ते आता अपिलार्थीस तीस दिवसांच्या आत विनामूल्य माहिती देण्यास तयार आहेत.

११) अपील क्र. १५५८ संदर्भात जन माहिती अधिकारी क्र.११ यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थी यांच्या अर्जासंदर्भात त्यांनी दि. १२.०४.२००७ रोजीच्या पत्रान्वये माहिती अपिलार्थीस पाठविली आहे. अपिलार्थीचे दि. ३०.०४.२००७ रोजीचे प्रथम अपील त्यांच्याकडे प्राप्त झालेले नाही. अपिलार्थीने सदर अपील रजिस्टर्ड पोस्टाने पाठविल्याची पावती आयोगास सादर केली. त्यामुळे जन अपिलीय अधिकारी यांचे म्हणणे अमान्य करण्यात येत आहे. आता जन माहिती अधिकारी अपिलार्थीस तीस दिवसांच्या आत विनामूल्य माहिती देण्यास तयार आहेत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणांमध्ये असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी क्र. १ ते ५ यांच्याकडे मागितलेल्या माहितीपैकी परवानेधारकांचे फोननंबर ही खाजगी स्वरुपाची माहिती वगळता उर्वरित माहिती अपिलार्थीस अधिनियमातील तरतुदीनुसार देय ठरते.

जन माहिती अधिकारी क्र.१ यांनी अपिलार्थीच्या प्रथम अर्जास अनुसरुन द्यावयाच्या माहितीपोटीचे शुल्क त्यांना जास्तीचे कळविल्याचे सिध्द होत आहे. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जवळपास १०-१५ पृष्ठांची असल्याने त्यांना ७८६ पृष्ठांकरिताचे रु. १५५२/- इतके शुल्क त्यांना कळविणे, ही त्यांची कृती चुकीची आहे.

जन माहिती अधिकारी क्र. २ व ३ यांच्याकडून अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती प्राप्त झाली नाही. जन माहिती अधिकारी क्र. ३ यांनी अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज व प्रथम अपील त्यांच्या कार्यालयात अप्राप्त असल्याचे आपल्या युक्तिवादात सांगितले, तर जन माहिती अधिकारी क्र. ४ यांनी अपिलार्थीस अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत म्हणजे त्यांच्याकडील दि. ४.४.२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद दिल्याचे आढळले. तथापि सदर पत्रामध्ये त्यांनी अपिलार्थीस माहितीच्या संभावित पृष्ठांची संख्या व प्रतिपृष्ठ दर याचा तपशील दिला नाही. त्यामुळे सदर पत्र अवैध ठरते. जन माहिती अधिकारी क्र. ५ यांनी दि. २५.४.२००७ रोजीच्या पत्रान्वये पाठविलेली माहिती अपिलार्थीस प्राप्त न झाल्याचे त्यांनी सांगताच ती पुन्हा विनामूल्य त्यांना पुरविण्याचे त्यांनी कबूल केले आहे.

जन माहिती अधिकारी क्र. ६ ते ११ यांच्याकडे अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीचे अवलोकन करता, असे दिसून येते की, अपिलार्थीने मागितलेली संपूर्ण माहिती संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध नसते. या माहितीपैकी रॉकेल विक्रेत्यांना दिल्या गेलेल्या रॉकेल टॅन्करच्या पोच पावत्यांव्यतिरिक्त उर्वरित माहिती संबंधित अर्धघाऊक रॉकेल विक्रेते यांच्याकडेच उपलब्ध असते. यामुळे अपिलार्थीने मागितलेल्या माहितीचे स्वरुप व व्याप्ती मोठया प्रमाणात असल्याचे दिसून येते व अशाप्रकारची विस्तृत स्वरुपातील माहिती उपलब्ध करुन देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाकडे आर्थिक अनुदान तसेच पुरेसे मनुष्यबळ उपलब्ध नसते, असे आढळून आले आहे व त्यासंदर्भात अर्जदाराने माहिती मागताना तिच्या व्याप्तीवर

अथवा द्यावयाच्या पृष्ठसंख्येवर मर्यादा असणे, नितांत आवश्यक असल्याचे आयोगाचे मत आहे.

सदर संपूर्ण माहिती आता विनामूल्य अपिलार्थीस द्यावयाची झाल्यास संबंधित जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सांगितल्याप्रमाणे प्रत्येकी साधारणतः ५० ते ६० हजार रुपये खर्च असल्याने व इतका निधी त्यांच्याकडे उपलब्ध नसल्याने, व याकरिता शासनाकडून अनुदान उपलब्ध करुन घ्यावे लागेल. या सर्व प्रक्रियेमध्ये आणखी बराच कालावधी व्यपगत होण्याची शक्यता आहे. तसेच जन माहिती अधिकारी क्र.६ यांनी आपल्या युक्तिवादामध्ये या प्रकरणाशी संबंधित माहिती त्यांनी अपिलार्थीस एका वेगळया अर्जाच्या अनुषंगाने यापूर्वी पुरविण्यात आली असल्याचे सांगितले असून, तीच माहिती अपिलार्थीस पुन्हा पुरविण्याचे आदेशित करणे, वरील व्यवहार्य अडचण पाहता, आयोगास अव्यवहार्य वाटते. जन माहिती अधिकारी क्र. ६ यांनी अपिलार्थीने माहिती मिळाल्याप्रीत्यर्थ आयोगास दाखविलेल्या त्यांच्या दि. ७.७.२००७ च्या पत्राच्या प्रतीवरील सही व अपिलार्थीने सदर सही त्यांची नसल्याचे म्हणणे तपासून पाहण्यासाठी या प्रकरणांशी संबंधित कागदपत्रांचे अवलोकन करता, अपिलार्थी यांच्या सहयांमध्ये विसंगती असल्याचा जन माहिती अधिकारी यांचा मुद्दा सिध्द होत आहे. या सर्व बाबी विचारात घेऊन जन माहिती अधिकारी क्र. ६,८,९,१० व ११ यांना अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेली संपूर्ण माहिती हे आदेश निर्गमित होताच अपिलार्थीस तीस दिवसांच्या आत अवलोकन करण्यासाठी उपलब्ध करुन द्यावी, तर जन माहिती अधिकारी क्र.७ यांनी अपिलार्थीने माहितीपोटीचे आवश्यक शुल्क भरल्यानंतर त्यांना सदर माहिती सशुल्क उपलब्ध करुन द्यावी, असे आदेशित करण्यात येत आहे.

प्रसंगावशात्, या प्रकरणाच्या सुनावणीसाठी जिल्हा पुरवठा अधिकारी, उस्मानाबाद यांनी स्वतः अथवा सहायक जिल्हा पुरवठा अधिकारी अथवा त्यांचे सहायक माहिती अधिकारी यांना सुनावणीसाठी प्राधिकृत न करता जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयातील टंकलेखकास आयोगाकडे सुनावणीसाठी हजर राहण्यासाठी प्राधिकृत केले होते. जिल्हा पुरवठा अधिकारी,

उस्मानाबाद यांच्या अनुपस्थितीचे कारण विचारले असता, त्यांनी आयोगास असे सांगितले की, मंत्री, (कृषि) यांनी उस्मानाबाद येथे बैठक आयोजित केली असल्याने व त्यांनी जिल्हा पुरवठा अधिकारी, उस्मानाबाद यांना आयोगाच्या सुनावणीसाठी येऊ न दिल्यामुळे ते आयोगाच्या सुनावणीसाठी उपस्थित राहू शकले नाहीत. या मुद्यावर मुख्य सचिव यांना असे सूचित करण्यात येते की, त्यांनी आयोगाच्या सुनावणीसाठी हजर न राहण्याच्या, मंत्री महोदयांनी कृपया सूचना देऊ नयेत, असे संबंधित मंत्री महोदयांना अवगत करण्याची व्यवस्था करावी. त्याचबरोबर जिल्हा पुरवठा अधिकारी, उस्मानाबाद यांनी अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती उपलब्ध न करुन आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव व बेपवाई स्पष्ट केली असून स्वतःला अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीस पात्र ठरविले आहे. सबब सचिव(महसूल) यांना संबंधित जन माहिती अधिकारी तथा जिल्हा पुरवठा अधिकारी,उस्मानाबाद यांनी या प्रकरणी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभावाबद्दल व बेपवाईबद्दल त्यांच्यावर प्रचलित सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी क्र. १ ते ५ यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल परवानाधारकांचे फोन नंबर वगळता उर्वरित माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच दहा दिवसांच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१) अपील क्र. १५४८/०७, १५४९/०७, १५५०/०७, १५५१/०७, १५५२/०७ मान्य करण्यात येत आहेत.

२) अपील क्र. १५५३/०७, १५५५/०७, १५५६/०७, १५५७/०७ व १५५८/०७ निकाली काढण्यात येत आहेत.

३) अपील क्र. १५५४/०७ अंशतः मान्य करण्यात करण्यात येत आहे.

४) जन माहिती अधिकारी तथा जिल्हा पुरवठा अधिकारी, उस्मानाबाद (ज.मा.अ.क्र.१),लातूर (ज.मा.अ.क्र.२), बीड( ज.मा.अ.क्र.३),जालना (ज.मा.अ.क्र.४) व औरंगाबाद(ज.मा.अ.क्र.५) यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती (परवानाधारकांचे फोन नंबर वगळता) अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच दहा दिवसांचे आत विनामूल्य पुरवावी.

५) जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, परभणी (ज.मा.अ.क्र.६), वसमत जि.हिंगोली (ज.मा.अ.क्र.८), तहसीलदार,हिंगोली (ज.मा.अ.क्र.९), नायब तहसीलदार (पुरवठा) तहसील कार्यालय, उमरी जि. नांदेड (ज.मा.अ.क्र.१०) व मुखेड जि.नांदेड (ज.मा.अ.क्र.११) यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेली संपूर्ण माहिती हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत अवलोकन करण्यासाठी उपलब्ध करुन द्यावी व त्यातून आवश्यक ती माहिती अपिलार्थीस विनामूल्य पुरवावी.

६) जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, जिंतूर जि.परभणी (ज.मा.अ.क्र.७) यांनी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती, हे आदेश निर्गमित होताच दहा दिवसांच्या आत सशुल्क उपलब्ध करुन द्यावी.

७) सचिव(महसूल) यांना संबंधित जन माहिती अधिकारी तथा जिल्हा पुरवठा अधिकारी,उस्मानाबाद यांनी या प्रकरणी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभावाबद्दल व बेपवाईबद्दल त्यांच्यावर प्रचलित

सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : १४.०८.२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त ,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री.मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ रा. मिलकॉर्नर, बसस्टँड रोड नांदेड, जि.नांदेड

२ जन माहिती अधिकारी तथा जिल्हा पुरवठा अधिकारी,उस्मानाबाद (ज.मा.अ.क्र.१)यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन माहिती अधिकारी तथा जिल्हा पुरवठा अधिकारी, लातूर (ज.मा.अ.क्र.२) यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जन माहिती अधिकारी तथा जिल्हा पुरवठा अधिकारी, बीड यांना (ज.मा.अ.क्र.३)या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ जन माहिती अधिकारी तथा जिल्हा पुरवठा अधिकारी, जालना (ज.मा.अ.क्र.४)यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ जन माहिती अधिकारी तथा जिल्हा पुरवठा अधिकारी, औरंगाबाद (ज.मा.अ.क्र.५)यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

७ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय,परभणी (ज.मा.अ.क्र.६)यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

८ जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार,जिंतूर (ज.मा.अ.क्र.७) यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

९ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा),तहसील कार्यालय,वसमत,जि.हिंगोली (ज.मा.अ.क्र.८) यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

१० जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, हिंगोली (ज.मा.अ.क्र.९)यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

११ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील

कार्यालय,उमरी,जि.नांदेड (ज.मा.अ.क्र.१०)यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

१२ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा),तहसील कार्यालय,मुखेड,जि.नांदेड (ज.मा.अ.क्र.११) यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

१३ जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी,उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

१४ जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

१५ जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

१६ जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

१७ जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

१८ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, परभणी जि.परभणी यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

१९ जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, सेलू, जि.परभणी यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

२० जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार,वसमत, जि.हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

२१ जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

२२ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, उमरी, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

२३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, मुखेड, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

२४ सचिव महसूल,महसूल व वन विभाग,मंत्रालय, मुंबई यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

२५ मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय,मुंबई यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

२६ निर्णय नस्ती.